# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १८-०५-१९९२ ते दिनांक १९-११-१९९२**

**विषय क्र. १/१ ते विषय क्र. ८५/३**

**रजिष्टर क्र.११**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## सोमवार, दिनांक १८/५/९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**दिनांक १८/५/९२ रोजी सकाळी अंदाजे ११:२५ वाजता मा. महापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या अध्यक्षतेखाली मा. महापौर व उपमहापौर निवडीसाठी विशेष सर्वसाधारण सभा "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली.**

१) श्री. थोरात किशोर गोविंदराव
२) श्री. यादव अशोक सायन्ना
३) श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
४) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
५) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
८) श्री. भगुरे तुळशीराम छगन
९) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
१०) श्री. पाटील नरेंद्र यादवराव
११) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
१२) श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१३) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१४) श्री. ओक जयवंत केशवराव
१५) श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग
१६) श्री. वंजारे पीटर प्रभाकरराव
१७) सौ. दलाल लता श्रीनिवास
१८) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
१९) श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२०) श्री. छापरवाल रमेश नारायण
२१) श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२२) श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२३) डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
२४) श्री. मगर शंकर जिजाराम
२५) श्री. मानकापे नामदेवराव शामराव
२६) श्री. पैठणकर पांडूरंग भिमाजी
२७) श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
२८) श्री. वाघमारे सुदाम भानुदास
२९) श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
३०) श्री. अजिमखान दादामिया आ. रहेमान
३१) श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ
३२) श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव

३३) डॉ. काळे शांताराम यशवंत
३४) श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
३५) श्री. बारवाल गजानन रामकिसन
३६) श्री. गोडसे आनंद जगदिश
३७) श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
३८) श्री. जावळे प्रकाश शिवराम
३९) श्री. गाडे गंगाधर सुखदेव
४०) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
४१) श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
४२) श्री. परदेशी सुभाष शिवलाल
४३) श्री. नवपुते तुप्परु चंद्रभान

**विषय क्र. १/१ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) अन्वये मा. महापौर व मा. उपमहापौर यांची निवड करणे.

**संवाद :**

**श्री. नामदेव मानकापे** :
**श्री. अविनाश कुमावत** :
**श्री. चंद्रकांत खैरे** :
सभेची वेळ ११:०० ची होती परंतु अद्यापही सुरु झालेली नाही. वेळ जास्तीचा झाला आहे. निवडणुक प्रक्रियेला सुरुवात व्हावी.

**मा. महापौर** : निवडणूकीच्या प्रक्रियेला सुरु करण्यापूर्वी सभेला कोरम पूर्ण आहे काय?

**श्री. चंद्रकांत खैरे** : आता सभेला सुरुवात झालेली आहे आणि सभा तहकुब न करता पुढील प्रक्रिया चालू ठेवावी. आपण सभा वेळोवेळी तहकुब करु नये.

**मा. महापौर** : मी स्वतः सभा तहकुब करित नाही. परंतु सभागृहात कोरम नसल्यास नाईलाज होतो. म्हणून आपण काही वेळ वाट पाहू.

**श्री. चंद्रकांत खैरे** : केवळ १/२ तासासाठी सभा तहकुब करावी.

**श्री. अविनाश कुमावत** : आपण सर्वांचे महापौर आहात सर्वांना सोबत घेऊन चालावे.

**मा. महापौर** : एकदा सभेला सुरुवात झाल्यास मी कधीही सभा सोडन पळुन जात नाही. आतापर्यंत केवळ कोरम अभावी सभा तहकुब करावी लागली हे आपल्याला ज्ञात असेलच.

**श्री. नामेदव मानकापे** : मा. महापौर आपण पळून जाण्याचे जे शब्द उच्चारले ते शब्द परत घ्यावे.

**श्री. शंकर मगर** : आणि केवळ १/२ तासाचा अवधी देवून पुन्हा सभेला सुरुवात करण्यात यावी.

**श्री. चंद्रकांत खैरे** : मा. महापौर आपण १/२ तासाच्या कालावधी करिता सभा तहकुब करावी परंतु या सभागृहात आपण बाहेर जावू नये.

**मा. महापौर** : हि गणपुर्ती नसल्यामुळे स. सदस्य सभेसाठी येतील म्हणून त्यांची

वाट पाहण्यासाठी ही सभा सभागृहांच्या संमतीने १.०० वाजता घेण्यात येईल. (सभेला सुरुवात अंदाजे १:१० वाजता)

**मा. महापौर** : कोरम अभावी व गणपूर्ती दिसून येत नाही म्हणून ही सभा १ तासाकरिता तहकुब करण्यात येते. सभागृहाच्या संमतीने १ तासानंतर सभा घेण्यात येईल नंतरच्या सभेला सुरुवात घेऊन निवडणूक प्रक्रियेला सुरुवात करण्यात येईल.
(अंदाजे वेळ १:१५ वाजता)
(सभेला सुरुवात अंदाजे २:१५ वाजता)

**मा. सचिव** : आता महापौर उपमहापौर पदाची निवडणूक होत आहे. तत्पुर्वी महापौर पदासाठीज्य उमेदवारांनी आपआपले नामनिर्देशन फॉर्म भरलेले आहेत त्यांची नावे वाचून दाखवावी.

**मा. महापौर :** महापौर पदाच्या निवडणुकीसाठी ज्या ज्या उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केलेले आहेत, आणि ज्यांना फार्म परत (with draw) करावयाचे आहेत त्यासाठी ठिक ३:३० पर्यंतचा वेळेचा अवधी देण्यात येतो. (अंदाजे वेळ २:१५ वाजता)
(सभेला सुरुवात अंदाजे ३:४५ वातता)

**श्री. गजानन बारवाल :** महापौर पदाच्या निवडणुकीसाठीची फॉर्म परत (with draw) घेण्याची वेळ संपलेली असून आता कुणासही परवानगी देवू नये.

**मा. महापौर :** मी सभागृहाची परवानगी साठी विनंती करिता आहे की, सहा उमेदवारांनी महापौर पदासाठीचे फॉर्म परत (with draw) करण्यासाठी आणलेले असून ते स्विकारावे अन्यथा बॅलेट पेपर अधिक मोठा होईल यासाठी सर्वानुमते मंजुरी द्यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** ठिक आहे. ज्या सहा उमेदवाराचे महापौर पदाच्या निवडणुकीसाठीचे फार्म परत (with draw) करण्यासाठी आणलेले आहेत ती स्विकारण्यात यावी.

**श्री. नरेंद्र पाटील :** बॅलेट पेपरवर किती उमेदवारांची नावे आहेत ती नावे बॅलेट पेपरवर छापल्या नंतर जाहिर करावी.

**मा. महापौर :** बॅलेट पेपरवर अगोदरच नावे छापल्यास ती जास्तीची यादी होईल. करिता अगोदर फार्म परत (with draw) करुन नंतरच प्रोसिजरने नावे बॅलेट पेपरवरती छापल्या जातील. नंतर मतदान होईल.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** महापौर पदासाठी किती उमेदवारांनी आपले फार्म परत केले याची माहिती द्यावी आणि निवडणूक प्रक्रियेला सुरुवात व्हावी.

**मा. महापौर :** सचिवांनी याबाबतची माहिती द्यावी.

**मा. सचिव :** महापौर पदासाठी एकुण २१ (एकवीस) उमेदवारांनी आपले नामनिर्देशन फॉर्म दाखल केलेले होते. त्यापैकी १० (दहा) उमेदवारांनी फॉर्म परत (with draw) केलेले असून आता महापौर पदासाठी केवळ (अकरा) उमेदवार आहेत. (या सर्व उमेदवारांची नावे वाचून दाखविली.) सर्व श्री. १) अजिमखाँ दादामियाँ २) जहागिरदार अजिज, ३) जावेद हसन खान ४) जैस्वाल प्रदिप, ५) नारायण मोहन, ६) मिर्झा अनवर बेग, ७) मुजिब आलमशा खान, ८) मोहसीन अहमद, ९) यादव अशोक सायन्ना, १०) स. हुसैन स. अहमद, ११) संचेती चेनकरण.

**मा. महापौर :** महापौर पदाच्या निवडीच्या प्रक्रियेबाबत विधि सल्लागार यांनी माहिती द्यावी.

**विधी सल्लागार :** मा. महापौर पदाच्या निवडणूकीसाठी प्रक्रिया सुरु झाली असून नियम क्र. १९ व ४५ व ४७ अन्वये मतदान प्रक्रिया सुरु झालेली आहे. आणि आताच नामनिर्देशन फार्म परत घेतल्यामुळे एकुण ११ (अकरा) इच्छुक उमेदवार निवडणुकीसाठी उभे आहेत. याबाबत नियमाप्रमाणे जी तरतुद आहे ती मी सभागृहासमोर वाचून दाखवितो. प्रतयेक स.स. एक मत देण्याचा अधिकार राहिल. निवडणूकीत जर दोनच उमेदवार इच्छुक असतील तर त्याच्यपैकी ज्या उमेदवारास जास्त मते वडील तो निवडूण आला असे घोषित करण्यात येईल. निवडणूकीत दोनपेक्षा अधिक उमेदवार इच्छुक असतील तर ज्या इच्छुकाला सर्वात कमी मते पडली असतील तर ते नाव वगळण्यात येईल. आणि उरलेल्या इच्छुकामध्ये पुन्हा मतदान घेण्यात येईल. मा. महापौरांचे निर्णायक मत धरुन जर एखाद्या इच्छुकाला इतर सर्व इच्छुकांना मिळालेल्या संख्येच्या मतापेक्षा अधिक मते मिळाली असतील तर तो निवडूण आला असे घोषित करण्यात येईल. अशा मतदारास दोन किंवा अधिक इच्छुकांना मिळालेल्या मताची संख्या त्यांच्या लगतच्या इच्छुकापेक्षा कमी असेल तर त्याचे नाव वगळण्यात येऊन उरलेल्या इच्दुकामध्ये परत मतदान घेण्यात येईल. अशा मतदानास जर सर्व उमेदवारांना समान मते पडल्यास ही निवडणूक परत घेण्यात येईल.

**श्री. केशव सोनवणे :** आपल्याकडे अकरा सदस्य महापौर निवडणूकीच्या रिंगणात आहेत त्यापैकी क्रमवारीने १) ला २० मते मिळाली असतील आणि (२) ला १८ मते मिळाली असतील आणि (३) ला १६ अशा उतरत्या क्रमांकाने मते मिळाल्यास तर (१) आणि (२) वगळून म्हणजे या दोघात निवडणूक होऊन बाकीचे बाद ठरविले जाईल काय? याची माहिती द्यावी.

**विधि सल्लागार :** नाही. यामध्ये अशी पध्दत आहे, जर १९ उमेदवारापैकी एका उमेदवाराला १९ मते पडली, बाकीच्या सर्वांनी मिळून २९ मते पडली तर ३१ वाला निवडणूकीत निवडून आला असे घोषित होईल.

**श्री. केशव सोनवणे :** तशी इतिवृत्ता नोंद घ्यावी.

**मा. महापौर :** बॅलेट पेपर तयार करण्यासाठी किती कालावधी लागेल याची माहिती सचिवांनी द्यावी.

**मा. सचिव :** बॅलेट पेपर महापौर पदासाठी उभे असलेले उमेदवारांचे नावे छापण्याच्या प्रक्रियेसाठी कमीत कमी १ १/२ ते २ तासाचा अवधी लागेल.

**श्री. केशव सोनवणे :** दरवेळेस जो बॅलेट पेपरसाठी वेळ दिला जातो तोच वेळ देण्यात यावा.

**मा. महापौर :** (दिड तास) १ १/२ तासाचा अवधी बॅलेट पेपर तयार करण्यासाठी देण्यात येतो. (अंदाजे वेळ ४ वाजता)

(सभेला सुरुवात अंदाजे ५.३० वाजता)

**मा. महापौर :** निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होत आहे. ततपुर्वी स. सदस्यांना निवडणूकीसाठी नेमलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची नावे सांगावी आणि पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**मा. सचिव :** महापौर व उपमहापौर निवडणूक प्रक्रियेसाठी ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी काम पाहावयाचे आहेत त्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत -

(१) छाणनी अधिकारी - १. श्री. एन.ए. वाहुळ
२. श्री. जी.एस. हाशमी
(२) मतदान अधिकारी - १. श्री. शितोळे ए. बी.
२. श्री. जाधव व्ही.डी.
३. श्री. गंगावणे एम.एस.
(३) मतपेटीजवळ - १. श्री. जाधव गणेश
(४) इतिवृत्त संकलनासाठी - १. श्री. खोब्रागडे पी.के.
२. श्री. बाहेती एस.आर.

त्याचप्रमाणे महापौर पदासाठी उभे असलेल्या एकुण ११ (अकरा) उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.
सर्व श्री. - १) अजिमखाँ दादामियाँ २) नारायण मोहन ३) जहागिरदार अजिज, ४) जावेद हसन खान ५) जैस्वाल प्रदिप, ६) मिर्झा अनवर बेग, ७) मुजिब आलमशा खान, ८) मोहसीन अहमद, ९) यादव अशोक सायन्ना, १०) स. हुसैन स. अहमद, ११) संचेती चेनकरण. आता मतदान प्रक्रियेला सुरुवात होत आहे. वार्डवाईज स. सदस्यांची नावे पुकारण्यात येतील तेव्हा विनंती की, स. सदस्यांनी मतदानात भाग घ्यावा.

**श्री. अविनाश कुमावत** : मतदान करण्यासाठी किती वेळ देण्यात आला याची माहिती द्यावी.

**मा. सचिव** : मतदानाकरिता एक तासाचा अवधी देण्यात यावा.

**मा. महापौर** : मतदानासाठी एक तासाचा कालावधी देण्यात येतो.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : मतदानास सुरुवात होण्यापूर्वी मतदान कसे करावे याबाबत स. सदस्यांना माहिती द्यावी.

**मा. महापौर** : विधि सल्लागारांनी माहिती द्यावी.

**विधि सल्लागार** : मतदान प्रक्रियेबाबत प्रत्येक स. सदस्यांना एक मत देण्याचा अधिकार राहिल. निवडणूकीत दोहोंपेक्षा अधिक इच्छुक असतील तर, ज्या इच्छुकाला सर्वात कमी मते मिळाली असतील त्याचे नाव वगळण्यात येईल आणि उरलेल्या इच्छुकामध्ये पुन्हा मतदान घेण्यात येईल. (सुरुवातीला मतपेटी रिकामी असल्याचे सर्वांना दाखविण्यात आले. नंतर मतपेटीला मा. महापौर यांच्या स्वाक्षरीने सर्वांसमोर सील करण्यात आले.)

**मा. सचिव :** आता मतदान प्रक्रियेला सुरुवात होत आहे. वार्डवाईज नावे पुकारण्यात येतील. कृपया सदस्यांनी नावाप्रमाणे मतदान करावे. (यावेळी वार्ड क. १ ते ६० प्रमाणे नावे पुकारण्यात आली. प्रक्रियेला सुरुवात अंदाजे ५.३५ वाजता)

वार्ड क्र. १ ते ३ च्या स. सदस्यांनी मतदान केले. वार्ड क्र. ४ चे स. सदस्य री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग सभागृहात उपस्थित नव्हते त्यामुळे मतदानात भाग घेतलेला नाही. वार्ड क्र. ५ ते वार्ड क्र. ११ चे स. सदस्यांनी मतदान केले. वार्ड क्र. १२ व १३ चे स. सदस्य श्री. म. आयुब गुलाम जिलानी व मुजिब आलमशा खान मतदानास उपस्थित

नव्हते. वार्ड क्र. १४ व १५ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वार्ड क्र. १६ ते १९ चे सदस्य श्री. जावेद हसन खाँ कासिम हसन खाँ, तकीहसन खाँ, कासिम हसनखाँ, स. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन व मिर्झा अन्वर बेग हमीद बेग हे मतदान करण्यास उपस्थित नव्हते. वार्ड क्र. २० ते २२ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. वार्ड क्र २३ चे स. सदस्य श्री. अब्दुल रशिदखा (मामु) अ. हमीद खान हे मतदान करण्यास उपस्थित नव्हते. वार्ड क्र. २४ ते २६ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. वार्ड क्र. २७ चे स. सदस्य श्री. हाजी मोहम्मद हाफिजोद्दिन हे मतदान करण्यास उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. २५ ते ३१ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र. ३२ ते ३६ चे स. सदस्य सर्व री म. इस्माईल अ. करीम, फैय्याजखान अहमदखान, अलीमबेग मिर्झा कलीम बेग, मोसिन अहमद बशीर अहमद व स. हुसैन स. अहमद हे मतदान करण्यास उपस्थित नव्हते. वार्ड क्र. ३७ ते ४० चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. व मा. महापौर ंयाचे सुचनेनुसार वार्ड क्र. ४० चे स. सदस्यांनी सहकार्य करण्यास विधि सल्लागार यांना आदेश दिला. वार्ड क. ४१ चे स. सदस्य श्री. आलफखा हुसैनखा हे मतदान करण्यास उपस्थित नव्हते. वार्ड क्र. ४२ ते ५२ चे स. सदस्य यांनी मतदाना तभाग घेतला. वार्ड क्र. ५३ चे स. सदस्य श्री. जहागिरदार अजिज मुख्तार अहमद यांनी मतदानात भाग घेण्या उपस्थित नव्हते. तर वार्ड क्र. ५४ ते ६० चे स. सदस्यांची नावे पुकारण्यात आली.

**मा. महापौर :** महापौर पदासाठी जे उमेदवार उभे आहेत त्यांचे प्रतिनिधी मतपत्रीका छानणीसाठी पाठविण्याबाबत अर्ज सादर करावे अशी विनंती करण्यात येते.

**मा. सचिव :** मतदानात भाग न घेणाऱ्या स. सदस्यांची नावे पुन्हा पुकारण्यात आली.

**मा. महापौर :** मतदानाची वेळ संपलेली आहे. (अंदाजे वेळ ६:३०) ज्या स. सदस्यांनी मतपत्रिका छानणीच्या वेळी उभे राहण्याबाबत प्रतिनिधिनी अर्ज सादर केलेले आहेत त्या स. सदस्यांनी मतपेटी जवळ येण्याची कृपा करावी.

(यावेळी छानणी अधिकाऱ्यांच्या बाजुला आपआपले उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांच्या समोर मतपेटी उघडण्यात आली. छानणी अधिका:ऱ्यांनी मतपत्रिका ताब्यात घेऊन प्रत्येक मतपत्रिकेवर मा. महापौर यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या मतपत्रिका मोजणीला सुरुवात केली.)

**मा. महापौर :** मतमोजनी संपलेली आहे. ज्या उमेदवारांना मते पडली व ज्या उमेदवारांना मते पडली नाहीत त्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत -

| **उमेदवारांची नावे** | **पडलेली मते** |
|---|---|
| सर्वश्री. | |
| १) यादव अशोक सायन्ना | २२ |
| २) प्रदिप शिवनारायण जैस्वाल | २१ |
| ३) अजिमखाँ दादामियाँ | ०० |
| ४) नारायण मोहन | ०० |
| ५) जहागिरदार अजिज | ०० |

| | |
|---|---|
| ६) जावेद हसन खान | ०० |
| ७) मिर्झा अन्वर बेग | ०० |
| ८) मुजिब आलमशा खान | ०० |
| ९) मोहासिन अहमद | ०० |
| १०) स. हुसैन स. अहमद | ०० |
| ११) संचेती चेतकरण | ०० |
| एकुण मते - | ४४ |
| वैध मते - | ४३ |
| अवैध मते - | ०१ |

स. सदस्य श्री. यादव अशोक सायन्ना महापौर पदी २२ विरुध्द २१ मतांनी निवडून आलेले आहेत.

**मा. महापौर :** उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी ज्या उमेदवारांनी फॉर्म भरलेले आहेत आणि ज्यांना उमेदवारी परत घ्यावयाची आहे त्यासाठी १/२ तासाचा अवधी देण्यात येतो.
(अंदाजे वेळ ७:३५ वाजता)

**मा. सचिव :** उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी एकुण १९ (एकोनवीस) उमेदवार उभे असून ती खालील प्रमाणे आहेत.

सर्व श्री. १) अजितकुमार शेळके, २) अजिमखाँ दादामियाँ, ३) अब्दुल रशिदखान (मामु), ४) कवडे शिवाजी, ५) गाडे गंगाधर, ६) छापरवाल रमेश, ७) जावळे प्रकाश, ८) दत्त प्रदिपकुमार, ९) नवपुते कचरु, १०) परदेशी सुभाष, ११) पंडागळे रतनकुमार, १२) फैय्याजखान अहमदखान, १३) तुळशीराम छगन, १४) म. अयुब गुलाम जिलानी, १५) मिर्झा अन्वर बेग, १६) मोहसिन अहमद, १७) वंजारे पिटर, १८) स. अहमद एकबालुद्दीन, १९) सोनवणे केशव.
(सभेला सुरुवात अंदाजे ८:२५ वाजता)

**मा. महापौर :** उपमहापौर पदासाठी ज्यांनी उमेदवारी अर्ज भरलेले आहेत ते फॉर्म परत घेण्याची वेळ आता संपलेली असून आता किती उमेदवार उभे आहेत याची माहिती द्यावी.

**मा. सचिव :** उपमहापौर पदासाठी एकुण १९ उमेदवारांनी अर्ज भरलेले होते पैकी ११ (अकरा) उमेदवारांनी आपआपले अर्ज परत घेतलेले आहेत. आता ८ (आठ) उमेदवारांचे फॉर्म शिल्लक आहेत. ती पुढीलप्रमाणे सर्व श्री. १) अजिमखाँ दादामियाँ, २) अब्दुल रशिद खान (मामू), ३) नवपुते कचरु, ४) फैय्याजखान अहेमदखान, ५) अयुब गुलाम जिलानी, ६) मिर्झा अन्वर बेग, ७) मोहसिन अहमद, ८) स. अहमद एकबालुद्दीन.

**मा. महापौर :** ठिक आहे. आता बॅलेट पेपर तयार करण्यासाठी १/२ तासाचा अवधी देण्यात येतो.
(अंदाजे वेळ ८:३५ वाजता)
(सभेला सुरुवात अंदाजे ९:०५ वाजता)

**मा. महापौर :** उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी किती उमेदवार आहेत त्यांची नावे वाचुन दाखववी. आणि मतदानास सुरुवात करावी यासाठी १/२ तासाचा अवधी देण्यात येतो.

(अंदाजे वेळ ९:२० वा)

( यावेळी मतपेटी रिकामी असल्याचे सर्वांसमोर दाखवून मा. महापौरांचे स्वाक्षरीनिशी पेटीला सिल करण्यात आले.)

**मा. सचिव :** उपमहापौर पदासाठी एकुण (आठ) उमेदवार उभे असून यासाठी वार्डवाईज नावे पुकारल्या जातील त्याप्रमाणे मतदानास स. सदस्यांनी भाग घ्यावा ही विनंती. त्यानुसार मतदानाच्या प्रक्रियेला सुरुवात. वार्ड क्र. १ ते ३ स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. तर वार्ड क्र. ४ चे स. सदस्य श्री. अजिजउल्ला बेग सभागृहात उपस्थित नव्हते. त्यामुळे मतदानात भाग घेतला नाही. वार्ड क्र . ५ ते ११ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. तर वार्ड क्र. १२ व १३ चे स. सदस्य श्री. म. अयुब गुलाम जिलानी व मुजिब आलमशा खान हे उपस्थित नव्हते. वार्ड क्र. १४ व १५ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. व वार्ड क्र. १६ ते १९ चे स. सदस्य हे उपस्थित नव्हते. वार्ड क्र. २० ते २२ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वार्ड क्र. २३ चे स. सदस्य उपस्थित नव्हते. वार्ड क्र. २४ ते २६ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. वार्ड क्र. २७ चे स. सदस्य हे उपस्थित नव्हते वार्ड क्र. २८ ते ३९ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वार्ड क्र. ३२ ते ३६ चे स. सदस्य हे उपस्थित नव्हते. वार्ड क्र. ३७ ते ४० चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. मा. महापौर यांच्या सुचनेनुसार विधि सल्लागार यांनी स. सदस्य श्री. सुग्रीम रिडलान यांना सहकार्य करण्यास गेले. वार्ड क्र. ४१ चे रु. सदस्य श्री. अलफखान हुसैनखान उपस्थित नव्हते. वार्ड क्र. ४२ ते ५२ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वार्ड क्र. ५३ चे स. सदस्य श्री. जहागिरदार अजिज हे उपस्थित नव्हते. तर वार्ड क्र. ५४ ते ६० चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला, अशा प्रकारे मतदानाची प्रक्रिया संपली.

(नंतर पुन्हा मतदानात भाग न घेणाऱ्या स. सदस्यांची नावे पुकारण्यात आली.)

**मा. महापौर, मा.सचिव :** उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी जे उमेदवार आहेत त्यांनी आपआपले प्रतिनिधीची नावे पाठविण्यासाइी अर्ज सादर करावे यावेळी प्रतिनिधीने अर्ज सादर केल्या नुसार मतपत्रिका छानणी अधिकारी याचे बाजुला उभे राहिले आणि मतपेटी छानणी अधिकारी यांचे समोर उघडून त्या पत्रिका ताब्यात घेतल्या व मा. महापौरांच्या मतपत्रिकेवर स्वाक्षऱ्या करुन मतपत्रिका मोजणीला प्रारंभ झाला.

**मा. महापौर :** मतमोजणी संपलेली आहे. ज्या उमेदवारांना मते पडली त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| **उमेदवारांची नावे** | **पडलेली मते** |
|---|---|
| सर्वश्री. | |
| १) अजिमखाँ दादामियाँ | २२ |

| | |
|---|---|
| २) अब्दुल रशिद खान (मामु) | ०९ |
| ३) कचरु नवपुते | १९ |
| ४) फैय्याजखान अहमदखान | ०० |
| ५) म. अयुब गुलाम जिलानी | ०० |
| ६) मिर्झा अन्वर बेग | ०० |
| ७) मोहासिन अहमद | ०० |
| ८) स. अहमद एकबालुद्दीन | ०० |
| एकुण मते - | ४३ |
| वैध मते - | ४२ |
| अवैध मते - | ०१ |

अशाप्रकारे स. सदस्य श्री. अजिमखाँ दादामियाँ २२ विरुध्द १९ मतांनी उपमहापौर पदी निवडून आलेले आहेत आणि स. सदस्य श्री. कचरु नवपुते यांनी या मतदानाबाबत जो आक्षेप घेतलेला आहे त्याबाबत कायद्याप्रमाणे आणि विधि सल्लागार यांचेशी सल्ला घेऊनच प्रकरण निकाली काढण्यात येते.

"जण गण मन" राष्ट्रगीताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## शनिवार, दिनांक २०/६/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**शनिवार, दिनांक २०/६/९२ रोजी ठीक १२:३० वाजता मा. महापौर श्री. यादव अशोक सायन्ना अध्यक्षस्थानी स्थानापन्न झाले. सभेत मा. आयुक्त, उप आयुक्त अधिकारी तसेच खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. अजिमखाँ दादामियाँ
२) श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
४) श्री. अजिजउल्ला बेग वाहेद बेग
५) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
७) श्री. भगुरे तुळशीराम छगन
८) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
९) श्री. पाटील नरेंद्र यादवराव
१०) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
११) श्री. म. अयुब गुलाम जिलानी
१२) श्री. मुजीब आलमशा खान
१३) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१४) श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
१५) श्री. स.अ. एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
१६) श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१७) श्री. ओक जयवंत केशवराव
१८) श्री. अ. रशीद खान (मामु) अ. हमीद खान
१९) सौ. दलाल लता श्रीनिवास
२०) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२१) श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२२) श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२३) डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
२४) श्री. म. इस्माइल अ. करीम
२५) श्री. अलीम बेग मिर्झ करिम बेग
२६) श्री. स. हुसेन स. अहमद
२७) श्री. पैठणकर पांडूरंग भिमाजी
२८) श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
२९) श्री. वाघमारे सुदाम भानुदास
३०) श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
३१) श्री. थोरात किशोर गोविंदराव
३२) श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ

३३) डॉ. काळे शांताराम यशवंत
३४) श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
३५) श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
३६) श्री. बारवाल गजानन रामकिसन
३७) श्री. जहागिरदार अजिज मुख्तार अहमद
३८) श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
३९) श्री. जावळे प्रकाश शिवराम
४०) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
४१) श्री. परदेशी सुीााष शिवलाल
४२) श्री. नवपुते कचरू चंद्रभान

<u>सवांद</u>

**मा. महापौर :** आजच्या सभेस स. सदस्याची गणपुर्ती नसल्याने सभा अर्धा तासासाठी तहकुब करण्यात येत आहे.
(वेळ अंदाजे १२:३५ वाजता)
(सभेला सुरुवात अंदाजे १:१० वाजता)

**मा. महापौर :** सभेला अद्यापही कोरम पुर्ण झालेला दिसत नाही. त्यामुळे मला नाईलाजाने सांगावेसे वाटते की, नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी स. सदस्यांना पुरेशी काळजी नाही. यावरुन असे दिसून येते तेव्हा आजची सभा गणपूर्ती अभावी आजपासून पाच दिवसासाठी पुढे ढकलण्यात येते.
(वेळ अंदाजे १:१५ वा)

याबरोबरच राष्ट्रगीताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## शनिवार, दिनांक २०/६/९२ रोजी पुढे ढकलण्यात आलेल्या व दिनांक २४/६/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**बुधवार, दिनांक २४/६/९२ रोजी मा. महापौर श्री. यादव अशोक सायन्ना यांच्या अध्यक्षतेखाली अंदाजे ११:४० वाजता "वंदे मातरम्" या गीताने सभेस सुरुवात झाली.**

**या सभेस मा. आयुक्त, उपआयुक्त तथा अधिकारी आणि खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. अजिमखाँ दादामियाँ अ. रहेमान
२) श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
४) श्री. अजिजउल्ला बेग वाहेद बेग
५) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) श्री. भगुरे तुळशीराम छगन
८) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
९) श्री. पाटील नरेंद्र यादवराव
१०) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
११) श्री. म. अयुब गुलाम जिलानी
१२) श्री. मुजीब आलमशा खान
१३) श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१४) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१५) श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
१६) श्री. स.अ. एकबालुद्दीन स.मो. कुतुबुद्दीन
१७) श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१८) श्री. ओक जयवंत केशवराव
१९) श्री. गिल इकबलसिंग प्रितमसिंग
२०) श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
२१) श्री. अ. रशीद खान (मामु) अ. हमीद खान
२२) सौ. दलाल लता श्रीनिवास
२३) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२४) श्री. हाजी मोहमद हफिजोद्दीन
२५) श्री. छापरवाल रमेश नारायण
२६) श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२७) श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२८) श्री. म. इस्माइल अ. करीम
२९) श्री. फय्याज खान अहमदखान
३०) श्री. अलीम बेग मिर्झा करिम बेग

३१) श्री. स. हुसेन स. अहमद
३२) श्री. मगर शंकर जीजाराम
३३) श्री. मानकापे नामदेवराव शामराव
३४) श्री. पैठणकर पांडूरंग भिमाजी
३५) श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
३६) श्री. वाघमारे सुदाम भानुदास
३७) श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
३८) श्री. थोरात किशोर गोविंदराव
३९) श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४०) डॉ. काळे शांताराम यशवंत
४१) श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
४२) श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
४३) श्री. बारवाल गजानन रामकिसन
४४) श्री. जहागिरदार अजिज मुख्तार अहमद
४५) श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
४६) श्री. जावळे प्रकाश शिवराम
४७) श्री. गाडे गंगाधर सुखदेव
४८) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
४९) श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५०) श्री. परदेशी सुीााष शिवलाल
५१) श्री. नवपुते कचरु चंद्रभान

<u>संवाद</u>

**मा. उपमहापौर :** माजी नगराध्यक्ष व पक्षाचे माजी अध्यक्ष कै. द्वारकाप्रसाद जैस्वाल यांचे निधनानिमित्त सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा. महापौर :** ठिक आहे.
(यावेळी सभागृहात ००:०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून कै. द्वारकाप्रसाद जैस्वाल यांना आदरांजली वाहण्यात आली.

**श्री. अविनाश कुमावत :** "मिट द प्रेस" या पत्रकारांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात आपण शिवसेना व मस्लिम लिग यांना "जातीयवादी" आहेत असे वर्तमानपत्रात उल्लेख आला. तेव्हा गत चार वर्षाच्या काळात "शिवसेना" पक्षास कोणत्याही महापौरांनी जातीयवादी असे म्हटलेले नसून आपण केलेल्या वक्तव्याचा या ठिकाणी खुलासा व्हावा.

**श्री. बंडू प्रधान :** सदरील प्रश्न सभागृहाचा नसून या बाबत चर्चा होऊ नये.

**श्री. विठ्ठल पेरकर :**

**श्री. प्रदिप जैस्वाल :** एक स. सदस्य बोलत असतांना दुसऱ्या स. सदस्यांनी मध्येच बोलण्यास उठू नये. याबाबत सूचना करावी आम्ही सभागृहात मान ठेवतो.

**श्री. अविनाश कुमावत :** सभागृहात प्रथमतः खुलासा करावा की, आपण जातीयवाद हा उल्लेख का केला? या ठिकाणी विरोधी पक्ष नेता असल्यानंतरही आपण मला विचारणे भाग होते.

**श्री. बंडू प्रधान :** हा प्रश्न सभागृहात चर्चेचा नसुन इतिवृत्तावर चर्चा व्हावी.

**श्री. अविनाश कुमावत :** मला माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे की, आपण वार्ताहर परिषदेत जातीयवाद उल्लेख का केला?

**मा. महपौर :** स. सदस्य आपल्याला सांगू इच्छितो की, मी तसा उल्लेख केलेला नाही. पत्रकारांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर मी त्यांना एवऐच सांगितले की, मी एवढा मोठा व्यक्ती झालेलो नाही. त्यामुळे तुम्ही वरिष्ठांनाच विचारणा करावी किंवा ज्यांनी ही बातमी छापली त्यांनाच विचारावे.

**श्री. अविनाश कुमावत :** मग वर्तमानपत्रात जे छापुन आलेलं आहे ते खोटे आहे का?

**मा. महापोर :** मी आताच सांगितले की, मी असा कोणताही उल्लेख केलेला नाही व मी फार मोठा व्यक्ती झालेलो नाही.

**श्री. बंडू प्रधान :** स. संसद सदस्याबाबत औरंगाबाद उच्च न्यायालयाने एकाची झालेली निवड रद्दबातल ठरविलेली आहे. त्यामुळै पक्ष जातीयवादी आहे हे सिध्द झालेले आहे. त्यामुळे बोललेले योग्य आहे.

**श्री. अय्युब जागिरदार :** आपण जातीयवादी असा उल्लेख केलेला आहे त्याप्रमाणे गत स्थायी समिती अध्यक्ष पदासाठीच्या निवडणुकीत सुध्दा असा प्रकार झालेला असून "जातीयवादी" हा पक्ष आहे असे बोलण्याचे वक्तव्य आपल्याकडून का झाले? आपल्याला काय अधिकार आहे जातीयवाद बोलण्याचा.

**श्री. अविनाश कुमावत :** मा. महापौर आपण असा उल्लेख केलेला आहे किंवा नाही याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर :** स. विरोधी पक्ष नेता, आपणास सुचविण्यात येते की, त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला होता परंतु मी उत्तर दिलेले नाही.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** इतर बाबींवरती सभागृहात चर्चा न होता "पाण्याच्या ज्वलंत प्रश्नावर" चर्चा व्हावी.

**श्री. अविनाश :** मा. महापौर आपण केलेल्या खुलासाचे आमचे समाधान झालेले आहे.

**मा. महापौर :** स. सदस्य तथा सभागृह यांना विनंती करतो की, इयत्ता दहावीच्या परीक्षेत मराठवाड्यातून तसेच राज्यातून गुणाणूक्रमे प्रथम आलेला विद्यार्थी सचिन जाधव तसेच मागासवर्गीयातून प्रथम आलेला विद्यार्थी श्री. विष्णू कनकुटे व अपंगामधन प्रथम आलेला विद्यार्थी श्री. प्रविण धोपटे तसेच मुलींमधून सुध्दा प्रथमतः आलेली कु. तृप्ती राजोपाध्याय यांचा अभिनंदन करणारा प्रस्ताव मी मांडत आहे. कृपया सभागृहातर्फे वरील विद्यार्थ्यांचे अभिनंदन करावे.

**श्री. अविनाश कुमावत :** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे व अभिनंदन करण्यास सभागृहाची संमती आहे.

**श्री. अजिज जहागिरदार :** मी या सभेबाबत आव्हान देवून इच्छितो की, दिनांक २०/६/९२ च्या सभेमध्ये आपण असे सुचीत केलेले होते की, सदरची सभा पाच दिवसासाठी तहकुब करण्यात येते. तेव्हा आज या सभेचा पाचवा दिवस आहे काय? आपण एक दिवस अगोदर सभा घेत आहात किंवा नाही. म्हणजे आजची सभा नियमाप्रमाणे आहे काय याचा खुलासा करावा व नंतरच सभेला सुरुवात व्हावी.

**मा. महापौर :** स. सदस्य आपणांस सुचविण्यात येते की, त्या दिवशी मी असे सुचित केलेले होते की, दि. २०/६/९२ ची सभा बुधवार दि. २४/४/९२ पर्यंत पुढे

ढकलण्यात येईल आणि नियमाप्रमाणे सर्व स. सदस्यांना पत्राने कळविण्यात आलेलं आहे. त्यामुळे आता इतिवृत्तावर चर्चा व्हावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** मी या सभेमध्ये एक प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या प्रश्नाचे उत्तर मला समाधानकारक मिळालेले नसल्याने नियमाप्रमाणे प्रश्नोत्तर तास घेऊन मला माझ्या प्रश्नाचे उत्तर संबंधित अधिकाऱ्यांकडून मिळावे ही अपेक्षा आहे.

**सौ. लता दलाल :** मराठवाड्यातून इयत्ता दहावीच्या परीक्षेत अपंगातून विशेषतः मागासवर्गीय विद्यार्थी श्री. प्रविण धोपटे हे गुणानुक्रमे प्रथम आल्याने व त्यांची आर्थिक परिस्थिती ठिक नसल्याने त्यांना मनपातर्फे आर्थिक मदत द्यावी.

**श्री. अजिज जहागिरदार :** स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत द्यावी.

**मा. महापौर :** याबाबत विचार करण्यात येईल.

**श्री. विठ्ठल पेरकर :** मनपातर्फे आर्थिक मदत देण्याबाबत विचार व्हावा. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ६६ मध्ये अशा प्रकारची तरतुद करता येते.

**श्री. प्रदिप जैस्वाल :**

**श्री. प्रकाश जावळे :** प्रकल्प विभागामार्फत जे गरिब व होतकरु विद्यार्थ्यासाठी देणगी किंवा आर्थिक मदत देण्यात येते तशाच प्रकारे संबंधित मागासवर्गीय व अपंग विद्यार्थ्यांच्या इयत्ता १२ वी पर्यंतच्या शालेय शिक्षण योग्यरित्या घेण्यासाठी प्रकल्प विभागांतर्गत काही मदत देण्याबाबत विचार व्हावा.

**मा. महापौर :** याबाबत विचार करण्यात येईल. तत्पूर्वी संबंधित विद्यार्थ्यास काही स. सदस्यांचे सुचनेनुसार मनपातर्फे रु. दहा हजार आर्थिक मदत पुढील उच्च शिक्षणासाठी देण्यात येते.

**श्री. अविनाश कुमावत :** माझ्या मासिक मानधनातून प्रत्येक महिन्याला रु. १००/- संबंधित अपंग विद्यार्थ्यास आर्थिक मदत म्हणून देण्यात यावी. अशी मी सभागृहास विनंती करतो.

**मा. महापौर :** ठिक आहे. तशी नोंद घेण्यात यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** आता प्रश्नोत्तराच्या तासात माझ्या प्रश्नाबाबत खुलासा व्हावा.

**मा. महापौर :** स.सदस्य अगोदर इतिवृत्त कायम करण्यासाठी चर्चा व्हावी. आणि त्यानंतर १/२ तास प्रश्नोत्तरासाठी आपल्याला वेळ देण्यात येतो.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** नियमात तशी तरतुद केलेली आहे की, सभा सुरु होण्यापूर्वी प्रश्नोत्तराचा अर्धा तास घेण्यात यावा.

**मा. महापौर :** ठिक आहे. आपल्या मताशी मी सहमत आहे. परंतु इतिवृत्त कायम झाल्यानंतर आपल्याला प्रश्न उपस्थित करण्यासाठी वेळ देण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**श्री. अजिजुल्ला :** कायद्यामध्ये अशी तरतुद आहे की, अगोदर इतिवृत्त कायम करावे व नंतर प्रश्नोत्तराचा तास घ्यावा.

**मा. महापौर :** ठिक आहे. अगोदर इतिवृत्त कायम करण्यावर चर्चा व्हावी.

**विषय क्र. २/१ :** दिनांक १८/४/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त, दिनांक ३०/४/९२ रोजी तहकुब विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व दिनांक १८/५/९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा. महापौर :** मंजुर.

**ठराव क्र. २/१ :** दिनांक ३० एप्रिल १९९२ चे पान क्र. २७ मधील ठरावामधील अनु क्र. १३ मध्ये शहरातील ज्या मोकळ्या असलेल्या ७५% राखीव जागेवर बांधकामे झालेली आहेत ती अतिक्रमाणास ऐवजी आरक्षणातुन वगळण्यास यावे अशी दुरुस्ती करण्यात यावे. सन १९९२ च्या शालांत परिक्षा विशेष नैपुण्यप्राप्त अपंग विद्यार्थी श्री. प्रविण धोपटे यास मनपातर्फे रु. १० हजार आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या व इतर दुरुस्त्यासह दि. १८/४/१९९२ सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त तसेच दि. ३०/४/९२ रोजी तहकुब विशेष सर्वसाधारण सभेचे व दि. १८/४/९२ च्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## प्रश्नोत्तराचा तास

**मा. महापौर :** प्रश्नोत्तरासाठी १/२ तासाचा अवधी देण्यात येतो.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** या सभेमध्ये मी आस्थापनेवर दहा सुरक्षा रक्षक कर्मचार्यांची भरती कशी झाली याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. व त्याचे उत्तर मला आता मिळाले. तेव्हा माझ्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर मला आता मिळाले. तेव्हा माझ्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर संबंधित अधिकारी किंवा मा. आयुक्त यांनी द्यावे.

**मा. महापौर :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**सहाय्यक आयुक्त :** औरंगाबाद मनपाच्या आस्थापनेवर दहा सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरील कर्मचाऱ्यांची भरती मनपाचे ठराव क्र. ९०४ दि. १३/५/८५ नुसार ठरल्याप्रमाणे सुरक्षा रक्षक या पदासाठी सेवा निवृत्त सैनिकामधील नाईक किंवा शिपाई उमेदवारांची यादी जिल्हा सैनिक बोर्ड औरंगाबाद यांचेकडून मागविण्यात आली होती. आणि सदरची यादी आल्यानंतर कलम ५४ चे आधारे मंडळाने निवड केलेली आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** नियमावलीतील प्रकरण ३ मध्ये असा उल्लेख आहे की, निवड समितीने निवड केलेल्या कर्मचाऱ्यांची क्रमावाईज नावे सभागृहात किंवा सेवा पटलावर माहितीस्तव लावावे परंतु तसे न करता भरती करुन घेतलेली आहे. ती योग्य नसुन निवडसमितीने केलेली निवड अयोग्य आहे. असे मला वाटते. याबाबत विधि सल्लागारांचे मत घ्यावे.

**श्री. शांताराम काळे :** स. सदस्यांनी मांडलेली सुचना योग्य असून प्रशासनाने असे किती प्रकरणे विचारात घेतली आहेत, याची सर्वांना ज्ञान आहे, यासाठी मी गेल्या पाच सहा महिन्याचे उदा. आपल्यासमोर ठेवू इच्छितो की, त्यावेळी सभागृहात काही रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना रु. १०००/- प्रति महिना देणेबाबतचा प्रस्ताव मंजुर झालेला होता. परंतु प्रशासनाने त्याची अद्यापही दखल घेतलेली नाही. याही

नंतर ते कर्मचारी रु. ७५० प्रति महिना घेण्यासही तयार झाले परंतु त्यावरही निर्णय झालेला दिसत नाही. तेव्हा हे प्रशासन तुम्हा आम्हाला असेच ठुकरावून लावणार आहे. यासाठी जनतेच्या प्रश्नासाठी सर्व स. सदस्यांनी आपसातील पक्षभेद बाजूला सारुन एकत्रित कामे करणे जरुरीचे असून सहकार्याच्या अपेक्षेने कामे करण्याची नितांत आवश्यकता आहे. अन्यथ आता पुढील दहा महिन्याचा काळ राहिला असून वार्डातील नागरिक आपल्याला माफ करणार नाहीत याची दक्षता घ्यावी एवढीचविनंती.

**मा. महापौर** : स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल आपण सुचित केल्यानुसार आपणास पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : नियमात तशी तरतुद आहे की, चॅप्टर ३ अन्वये झालेल्या कर्मचाऱ्यांची निवड समितीने क्रमवाईज सभागृहाच्या मान्यतेस्तव नावे लिहून माहितीस्तव ठेवावी. तसे झालेले नाही म्हणून याबाबत विधी सल्लागारांनी खुलासा करावा की, सहाय्यक आयुक्त - २ यांनी केलेल्या खुलासाप्रमाणे योग्य आहे काय ?

**मा. महापौर** : स. सदस्य आपण विचारलेल्या प्रश्नासंदर्भात सहाय्यक आयुक्त - २ यांनी खुलासा केलेला आहे. आणि आता जो प्रश्न आपण उपस्थित केलेले आहे याबाबत पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : नियमात तशी तरतुद असून विधि सल्लागार यांनी खुलासा करावा की, निवड समितीने केलेली निवड व झलेली भरती योग्य आहे काय?

**श्री. अजिज जागिरदार** : स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांची सुचना आहे की, त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाची माहिती द्यावी. परंतु सभागृहाने याबाबत विनंती केलेली असल्यास माहिती देण्यास हरकत नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** विधी सल्लागारांनी माहिती द्यावी की, चॅप्टर ३ अन्वये निवड समितीने केलेली निवड झालेली भरती योग्य आहे काय?

**मा. महापौर :** ठिक आहे. विधि सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** मुं.प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ३ चे नियम २ मधील तरतुद आपल्यासमोर वाचून दाखवित आहे.

नियम क्र. १ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही पदावर नेमणूक करण्यापूर्वी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून अशा पदासाठी अर्ज मागविण्यात आले पाहजेत आणि आलेल्या अर्जाची आयुक्तांनी छाननी करायला पाहिजे. महापालिकेने तसे फर्माविलेले असल्यास आयुक्तांनी ज्या व्यक्तीनी अर्ज केलेले असतील त्या व्यक्तींपैकी ज्याच्यामध्ये त्या व्यक्ती ज्या पदासाठी अर्हता प्राप्त असतील अशा व्यक्तींची एक यादी ती पसंतीच्या क्रमानुसार तयार करुन समितीमार्फत मनपास सादर केली पाहिजे. म्हणजे नियमात तशी तरतुद आहे की, सर्व साधारण सभेने जर आदेश दिला तर त्या आदेशान्वये आयुक्तांनी निवड समितीच्या पसंती क्रमानुसार जी निवडीची यादी आहे ती स. सदस्यांपुढे ठेवतील.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : विधि सल्लागार यांनी केलेला खुलासा दिशाभुल करणारा आहे. नियमात स्पष्ट असे आहे की, निवड समितीने निवडलेली यादी आयुक्तांनी क्रमवाईज सभागृहात सादर करावी.

**मा. महापौर** : स. सदस्य आपण सुचित केल्याप्रमाणे सहाय्यक आयुक्त - २ यांनी खुलासा केला तर आता विधि सल्लागारांनी खुलासा केला. त्यावरही तुमचे समाधान झालेले नाही. तेव्हा मी यापूर्वी सुचित केलेले होते की, तुम्हाला जे उपप्रश्न विचारायचे असतील त्याबाबत पुढील सभेत सविस्तर माहिती देण्यात येईल. परंतु आपण ऐकूण घेत नाही. तेव्हा आपल्याला काय करायचे ते पहावे.

**श्री. अजिजुल्ला बेग** : विधि सल्लागार यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे भरतीबाबत जे काही आदेश असतात त्या संदर्भात सभागृहात प्रस्ताव मांडून संमत करावा की, यापूर्वी झालेल्या भरतीबाबत क्रमानुसार यादी सभागृहात सादर करावी. परंतु मु.प्रा. मनपाचे अधिनियम ५४/२ नुसार निवड समितीला कर्मचाऱ्यांची पदोन्नतीबाबत कोणताही अधिकार नाहीत. यापूर्वीच्या ज्या काही पदोन्नती द्वारे भरत्या झालेल्या आहेत त्या नियमाप्रमाणे नाही. यासाठी झालेल्या पदोन्नतीने कर्मचाऱ्यांची भरती सभागृहासमोर ठेवणे आवश्यक होते. अर्थात सभागृहाने विचारणा केली नाही म्हणून प्रशासनाने याचा गैरफायदा घेऊ नये. याबाबत प्रकरण ५१ मध्ये योग्य ते निर्देश दाखविण्यात आलेले आहेत. (ते वाचून दाखवावीत) यानुसार कर्मचाऱ्यांची आर्थिक बाबत (पगार) स्थायी समितीसमोर विचारार्थ प्रस्ताव येणे आवश्यक आहे. पेंशन, ग्रॅज्युटी आदिंबाबत विचार होऊ शकेल.

**मा. महापौर** : स. सदस्य आपण स्वतः स्थायी सतिीचे सदस्य आहात. आपण समजुन घ्यावे.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय** : सभाग्रहाचा वेळ वाया जात आहे. याबाबत आता चर्चा बंद करावी व पुढील विषयास सुरुवात व्हावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : नियमाप्रमाणे भरती झालेली आहे. काय अशी माझी मागणी आहे. त्याची माहिती द्यावी.

**श्री. अजिजुल्ला बेग** : नियमाप्रमाणे प्रशासनाने प्रत्येक पदांच्या भरतीबाबत निवड समितीने तयार केलेल्या क्रमवाईज पसंतीच्या यादीनुसार आयुक्तांनी सभागृहात यादी सादर करावी.

**मा. महापौर** : ठिक आहे. याबाबत माहिती मागविण्यात येत जाईल.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय** : अशा प्रकारचा प्रस्ताव मांडावा त्यावेळी सभागृहात चर्चा करता येईल.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : मी विचारलेल्या प्रश्नासंदभा्रत प्रशासनाने कार्यवाही केली काय? याची माहिती द्यावी.

**श्री. रशिद मामु** : मा. महापौर साहेब सभागृहात कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उगाचच चर्चा होते. यापेक्षा नागरीकांच्या कामासंदर्भात चर्चा व्हावी. बरीचशा वार्डातील तक्रारी आहेत त्या सोडविण्यापेक्षा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जास्त चर्चा करणे ठिक नाही. त्यापेक्षा

शहरातील लाईट व पाणी प्रश्न महत्वाचे आहे. याकडे विशेष लक्ष द्यावे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : स. सदस्य श्री. अजिजुल्ला बेग काय सांगत आहेत याकडे माजी महापौर श्री. ओबेरॉय यांनी लक्ष घालावे.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** खर्चाची बाब स्थयी समितीकडे असल्याने स्थायी समितीने निर्णय घ्यावा. आता सभागृहात वेळ वाया न घालविता पुढील विषयावर चर्चा व्हावी.

**श्री. शांताराम काळे** : माजी महापौर श्री. प्रदिप जैस्वाल यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे याबाबत त्यांचा काही इंट्रेस्ट आहे काय?

**श्री. प्रदिप जैस्वाल** : इंट्रेस्टचा प्रश्न नसुन महानगरपालिकेच्या नियमानुसार प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे काय याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधित आहे. आणि आपल्याला माहित नसेल माझा स्पष्ट आरोप आहे की, मनपाचे सफाई कामगार म्हणून लावायला सुध्दा रु. ५ ते १० हजाराची मागणी केली जाते. हे सांगणे मला शोभत नाही. परंतु नियमाप्रमाणे प्रशासनाने भरती करावी एवढेच माझे मत आहे.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी जो सभागृहात आरोप केलेला आहे, तर कोण अधिकारी किंवा कर्मचारी आहेत त्यांचे नावे सुचवावी. उगाचच आरोप करण्यात अर्थ नाही.

**मा. महापौर** : स. सदस्य श्री. अजिजुल्ला बेग यांनी बोलावे.

**श्री. अजिजुला बेग** : प्रशासनातील भरती करित असतांना निवड केलेल्या उमेदवारांची पसंतीनुसार क्रमवाईज यादी प्रशासनाने सभागृहात सादर करावी अशा प्रकारचा प्रस्ताव मांडून मंजुर करावा. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांची पदोन्नती बाबत सुध्दा प्रशासनाने सभागृहाची मंजुरी घेतल्याशिवाय व माहिती दिल्याशिवाय कार्यवाही करु नये. असे मनपाच्या नियमावलीत स्पष्ट दिलेले आहे. त्याप्रमाणे तो कायदा (नियम वाचून दाखविला)

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** अशा प्रकारचा प्रस्ताव ठेवावा व त्यावर चर्चा करता येईल.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : स. सदस्य श्री. अजिजुल्ला बेग यांनी सुचित केल्याप्रमाणे व नियमावलीत दिलेल्या नियमाप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही आहे काय? याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** : स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल आपण विचारलेल्या प्रश्नाची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून मिळालेली आहे. आणि स. सदस्य श्री. अजिजुल्ला बेग यांनी जो नियम वाचून दाखविला त्याप्रमाणे विचार करण्यात येईल. एवढेच मी आपणास सुचीत करु शकतो. आता अर्धा तास प्रश्नोत्तराचा संपलेला आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही.

**श्री. अविनाश कुमावत :** स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी विचारलेल्या प्रश्नाचे सविस्तर माहिती न दिल्याने आम्ही निषेध म्हणून "सभा त्याग" करिता आहोत. (त्यावेळी शिवसेना सर्व स. सदस्यांनी अंदाजे ठिक १२ वाजता सभात्याग केला.)

**श्री. धनंजय गंगाखेडकर :** काही वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यानुसार गेल्या चार वर्षापासून भिजत पडलेला स्विमिंग पुलचा प्रश्न आपण चार महिन्यात कस सोडविणार याबाबत माहिती द्यावी.

**मा. महापौर :** स. सदस्य श्री. धनंजय गंगाखेडकर आपणास सुचीत करण्यात येते की, आपण विचारलेला प्रश्न आजच्या इतिवृत्तातील नसल्याने व प्रश्नोत्तराचा तास संपल्याने यावर चर्चा करता येणार नाही. (यावेळी सभात्याग केलेले शिवसेना सदस्यांचा सभागृहात अंदाजे ठिक १२:०२ वाजता प्रवेश)

## "प्रश्नोत्तराचा अर्धा तास समाप्त"

**विषय क्र. ३/२ :** दिनांक ६/१/९२ रोजी संपन्न झालेल्या माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीच्या बैठकीतील ठराव क्र. ३ नुसार (१) सध्या अस्तित्वात असलेल्या चौदा बालवाड्या आणि चार शाळांमध्ये जागेचा प्रश्न असल्याने या व्यतिरिक्त सन १९९२-९३ या सालापासून महानगरपालिकेच्या शाळांना जोडून ५० बालवाड्या चालू करण्यात याव्यात. (२) सन १९९२-९३ पासून महापालिकेच्या शाळेला जोडून सुरु होणऱ्या बालवाड्या करिता दरमहा रु. २००/५ याप्रमाणे मानधन तत्वावर एस.एस.सी. पास शिक्षिकांना फक्त दहा महिन्याकरिता नियुक्त करण्यास सार्वनुमते मंजुरी देण्यात येते. (३) प्रत्येक बालवाडीला मुलांच्या स्वच्छता व खेळ या साहित्यासाठी रु. ५००/- खर्च करण्यात यावेत व बाकी साहित्य संबंधित शाळांचे वापरण्यात यावे. (४) बालवाडी तीन तास चालविली जाईल. यासाठी बालवाडी शिक्षकांना पाच दिवसांचे प्रथम प्रशिक्षण देण्यात यावे. (५) सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पात बालवाड्यांसाठी तरतुद करण्यात यावी. वरील अनु. क्र. ३ ते ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे नवीन बालवाड्या सुरु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

**संवाद**

**श्री. तुळशीराम भगुरे :** महापालिकेअंतर्गत ज्या शाळांमध्ये बालवाड्या सुरु करण्यात येणार आहे तेथील शिक्षिकांना रु. २००/- मानधन प्रतिमाह अपुरा असून, त्याऐवजी दरमहा रु. ५००/- करण्यात यावा.

**श्री. तकी हसन खान :** प्रत्येक वार्डात एक बालवाडी होणे आवश्यक आहे. नसता काही वार्डात दोनदोन बालवाड्या तर काही वार्डात एकही असे होता कामा नये. असे किती ठिकाणी बालवाड्या उघडणार याचा खुलासा व्हावा.

**श्री. अजितकुमार शेळके :** स. सदस्य श्री तकी हसन खान यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार ज्या ठिकाणी अत्यावश्यक आहे आणि बालवाड्या चालू करण्यास मनपाच्या शाळा आहेत, त्या ठिकाणी सुरु करण्यात येईल.

**श्री. प्रकाश जावळे :** बालवाड्याचा जो उपक्रम आहे तो भारत सरकारचा असून शहरातील स्लम भागातील लहान मुलांचा विकास होण्याच्या दृष्टिने उपक्रम असून त्या दृष्टिने आपण पाऊले उचलावीत असे मला वाटते.

**श्री. अजिजुल्ला बेग** : शहरामध्ये एकुण ६८ स्लम भाग आहेत. तेव्हा या सर्व भागांमध्ये बालवाड्या सुरु करण्यात याव्यात आणि मनपातर्फे ज्या ९४ बालवाड्या सुरु आहेत त्या व समाजकल्याण अंतर्गत अंगणवाड्या सुरु आहेत त्यानुसार केवळ स्लम भागात या बालवाड्या व्हावयात. स. सदस्य श्री. भगुरे यांनी सुचित केल्यानुसार बालवाडी शिक्षिकेला मानधन रु. २००/ आहे ते कमी असून त्याऐवजी रु. ५००/- दरमहा करावे आणि ज्याठिकाणी मनपाची शाळा नाही, परंतु स्लम भाग आहे त्या ठिकाणी आपण कोणती पॉलिसी डिसाईड केलेली आहे. जर स्लम भाग असूनही मनपाची शाळा उपलब्ध नसल्यास त्याठिकाणी बालवाडी सुरु करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक बालवाडीला जसे समाज कल्याण अंतर्गत अंगणवाडीला सकस आहार म्हणून मुलांना दिला जातो त्याप्रमाणे या बालवाडयांना सकस आहार म्हणून दुध व खेळांचे साहित्य पुरविण्यासाठी रु. ५००/- ऐवजी रु. १०००/- करावे.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासनाने जी आर्थिक बाबत या अंदाजपत्रकात नमुद केलेली आहे. त्याबाबत प्रशासनाचे मत घेणे आवश्यक आहे. कारण आपण या ठिकाणी रककम वाटायची तर शहरातील ड्रेनेज व रस्ते यासाठी जी तरतुद अंदाजपत्रकात केलेली असते ती कमी पडेल व नागरिकांत असंतोष पसरेल यासाठी आर्थिक बाब तपासणे महत्त्वाचे आहे. नंतरच कोणतीही वाढ सुचवावी.

**श्री. गजानन बारवाल :** या बालवाड्यांच्या प्रस्तावासाठी शिक्षिके प्रमाणे प्रत्येक ठिकाणी एक सेविका असणे आवश्यक आहे.

**श्री. कचरु नवपुते** : शहरात ज्या ५० बालवाड्या सुरु करण्यात येणार आहे त्यपेक्षा ६० बालवाड्या चालू केल्यास प्रत्येक वार्डात एक अशा प्रकारची वाटणी होईल व मानधन जे रु. २००/- दरमहा आहे ते अल्पसे असून त्याऐवजी रु. ५००/- करण्यात यावे.

**श्री. रशिद मामु** : बालवाड्या प्रत्येक वार्डात असणे जरुरीचे नाही. केवळ ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्याच ठिकाणी सुरु करण्यात याव्या. परंतु यासाठी ज्या शिक्षिकेची निवड होणार, त्यामध्ये प्रत्येक जाती धर्माचा समावेश असावा व त्यांना दरमहा देण्यात येणारे मानधन रु. ५००/- करावे किंवा आर्थिक बाजु पाहावयाची झाल्यास कमीत कमी रु. ३००/- करावे.

**श्री. प्रभाकर विधाते** : मनपाच्या काही शाळांमधील इयत्ता ४ थी मुलांना बरोबर लिहिता वाचता येत नाही असे माझ्या निदर्शनास आले आहे. यासाठी बालवाड्या उघडून मुलांना कोंडून ठेवण्यात काहीच अर्थ नाही. तर मनपाचे शिक्षणाधिकारी यांचे निरीक्षण वारंवार असणे आवश्यक आहे.

**श्री. अविनाश कुमावत:** बालवाड्याची वेळ ३ तासासाठी आहे तेव्हा मानधन रु. २००/- ऐवजी रु. ३००/- करण्यात यावे.

**मा. महापौर** : ठिक आहे.

**श्री. शंकर मगर** : बालवाडी शिक्षिकांना मानधन रु. २००/- ऐवजी ३००/- करावे आणि रु. ५००/- जे साहित्य घेण्यासाठी ठेवलेले आहेत त्यामध्ये सर्व पैशांचा खर्च करुन केली जाईल याची शक्यता वाटत नाही. तेव्हा रु. ५००/- ची ऐवजी रु. ७००/- करण्यास माझा विरोध आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : या प्रस्तावात खालच्या ओळीत सदरील प्रस्ताव मंजुर करण्यास शिफारस करण्यात येते असे आहे, याचे कारण काय?

**मा. महापौर** : दुरुस्ती व्हावी.

**सौ. लता दलाल, श्री. अजित शेळके :** सदरील प्रस्ताव शिक्षण समितीकडून आलेला आहे.

**श्री. प्रकाश जावळे** : बालवाड्यांमध्ये ४० ते ५० विद्यार्थी / विद्यार्थीनी राहणार असून एका शिक्षिकेला ते जड जाईल तेव्हा त्यांना जोडीला एक सेविका प्रत्येक बालवाडीस असावी व त्यांना रु. ३००/- मानधन करण्याची मी सूचना करीत आहे.

**श्री. अजिज जागिरदार:** या संदर्भातील महाराष्ट्र शासनाची काय योजना आहे त्याची संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**मा. महापौर** : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**श्री. स. हुसैन स. अहमद :** मनपाच्या शाळांना बालवाड्या जोडून सुरु करण्याचा प्रस्ताव आहे परंतु काही मनपाच्या शाळा अशा आहेत की, त्या ठिकाणी बसण्याची बरोबर व्यवस्था नाही, मग आपण बालवाडीतील मुलांना बसण्याची क्षमता पाहून कशी व्यवस्था करणार याचा अहवाल शिक्षणाधिकाऱ्यांकडून घ्यावा.

**शिक्षणाधिकारी** : शासनाने ग्रामिण भागात आशी योजना सुरु केलेली आहे की, प्रत्येक शाळेला जोडून बालवाडी असावी. बालवाडीचा असा उद्देश आहे की शाळेमध्ये गळती कमी व्हावी, विद्यर्थी शाळेत हमखास यावेत. व इयत्ता १ ली च्या वर्गात विद्यार्थी भरपुर प्रमाणात मिळावे हा या पाठीमागील उद्देश आहे. आणि शासनाने गेली २-३ वर्षापासून जिल्हा परिषद अंतर्गत ही योजना सुरु केलेली आहे. त्यांना रु. १००/- मानधन तत्वावर देत होते आता मात्र रु. ३००/- मानधन केलेले आहे. मनपा क्षेत्रातील भाग हा शहरी असूनही शाळेत इयत्ता १ लीच्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी सुध्दा मुलांच्या बाबतीत फार प्रयत्न करावे लागतात. तेव्हा आपल्या शाळेला जोडून जर बालवाड्या असल्या तर विद्यार्थ्यांची संख्या जास्त प्रमाणात दिसून येईल आणि शाळा सुरळीत चालतील या दृष्टिकोनातून आपल्या शाळेमध्येच ही बालवाडी सुरु करावी असा शासनाच्या धर्तीवर हा प्रस्ताव सुरु करण्याचे ठरविले आहे. आपल्याला वेगळ्या शाळेची गरज नाही कारण मनपाच्या शाळा दोन शिप्ट मध्ये भरत असल्याने एका बालवाडीसाठी जागा सहज उपलब्ध होऊ शकते. एवढ्या मोठ्या प्रमाणात शिक्षक आपण त्या ठिकाणी देवू शकत नाही. म्हणून मानधन तत्वावर तीन तासाचे मुदतीवर ही बालवाडी चालेल आणि मानधन तत्वावर शिक्षकांची नेमणुक होईल ती दरवर्षी दहा महिनेसाठी राहील यावर रु. दिड लाख खर्च करावा लागेल अशी ही योजना आखलेली आहे आणि

यासाठी बालवाडीचे शिक्षिकांना एक प्रशिक्षण आम्ही देणार आहोत. बालवाडीचे साहित्य आम्ही भरपुर प्रमाणात आपल्याकडे आहे तेव्हा ते देखील घेण्याची तरतुद यामध्ये आहे. अशा रितीने जर मान्यता दिली तर आपल्या शाळेच्या दृष्टिने उपयुक्त असे होईल. आणि केवळ शाळेमध्येच या बालवाड्या राहतील. स्लम विभागामध्ये ज्या बालवाडया उघडावयाच्या त्याचे स्वतंत्र कार्यवाही प्रकल्प विभागाकडून होत आहे. त्यांच्या बालवाड्या वेगळ्या राहतील.

**श्री. रतनकुमार पंडागळे** : या बालवाड्यांची योजना केवळ दहा महिन्यासाठीच आहे की, पुन्हा वाढणार आहे. त्याचा पुढील कालावधीची माहिती द्यावी.

**शिक्षणाधिकारी** : एका वर्षासाठी दहा महिन्यासाठी नेमणूक राहील प्रत्येक वर्षी दहा महिन्याचा कालावधी राहील.

**श्री. तुळशीराम** : शिक्षणाधिकारी यांनी जी माहिती दिली की, स्लम भागामध्ये प्रकल्प विभागाअंतर्गत बालवाडी चालू आहेत तर त्या किती प्रभागामध्ये चालू आहेत याची माहिती घ्यावी.

**शिक्षणाधिकारी** : याबाबत प्रकल्प विभाग आपल्याला माहिती देईल. कारण आमच्या सोडून त्यांच्या बालवाड्या सुरू करण्याची कार्यवाही चालू आहे. त्या बालवाड्याची यादी आमच्याकडे आलेली आहे.

**श्री. तुळशीराम भगुरे** : प्रकल्प विभागामार्फत किती बालवाड्या चालू आहेत याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** : प्रकल्प अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**सहा. प्रकल्प अधिकारी :** मो. आंबेडकरनगर स्लम भागात बालवाडी गेल्या २-३ वर्षापासून प्रकल्प विभागातार्फत बालवाडी चालू आहे. आणि सध्या या विभागा अंतर्गत आठ-दहा बालवाड्या सुरू करण्याची कार्यवाही चालू आहे.

**श्री. तुळशीराम भगुरे :** शिक्षणाधिकारी म्हणतात स्लम भागात बालवाडी चालू आहे.तर प्रकल्प विभागा अंतर्गत एकाच ठिकाणी बालवाडी सुरू आहे. एक तर शिक्षण विभागाकडे बालवाड्यांची योजना चालू ठेवावी नाही तर प्रकल्प विभागाकडे बालवाडी चालविण्याची योजना असावी. याचा कारभार कुण्यातरी एकाच विभागाकडे असावा. आणि स्लम भागात बालवाडी म्हटले की, हर्सूल वॉर्ड स्लम मध्ये येत असूनही या ठिकाणी बालवाडी नाही. म्हणून हा मुद्या उपस्थित झाला आहे. प्रकल्प अधिकारी सध्या वर्कशॉपच्या धुळे जिल्ह्यातील कार्यक्रमास गेलेले आहेत. ते अद्याप आलेले नाहीत.

**मा. महापौर** : ज्या ठिकाणी मनपाची शाळा त्याच ठिकाणी बालवाडी त्याचबरोबर शिक्षिकेला मानधन व त्या बालवाड्यामध्ये खेळाचे साहित्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे. यावर आपण आपले मत मांडावे.

**श्री. तुळशीराम भगुरे :** याबाबत मी माझी सुचना मांडलेली आहे. परंतु हर्सूल प्रभाग स्लमध्ये येत असून या ठिकाणी बालवाडीचा प्रस्ताव का नाही याची माहिती द्यावी.

**श्री. रशिद मामू** : स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती मिळालेली नाही.

**मा. महापौर** : बालवाडीच्या संदर्भात आपल्याला काही सुचना करावयाच्या आहेत काय? तशी अंदाजपत्रकानुसार करणे योग्य होईल.

**श्री. मधुकर शिंदे** : प्रकल्प अधिकारी गैरहजर आहेत ते कुठे गेलेत याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** : संबंधित बाबतीत माहिती द्यावी.

**सहाय्यक प्रकल्प अधिकारी :** प्रकल्प अधिकारी सध्या वर्कशॉपच्या धुळे जिल्ह्यातील कार्यक्रमास गेलेले आहेत. ते अद्याप आलेले नाहीत.

**श्री. मधूकर शिंदे** : सर्वसाधारण सभेमध्ये संबधित अधिकारी उपस्थित का राहत नाही?

**श्री. नरेंद्र पाटील** : स. सदस्य श्री. भगुरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर व्यवस्थित मिळालेली नाही. मनपा अंतर्गत बालवाडी शिक्षण विभागामार्फत असावी आणि त्यावर पूर्ण नियंत्रण या शिक्षण विभागाने करावे प्रकल्प विभाग व शिक्षण विभाग यांच्यामध्ये कुण्यातरी एका विभागाकडे कार्यभार आसावा. असा प्रस्ताव मान्य करुन पुढील कार्यवाही चर्चा व्हावी.

**श्री. रशीद मामु** : मा. महापौर साहेब आपण स. सदस्य असतांना असे प्रश्न उपस्थित करीत होता की, सर्वसाधारण सभेच्या दिवशी संबंधीत अधिकारी हे उपस्थित असावे व त्यांनी माहिती द्यावी मग आता पुरेशी माहिती का देत नाही.

**मा. महापौर** : स. सदस्य श्री. रशीद मामू मी आताच मा. आयुक्त यांना सांगितलेले आहे की, प्रकल्प अधिकारी कुठे गेलेत याबाबत जाब विचारावा, तेव्हा याबाबतची माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल.

**श्री. नामदेव मानकापे :** माझ्या वार्डात स्लम भाग येतो. परंतु बालवाडी उघडावयाची असल्यास जागा उपलब्ध नाही तेव्हा जागा विकत घेणार काय?

**मा. महापौर** : याबाबत योग्य तो विचार करण्यात येईल. केवळ आता आपण बालवाडी शिक्षकांना मानधन व बालवाड्यांना साहित्य याबाबत सुचना करावी.

**सौ. लता दलाल** : आपल्याकडे बालवाड्या सुरु होणार यामध्ये आमचे दुमत नाही परंतु आपल्या मनपाच्या शाळांमध्ये इतर बाहेरील संख्या किंवा कुणीतरी क्रिडा अकादमीच्या नावे असलेल्या संख्येने वरीष्ठ मंत्रीमहोदय, व बड्या अधिकाऱ्यांकडून दबाव आणून प्रशासनाचे अधिकारी यांना कोर्टात बाँड पेपरवर शाळेच्या इमारतीचे बाबतीत करारपत्र लिहून द्यावे लागते हे बरोबर नाही. असे जर झाले तर उद्याला प्रत्येक संस्था या जिल्ह्यातील व शहराची जागा मागेल व उद्याला तुम्हास साधी बालवाडी चालविण्यास जागा शिल्लक राहणार नाही याची दखता घ्यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : स. सदस्या सौ. दलाल यांचे असे म्हणणे आहे की, एका मनपाची शाळा एका खाजगी संस्थेला मंत्र्यांच्या सुचनेनुसार प्रशासनाने ताब्यात द्यावी ही बाब गंभीर आहे. कारण मागे स्थायी समितीमध्ये असे ठरले होते की, मनपाची शाळा इतर कुठल्याही संस्थेला देण्यात येवू नये. तरीही आज दबावाने आपण देतो ते योग्य नाही.

**मा. महापौर** : स. सदस्य आपण सुचविलेली सूचना योग्य आहे. परंतु आज हा विषय इतिवृत्तावरील नसल्याने चर्चा करणे ठिक नाही. आता मी असा निर्णय देतो की, सन १९९२-९३ पासून मनपाच्या शाळेला जोडून सुरु होणाऱ्या बालवाड्यांकरीता दरमहा रु. २००/- शिक्षिकांना मानधन देण्याऐवजी त्यात वाढ करुन रु. ३००/- करण्यात यावे. तर प्रत्येक बालवाडीला मुलांच्या स्वच्छता व खेळ या साहित्यासाठी रु. ५००/- वरुन रु. ७००/- खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**श्री. रशीद मामु** : संबंधीत बालवाड्या कोणत्या प्रभागात होणार याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** : मनपाच्या शाळेमध्ये सदरील बालवाड्या सुरु करण्यात येणार असून ज्या भागाता जागा उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी जागा वगैरे पाहून कार्यवाही होईल.

**श्री. रतनकुमार पंडागळे** :ज्या वार्डात मनपाची शाळा नाही आपण तेथील विद्यार्थ्यांबाबत काय व्यवस्था करणार?

**मा. महापौर** : याबाबत संबंधीत अधिकारी पुढील बैठकीत माहिती देतील व चर्चा करण्यात येईल.

**श्री. प्रकाश जावळे** : बालवाड्या शिक्षण विभागा अंतर्गत की प्रकल्प विभागा अंतर्गत चालणार याची माहिती द्यावी व बालवाड्या चालविण्यास ज्या भागात शाळा नाहीत त्या ठिकाणी नवीन इमारत बांधून चालविणार की, समाज मंदिरात चालविणार याचाही विचार होणे आवश्यक आहे.

**मा. महापौर** : शिक्षण विभाग अंतर्गत बालवाड्यांची योजना चालू राहील व बालवाड्यासाठी ज्या ठिकाणी मनापाच्या शाळा नाहीत त्या ठिकाणी काय कार्यवाही करणार याबाबत माहिती देण्यात येईल.

**श्री. गंगाधर गाडे** : याबाबतची माहिती सर्व स. सदस्यांना द्यावी.

**मा. महापौर** : ठिक आहे. सर्व स. सदस्यांना लेखी माहिती देण्यात येइल.

**श्री. गंगाधर गाडे** : आपल्या शहरामध्ये अशा अनेक शैक्षणिक संस्था आहेत की, बालवाडी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून एक ते दोन हजार रुपये देणग्या घेतात. तेव्हा स्लम भागातील विशेषत: झोपडपट्टी भागातील गोरगरीब मुले अशा संस्थांमध्ये शिक्षण घेऊ शकत नाही. यासाठी मनपाने स्लम भगात शाळा सुरु कराव्यात आणि जर शाळा नसतील तर इमारती बांधाव्या अन्यथा समाज मंदिराचा उपयोग बालवाड्यांसाठी करावा. परंतु शिक्षण विभागामार्फत बालवाड्या मनपाच्या कशा आदर्श होतील याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. बालपणी मुलांवरती संस्कार चांगले पडण्यासाठी या योजनेचा लाभ सर्व गरीब व होतकरु नागरीकांना मिळेल यासाठी सदरील योजनेस मंजुरी द्यावी व बालवाड्याचे इमारती भोवती तारकुंपण करणे आवश्यक आहे.

**श्री. मधुकर शिंदे** : शहरामध्ये किती समाजमंदिरे आहेत याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** : आता विषय मंजुर करण्यात आलेला आहे. तेव्हा इतर बाबीवर चर्चा करु नये.

**श्री. तकी हसन खाँ** : ज्या ठिकाणी मनपाच्या शाळा नाहीत त्यांचेसाठी आपण काय

करणार?

**श्री. रतनकुमार पंडागळे:** स. सदस्य श्री. गाडे व तकी हसन यांनी जी सुचना मांडली त्यानुसार ज्या भागामध्ये मनपाच्या शाळा नाहीत परंतु तो भाग स्लममध्ये येतो तेथील गरीब व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आपण काय व्यवस्था करणार?

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** कोणकोणत्या ठिकाणी व स्लम भगातील कोणत्या भागात बालवाड्या सुरु करण्यात येणारी याची माहिती पुढील बेठकीत प्रशासन देईल परंतु संबंधीत प्रस्तावास अगोदर मंजुरी द्यावी.

**मा. महापौर** : ठीक आहे. सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. ३/२** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९२-९३ या सालापासून सध्या अस्तित्वात असलेल्या चौदा बालवाड्या आणि चार शाळांमध्ये जागेचा प्रश्न असल्याने या व्यतिरिक्त मनपाच्या सर्व शाळांना जोडून ५० बालवाड्या चालू करण्यात याव्यात. या बालवाड्यांकरीता दरमहा रु. ३००/- प्रमाणे मानधन तत्वावर एस.एस.सी. पास शिक्षिकांना फक्त दहा महिन्यांकरिता नियुक्त करण्यात येईल. प्रत्येक बालवाडीतील मुलांच्या स्वच्छता व खेळ या साहित्यासाठी रु. ७००/- खर्च करण्यात यावेत. बाकी साहित्य संबंधित शाळांचे वापरण्यात यावे. त्याचप्रमाणे बालवाडी तीन तास चालविली जाईल यासाठी बालवाडी शिक्षिकांना पाच दिवसांचे प्रथम प्रशिक्षण देण्यात यावे आणि सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पात बालवाड्यांसाठी लागणारी खर्चाची तरतुद करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४/३ :** उप आयुक्त मनपा औरंगाबाद हे मा. आयुक्तांचे मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहेत की, कार्यालयाच्या मालकीच्या नाथ मार्केट मधील दुकाने भाड्याने देणे संबंधात सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ८७/८ दिनांक २२/४/९० अनुसार दुकाने भाड्याने देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. या ठरावान्वये ठरलेल्या धोरणानुसार नाथ मार्केटच्या तळमजल्यावरील सर्व दुकाने भाड्याने दिली गेली आहेत.

पहिल्या मजल्यावरील १९ दुकाने भाड्याने देण्यासाठी वरील ठरावान्वये ठरलेल्या धोरणानुसार ५ वेळा निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात आली असता यातील फक्त एक राखीव दुकान भाड्याने दिले गेले आहे, इतर १८ अराखीव दुकाने अद्याप भाड्याने दिली गेलेली नाहीत. सदरची दुकाने भाड्याने घेण्यासाठी इच्छुक लोकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने सदरची १८ दुकाने अद्यापपर्यंत रिकामी आहेत. त्यामुळे मनपाला सुमारे ३ लाख रुपये भाडे मिळू शकले असते ते मिळाले नाही.

या दुकानापासून मिळणाऱ्या भाडे उत्पन्नाची नुकसान टाळण्यासाठी पहिल्या मजल्यावरील या १८ दुकानांचे हद्दीपावेतो वर नमुद केलेल्या ठरावान्वये ठरलेल्या भाडे धोरणात बदल करण्याची आवश्यकता आहे.

वर नमुद केलेल्या ठरावानुसार पहिल्या मजल्यावरील अराखीव दुकानासाठी सध्याचे भाडेधोरण खलीलप्रमाणे आहे.

(१) भाडेदर :- रु. ८०/- प्रति चौ. मी. प्रतिमहा या दरापेक्षा अधिक दराने भाडे देवू करणारास भाड्याने द्यावे.

(२) अनामत :- रु. २०००/-प्रति चौ. मी.

सध्याचे वरील भाडे धोरणात बदल करुन वर नमुद केलेल्या दराऐवजी खालील प्रमाणे भाडे दराचे सुधारीत धोरण लागू करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रस्तावित भाडे दर : (पहिल्या मजल्यावरील १८ अराखीव दुकानासाठी)

भाडे दराबाबत :

| | |
|---|---|
| १) फ्रन्ट साईडच्या दुकानासाठी | बॅक साईडच्या दुकानासाठी |
| (प्र.चौ.मी प्रतिमहा) | (प्र. चौ.मी. प्रतिमहा) |
| रु. ६०.०० | रु. ५०.०० |

वरील भाडे दरापेक्षा अधिक भाडे दराने भाडे देवू करणारास दुकाने भाड्याने दिली जातील. सदर दर सहाय्यक संचालक नगर रचना व शहर अभियंता यांचेकडून तांत्रिक दृष्ट्या व बाजार भावाचे दृष्टिने मनपाचे नुकसान होणार नाही ही बाब लक्षात घेऊन प्रस्तावित केलेले आहेत.

(२) भाडे दराचे बाबतचे प्रस्तावित धोरणातील अ.क्र. १ ला आधिन राहुन निवेदन जो भाडेदर नमुद केला जाईल त्याचे ५०% दराने पोटमाळ्याचे भाडे आकारले जाईल.

अनामत दराबाबत :- रु. १५००/- प्रति चौ. मी. दराने अनामत आकारली जाईल. पहिल्या मजल्यावरील १८ अराखीव दुकानांसाठी वरील प्रमाणे सुधारीत भाडे धोरण लागू करणे बाबत विचार होणेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>संवाद</u>**

**श्री. प्रदिप जैस्वाल** : सदरील प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर टेंडर कॉल करावे व त्वरीत कार्यवाही करावी. कारण गेल्या ३ वर्षापासून याबाबत सतत चर्चा होत आहे.

**श्री. गजानन बारवाल** : ज्या लोकांना या सुपर मार्केटच्या ठिकाणी जागा दिलेली आहे त्या ठिकाणच्या समोरील जी लॉबी आहे त्यांनी त्य ठिकाणी अतिक्रमण केलेले आहे आणि एका छोट्याशा जागेत स्कुटर सुध्दा लावलेले आहे. याबाबत त्वरीत कार्यवाही व्हावी व तेथे जाहिरात केंद्र एकाने बनविले आहे.

**श्री. अविनाश कुमावत**: या ठिकाणचे दुकान जे आहे ते एक राखीव आहे. ते राखीव दुकान खरंच भाड्याने दिलेले आहे काय व त्या मालकीचे आहे याची चौकशी व्हावी.

**मा. महापौर** : ठिक आहे. चौकशी करण्यात येईल. प्रस्ताव मंजुर.

**ठराव क्र. ४/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कार्यालयाच्या मालकीच्या नाथ मार्केटमधील दुकाने भाड्याने देणे संबंधात सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ८७/८ दि. २२/४/९० अन्वये कार्यवाही करण्यात आली. १ ल्या मजल्यावरील १९ दुकाने भाड्याने देण्यासाठी ठरलेल्या धोरणानुसार, एक राखीव दुकान भाड्याने दिले तर उरलेले १८ अराखीव दुकाने ५ वेळेस निविदा मागवूनही भाड्याने दिली गेली नाहीत व प्रतिसाद मिळाला नाही. यासाठी अराखीव दुकानासाठी सध्याचे ठेवण्यात आलेले दराऐवजी सुधरीत दुकानाचे भाउेदर खालील प्रमाणे प्रस्तावित आहे.

| | |
|---|---|
| १) फ्रन्ट साईडच्या दुकानांसाठी | बॅक साईड दुकानांसाठी |
| (प्र.चौमि. प्रतिमहा) | (प्र.चौमि. प्रतिमहा) |

रु. ६०.०० रु. ५०.००

या दरापेक्षा अधिक भाडे दराने भाडे देवू करणारास दुकाने भाड्याने दिली जावीत. याबाबत धोरणातील अ.क्र. १ च्या अधीन राहून निविदेत जो भाडेदर नमुद केला जाईल त्याचे ५०% दराने पोटमाळ्याचे भाडे आकारले जाईल. तर १८ अराखीव दुकानांसाठी अनामत दर रु. १५००/- प्रति चौ.मी. दराने आकारला जाईल. सदरील सुधारित भाडे धोरण लागू करणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५/४ :** उपआयुक्त मनपा यांनी प्रस्ताव सादर केला की, कमकुवत घटक कल्याण कार्यक्रमांतर्गत औरंगाबाद मनपा हद्दीतील अनुसूचित जाती, अनु जमाती भटक्या विमुक्त जाती जमातीतील महिलांना ५० टक्के अनुदान तत्वावर शिवणयंत्रे पुरविण्यात यावीत.

प्रकल्प विभागातर्फे १९८४ ते ९२ या दरम्यानच्या काळात अनु. जाती ४७७, अनु. जमाती२, भ.वि. जाती २७ इतर मागासवर्ग ५१ व सर्वसामान्य २०३ अशा (एकुण ७६०) विविध झोपडपट्टयातील महिलांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

प्रकल्प विभागातर्फे १९८४ ते ९० दरम्यान सहा महिन्याचे शिवणकलेचे प्रशिक्षण देण्यात येत होते. १९९२ या वर्षापासून तिन्ही शिवणकला केंद्राना शासन मान्यता मिळाली आहे. ज्या महिलांकडे प्रकल्प तर्फे देण्यात आलेल्या सहा महिन्याचे प्रशिक्षण प्रमाणपत्र आहे किंवा एक वर्ष अभ्यासक्रमाची शासकीय परिक्षा उत्तीर्ण झालेली आहे अशा गरीब गरजु व स्वतःचा व्यवसाय करु इच्छिणाऱ्या ज्यांचे कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळून उत्पन्न रु. ९०००/- च्या आत असेल आा महिलांना ५० टक्के अनुदान तत्वावर शिवणयंत्रे पुरविण्यात यावीत. यात प्रशिक्षित अपंग, परित्यक्ता, विधवा महिलांना प्राधान्य देण्यात यावे.

१९९२-९३ च्या अंदाजपत्रकात कमकुवत घटक कल्याणासाठी ३५ लक्ष रु. तरतुद ठेवण्यात आली आहे. यावर्षी पन्नास महिलांना लाभ द्यावयाचा झाल्यास सुमारे रु. ४०,०००/- (चाळीस हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे.

धोरणात्मक बाब असल्याने सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>संवाद</u>

**श्री. अविनाश कुमावत:** प्रस्ताव चांगला आहे. परंतु महिलांना यंत्रे पुरविण्याबाबत संबंधित प्रकल्प अधिकारी हे आपल्या जवळच्या माणसांना अधिक महत्त्व देतात तेव्हा वाटप प्रसंगी मा. आयुक्त व मा. महापौर आपण स्वतः उपस्थित रहावे आणि तुमच्यामार्फत वाटप झाले पाहिजे.

**श्री. मधुकर शिंदे** : एकुण ७६० महिलांना जे प्रशिक्षण देण्यात आले त्या कोणत्या विविध महिलांना प्रशिक्षित केले याची माहिती द्यावी.

**सौ. लता दलाल** : या ठिकाणी प्रकल्प अधिकारी उपस्थित नाहीत. मला आज त्याचे बाबत दुसरे मुद्दे उपस्थित करावयाचे होते.

**मा. महापौर** : स. सदस्या आपण प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत चर्चा करावी. इतर बाबतीत नाही.

**सौ. लता दलाल** : प्रकल्प विभागामार्फत फक्त झोपडपट्टी व स्लमच्या भागासाठीच योजना आहे काय? इतर वार्डासाठी नाही काय? याचा खुलासा व्हावा.

**श्री. अजिज जहागिरदार :** ज्या प्रायव्हेट संस्थामधून प्रशिक्षण पुर्ण केलेले असेल अशा व्यक्तींना या योजनाचा लाभ मिळणार आहे काय?

**मा. महापौर** : संबंधीत प्रस्तावात महिलांना शिवण यंत्रे पुरविण्यासाठी रु. ४० हजार खर्च अपेक्षित आहे. त्या अंदाजपत्रकास मंजुरी द्यावी.

**श्री. रशिद मामु** : सभागृहामध्ये संबंधीत अधिकारी उपस्थित नाहीत त्यामुळे या प्रस्तावतील माहिती जाणुन कुणाकडून घ्यावी याची कल्पना नाही. शहरातील बऱ्याचशा वस्त्यांमध्ये अशा प्रकारच्या योजना राबविल्या नाहीत तेव्हा कोणत्या महिलांना यंत्रे पुरविणार याचा उल्लेख यामध्ये असावा. बऱ्याचशा वस्त्यांमध्ये या योजनेची केंद्र उघडलेले नाहीत.

**मा. महापौर** : स. सदस्य रशीद मामू आपण सुचित केल्याप्रमाणे प्रकल्प अधिकारी कुठे गेले याबाबत मी मा. आयुक्तांना जाब विचारण्यास सांगितले आहे. पढील बैठकीत आपल्याला त्याचे उत्तर मिळेल. आता केवळ अंदाजपत्रकास मंजुरी द्यावी आणि असल्या काहीच सुचनाअसल्यास, त्या मांडाव्यात.

**श्री. अजिजुल्ला** : प्रत्येक वार्डातील दोन व्यक्तींना यंत्रे पुरविण्यात यावीत.

**श्री. बंडू प्रधान** : एखाद्या अधिकारी सभेस उपस्थित नाही ते काही महत्त्वाचे कामासाठी कुठे गेले असतील किंवा त्यांची प्रकृती ठिक नसेल म्हणून आले नसतील तर मग आपण काय त्यांना फाशी देणार आहोत काय?

**मा. महापौर** : आपण केवळ अंदाजपत्रकास मंजुरी द्यावी. पुढील कार्यवाही संबंधित विभागाकडून होईल.

**श्री. गंगाधर गाडे** : या प्रस्तावातील अंदाजपत्रकातील खर्चाची तरतुद अल्पशी असून ती रु. १ लाखापर्यंत आणि प्रत्येक वार्डातील स. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे दोन-दोन व्यक्तींना याचा लाभ मिळावा.

**श्री. प्रकाश जावळे** : प्रकल्प विभागाअंतर्गत ज्या महिला प्रशिक्षण घेतलेल्या आहेत त्यांना त्याचप्रमाणे शहरात समाज कल्याण विभागामार्फतही अशी प्रशिक्षणे झालेली आहेत त्यांनाही याचा लाभ होईल असे संयुक्त ठरवावे.

**श्री. बंडू प्रधान** : सदरची योजना आणि रु. ३५ लाख जी रक्कम ठेवलेली आहे ती आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या घटकांसाठी ठेवलेली असून त्याचा लाभ याच व्यक्तीना व्हावा. इतरांना होऊ नये. नाहीतर उद्याला मी माझ्या घरातील व्यक्तीला पुढे करुन फायदा घ्यायचा ते बरोबर नाही. केवळ कमकुवत घटकातील व्यक्तींनाच याचा लाभ घेता येईल हे लक्षात घ्यावे.

**श्री. शंकर मगर** : एकुण ७६० व्यक्तींना यंत्रे पुरविण्याची योजना आहेत तेव्हा प्रत्येक वार्डातील दहा-दहा व्यक्तींना जर स. सदस्यांच्या सुचनेनुसार लाभ दिला तर सर्वसामान्यांपर्यंत लोकांना माहिती होईल. कारण नेहरु रोजगार योजनेचा फायदा ही ज्यांना पाहिजे त्यांना झालेला नाही. तेव्हा याबाबतही विचार करावा.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** एका स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानुसार मी म्हणतो प्रकल्प अधिकारी हे एका कार्यशाळेच्या कार्यक्रमासंबंधी बाहेर गेलेले आहेत की सुट्टीवर गेलेले आहेत याची माहिती द्यावी.

**श्री. प्रदीप जैस्वाल** :

**श्री. अविनाश कुमावत:** सदरील खुलासा प्रशासनाने करावयाचा असतो. तुम्ही त्यातील भाग आहात काय?

**श्री. प्रकाश जावळे :** रु. १ लाखाचे अनुदान सदरील प्रस्तावासाठी तरतुद करावी म्हणजे जास्तीत जास्त महिलांना याचा लाभ घेता येईल.

**श्री. अजिज जहागिरदार :** प्रकल्प विभागाअंतर्गत किंवा मान्यताप्राप्त इंन्स्टिट्युट मार्फत शिवणकलेचे प्रशिक्षण घेतलेले असल्यास त्यांना या योजनेचा लाभ होतो. परंतु एखादी महिला जर प्रायव्हेट संस्थेतून जर प्रशिक्षित झालेली असल्यास त्यांच्या बाबतीतही विचार व्हावा अशी नोंद इतिवृत्तात व्हावी.

**मा. महापौर :** आता स. सदस्य श्री. शंकर मगर यांनी जी सुचना केली की, प्रकल्प विभागामार्फत नेहरु रोजगार योजने अंतर्गतची कामे समाधानकारक नाहीत परंतु सध्या ही योजना राबविने आवश्यक असून या प्रस्तावास मंजुरी देवून या प्रस्तावास मंजुरी देवून काम समाधानकारक असल्यास पुढे पुन्हा रु. ४० हजार वरुन रु. १ लाखापर्यंत करता येईल. कारण सदरची योजना ही पहिलीच आहे.

**श्री. गंगाधर गाडे :** सदरची योजना आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या व्यक्तींसाठीची असून यासाठी जास्तीत जास्त महिलांना लाभ घेता येईल यासाठी रु. १ लाखची तरतुद करण्यात यावी. कारण प्रत्येक वार्डातील स. सदस्य अशा कमकुवत घटकातील महिलांची शिफारस करु शकतील.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** कमकुवत वर्गील लोकांसाठीची खर्चाची तरतुद रु. ६५ लाख आहे. त्यातुन रु. १ लाख या योजनेसाठी केल्यास काहीच हरकत नाही.

**मा. महापौर :** रु. ३५ लाखाच्या तरतुदीतून आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गासाठीच्या योजना कशा कशाच्या आहेत तेही पाहणे आवश्यक आहे.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** रु. ४० हजारावरुन रु. ६० हजार या योजनेसाठी वाढवून देण्यात यावे. कारण ही योजना प्रकल्प विभागाकडील ज्या ठिकाणी केंद्रे उघडलेली होती व प्रशिक्षण झालेले आहे अशांना याचा लाभ होईल परंतु ज्यांच्या वार्डात अशा प्रकारची केंद्रे नाहीत त्यांच्यासाठी स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार वाढीव रकमेचा फायदा होईल.

**श्री. गंगाधर गाडे :** आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गासाठी काही योजना राबविण्यासाठी रु. ३५ लाखाची जर तरतुद आहे तर त्यामधुन रु. ६० हजार घेऊन या योजनेसाठी रु. १ लाखाची मंजुरी द्यावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** ज्या भागातील महिलांनी प्रशिक्षण घेतलेले नाही त्यांना आपण काय करणार?

**मा. महापौर :** ठिक आहे. स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार रु. ३५ लाखाच्या आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील लोकांसाठीचे असणाऱ्या विविध योजनामधून रु. ६० हजार या योजनेत समाविष्ट करण्यात येतो. अशी नोंद घ्यावी.

**श्री. इकबालसिंग गील:** मागील बैठकीत मो. पडेगांव येथील पाण्याच्या टाकीबाबत एक समिती गठण केलेली होती. त्या समितीचा अहवाल आजच्या बैठकीत आलेला आहे काय?

**मा. महापौर** : इतिवृत्त कायम करण्यात आलेले असून याबाबत आता चर्चा नको.

**ठराव क्र. ५/४** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रकल्प विभागामार्फत कमकुवत घटक कल्याण कार्यक्रमांतर्गत औरंगाबाद मनपा हद्दीतील अनु. जाती/जमाती, भटक्या विमुक्त जाती/जमातीतील महिलांना ५० टक्के अनुदान तत्वावर शिवणयंत्रे पुरविण्यात यावीत. ज्यामध्ये सन १९८४ ते ९२ पर्यंत एकुण ७६० विविध झोपडपट्टयातील महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. यामुळे ज्या महिलांकडे प्रकल्पतर्फे देण्यात आलेल्या सहा महिन्याचे प्रशिक्षण प्रमाणपत्र आहे किंवा एक वर्ष अभ्यासक्रमाची शासकीय परिक्षा उत्तीर्ण झालेली आहे. अशा गरीब व गरजु स्वत:चा व्यवसाय करु इच्छिणाऱ्या ज्यांचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळून रु. ९०००/- च्या आत वार्षिक उत्पन्न असेल अशा महिलांना ५० टक्के अनुदान तत्वावर शिवण यंत्रे पुरविण्यात यावीत. ज्यामध्ये प्रशिक्षित, अपंग, परित्यक्ता, विधवा महिलांना प्राधान्य देण्यात येईल. यासाठी सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पात कमकुवत घटक कल्याणासाठी ३५ लक्ष रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. या वर्षीच्या अंदाजपत्रकातून ५० महिलांना लाभ देण्यास रु. ४० हजार खर्च अपेक्षित रहील परंतु रु. ४० हजारावरुन वाढ करुन रु. ६० करावे म्हणजे रु. १ लाख या वर्षीच्या अंदाजपत्रकातून खर्च करुन याचा लाभ सर्व वार्डातील कमकुवत महिलांना होईल. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६/५ :** शासनाचे पत्र दि. ११/२/९२ अन्वये महारोगी सेवा समिती वरोरा, आनंदवन यांच्या रोगमुक्त कुष्ठरोग्यांनी तयार केलेल्या मालावर जकात कर माफ करण्याबाबत प्रस्ताव दिलेला आहे. सदरील संस्थ बँडेजेस, अपंगासाठी सायकल व इतर उत्पादन करीतअसून संस्थेस आर्थिक स्थिरता लाभ्ण्यासाठी या संस्थेने उत्पादीत केलेलया मालावर जकात आकारु नये अशा सुचना शासन परिपत्रक क्र. टीएएक्स/१०९१/७५५/प.क्र. १५३/९१ नवि-१४ दि. ५/१०/९३ अन्वये दिले आहे. त्या अनुषंगाने जकात अधिक्षक खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहे.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महारोगी सेवा समिती वरोरा, आनंदवन यांच्या रोगमुक्त कुष्ठरोग्यांनी तयार केलेल्या मालावर जकात माफी संबंधी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे अन्वये जकात नियम तयार केलेले असून, नियम ५ च्या जकात माफीच्या यादीत वरील बाबीचा समावेश नाही. शासनाने केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार रोगमुक्त कुष्ठरोग्यांनी तयार केलेल्या मालावर जकात माफी देण्याबाबत प्रस्ताव सादर. मंजुरी मिळाल्यास त्या अनुषंगाने जकात नियम ५ मध्ये (१९) नवीन समाविष्ठ करण्यात येईल. ही सवलत फक्त महारोगी सेवा समिती, वरोरा, आनंदवन यांनी उत्पादीत केलेल्या मालावरच सुट देण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद</u>**

**श्री. प्रदिप जैस्वाल** : सदरील प्रस्ताव मंजुर करावा.

**श्री. नरेंद्र पाटील** : या प्रस्तावास आमचा विरोध नाही. परंतु या प्रस्तावानुसार मनपास वार्षिक काही आर्थिक नुकसार किती सोसावे लागेल याबाबत नुसती सभागृहाला कल्पना व्हावी.

**मा. महापौर** : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**जकात अधिक्षक** : महारोगी सेवा समिती, वरोरा यांचयाकडून शहरात कोणकोणता माल येतो याची तपशीलवार माहिती पाहुनच सभागृहात सांगता येईल. त्याप्रमाणे शासनाने पत्रानुसार सदरील प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे.

**श्री. नरेंद्र पाटील** : शासनाचा उद्याला कोणताही निर्णय येईल व तोच निर्णय आपण माहिती अभवी आणला तर चालेला काय?

**जकात अधिक्षक** : तपशीलवार माहिती नेकके पाहूनच सांगणे योग्य होईल.

**श्री. नरेंद पाटील** : संबंधित अधिकाऱ्याने केवळ शासनाचे पत्रानुसार हा प्रस्ताव मांडलेला आहे. परंतु प्रशासनाने महारोगी सेवा समिती, वचरोरा यांचेकडील वर्षभरात किती माल येतो व त्याचा एकंदरीत जकात किती होतो याची माहिती सभागृहाला द्यावी. नुसता प्रस्ताव ठेवायचा आणि मंजुर घ्यावयाचा हा मार्ग योग्य नाही कोणत्याही प्रस्तावाची सविस्तर माहिती स. सदस्यांना मिळणे आवश्यक आहे.

**श्री. प्रकाश जावळे** : स. सदस्य श्री. पाटील याची सुचना योग्य असून त्यांनी सुचविल्याप्रमाणे सदरील प्रस्तावात सविस्तर माहिती देवून पुढील सभेत प्रस्ताव मांडावा.

**मा. महापौर** : सचिवांनी प्रस्ताव वाचुन दाखवावा.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून, शासनाचे पत्र आलेले असले तरी प्रस्ताव पास करावा किंवा नाही हा आपला अधिकार आहे. शासनाचे अधिकार असतील तर याबाबत प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडून वाढीव अनुदानाची मागणी करता येईल.

**श्री. शांताराम काळे** : माजी महापौर श्री. ओबेरॉय यांनी सुचित केल्याप्रमाणे शासनाचे पत्रानुसार काय करायचे ते करावे. परंतु परवाला पाणीपुरवठा बाबत सिडको व मनपाचा करार झालेला असतानाही आपण म्हणतो सिडकोने रु. ६० लाख द्यावे म्हणजे यासाठी शासनाचे पत्र आहे त्याचा करार आहे. याबाबत आपण काय करणार आहोत काय? आपली ही स्वायत्त संस्था आहे तेव्हा संबंधित समितीच्या वतीने शहरात संबंधित एजन्सीला माल येतो. तेव्हा त्याची किंमत काय आहे, त्याची किती टक्केवारी आपण जकात माफ करावी याची तपशीलवार माहिती सभागृहाला असणे आवश्यक आहे. अन्यथा रु. १० चा माल संबंधित एजन्सी जकात माफ करुन विक्री करतांना रु. १०० ला करतील हा फायदा एजन्सीला म्हणजे मनपाला त्याचा काय फायदा? याचाही विचार होणे आवश्यक आहे. सदरील प्रस्ताव माहितीसह पुढील बैठकीत ठेवावा अशी आमची विनंती आहे. म्हणजे संबंधित समितीलाही याचा फायदा नाही, फक्त एजन्सीला याचा फायदा होत असल्यास मनपाने जकात माफ का करावी? जर माफक करायची असल्यास काहीतरी जाचक अटी घालणे आवश्यक आहे.

**मा. महापौर** : याबाबत जकात अधिक्षक यांनी सविस्तर माहिती सभागृहाला द्यावी.

**जकात अधिक्षक** : स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार मी सविस्तर माहिती पुढील बैठकीत ठेवतो.

**मा. महापोर** : मी सभागृहात सर्व अधिकारी वर्गांना सूचित करतो की, आपल्या कक्षेतील कोणताही प्रस्ताव सभेमध्ये असल्यास, त्या प्रस्तावाची संपूर्ण माहिती व सखोल अभ्यास करुन सभागृहात माहिती द्यावी. अशी ताकीद देण्यात येत कारण आजचा प्रस्ताव माहिती अभवी पुढील बैठकीत ठेवायचा म्हणजे, या महिन्याचा प्रस्ताव पुढच्या महिन्यात व पुढच्या महिन्याचा प्रस्ताव त्याच्या पुढच्या महन्यात असे होता कामा नये. याची नोंद घ्यावी. आता सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावा.

**ठराव क्र. ६/५ :** सदरील प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ७/६ :** मा. उप आयुक्त मनपा यांनी प्रस्ताव सादर केला की, ८ डिसेंबर १९८२ रोजी महानगरपालिकेची स्थापना झाली. नगर परिषदेच्या काळाच्या मानाने ६० टक्के कर्मचाऱ्यांची संख्येत वाढ झाली. त्यामुळे महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांची संख्या जवळजवळ तीन हजार आहे. त्यात अर्ध्यापेक्षा जासत वर्ग चारचे कर्मचारी आहेत. शासनाच्या कामगार कायद्यानुसार ५०० कर्मचाऱ्यांचे मागे एक कामगार अधिकारी असणे आवश्यक आहे. परंतु आपणाकडे एकही पद कामगार अधिकाऱ्याचे निर्माण करण्यात आलेले नाही. त्यामुळे आपल्या मनपात कमीत कमी एक कामगार अधिकाऱ्यांचे पद निर्माण करणे आवश्यक आहे. जेणे करुन कामगारांच्या अडचणी व त्यांन केलेल्या मागण्यांवर सहज व सुलभरित्या तोडगा काढण्यासाठी तसेच कर्मचारी संघटना व व्यक्तिगत कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींवर तडजोड घडवून आणण्याबाबत प्रशासनान शिफारस करणे, कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालयात केलेल्या खटल्यामध्ये न्यायालयात हजर राहून बाजू मांडणे, मनपातील सेवकांना पेन्शन, ग्रॅच्युटी इत्यादी फायदे वेळेत मिळतात कि नाही याबाबत पाठपुरावा करणे, कर्मचाऱ्यांचे शिक्षण व प्रोत्साहन पुरस्कार यांची व्यवस्था करणे, तसेच प्रशासन व कामगार यांच्यातील दुवा म्हणून कामगार अधिकारी हे पद निर्माण करणे गरजेचे आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करुन महानगरपालिका औरंगाबादच्या अस्थापनेवर कामगार अधिकारी हे पद वेतनश्रेणी रु. २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० मध्ये निर्माण करण्यात यावे. त्याची शैक्षणिक पात्रता एस.एस.डब्ल्यु. (कामगार कल्याण व कर्मचारी प्रबंध) व कामगार कायद्याची पदविका आणि विधि पदवी धारकास प्राधान्य देण्यात येईल या अर्हतेवर "कामगार अधिकारी" हे पद निर्माण करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. प्रस्ताव मान्य झाल्यास शासनाकडे पाठविण्यात येईल.

<u>**संवाद**</u>

**सौ. लता दलाल** : मनपाचा कारभार कामगार कायद्याप्रमाणे चालतो की महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या नियमानुसार चालतो, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. दुसरा प्रश्न महाराष्ट्रातील किती महानगरपालिकांमध्ये किती कामगार वर्गाच्या संख्येनुसार कामगार अधिकारी पद भरले आहे. याची माहिती मिळवावी. तिसराप्रश्न आपल्या मनपामध्ये झोन अधिकारी व अधिकारी वर्ग किती आहेत, त्यांचे त्या पदाप्रमाणे कार्य काय आहे, त्याचप्रमाणे झोन वाईज स्वच्छता निरिक्षक किती आहत, त्यांचे नियंत्रण त्या जवानांवर

किंवा कामगार वर्गावर सुरळीत असते काय? शिवाय किती कामगारामध्ये एक कामगार कल्याण अधिकारी असावा व इतर मनपामध्ये काय तरतुद आहे त्याचप्रमाणे सदरील पद भरत असतांना, आपल्या मनपाची आर्थिक परिस्थिती बरी आहे काय? आणि या पदापासून सध्या काय फायदा याची सविस्तर माहिती प्रिथमतः सभागृहाला द्यावी.

**श्री. प्रकाश जावळे** : महाराष्ट्र शासनाच्या कामगार कायद्याप्रमाणे ५०० कामगारांमागे एक कामगार कल्याण अधिकारी हे पद असते काय? याची माहिती द्यावी आणि हे पद भरण्यासाठी मनपाला त्याच्यासाठी लागणारा खर्च (बोजा) परवडणारा आहे काय? याची माहितीसह पुढील बैठकीत ठेवावा व नंतरच सविस्तर चर्चा करण्यात येईल.

**श्री. अजिजुल्ला बेग** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ५०० कामगारामध्ये एक कामगार अधिकारी तर आपल्या मनपामध्ये जवळपास ३००० च्या वर अधिकारी/कर्मचारी आहेत त्यामध्ये १५०० च्या वर कामगार वर्ग आहे. त्यामुळे या प्रस्तावात असा कुठेही उल्लेख नाही की, एक पद निर्माण करावयाचे की, १५०० प्रमाणे तीन कामगार अधिकारी यांची पदे निर्माण करावयाची याबाबत मा. आयुक्त यांनी खुलासा करावा व नंतरच चर्चा व्हावी. कारण आर्थिक बोजा मनपाला परवडणारा नाही.

**श्री. नरेंद्र पाटील** : कामगार कायदा असो किंवा नसो आपल्याकडे एक कामगार कल्याण अधिकारी असणे आवश्यक आहे. कायद्यामध्ये असो किंवा नसो परंतु मनपामध्ये कामगारांच्या बऱ्याच समस्या आहेत. यासाठी एक पद असणे अत्यंत जरुरीचे आहे. कारण कामगारांची भरती त्यांचे पेंशन आणि इतर प्रश्न सोडविण्याची कामे कोण करतात याची माहिती सभागृहाला द्यावी व नंतरच चर्चा व्हावी.

**श्री. रतनकुमार पंडागळे** : प्रस्तावानुसार मनपामध्ये कामगार अधिकारी यांचे पद निर्माण करणे आवश्यक आहे. याचे कारण म्हणजे या ठिकाणी १६५६ कामगार वर्ग कार्यरत आहेत आणि यामुळे अनेक प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतात. उदा. पेन्शन, ग्रॅच्युटी, व इतर प्रश्न त्याचप्रमाणे काही कामगारांवर अन्याय झाल्यास अनेक प्रकरणे कामगार आयुक्त, कार्यालयात प्रलंबित आहेत. तर १९७६ पासून बऱ्याचशा कामगारांची सर्व्हीस बुके भरलेली नाहीत यासाठी कामगारांचे प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी या ठिकाणी कामगार अधिकारी यांचे पद निर्मिती करुन भरणे नितांत गरजेचे आहे आणि तेही मनपातील पात्रता कर्मचाऱ्यांमधून भरती करण्यात यावे व प्रस्ताव शासनाकडे पाठवावा ही विनंती.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : या महानगरपालिकेमध्ये कर्मचाऱ्यांवर कमीत कमी ५८% खर्च होतो. तेव्हा माझी सुचना आहे की, सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय** : एका कामगार अधिकारी पदास मंजुरी द्यावी, झोनवाईज अधिकारी पदे निर्माण करणे सध्या गरजेचे नाही व खर्च करणे

शक्य नाही. तेव्हा एकाच पदास मान्यता द्यावी तेही कर्मचाऱ्यांमधून.

**श्री. रशीद मामु** : कामगार वर्ग या ठिकाणी बरेच आहेत यासाठी कर्मचाऱ्यांमधून या पदाची भरती करण्यापूर्वी कामगार कायद्यानुसार त्यांना संपूर्ण माहिती व ट्रेनिंग झालेला असणे आवश्यक आहे.

**श्री. बंडू प्रधान** : मनपात चतुर्थश्रेणी कर्मचारी जवळपास १६०० आहेत. त्यामुळे त्यांचे अनेक प्रश्न असतात त्यांच्या प्रश्नाबाबत चतुर्थश्रेणीतील कर्मचारी मा. आयुक्तांकडे डायरेक्ट जाऊन भेटू शकत नाही व प्रश्न कामगारांना चांगल्या प्रकारे सांगताही येणार नाही यासाठी कामगार व प्रशासन यांच्यामध्ये एक दुवा म्हणून मिडीएटर असणे आवश्यक असून पद निर्मित करुन कामगारांची बाजू व प्रश्न सोडविण्यासाठी संपाबाबत तडजोड घडविण्यासाठी कामगार अधिकारी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. यामुळे या प्रस्तावास मंजुरी द्यावी.

**श्री. शांताराम काळे** : स. सदस्य श्री. बंडू प्रधान यांनी सूचित केल्याप्रमाणे कामगार व प्रशासन यांच्यामध्ये मेडिएटर असतो. मेडिएटर नसतो तर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संघटना कशासाठी आहेत. तेव्हा स. सदस्य बंडू प्रधान अशा संघटनेत असून स्वत: असमर्थता दाखवितात, असा त्याचा अर्थ समजायचा ही बाब फार दुर्देवाची आहे.

**श्री. स. हुसैन ह. अहमद** :बऱ्याचशा स.सदस्यांनी या प्रस्तावावर वेगवेगळी मते मांडली. तेव्हा कामगार अधिकारी पदाबाबत किती पदे असावीत, त्यांची शैक्षणिक पात्रता व अनुभव यांचा उल्लेख असणे आवश्यक असून त्याचप्रमाणे निर्णय घेणे आवश्यक आहे.

**मा. महापौर** : काही स. सदस्यांच्या सुचनेनुसार कामगार अधिकाऱ्यांचे एक पद निर्मितीस मंजुरी देण्यात येते.

**सौ. लता दलाल** : आम्ही विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळणार नाहीत काय? जर प्रशासन माहिती देण्यास असमर्थ असल्यास आम्ही माहिती देण्यास असमर्थ असल्यास आम्ही माहिती मागणार नाही.

**मा. महापौर** : केवळ एका पदाच्या निर्मितीस मंजुरी द्यावयाची आहे. त्यासाठी माहिती काय द्यायची.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : सदरील पद निर्मितीस मंजुरी देऊ नये. माझ्या मते महापालिकेने विनाकारण जनतेवर लादलेला पैशाचा बोजा आहे. यास माझ ाविरोध असून यासाठी पोल घेण्यात यावे. प्रशासन कोणताही प्रस्ताव ठेवील त्यास मान्यता द्यायची किंवा नाही हा सभागृहाचा अधिकार आहे.

**मा. महापौर** : ठिक आहे.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय** : सदरचा प्रस्ताव प्रशासनाने सात पदासाठीचा मांडलेला असून आपणास केवळ एका पद निर्मितीस मंजुरी द्यावयाची आहे. कारण यामुळे कामगारांमध्ये एक प्रकारची शिस्त लागेल व सर्व कामे सुरळीत होतील. एका पदासाठी खर्चाची बोजा पडला तरी हरकत नाही. परंतु एक पद निर्मितीस मंजुरी द्यावी.

**श्री नरेंद्र पाटील** : या प्रस्तावा बाबत मला एक प्रश्न उपस्थित करायचा असून आपल्या कडील कामगार वर्गापैकी कुणी कर्मचारी औद्योगिक कोर्टात आतापर्यंत गेलेला आहे काय? नसेल गेला तर पद निर्मिती नको परंतु गेला असेल तर मंजुर करण्यास काहीच हरकत नाही.

**मा. महापौर** : स. सदस्य हा विषय चर्चेचा नसून पद निर्मिती करावे किंवा नाही याचा विचार करावा यासाठी विषय चर्चीला जावा.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय** : औद्योगिक न्यायालयात गेलाही असेल तरी आम्ही कार्यालयात बसून वाटाघाटी करुन निर्णय घेतलेला आहे.

**श्री. बंडू प्रधान** : प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. आता चर्चा नको.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : सदरील पदासाठी पोल करण्यात यावे. मतदानासाठी भाग पाडावे.

**मा. महापौर** : तुमचा जर या पदास विरोध असल्यास तसे स्पष्टपणे सांगावे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : माझा या पद निर्मितीस विरोध आहे. एकदा स. सदस्यांनी मतास टाकण्याची सुचना केलेली असून पोल घेण्यात यावे. अन्यथा आपण असे प्रस्ताव मंजुर करुन चुकीचा पायंडा घालीत आहोत असे मला वाटते. स.सदस्यांनी मागणी केल्यानुसार पोल घेण्याचा कायद्यामध्ये अधिकार आहे.

**मा. महापौर** : आपला विरोध या ठिकाणी नोंदविलेला आहे. आता सदरील पद निर्मितीस मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ७/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ८ डिसेंबर १९८२ रोजी महानगरपालिकेची स्थापना झाली त्यामुळे ६०% कर्मचाऱ्यांची वाढ होऊन त्यात अर्ध्यापेक्षा जास्त कर्मचारी वर्ग - ४ चे आहेत आणि शासनाच्या कामगार कायद्यानुसार ५०० कर्मचाऱ्यांमागे एक कामगार अधिकारी असणे आवश्यक आहे. त्यामुळे कमीत कमी एक कामगार अधिकाऱ्यांचे पद निर्माण करणे आवश्यक आहे जेणे करुन कामगारांच्या अडचणी व त्यांच्या मागण्या आणि विविध तक्रारी सहजरित्या सोडविणे व तडजोड घडवून आणणे तसेच प्रशासनास शिफारशी न्यायालयात हजर राहून बाजू मांडणे आणि इतर कार्यालयीन अडचणी बाबत व्यवस्था करण्यासाठी औरंगाबाद मनपा आस्थापनेवर रुपये २०००-६०-२३००-दशे-७५-३२००-१००-३५०० या वेतनश्रेणीत एम.एस.डब्ल्यु/एम.ए. समाजशास्त्र (कामगार कल्याण व कर्मचारी प्रबंध व कामगार कायद्याची पदविका आणि विधिपदवी धारकास प्राधान्य देण्यात येईल या शैक्षणिक अर्हतेवर एका कामगार अधिकारी या पद निर्मितीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८/७** : कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी औरंगाबाद पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ भाग ३ व औरंगाबाद पुर्नरचित पाणी पुरवठा व्यवस्था टप्पा क्र. १ ह्या योजनेमधील सिडको प्रशासनाच्या पी.सी लोकवर्गणीचा वाटा याबाबत प्रस्ताव सादर केला की,

(अ) औरंगाबाद पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ भाग १ ही १०० दशलक्ष लिटर पाणी पुरवठ्याची योजना लवकरच पूर्ण होत आहे. सदर योजना परिसर अभियांत्रिकी मंडळाचे मालकीची असली तरी योजनेच्या १० टक्के खर्चाचा एजन्सीवाटा औरंगाबाद महानगरपालिकेचे उचलला आहे. ही योजना औरंगाबाद शहराची (सिडको विभाग धरुन) पाणी पुरवठ्याची गरज लक्षात घेऊन महापालिकेच्या प्रस्तावानुसार व विनंतीनुसार शहराची एकुण २००१ सालातील पाण्याची गरज लक्षात घेऊन मंजुर केलेली आहे.

सदर योजनेवर एकुण खर्च रुपये २६२६.३० लाख एवढी येणार आहे. त्यात महापालिकेची लोकवर्गणी (पी.पी.) २७२.७३ लाख एवढी आहे. या योजनेअंतर्गत घेतल्या जाणाऱ्या ९० दशलक्ष लिटर पाण्यापैकी (पाणी पुरवठा योजना १०० एम.एल.डी. ला डिझाईल केलेली आहे. पैकी २२००१ साली करण्यासाठी सिडको विभागाला या योजनेतून १८.५० दशलक्ष लिटर पाणी दिले जाणार आहे. या योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या सिडको विभागाल पाण्याच्या प्रमाणात लोक वर्गणीचा प्रमाण वाटा (प्रवोशनेट शेअर, इन पब्लीक कॉन्ट्रीब्युशन) सिडको प्रशासनाकडून मनपाला मिळणे लोकहिताच्या दृष्टिने गरजेचे आहे. त्यानुसार या योजने अंतर्गत महानगरपालिकेला द्याव्या लागणाऱ्या रुपये २७२.७३ ला ाख लोकवर्गणीपैकी सिडको प्रशासनाचा प्रमाण वाटा (प्रपोर्शनेट शेअर) रुपये ५६.०६ लाख एवढा येतो. तो सिडको प्रशासनाने मनपा कडे द्यावा.

(ब) औरंगाबाद पुनर्रचित पाणी पुरवठा व्यवस्था टप्पा क्र. १ ही योजना नक्षत्रवाडी येथे आलेले शुध्द पाणी शहरापर्यंत नेऊन शहरात ते वितरीत करणे अशा स्वरुपाची आहे. ही योजना मनपाच्या मालकीची आहे. या योजने अंतर्गत शहरात पाण्याच्या नवीन टाकया बांधणे व विविध व्यासाच १०२ कि.मिटर लांबीच्या बिडाचे पाईप लाईन टाकणे अशा स्वरुपाची कामे आहेत व ही योजना परिसर अभियांत्रिकी मंडळामार्फत राबविण्यात येत आहे. योजनेची कामे प्रगती पथावर आहेत. या योजनेचा खर्च १८६२.३४ लाखाचा आहे. त्यात महाराष्ट्र शासनाचे ४३४.५२ लाख (२३.३३) टक्के अनुदान वगळून बाकीचा खर्च महानगरपालिका आयुर्विमा महामंडळाकडून व खुल्या बाजारातून कर्ज उभारुन करत आहे.

या योजनेच्या खर्चात महानगरपालिके बरोबरच सिडको प्रशसनाचाही सहभाग आवश्यक आहे. कारण ही योजना पहिल्या (अ) मध्ये वर्णन केलेल्या योजनेचाच पुरक ब पुढचा भाग आहे. एकुण दोन्ही योजन मिळूनच औरंगाबाद शहर व सिडको विभागाला सुरळीत पाणी पुरवठा केला जाणार आहे. किंवा त्यासाठीच इतक्या मोठ्या खर्चाच्या ह्या दोन योजना शासनाने मंजुर केल्या आहेत. या योजने अंतर्गत पाणी वितरणाच्या प्रमाणात (१८.५ एम.एल.डी.) सिडको प्रशासनाने खर्चाचा वाटा उचलणे गरजेचे आहे. हा खर्च सिडको विभागाने एकुण १०५.१८ लाख एवढा करावयाचा आहे.

एकुण (अ) व (ब) मध्ये दर्शविलेल्या योजनांतर्गत सिडको प्रशासनाने महानगरपालिकेला

(१) ५६.०६ लाख (अ प्रमाणे)

(२) १०५.१८ लाख (ब प्रमाणे) असे एकच १६१.१८ लाख एवढी रक्कम खर्चाच्या हिश्याच्या स्वरुपात द्यावयाची आहे.

सिडको विभागाला पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेने घेतली असल्याने महापालिकेला फार मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे व महानगरपालिकेवर खर्चाचा बोजा वाढत आहे. करिता सिडको प्रशासनाकडून रुपये १६१.१८ लाख एवढा निधि मनपास लवकर उपलब्ध होणे जरुरी आहे.

करिता सिडको प्रशासनाकडून महानगरपालिकेस दोन्ही पाणी योजनाच्या खर्चाचा प्रमाण हिस्सा लोकवर्गणी निमित्त म्हणून रुपये १६१.१८ लाख एवढी मिळणे बाबत माहितीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. नरेंद्र पाटील** : सदरील प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही परंतु मी माझे मत या ठिकाणी व्यक्त करतो की, ज्या काही रक्कमा आपण सिडको कार्यालयाकडून घेणार आहोत त्याबाबत सिडकोने उद्या असे नको म्हणायला पाहिजे की, आम्ही ते काम करुन देतो पैसे देऊ शकत

नाही. असे मागील वेळेस रुपये ८० लाख देणे संदर्भात सुचित केले होते. ते आठवत असेल म्हणून असला प्रकार पुन्हा घडू नये यासाठी ज्या काही रक्कमा सिडकोकडून घ्यावयाच्या आहेत त्यारोख रक्कमेत घेण्यात येऊन तेथील कामे मनपातर्फे करण्यात यावी. दुसरे म्हणजे मागील सर्वसाधारण सभेमध्ये असे ठरविले होते की, सिडकोच्या वेगळ्या पंपिंगबाबत जे क्रांती चौकात करायचे ठरविले त्यासाठी रुपये ६० लाख अंदाजे खर्च अपक्षित आहे. तो खर्च सुध्दा सिडकोकडून मागवून सदरील काम मनपाने करावे अशा प्रकारचा ठराव याला जोडून मंजुर केला तर योग्य हाईल.

**श्री. अजिज जहागिरदार :** सिडको व मनपामध्ये जो सुरुवातीला करार झालेला होता. तो किती पाणी पुरवठा करण्याचा झालेला आहे. ४ १/२ एमएलडी पाणी देण्याचा करार झालेला होता. त्यानंतर ही आज आपण ११ एमएलडी पाणी सिडकोला पुरवितो आणि या बदल्यात आपण त्यांचेकडून पैसे किती घेतो. आणि मनपाचे नुकसान किती होते. ते मनपास सहन करावे लागत आहे. यात दर्शविल्याप्रमाणे रुपये १ कोटी ३० लाख रुपये खर्च आहे. त्याच्या बदल्यात रु. ५६ लाख घेण्यात येणार. त्यानंतरही या पाईपलाईनला जोडून काही खर्च पुन्हा होणार आहे की नाही त्यावरील मेंटनेन्सची जबाबदारी कुणावर रहील याचा खुलासा सभागृहात व्हावा. ज्यामध्ये जादा पाणी वाटपाचे पैसे वसुल होणार आहेत काय? सिडकोशी जो करार झालेला होता त्या कराराचे आज उल्लंघन झालेले वाटते.

**श्री. रतनकुमार पंडागळे** : स. सदस्य श्री. अजिज जहागिरदार यांनी सुचित केल्यानुसार मला अशी सुचना करावयाची आहे की, ज्यावेळी सिडकोशी करार झाला त्यावेळी किती सेक्टरला पाणी पुरवठा करण्याचा झालेला होता. आज आपण किती सेक्टरला पुरवठा करतो. याचीही माहिती या ठिकाणी सांगितली जावी.

**श्री. अजिजुल्ला बेग** : प्रस्ताव त्वरीत मंजुर करुन सिडको कडून रु. १६१.१८ लाख एवढा निधी वसुल करणे जरुरीचे आहे. कारण शहराला पाणी कमी करुन सिडकोला पाणी पुरवठा केला जातो.

**श्री. मधुकर शिंदे** : सिडकोचा पाण्याचा प्रश्न हा ज्वलंत प्रश्न असून सिडकोच्या पाणीपुरवठ्या संदर्भात मनपा तोट्यात आहे. व तोट्यातच राहणार तरीही सदरील प्रस्ताव मंजुर व्हावा.

**श्री. अविनाश कुमावत:** सिडकोला क्रांती चौक येथून पंपिंगने पाणी पुरवठा करण्यासाठी रुपये ६० लाख खर्च येणार आहे तो खर्चही सिडकोकडून घेऊन सदरील प्रस्ताव मंजुर करावा.

**श्री. स. अहमद स. रफत :** सिडको भागाला पाणी पुरवठा करिता असलयाने बऱ्याचशा शहरात भागांना त्रासहोत आहे. शहरात ३५ एमएलडी पाणी पुरवठा होतो त्या मानाने अल्प असून दररोज ६५ एमएलडी पुरवठा होणे आवश्यक असते. यासाठी सिडकोला वाढीव पुरवठा करुनही सिडकोकडून पैसे लवकर उपलब्ध होत नाही व फटका येथील जनतेला बसतो. हत्तेसिंग पुरा व मरिमाता मंदिर या

ठिकाणी दोन पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या त्यामधून बऱ्याचशा भगांना पाणी पुरवठा केला जातो. परंतु यातुनही सिडको भागाला पुरवठा केला जात असल्याने आमच्या भागातील नागरिकांना पाणी कमी येते. यासाठी सिडकोकडून घेण्यात येणारा निधी तात्काळ घेऊन शहरातील नागरिकांना होणारा त्रास वाचवावा तर बरे वाटेल.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** या योजनेसाठीचा निधी रुपये १.६१ लाखामधून सिडकोचा निधी रुपये ५६ लाख घेण्यात यावा. कारण तेथील नागरिकांचा नेहमीचाच प्रश्न आहे त्या ठिकाणी ११ एमएलडी पाणी पुरवठा केला जातो परंतु प्रत्यक्षात ९ एमएलडी पाणी त्यांचेपर्यंत पोहचते यासाठी या निधीचा पैसा सिडकोकडून त्वरित घ्यावा किंवा शासनाकडून अनुदानाची मागणी करावी व सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री. शांताराम काळे :** सिडकोला पुरवठा केल्याने जो निधी रुपये ५६ लाख रुपयांचा घ्यावयाचा आहे. तो घेण्यात यावा. सिडकोच्या पाणी पुरवठ्याने शहरातील नागरिकांना झळ पोहोचते. सिडकोने जर निधी लवकर दिला तर प्रशासनाला काम करायला सोईस्कर जाईल अन्यथा काही तरतूद कमी पडली तर स. सदस्यांनी पुढे ओरड करु नये. यासाठी सदरचा प्रस्तावा मंजुर करावा सिडकोतील स.सदस्य नगरसेवकांनी या भागातील लोकांच्या पाणी प्रश्नावर जिव्हाळ्याने उठून लक्ष देतात त्याप्रमाणे निधी कसा वसूल होईल याकडेही लक्ष देणे जरुरीचे आहे.

**श्री. पांडूरंग पैठणकर :** आताच पाणी पुरवठा बाबत वितरणाचा टप्पा - २ चे उद्‌घाटन झालेले आहे. त्यामुळे याचाही फायदा सिडको वासीयांना होईल. यामध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण न आणता पाणी पुरवठा व्यवस्थित वितरण होण्याचे संबंधित अधिकाऱ्यांचे काम आहे. सिडकोच्या नागरिकांनी आतापर्यंत जनआंदोलन उभारण्याचे प्रयत्न केलेले आहे. त्यांना सहकार्य करण्यासाठी मनपाने आपले कर्तव्य पार पाडावयास पाहिजे.

**श्री. तकीहसन खान :** सर्वात प्रथम सिडकोकडून पाणी वितरणाचा निधी वसुल करणे आवश्यक आहे. जायकवाडी जलाशयातून पाणी शहर वासीयांसाठी मनपा विकत घेते ते नागरिकांच्या टॅक्सच्या आधारे आणि तेच पाणी सिडकोला पुरवठा केला जातो. म्हणजे मनपाला भुर्दंड बसतो. नव्हे तर शहरातील नागरिकांना टॅक्सद्वारे फटका बसतो. म्हणजे टॅक्स भरायचा शहरातील नागरिकांनी व पुरवठा करायचा सिडकोला हा कोणता न्याय आहे. यासाठी सिडको वासियांकडून मालमत्ता कर वसुल करण अत्यावश्यक असून त्यामधूनच पाणी पुरवठ्याचे पैसे ॲडजस्ट करणे ठिक राहील. अन्यथा एका एमएलडी द्वारे प्रतिवर्षी खर्च रुपये २ कोटी मनपाला तोटा सहन करावा लागतो. याचाही विचार करावा.

**श्री. बंडू प्रधान :** सिडकोच्या काही स. सदस्यांनी पाणी पुरवठ्याच्या संदर्भात नारळे फोडली तर आपणही त्यांचे समोर बकरे कापायला पाहिजे की,

तुम्ही मालमत्ता कर लवकर भरीत जावा म्हणून सिडकोतील स. सदस्य केवळ राजकारणाचे भांडवल करुन स्वत:ची पोळी भाजुन घेतात. यासाठी शहरातील जनतेकडून टॅक्स वसुल करुन सिडकोला पुरवठा का दिला जाते येथील नागरिकांना का त्रास सहन करावा लागतो याचाही विचार व्हावा.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** मालमत्ता कराबाबत मागे एक दोनदा बैठका झालेल्या होत्या त्यावेळी बऱ्याचशा सुचना मिळाल्या त्यात सवलत म्हणून रुपये २५, ५०, ७५ व १०० अशा टक्केवारीने सिडको वासियांकडून मालमत्ताकर वसुल करण्यासंदर्भात विचार निर्माण झालेला होता. जेणे करुन २२% कर वसुल होऊ शकेल. यासाठी प्रशासनानी शासनाकडे विचारणा केलेली आहे. परंतु पाणी प्रश्न ज्वलंत असून सिडकोकडून जो काही निधी आहे तो घेण्यात यावा.

**श्री. मुजिब आलमशा खान :** आपण प्रशासनातील अधिकारी आहात काय, खुलासा करण्यासाठी.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** मी माजी महापौर असून मला याबाबतची कल्पना आहे.

**श्री. शंकर मगर :** सिडको वासीय टॅक्स भरीत नाही म्हणून त्यांना पाणीपुरवठा करु नये, असे बोलणे योगय वाटत नाही. हा फक्त सिउको आणि मनपा प्रशासन यांच्यातील करारान्वये नफा किंवा तोटा ही प्रशासकीय बाब आहे. माझ्या माहितीप्रमाणे बरेचशे नागरिक टॅक्स भरित आहेत मी स्वत: कमी जास्त करुन फाईली दाखल केलेल्या आहेत. व टॅक्स भरलेले आहेत. करारान्वये जो निधी आहे तो वसुल करुन घेणे आवश्यक आहे. अन्यथ शासनाकडून तो पैसा वळवून घ्यावा. परंतु सिडकोला पाणी पुरवठा करणे मनपाचे कर्तव्य आहे.

**श्री. मोतीराम घडामोडे :** सिडकोच्या मालमत्ता टॅक्सबाबत माजी महापौरांबरोबर अनेकदा बेठका झालेल्या आहेत. नागरिकांनीही बैठका घेतलेल्या आहेत. फक्त प्रश्न एवढाच की, किती टॅक्स घ्यावयाचा कसा घ्यावयाचा यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न होते. आम्ही टॅक्स भरित नाही असे कधीही म्हटलेले नाही. मालमत्ता कर उद्यालाही भरण्यास तयार आहोत परंतु मालमत्ता कर भरित नाही म्हणून पाणी देत नाही ही भूमिका योग्य वाटत नाही. मनपाने सिडकोला पाणी वाटपाबाबत फार घाई केलेली आहे. त्यामुळे त्यांचे डोक्यावर हा प्रश्न सतत भेडसावतात आणि तो सोडविणे आवश्यक आहे. परंतु क्रांतीचौक येथे रुपये ६० लाख खर्च करुन स्वतंत्र पंपिंग हाऊस बांधण्याबाबतचा प्रस्ताव जो पुढे आला त्याबाबत तत्काळ या सोबतच मंजुर करुन घेण्याचा निर्णय घ्यावा व कायम स्वरुपात करावी, व जो निधी सिडकोकडून वसुल करायचा आहे तो आणि येणारा पंपिंगचा खर्च रु. ६० लाख सिडकोकडून वसुल करुन घ्यावा. नसे आम्ही मनपाकडे आंदोलनाची भाषा करतो तीच पध्दत सिडको कार्यालयाकडे सुध्दा नागरकांसहीत आम्ही करुत.

**श्री. अजिज जहागिरदार :** सिडको व मनपामध्ये आधी ४ सेक्टरला पाणी पुरवठा देण्याचा करार त्यावेळी झालेला होता व आता तर ९ ते १३ सेक्टर पर्यन्त

पुरवठा केला जातो व उद्याला २० सेक्टर झाले तर आपण त्यांनाही पाणी पुरवठा कोणत्या आधारे करणार याचाही विचार करावा. सिडको भाग बऱ्याच ठिकाणी विकसित होत आहे. त्या सर्वांना आपण सुविधा देणार काय? त्यांचे ड्रेनेज व पाणी पुरवठा पध्दती बाबत जोपर्यनत पुन्हा पउताळणी होत नाही तोपर्यन्त कोणताही करार होता कामा नये. या ठिकाणी कोणतीही भावना प्रधान होण्याचा प्रश्नच येत नाही. जो भाग विकसित करायचा आहे त्यासाठी मनपाने आताच पेपरला जाहिरात देऊन आपला खुलासा स्पष्ट करावयास पाहिजे की, आम्ही पडेगाव किंवा वाळुज व इतर सिडको भागातील ड्रेनेज पाणी व इतर सुविधा पुरवु शकतो किंवा नाही. अन्यथा पुढील प्रसंग असाच येणार आहे याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**श्री. नरेंद्र पाटील** : स. सदस्य श्री. अजिज जहागिरदार यांनी सुचित केलेल्या काही विचाराशी मी सहमत आहे. याच्यामध्ये काही सिडको सेक्टरच्या बाबतीत मनपा प्रशासनाने वेळोवेळी योग्य तो करार केलेला नाही ती चुक पुर्णतः प्रशासनाची आहे, हे मान्य करायला पाहिजे आणि सिडकोची जनता व शहराची जनता ही वेगवेगळी समजत असतील तर ती चुकीची समजूत आहे.

**श्री. प्रकाश जावळे** : स. सदस्यांनी औरंगाबादच्या शहर वासीयांवर केलेला आरोप परत घ्यावा.

**श्री. नरेंद्र पाटील** : आम्ही सिडकोचे रहिवासी जरी असलो तरी औरंगाबाद शहराच्या नागरिकाप्रमाणेच पाणी पट्टी रुपये ४००/- आम्ही भरतो. त्यामुळे पाणी मुबलक मिळावे ही विनंती आहे.

**श्री. बंडू प्रधान** : काही स. सदस्य या ठिकाणचे काचा फोडतात तर उद्याला तेच स. सदस्य सिडकोकडून पैसे वसुल करणेसाठी डोके फोडायला पाहिजे.

**श्री. रतनकुमार पंडागळे** : सिडकोकडून पैसे वसुल करण्यासाठी व पुन्हा वाढीव पाणी पुरवठा करण्यासाठी मनपा व सिडको प्रशासन यांची समजुत एक बैठक बोलावून त्यामध्ये असा करार करुन घ्यावयास पाहीजे नंतरच चर्चा करायला पाहिजे.

**श्री. नरेंद्र पाटील** : ठराव मंजुर करुन पैसे वसुल करणे बाबत बोलणी करावी.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय** : ठराव कंडिशनल मंजुर करावा.

**श्री. प्रकाश जावळे** : सिडकोचा बेजबाबदारपणा शहरातील नागरिकांवर का लादता?

**मा. महापौर** : सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. यामध्ये अशी अट लादण्यात येते की, क्रांतीचौक पंपिंगच्या कामासाठी लागणारा रु. ६० लाख अंदाजित खर्च करण्यासाठी एक संयुक्ती बैठक सिडको प्रशासन व मनपा यामध्ये घडवून चर्चा करावी. सदरील खर्च सिडकोनी त्वरीत द्यावा व नंतरच कामाला सुरुवात करण्यात येईल असा निर्णय या सोबतच देण्यात येतो.

**ठराव क्र.८/७** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ भाग १ व पाणी पुरवठा व्यवस्था टप्पा क्र. १ या योजनेमधील सिडको प्रशासनाच्या पी.सी. (लोकवर्गणीचा वाटा) प्रस्ताव (अ) मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकुण खर्च २७२७.३० लाख एवढा

आहे. त्यामध्ये महानगरपालिकेची लोकवर्गणी २७२.७३ लाख एवढी आहे. या योजने अंतर्गत २००१ सालापर्यंत सिडको विभागाला ८.५० दशलक्ष लि. पाणी दिले जाणार असुन मनपाला द्याव्या लागणाऱ्या रुपये २७२.७३ लाख लोकवर्गनीपैकी सिडको प्रशासनाचा प्रमाण वाटा (प्रपोर्श सर शेअर) रु. ५६.०६ लाख एवढा मनपाला द्यावा तर प्रस्तावातील (ब) नुसार पाणी पुरवठा व्यवस्था टप्पा क्र. १ या योजनेचा खर्च१८६२.३४ रुपये लाखाचा असून शासनाचा ४३४.५१ लाख (२३.३३) टक्के अनुदान वगळून बाकीचा खर्च मनपा आयुर्विमा महामंडळाकडून व खुल्या बाजारातून कर्ज उभारत आहे. या योजनेच्या खर्चात मनपा बरोबरच सिडको प्रशासनाचाही सहभाग आवश्यक आहे. या पाणी वितरणाच्या प्रमाणात (१८.५ एमएलडी) साठी सिडको प्रशासनाने खर्चाचा वाटा उचलणे गरजेचे असून यासाठी लागणारा खर्च सिडकोने रुपये १०५.१८ लाख एवढा द्यावयाचा आहे. म्हणजे प्रस्तावातील एकुण (अ) व (ब) मध्ये दर्शविलेल्या योजने अंतर्गत सिडको प्रशासनाने मनपाला

१) ५६.०६ लाख रुपये (अ प्रमाणे)

२) १०५.१८ लाख रुपये (ब प्रमाणे)

एकुण १६१.१८ लाख रुपये एवढी रक्कम खर्चाच्या हिश्याच्या स्वरुपात सिडको प्रशासनाकडून महानगरपालिकेस दोन्ही पाणी योजनांच्या खर्चाचा प्रमाण हिस्सा लोकवर्गणी म्हणून मनपास मिळणेसाठीच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्याचबरोबर क्रांतीचौक येथील सिडकोसाठी पुरवठा करणेसाठी पंपिगच्या कामासाठी रुपये ६० लाख अंदाजे खर्च येणार असल्याने सदरील खर्च सिडकोने देण्यास प्रथमतः लेखी करारान्वये स्पष्ट केल्यास पुढील काम मनपाने चालू करावे या आखेर रुपये ६० लाखास मान्यता देण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९/८ :** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की सिडकोच्या काही सेक्टरचा उतार महानगरपालिकेकडे असल्यामुळे सिडकोच्या त्या भागातील ड्रेनेज लाईन महानगरपालिकेच्या ड्रेनेज लाईनला जोडावे लागणार आहे. त्यानुसार सिडको कार्यालयाने त्यांचे पत्र क्र. सिडको /ईई/एफ६१/एयुआर-९० दिनांक १०/८/९० नुसार मजनुहील ते दमडीमहल या रोडच्या लगत ड्रेनेज लाईन टाकुन पंचायत समिती कार्यालयामागे महानगरपालिकेच्या मुख्य जलनिःसारण वाहिनीस जोडण्याची परवाणगी मागितली. सिडकोकडून येणारी नवीन जलनिःसारण वाहिनी महानगरपालिकेच्या सध्याच्या जलनिःसारण वाहिनीस जोडल्यास ती अपुरी होते म्हणून ती बदलणे आवश्यक आहे. मुख्य निःसारण वाहिनी "सी" पंचायत समिती कार्यालय ते सिध्दार्थ गार्डन पर्यनत बदलण्याचा खर्च ३० लाख रुपये अपेक्षित आहे. त्यानुसार सिडको कार्यालयाने त्यांचे प.क्र. ४५१ दि. ४/७/९१ नुसार कळविले की, सदरील कामासाठी सिडको व मनपा यांचे वरीष्ठ अधिकाऱ्यात झालेल्या चर्चेनुसार सिडको या खर्चाचा १/५ हिस्सा भरणार आहे. त्यानुसार या कामासाठीच्या एकुण खर्च रुपये १३० लाख रुपयांचा १/५ हिस्सा रु. २६ लाख मनपाकडे त्वरीत भरण्यासाठी पत्र क्र. मनपा/विका/१५/९२ दिनांक ९/१/९२ नुसार कळविण्यात आले अ. तसेच सिध्दार्थ उद्यान ते बनेवाडी "बी" सी वरचा बदलण्याचा खर्च सध्याच्या दराने २५० लाख रुपये एवढा येणार आहे. यातील १/५ हिस्सा म्हणजे ५० लाख रुपये सिडकोकडून येणे आहे.

शिवाय सिडकोकडून परिसरातून एक उप जलनिःसारण वाहिनी पोलीस क्वार्टर जवळ मनपा हद्दीत येत आहे. पोलीस क्वार्टर ते पंचायत समिती कार्यालय पर्यन्तचे काम मनपा हद्दीत असले तरी सिडको प्रशासनातर्फे पुर्ण होणार आहे असे सांगण्यात आले.

तरी सिडकोला मनपा हद्दीत या उप जलनिःसारण वाहिनीचे काम करु देण्यास मनपाची हरकत नाही.

शिवाय सिडको परिसरातून एक उप जलनिःसारण वाहिनी किराडपुरा जवळ मनपा हद्दीत सोडण्यात येत आहे. ही जलनिःसारण वाहिनी मुख्य "सी" वर पर्यन्त नेण्याचे काम मनपातर्फे अपेक्षित आहे. त्यावरील अंदाजित खर्च रुपये १७.४३ लाख आहे तो खर्च पुर्णपणे सिडकोने करावयाचा आहे.

एक उप जलनिःसारण वाहिनी बायजीपुऱ्याजवळ मनपा हद्दीत सिडकोतर्फे सोडली जाणार आहे. त्या वाढीव जलनिःसारण वाहिनीमुळे "डी" सीवर बायजीपुरा ते समर्थनगर जंक्शन पर्यन्त बदलावी लागणार आहे. त्याचा अंदाजित खर्च रुपये ५५.७३ लाख एवढा आहे. त्याचा १/५ हिस्सा रु. ११.१४ लाख सिडकोकडून येणे आहे.

वरील सर्व खर्च रु. १०४.५० लाखाची मागणी सिडको प्रशासनाकडे पत्र क्र.मनपा/काअ/९२/३६९ दिनांक २७.५.९२ नुसार करण्यता आली आहे.

सातारा सेक्टर सिडकोतर्फे ११ वी योजनेचे घरे तयार होत आहे त्या भागाची जल निःसारण वाहिनी महानगरपालिकेच्या जलनिःसारण वाहिनीस जोडण्यासाठी वाढीव खर्च रुपये २,७३,१२०/- सिडको कडून प्राप्त झाले आहे. व त्याचे काम प्रगती पथावर आहे.

तरी वरील प्रकारे सिडकोशी पत्र व्यवहार करुन त्यांच्याकडून रुपये १०४.५७ लाख वसुल करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

<u>संवाद</u>

**श्री. मुजिब आलमशा खान** : सदरील प्रस्ताव मुंर करण्यात येऊ नये कारण की, पंचायत समितीकडे किराडपुरा व कटकट दरवाजाकडे सिडको ड्रेनेज लाईन उताराने जोडल्या जाणार तर येथील नागरिकांना आपण मारणार आहात काय? आणि माझ्या वार्डातील पंचायत समिती ते फाजपुरा पर्यन्तची रुपये ४ १/२ लाखाजी ड्रेनेज लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक तयार सन १९८८-८९ ला केलेले होते. तेव्हा अंदाजपत्रक व ड्रेनेज लाईन कुठे आहे. ते कार्यालयात सापडू शकत नाही. ही दुर्देवाची बाब आहे. या उलट ड्रेनेज लाईन टाकावयाची आहे तर सिडको ते बनेवाडी अशी डायरेक्ट लाईन टाकावी तरच मंजुरी देण्यात येईल अन्यथा नाही. यासाठी आम्हास काय करायचे ते करायला आम्ही मागेपुढे पाहणार नाही. सगळीकडून लाईन पंचायत समितीकडे वळविण्याच्या उद्देश आहे काय. एक तर पाणी पुरवठा करायचा आणि त्यांची घाणही आमच्या वार्डाकडे घेण्याचा प्रस्ताव मला मान्य नाही. सदरील प्रस्ताव दरुस्त करुन मांडावा सिडकोने याबाबतचा सर्व खर्च स्वतः करावा आणि सिडको गाडर्न ते पंचायत समिती व पंचायत समिती ते सिध्दार्थ गार्डन व गाडर्न ते बनेवाडी अशा प्रकारचे अंदाजपत्रक तयार करावयाची कामे करण्यास संबंधित अधिकारी चालबाजपणा करित आहेत. त्यामुळे स. सदस्यांमध्ये विरोध होतो. यासाठी प्रस्तावात दुरुस्ती करुन नंतरच प्रस्ताव ठेवावा.

**श्री. तकी हसन खान :** मजनुहील ते बनेवाडी ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम आहे परंतु सिडको ते पंचायत समितीला ड्रेनेज लाईन जोडल्याचे काम हे सिडकोचे आहे. व त्याच्या फायद्यान्वये आपण लाईन का टाकावी. हा महत्त्वाचा प्रश्न आहे. म्हणजे काम सिडकोचे व त्यावर मनपाने इतरत्र कर्ज काढून व जनतेच्या टॅक्स मधून खर्च करण्यासाठी सिडकोला सहकार्य ही बाब योग्य नसून मनपाला परवडणारी नाही. यासाठी सिडकोकडून पैसे न घेता त्यांनी त्यांचे कडेच ही योजना आखावी. शहरामध्ये किंवा मनपाकडे रोख दाखवू नये. व मनपाने यावर कोणतीही सहानुभूती करु नये. खर्चाचे १/५ खर्च सिडकोने करावे. मनपावर खर्च लादु नये.

**श्री. मुजिब आलमखा खान :** मी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार पंचायत समिती ते फाजलपुरा ड्रेनेज लाईनचे ४ १/२ लाखाचे अंदाजपत्रक कुठे गायब झाले याचे कारण काय याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर :** स. सदस्य आपण केवळ प्रस्तावावर चर्चा करावी

**श्री. अजिज जहागिरदार :** मजनुहिल ते पंचायत समितीला ड्रेनेज लाईन जोडण्यात येणार ती सिडकोकडून येणारी परंतु माझ्या माहितीप्रमाणे पंचायत समितीजवळ जो नाला आहे त्या नाल्यामध्ये मोठमोठे चेंबर आहेत आणि याला लाईनच नाही तर तुम्ही जोडणार कोठून यासाठी माझा स्पष्ट आरोप आहे की, काही वरिष्ठांच्या दबावाखाली येऊन संबंधीत अधिकाऱ्यांनी हे दोन प्रस्ताव असे ठेवलेले आहेत या बाबत चौकशी व्हावी.

**मा. महापौर :** स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी आणि या प्रस्तावानुसार स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे कोठपर्यन्त ड्रेनेज लाईन टाकावयाची यामध्ये दुरुस्ती करुन प्रस्ताव पुढील सभेमध्ये सविस्तर ठेवावा.

**ठराव क्र. ९/८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ड्रेनेज लाईन कोठून कोठपर्यंन्त टाकावयाची या अंदाजपत्रकातील उल्लेखासह सविस्तर लिहुन प्रस्ताव पुढील सभेमध्ये ठेवावे असे सर्वानुमते ठरले.

# पुरवणी विषय पत्रिका

**संवाद**

**मा. महापौर** : मुळ विषय पत्रिका संपलेली आहे. आता ००.१५ मिनिटासाठी चहापाण्यासाठी सभा तहकुब करण्यात येते (वेळ अंदाजे २:१० वाजता. सभेला सुरुवात अंदाजे २.४५ मिनिटानी)

**विषय क्र. १०/१ :** (१) शिवाजी मैदान जवळ टी.बी. क्लिनिक पासून सर्वे नं. २३ मौजे हिमायत नगर पर्यंत ६० फुट डी.पी. रोडसाठी बाधित होणाऱ्या सर्व खाजगी आणि सरकारी जमिनी भुसंपादन करणे.

(२) शिवाजी मैदानावर स्टेडियम साठी जागा रुंद करण्याच्या उद्देशाने सिटी क्लबची पुर्ण इमारत तेथू हटविणे जरुरी वाटते व आज औरंगाबाद शहरामध्ये अशी इतकी मोठी कोणतीही खुली जागा उपलब्ध नसल्यामुळे वरील जागेमध्ये बाधित होणारी सिटी क्लबची ईमारत व जमिन भुसंपादन करुन क्रिडा प्रेमिंना सहकार्य करावे व सिटी क्लबसाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे

सूचक : श्री. अजिजुल्ला बेग
अनुमोदक : श्री. नरेंद्र पाटील
दिनांक : १३/३/९२

**संवाद**

**श्री. अजिजुल्ला बेग** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ठराव मंजुर करावा. कारण शिवाजी मैदानावर स्टेडियमसाठी जागा रुंद करण्याच्या उद्देशाने सिटी क्लबची पुर्ण इमारत तेथून हटविणे व तेथील इमारत व जमिन भुसंपादन करुन स्टेडियमसाठी सहकार्य करावे.

**श्री. अजिज जहागिरदार** : मी सिटी क्लबचा मेंबर या नात्याने सांगू इच्छितो की, सिटी क्लब व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये प्रकरण कोर्टात आहे. जोपर्यंत योग्य तो निर्णय लागत नाही व पुर्णपणे पडताळणी होत नाही तोपर्यंत कोणतीही कार्यवाही होऊ नये.

**श्री. नरेंद्र पाटील** : स. सदस्य श्री. अजिज जहागिरदार म्हणतात की, कोर्ट प्रकरण आहे. परंतु कोर्टाचा निकाल लागेल केव्हा मग प्रस्तावाठेवून मंजुरी मिळवायची त्याला वेळ लागेल. यासाठी प्रस्ताव मंजुर करुन ठेवावा नंतर निर्णय लागल्यास कार्यवाही होईल.

**श्री. अजिज जहागिरदार** : माझी काही हरकत नाही. परंतु कोर्ट प्रकरण आहे तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्याबाबत माझा आक्षेप आहे ही नोंद इतिवृत्तात व्हावी.

**मा. महापौर** : ठिक आहे.

**श्री. अविनाश कुमावत**: ६० फुट डी.पी रोड जो आहे तो सरळ जायला पाहिजे कुठेही टर्न होता कामा नये. मग सिटी क्लब हटवण्यास आमची काही हरकत नाही याची नोंद घ्यावी.

**मा. महापौर** : ठिक आहे. नोंद घ्यावी सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. १०/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवजी मैदानाजवळ टी.बी. क्लिनीक पासून सर्व्हे नं. ३३ मौजे हिमायत नगर पर्यंत ६० फुट डि.पी. रोडसाठी बाधीत होणाऱ्या सर्व खाजगी आणि सरकारी जमिनी भुसंपादन करावे ज्या मध्ये सिटी क्लबची इमारत तेथुन हटविण्यास त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देवून त्या ठिकाणी स्टेडियम साठी जागा तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११/२ :** (१) औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा योजन टप्पा क्र. (२) भाग एक या योजनेचा एकुण खर्च २७ कोटी २७ लाख रुपये आहे. या मधुन महानगरपालिकेस २ कोटी ७२ लाख रुपये लोक वर्गणी १०% दराने भरणे जरुरी आहे. या योजनेमधून सिडकोला १४.१३ एम.एल.डी. पाणी देण्यात येईल प्रमाणे सिडको कडून लोक वर्गणी वसुल करण्यात यावी प्रस्ताव विचारार्थ सादर.
(२) पुनर्वसन टप्पा क्र. (१) चे पाणी पुरवठ्याची योजना पुर्ण महानगरपालिकेच्या खर्चाची आहे. जिचा एकुण खर्च महानगरपालिकेस १८ कोटी ६२ लाख रुपये करावा लागेल. या योजनेचा आर्थिक भार पूर्ण महानगरपालिकेवर पडेल. या योजनेमधून सिडकोला पाणी पुरविण्यत येईल. पाण्याचे प्रमाणात सिडको प्रशासनाकडून या योजनेवरील खर्चाचा रक्कम वसुल करण्यात यावी. या दोन्ही योजना बाबत महानगरपालिकेस जास्त खर्च येत आहे यासाठी सिउको प्रशासनाकडून वरील दोन्ही योजना बाबत पाणी वापराचे प्रमाणात लोक कोणी व पाणी वितरण व्यवस्थेच्या खर्चाची रक्कम वसुल करण्यात यावी प्रस्ताव विचारार्थ सादर.

सूचक : श्री. अलफखाँ हुसैनखाँ
अनुमोदक : श्री. स. हुसैन स. अहमद
दिनांक ८/४/९२

**<u>ठराव क्र. ११/२ :</u>** प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**<u>संवाद</u>**

**मा. महापौर** : आताचा सिडकोच्या पाणी पुरवठा बाबत प्रस्ताव मंजुर झालेला आहे. तोच प्रस्ताव असल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. १२/३ :** औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास योजनेअंतर्गत होणाऱ्या विकासाचे कामामध्ये नागरिकांना स्वखुशीने स्वतःचे प्लॉट, घर, अथवा कोणतेही मालमत्ता ओरंगाबाद महानगरपालिकेच्या स्वाधीन केल्यास अशा नागरिकांना औरंगाबाद महानगरपालिके तर्फे प्रशंसा प्रमाणपत्र, नौकरीत प्राधान्य, औरंगाबाद महानगरपालिकेच्या योजनेमध्ये प्राधान्य व इतर कुठल्याही औरंगाबाद महानगरपालिकेच्या सवलती मध्ये सदरील नागरिकांना प्राधान्य देण्यात यावे.

सूचक : श्री धनंजय मनोहरराव गंगाखेडकर
अनुमोदक : श्री. किशोर थोरात

**<u>संवाद</u>**

**श्री. अविनाश कुमावत**: प्रस्तावाचे अनुमोदक नाहीत.
**मा. महापौर** : प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**ठराव क्र. १२/३ :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्र. १३/४ :** औरंगाबाद शहराचे ऐतिहासिक महत्त्व आणि शहराच्या सौंदर्यात भर टाकण्याच्या दृष्टिने या शहराचे विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारे माजी सहकार मंत्री आणि शहराचे लाडके नेते यांची स्मृती शहरवासीयांच्या सतत स्मरणात रहावी या करिता माणिकचंद पहाडे विधी विद्यालय (लॉ कॉलेज) समोरील चौकात कै. बाबुराव काळे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत विचारार्थ सादर.

सुचक : ॲड. एकबालसिंग गिल
अनुमोदक : १) श्री. तुळशीराम भगुरे
२) श्री. मुजिब खान
दिनांक १५/६/९२

<u>संवाद</u>

**श्री. अविनाश कुमावत:** यापुर्वी एक पुतळा समिती गठण केलेली आहे. त्यांच्याकडे हा प्रस्ताव पाठवावा.

**श्री. बंडू प्रधान** : सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात हरकत नाही, परंतु अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविण्याबाबतचा प्रस्ताव मंजुर होऊन कार्यवाही झालेली नाही. १ ऑगस्ट रोजी अण्णाभाऊ साठे यांची जयंती येत आहे. तोपर्यंत पुतळ्याची सर्व तयारी झाली पाहिजे. अन्यथा नागरीक उपोषणास बसतील याची नोंद घ्यावी.

**मा. महापौर** : या संदभ्रत स. सदस्य श्री. महादेव सुर्यवंशी यांचेशी माझे बोलणे झालेले आहे आणि त्या ठिकाणी पुतळा १ तारखे पर्यंत बसणार आहे. अशी चर्चा झालेली आहे. तेथील जागे वरील बेटाचे उद्‌घाटन होणार आहे व अण्णाभाऊ साठे पुतळा समितीचा मी अध्यक्ष हे मी सुचित करतो.

**श्री. प्रकाश जावळे** : जागेचे उद्‌घाटन माजी महापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या हस्ते झालेले आहे आणि अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा लवकरात लवकर बसविण्यासाठी आपण प्रयत्न करावेत.

**श्री. अविनाश कुमावत:** समर्थ नगर येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा बसविण्याचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. त्यासाठी प्रयत्न व्हावे.

**श्री. रतनकुमार पंडागळे** : मिल कॉर्नर येथे छत्रपती शाहु महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याचा प्रस्ताव झालेला आहे. त्याबाबत त्वरीत कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर** : जे प्रस्ताव मंजुर झालेले आहेत त्याबाबत लवकरच कार्यवाही होईल आता सदरील प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. १३/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराचे विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारे माजी सहकार मंत्री आणि लाडके नेते स्मृती स्मरणात रहावी म्हणून माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय (लॉ कॉलेज) समोरील चौकात कै. बाबुरावजी काळे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४/५ :** मो. चिकलठाण गावात उद्यान नसल्यामुळे नागरिक, महिला, मुलाची अत्यंत गैरसोय होत आहे. या गावात महापालिके मार्फत उद्यान तयार करणे बाबत रहिवाशांनी वारंवार मागणी केली आहे.

येथे नगरभुमापन क्रमांक ७०१ मध्ये भरपुर जागा उपलब्ध असून सदर जागे पैकी १ एकर ३६ गुंठे जमीन उद्यानासाठी खरेदी करण्यात यावी व या जमिनीत अद्ययावत व सुसज्ज असे उद्यान तयार करण्यात यावे. जेणे करुन रहिवाशांची उद्यानाची मागणी पुर्ण होईल प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. कचरु नवपुते
अनुमोदक १) श्री. गिरजाराम हाळनोर
२) श्री. महादेव सुर्यवंशी
दिनांक : १६/६/९२

<u>संवाद</u>

**श्री. प्रकाश जावळे** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गट क्र. ७०१ मधील १.३६ गुंठे जमिन जर उद्यानासाठी विकत घ्यावयाची असल्यास त्याचा मोबदला किती द्यावा लागेल याचा उल्लेख केल्यास प्रस्ताव मंजुर व्हावा.

**श्री. अविनाश कुमावत**: प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. १४/५** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. चिकलठाणा गावात उद्यान नसल्यामुळे गट क्र. ७०१ मधील १ एकर ३६ गुंठे जमिन उद्यानासाठी महानगरपालिके तर्फे खरेदी करुन या ठिकाणी सुसज्ज व अद्ययावत उद्यान तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५/६ :** ज्युबलीपार्क भडकलगेट येथे सिटी बसेस फार मोठ्या प्रमाणावर थांबतात रोडच्या पश्चिमेकडून शहागंज, सिडको, हडको, हर्सुल व इतर ठिकाणी जाणाऱ्या तर पूर्वे कडून रेल्वे स्टेशन, औरंगपुरा व इतर ठिकाणी जाणाऱ्या सर्व सिटी बसेसचे थांबे येथे आहेत व औरंगपुरा सिटी बस थांब्याप्रमाणेच ज्युबलीपार्क शहर बस थांब्यावर भरपुर प्रवाशी असतात तसेच या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असून ह्या परिसरात वर्षातुन बऱ्याच वेळा डॉ. बाबासाहेबांच्या अनुयायांचे धार्मिक व सामाजिक कार्यक्रम होतात व तेथे जनतेस बसण्या करीताच नव्हे तर उभे राहण्या करीता सुध्दा जागा कमी पडते.
तसेच रस्त्याला लागून फुटपाथची जागा फार कमी आहे व त्यामुळे लोक रस्त्यावर थांबतात. त्यामुळे या जागी अपघात होण्याची फार मोठी भिती आहे. त्यासाठी ज्युबलीपार्कची पुर्वेकडील संरक्षित भिंत बांधणेचे काम लवकरच सुरु होणार आहे. करिता सदर भिंत आहे त्या ठिकाणापासून आत वायव्येकडे किमान १० ते १५ फुट मागे घेऊन नंतरच भिंतीचे बांधकाम करण्यात यावे. जेणे करुन या परिसरात प्रशस्त जागा जनतेला वापरासाठी मिळेल व अपघात होणार नाही. करीता प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

सुचक : श्री. रतनकुमार पंडागळे
अनुमोदक : श्री. बंडू प्रधान
दिनांक १५/६/९२

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. १५/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्युबली पार्क पूर्वे कडील संरक्षित भिंत बांधण्याचे काम लवकरच सुरु होणार असल्याने ज्या ठिकाणी भिंत आहे त्या ठिकाणापासून पश्चिमेस किमान १० ते १५ फुट मागे घेऊन नंतरच संरक्षित भिंतीचे बांधकाम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६/७ :** आगामी सर्वसाधारण सभेमध्ये रेल्वे स्टेशन रोड तुळजा भवानी मातेच्या समोरील चौकात पुर्णाकृती श्री. महाराना प्रतापांचा पुतळा बसविणे बाबत तसेचवरील चौकास महाराणा प्रताप चौक असे नाव देण्यास मंजुरीसाठी सादर. तरी आपण वरील चौकामध्ये पुतळा बसवून महाराणा प्रताप चौक असे नाव द्यावे ही विनंती.

सुचक : श्री. गजानन बारवाल
अनुमोदक १) श्री. मधुकर शिंदे
२)श्री. महादेव सुर्यवंशी
दिनांक : १७/६/९२

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. १५/६** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन रोडवर तुळजा भवानी मातेच्या समोरील चौकात श्री. महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास व तेथील चौकास महाराणा प्रताप चौक असे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७/८ :** सध्या औरंगाबाद शहरात अतिक्रमण अनधिकृत बांधकामाचा प्रश्न महापालिकेस भेडसावत आहे. त्याकरिता या ठरावाद्वारे असे सुचित करावयाचे की, औरंगाबाद शहरातील प्रत्येक वार्डात महापालिकेचे जी आरक्षणे आहे त्यावर कोणी अतिक्रमण केले किंवा अनधिकृत बांधकाम केले तर ती अतिक्रमणे हटवितांना व अनधिकृत बांधकामे पाडतांना संबंधित व्यक्तीस कुठलाही मोबदला दिला जाणार नाही तसेच अशा महापालिकेच्या प्रत्येक वार्डातील आरक्षित जागेचे प्लॅाट जनतेने विकत घेताना जनतेने महापालिकेकडून शहानिशा करुन घ्यावी. अन्यथा महापालिका कसल्याही प्रकारचा मोबदला अगर पर्यायी जागा देण्यास जबाबदार राहणार नाही. तसेच हा मंजुर झालेला ठराव जनतेच्या माहिती करीता दैनिकातून प्रसिध्दीस द्यावा.

सुचक : डॉ. शांतराम काळे
अनुमोदक : श्री. विठ्ठल पेरकर
दिनांक : १५/६/९२

<u>संवाद</u>

**डॉ. शांताराम काळे** : मी सुचक आहे. त्याप्रमाणे वाचून दाखवितो.

**मा. महापौर** : मी सभागृहाला तथा विधी सल्लागारांना सुचित करतो की, प्रस्तावाचे सुचक असून अनुमोदक नसतील तर प्रस्ताव घेता येत असेल तर घेण्यास हरकत नाही.

**डॉ शांताराम काळे** : धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असून सभागृहाने मान्यता द्यावी.

**श्री. नरेंद्र पाटील** : गेल्या चार वर्षापासूनची जी प्रथा आहे ती प्रथा चालू असावी.

**श्री. प्रकाश जावळे** : प्रस्ताव मंजुर होत असतील परंतु प्रथा सभागृहात पडू नये. अशी माझी विनंती आहे.

**मा. महापौर** : ठिक आहे मी विधी सल्लागारांना सुचित केलेले आहे की, नियमाप्रमाणे काय ते पहावे व माहिति द्यावी.

**श्री. अविनाश कुमावत**: प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही परंतु महानगरपालिका हद्दी मध्ये किती जागा खुल्या आहेत याची माहिती द्यावी मी वारंवार सुचना करीत आहे की, गजानन महाराज मंदिरासमोरील जी महापालिकेची जागा आहे त्यावर बरीचशी अतिक्रमणे होत आहेत. त्याबाबत त्वरीत कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर** : ठिक आहे. नोंद घेण्यात यावी. सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. १७/८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील प्रत्येक वार्डात महानगरपालिकेची आरक्षणे आहेत त्यावर कुणीही अतिक्रमणे करुन अनधिकृत बांधकामे केलेली आहेत. तोच अतिक्रमण किंवा अनधिकृत बांधकामे महापालिके तर्फे हटवितांना किंवा पाडतांना संबंधित कुठलाही मोबदला दिला जाणार नाही तसेच महापालिकेच्या प्रत्येक वार्डातील आरक्षीत जागेचे प्लॉट जनतेने विकत घेताना जनतेनी महापालिकेकडून शहानिशा करुन घ्यावी अन्यथा महापालिका कसल्याही प्रकारचा मोबदला अगर पर्यायी जागा देण्यास जबाबदार राहणार नाही. तसेच या बाबत जनतेच्या माहितीसाठी सर्व स्थानिक वृत्तपत्रातुन अशी माहिती प्रसिध्दीस देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## "ऐनवेळचे प्रस्ताव"

**विषय क्र. १८/१ :** उप आयुक्त महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दि. १५/९/९० ठराव क्र. ६७/९ नुसार सर्वसाधारण सभेमध्ये "नेहरु रोजगार योजने" अंतर्गत एकुण १५ झोपडपट्ट्या मधून घर दुरुस्तीची योजना महानगरपालिके तर्फे हाती घेण्यास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर मसनतपुर "या घोषित झोपडपट्टीतील एकुण १०० झोपड्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा या योजने अंतर्गत प्रति झोपडी रु. ३०००/- कर्ज व रु. १०००/- अनुदान प्रमाणे हडकोकडे मागणी करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. अजिज जहागिरदार** : सदरील प्रस्ताव प्रशासनानी मांडलेला आहे. तर मसनतपुर बरोबरच शहरातील ज्या इतर घोषित झोपडपट्ट्या आहेत त्यांना या योजनेत समाविष्ट का करण्यात आलेले नाही.

**श्री. नरेंद्र पाटील** : मसनतपुर ही घोषीत झोपडपट्टी आहे. मागील वेळेस प्रस्ताव आला त्यावेळी नजर चुकीने या झोपडपट्टीचे नाव राहुन गेलेले होते. त्यामुळे हा प्रस्ताव घेण्यात यावा ही विनंती.

**मा. महापौर** : ज्या १५ घोषित झोपडपट्ट्रयाना ही योजना राबविण्यासाठी मंजुरी मिळालेली असेल आणि त्यामध्ये नजर चुकीने नाव राहिले असल्यास यामध्ये समाविष्ठ करुन घ्यावे व या प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी.

**ठराव क्र. १८/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ठराव क्र. ६७/९ नुसार सर्वसाधारण सभेमध्ये "नेहरु रोजगार योजने अंतर्गत " एकुण १५ घोषित झोपडपट्ट्रया मधुन घर दुरुस्तीची योजना महापालिके तर्फे हाती घेतलेली आहे त्या धर्तीवर "मसनतपुर" घोषित झोपडपट्टीतील एकुण १०० झोपड्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा. या योजने अंतर्गत प्रती झोपडी रु. ३०००/- कर्ज व रु. १०००/- चे अनुदान हडको कडून मागणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११/२ :** केंद्र शासनाच्या भंगीमुक्ती योजनेनुसार महाराष्ट्र शासन यांनी १०५ महानगरपालिकेस भंगीमुक्ती योजने अनुसार संडासाचे समांतर जलधित करणे संबंधी योजनेस ६४,६३१ संडासाचे समांतर जलधीत मध्ये रुपांतर करण्यासाठी उद्दीष्ट देण्यात आले आहे.

त्या आधारे औरंगाबाद महानगरपालिकेस ४२३२ संडासाचे समांतर जलधित मध्ये रुपांतर करण्याचे उद्दीष्ट दिलेले आहे. त्या आधारे प्रति संडास रु. २७००/- या हिशोबाने खर्च रक्कम दर्शवली आहे व त्या संबंधी महाराष्ट्र शासनाने सदर योजनेवर होणाऱ्या खर्चामध्ये अर्थ सहाय्य व कर्जाची तरतुद दिलेली आहे.

सदर योजनेची लाभ महानगरपालिका हद्दीतील नव्याने समाविष्ट झालेल्या भागात राहणाऱ्या लोकांना होणार आहे. त्यामध्ये चिकलठाणा, नारेगाव, ब्रीजवाडी, मसनतपूर, मुकुंदवाडी व आंबेडकर नगर या भागांचा समावेश आहे. कारण सदर भागात नुकतीच जलनिस्सारण वाहिनी टाकण्यात आलेली आहे. वरील सदर भाग गलीच्छ वस्ती सुधार योजने अंतर्गत घोषित झोपडपट्ट्या मध्ये मोडतात व तेथे राहणारे लोक आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक आहेत. सदर गटासाठी शासनाने वर्गणी ५% घेणे बाबत आदेश दिलेले आहेत.

अर्थसहाय्य व कर्जाची तरतुद खालीलप्रमाणे दर्शविण्यात आली आहे.

| अर्थ सहाय्य | कर्ज | लाभधारकांकडून वर्गणी |
|---|---|---|
| ४५% | ५०% | ५% |

वरील तरतुदी नुसार मनपाने एक संडासास लागणारा खर्च रुपये २७८०/- इतका गृहीत धरला आहे त्यापैकी लाभधारकाकडून वर्गणी रु. १३९/- व शासनाकडून रु. १२५१/- कर्ज म्हणून घ्यावे लागेल व त्याची परतफेड मालमत्ता कराबरोबर पाच वर्षात करुन घ्यावी.

त्यानुसार एकुण ४२३२ संडासावर लागणारा एकुण खर्च रुपये १,१७,६४,९६०/- इतका होईल व शासनाच्या धोरणनुसार खालील प्रमाणे रक्कमेचा तपशील येईल.

| अर्थसहाय्य शासनाकडून | कर्ज हडकोकडून | लाभधारक कडून वर्गणी |
|---|---|---|
| ४५% | ५०% | ०५% |
| ५२,९४,२३२.०० | ५८,८२,४८०.०० | ५,८८,२४८.०० |

तरी यापैकी ५०% रक्कम कर्ज म्हणून शासनाच्या धोरणानुसार हुडको कडून रु. ५८,८२,४८०.०० घ्यावे लागेल तरी ४२३२ संडासाचे अंदाज पत्रक रु. १,१७,६४,९६०/- मंजुरी देणे योग्य व हुडको कडून ५० टक्के रक्कम कर्ज घेण्याची मंजुरी देणे योग्य. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

<u>संवाद</u>

**श्री. अविनाश कुमावत :** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** या योजने अंतर्गत काहींनी लोक वर्गणी रु. १३९.०० पेक्षा जास्त भरलेली आहेत. तेव्हा त्यांची रक्कम परत मिळणार आहे काय?

**मा. महापौर :** मी अशा मताचा आहे की, रु. १३९.०० भरुन जर अजुन अशी योजना असल्यास त्या कराव्यात.

**श्री. बंडू प्रधान :** शहरामध्ये अजून काही कनेक्शन जोडावयाचे असून कार्यकारी अभियंता यांना योग्य ते आदेश द्यावेत.

**मा. महापौर :** ठिक आहे त्याचप्रमाणे मी सभागृहाला विनंती करतो की, काल ज्यावेळी मा. मुख्यमंत्री औरंगाबादेत आले त्यावेळी मी सुचना मा. पालकमंत्री यांचे वतीने केली होती की, शहरात १८ खेडी जी जोडण्यात आलेली आहेत, त्या खेड्यांचा योग्य विकास होणे, पाणी पुरवठ्याच्या सोयी होणेसाठी रु. २० लाखाची मागणी मी केलेली होती. विनंतीस मान देवून मा. मुख्यमंत्री यांनी रु. १० लाखाची मान्यता दिलेली आहे. त्यामुळे मा. मुख्यमंत्री सुधाकर रावजी नाईक, नगर विकास मंत्री, मदन बाफनाजी व पालकमंत्री पद्मसिंहजी पाटील यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव मांडीत आहे.

**श्री. बंडू प्रधान :** यास माझे अनुमोदन आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** मागील एक योजना होती की, भंगीमुक्ती योजनेनुसार तीचा कालावधी २० जुन पर्यंत होता तीच योजना ही आहे काय? ज्यामध्ये २२५० रुपयांची योजना होती व त्यामध्ये २५% लोकवर्गणी होती आणि संडासाची एकुण किंमत रु. २७८०/- होती ती योजना मागील आहे की नवीन आहे.

**मा. महापौर :** ती योजना वेगळी आहे. सदरची योजना सन १९९२-९३ साठी ची आहे ती मंजुर करावी.

**श्री. गजानन बारवाल :** या योजने अंतर्गत माझ्या वार्डातील मोची मोहल्यात काही घरांसाठी योजना राबविली परंतु या ठिकाणी भिंती बांधावयाचे आहेत. त्माजी आयुक्त यांनी त्या भिंती बांधावयास परवानगी दिलेली आहे. तेव्हा अद्याप पर्यंत कार्यवाही नाही.

**मा. महापौर :** ठिक आहे. त्यावर विचार करण्यात येईल.

**श्री. प्रकाश जावळे :** इंदिरा नगर गारखेडा या झोपडपट्टीचा यामध्ये समाविष्ट करण्यात यावा व प्रियदर्शनी गारखेडा याचा समावेश असावा.

**श्री. कचरु नवपुते :** या योजनेत समाविष्ट असलेल्या भागांचाच विचार असावा.

**श्री. अविनाश कुमावत :** गारखेडा झोपडपट्टीचा समावेश आसावा.

**मा. महापौर :** या ठिकाणी सुचित केल्याप्रमाणे मो. चिकलठाणा, नारेगांव, ब्रिजवाडी, मसनतपुर, मुकुंदवाडी, संजयनगर व आंबेडकर नगर आदींचा समावेश आहे. सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. ११/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या भंगीमुक्ती योजनेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेस ४२३२ संडासाचे समांतर जलधित मध्ये रुपांतर करण्याचे उद्दिष्ट दिलेले आहे. त्यानुसार महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ठ झालेल्या भागात राहणाऱ्या लोकांना याचा लाभ होणार असून त्यामध्ये मो. चिकलठाणा, नारेगाव, ब्रिजवाडी, मसनतपूर, संजयनगर, मुकुंदवाडी, व आंबेडकर नगर इ. भागांचा समावेश असून या भागात

नुकतीच जलनिःसारण वाहिनी टाकण्यात आलेली आहे. सदरील भाग गलिच्छ वस्ती सुधार योजने अंतर्गत घोषित झोपडपट्टी मध्ये मोडतात. त्यासाठी शासनाने वर्गणी लाभधारकांकडून ५% घेणे बाबत आदेश दिलेले आहेत. त्यापैकी लाभधारकाकडून वर्गणी रु. १३९.०० शासनाकडून रु. १२५१.०० अर्थ सहाय्य म्हणून तर बाकी रक्कम रु. १३९०.०० कर्ज म्हणून (रु. २७८०.०० एका संडास प्रमाणे) घेऊन त्याची परतफेड मालमत्ता कराबरोबर पाच वर्षात करुन घेणे यासाठी शासनाकडून ४५% प्रमाणे५२,९४,२३२.०० तर हडको कडून ५०% प्रमाणे ५८,५२,४८०.०० कर्ज घ्यावे लागेल म्हणजे राबविण्यात येणाऱ्या एकुण ४२३२ संडासावर लागणारा एकुण खर्च रु. १,१७,६४,९६०.०० यास मंजुरी देवून हडको कडून ५०% रक्कम कर्ज म्हणून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**विषय क्र. २०/३ :** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी औरंगाबाद पाणी पुरवठा जलनिस्सारण यांनी औरंगाबाद पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ भाग १ या योजनेतील कँटोनमेंट बोर्डाचा पी.सी. लोकवर्गणीचा वाटा या बाबत प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ भाग १ ही १०० दशलक्ष लिटर पाणी पुरवठ्याची योजना लवकरच पुर्ण होत आहे सदर योजना परिसर अभियांत्रिकी मंडळाचे मालकीची असली तरी योजनेच्या १० टक्के खर्चाचा एजन्सी वाटा औरंगाबाद मनपा ने उचलला आहे. ही योजना औरंगाबाद शहराची (सिडको विभाग धरुन) पाणी पुरवठ्याची गरज लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या प्रस्तावानुसार व विनंती नुसार शहराची एकुण २००१ सालातील पाण्याची गरज लक्षात घेऊन मंजुर केलेली आहे.

सदर योजनेवर एकुण खर्च रु. २७२७.३० लाख एवढा येणार असून त्यात महापालिकेची लोकवर्गणी (पी.सी) २७२.७३ लाख एवढी आहे. या योजने अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या ९० दशलक्ष लिटर पाण्यापैकी (पाणी पुरवठा योजना १०० एमएलडी ला डिझाईन केलेली आहे) पैकी केन्टोनमेंट विभागाला ७.५० दशलक्ष लिटर पाणी दिले जाणार आहे. या योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या केन्टोनमेंट विभागाला पाण्याच्या प्रमाणात लोकवर्गणीचा प्रमाण वाटा (प्रोपोरशनेट) शेअर इन पब्लीक कॉन्ट्रीब्युशन) केन्टोनमेंट बोर्डाकडून मनपा ला मिळणे लोक हिताच्या दृष्टिने गरजेचे आहे. त्यानुसार या योजने अंतर्गत महापालिकेला घ्याव्या लागणाऱ्या रु. २७२.७३ लाख लोक वर्गणी पैकी कॅन्टोनमेंट बोर्डाचा प्रमाण वाटा (प्रोपोरशनेट शेअर) रु. २२.६७ लाख एवढा येतो तो कॅन्टानमेंट बोर्डाने मनपाकडे द्यावा.

पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेने घेतली असल्याने महानगरपालिकेला फार मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे व महागनरपालिकेवर खर्चाचा बोजा वाढत आहे. करीता कॅन्टोनमेंट बोर्डाकडून रु. २२.६७ लाख एवढी रक्कम मनपास प्राप्त होणे जरुरी आहे.

करीता कॅन्टोनमेंट बोर्डाकडून औरंगाबाद महानगरपालिकसे पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ भाग १ योजनेच्या खर्चाच्या प्रमाणात प्रमाण हिस्सा लोकवर्गणी निमित्त (पी.सी.) म्हणून रु. २२.६७ लाख एवढी रक्कम मिळणे बाबत माहितीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. महापौर** : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. २०/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ भाग १ या योजनेवर एकुण खर्च रु. २७२७.३० लाख एवढा येणार असून त्यास महानगरपालिकेची लोकवर्गणी (पी.सी.) २७२.७३ लाख एवढी आहे आणि या योजनेतून छावणी बोर्डाला ७.५०

दश लक्ष लिटर्स पाणी दिले जाणार असून या योजने अंतर्गत महापालिकेला द्यावा लागणाऱ्या रु. २७२.७३ लाख लोक वर्गणीपैकी छावणी बोर्डाचा प्रमाण वाटा (प्रपोर्शनेट शेअर) रुपये २२.६७ लाख एवढा येतो. सदरच्या योजनेतील पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महापालिकेने घेतल्यास महापालिकेला आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. तेव्हा छावणी बोर्डा कडून रु. २२.६७ लाख एवढी रक्कम महापालिकेकडे लोकवर्गणी निमित्त (पी.सी) खर्चाचा प्रमाण हिस्सा म्हणून महानगरपालिकेकडे मिळणे बाबत च्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१/४ :** सहाय्यक आयुक्त २ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील वाढ लक्षात घेता सध्याचा पाणी पुरवठा कर्मचारी वर्ग अपुरा पडतो कामाचा दैनंदिन व्याप लक्षात घेता कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी खालील प्रमाणे अतिरिक्त कर्मचारी वर्ग मंजुर करण्यासाठी मागणी केली आहे. त्यामुळे शहरात पाणी पुरवठ्याच्या कामात सुधारणा होईल.

| | | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| (१) लाईनमन (पाणीपुरवठा) | (५०) | ९५० ते १४०० |

वरील प्रमाणे अतिरिक्त पदे निर्माण केल्यास यावर रु. १२,१२०००/- लाख वार्षिक खर्च वाढेल तरी वरील प्रमाणे पाणी पुरवठा विभागात नवीन पदे निर्माण करण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. २१/४** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील वाढ लक्षात घेता सध्याचा पाणी पुरवठा कर्मचारी वर्ग अपुरा पडतो या पाणी पुरवठ्याच्या दैनंदिन व्याप लक्षात घेता व शहरात पाणी पुरवठा कामात सुधारणा अधिक चांगल्या रितीने होण्यास मदत होईल या दृष्टिने पाणी पुरवठा लाईनमनचे ५० नवीन पद निर्मितीस रु. ९५०-१४००/- या वेतन श्रेणीत अतिरिक्त पदे निर्माण करण्यास व यासाठी लागणाऱ्या एकुण रुपये १२,१२,०००/- लाख वाढीव वार्षीक खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२/५ :** ज्योति नगर डेव्हलपमेंट फाऊंडेशन औरंगाबाद यांनी ज्योती नगर या रेखांकनातील खुली जागापैकी १००.०० चौ.मी. जागा व्यायाम शाळेसाठी बांधकाम करण्यास परवानगी देण्यासाठी अर्ज केला आहे. नगर भुमापन क्र. १६००७० क्षेत्र १०२३.७ चौ.मी. ही मिळकत ज्योती नगर या रेखांकनातील खुली जागा आहे. सदर खुल्या जागेच्या मालकी हक्कात "मंजुर रेखांकनातील मोकळी जागा" अशी नोंद झालेली आहे. बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम क्रमांक १३/३/१३ नुसार रेखांकनाच्या खुल्या जागेत खुल्या जागेच्या १०% व जास्तीत जास्त २००.०० चौ. मी. जागा व नियम क्रमांक १३/३/१३ tt] नुसार जिमनाशियम पॅव्हीलीयन तत्सन प्रकारच्या बांधकामास फक्त तळ मजल्या साठीच अनुज्ञेय होतो.

ज्योती नगर डेव्हलपमेंट फाऊंडेशन औरंगाबाद ही एक नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्रमांक ई-४०२ (औरंगाबाद) दि. ३०/३/९१ असा आहे व त्यांनी व्यायाम शाळेसाठी या रेखांकनाच्या खुल्या जागेपैकी १००.०० चौ. मी. जागेची मागणी केली आहे. मागणी केलेली जागा ज्योती नगर रेखांकनातील खुली जागा आहे. रेखांकनातील खुल्या जागेत वर

दर्शविल्याप्रमाणे व्यायाम शाळेचा वापर अनुज्ञेय होतो. सदर रेखांकनातील १००.०० चौ.मी. खुली जागा रु.३,३६०/- वार्षिक भाडे तत्वावर ९९ वर्षासाठी भाडे पट्ट्याने खालील अटीवर देणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

१. प्रस्तावित व्यायाम शाळेच्या जागेवर ज्योती नगर डेव्हलपमेंट ट्रस्टची मालकी राहणार नाही किंवा भाडेकरु म्हणून देखील नोंद राहणार नाही.

२. रेखांकनातील खुली जागा व त्यातील प्रस्तावित व्यायाम शाळेचे बांधकाम या सर्व परिसरात व्यायामशाळेसह प्रवेश व वापर सार्वजनिक स्वरुपाचा राहील. तसेच बांधण्यात येणारी व्यायाम शाळा सर्व जाती/जमाती/सर्व धर्म व्यक्तीसाठी खुली ठेवली जाईल.

३. व्यायाम शाळेचे बांधकाम महानगरपालिकेकडून नियमाप्रमाणे बांधकाम परवानगी घेवूनच बांधकाम करावे.

४. महानगरपालिका या जागेचा ताबा ट्रस्टला हस्तांतर करणार नाही. फक्त व्यायाम शाळेचा वापर करण्यास अनुमती देण्यात येईल.

५. प्रस्तावित व्यायाम शाळेखालील जागेचे धर्मादाय आयुक्त किंवा त्यांचे खात्याकडे ट्रस्टची स्थावर मालमत्ता म्हणून नोंद करता येणार नाही.

६. या जागेत फक्त व्यायाम शाळा व त्यास पुरक असलेला वापरच अनुज्ञेय होईल.

७. संपूर्ण जागेवर महानगरपालिकेचे नियंत्रण राहील.

वरील प्रमाणे अटी ट्रस्टला मान्य असल्याबद्दल त्यांनी दिनांक २४/३/१९९२ रोजी ठराव मंजुर केला आहे. तसेच या प्रकरणात नोंदणी करावे लागणारे दस्त ऐवजाचा संपूर्ण खर्च ट्रस्ट स्वतः करणार आहे. तरी वरील सर्व अटीसह आणि भाडे पट्ट्याच्या वेळी नमुद करावे लागणारे आवश्यक त्या अटीसह प्रस्तुत जागा ९९ वर्षासाठी भाडे तत्वावर ट्रस्टला व्यायाम शाळेस देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

<u>संवाद</u>

**श्री. अजिजुल्ला बेग** : सदरच्या प्रस्तावात १०० चौ.मी. खुली जागा रु. ३३६०/- वार्षिक भाडे तत्वावर देण्याचे ठरलेले आहे. तेव्हा योग्य दर लावूनच मंजुरी द्यावी.

**श्री. अविनाश कुमावत**: मी यापूर्वी सुचित केल्याप्रमाणे गारखेडाकडे जाणाऱ्या रोडवर फार मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे होत आहेत. सदरची जागा खुली असून महापालिकेची आहे. त्या जागेवर दुसरे व्यक्ती २०X३० चे प्लॉट पाडून इतरांना विक्री करीत आहेत व त्या जागेवर अतिक्रमणाने घरे बांधली जात आहेत या बाबत महानगरपालिकेने त्वरीत कार्यवाही करावी.

**मा. महापौर** : या बाबत मा. आयुक्त योग्य तो कार्यवाही करतील आणि सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. २२/५** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्योती नगर डेव्हलपमेंट फाऊंडेशन औरंगाबाद यांनी नगर भुमापन क्र. १६०७० क्षेत्र १.२३.७ चौ.मी. जागा ज्योती नगर या रेखांकनातील मोकळी जागा अशी नोंद आहे. या रेखांकनातील खुल्या जागेत दर्शविल्याप्रमाणे व्यायाम शाळेचा वापर अनुज्ञेय होतो. या रेखांकनातील १०० चौ.मी. खुली जागा रु. ३३६०/- वार्षिक भाडे तत्वावर ९९ वर्षासाठी भाडे पट्ट्याने प्रस्तावातील दर्शविलेल्या अनु.क्र. १ ते ७ अटींच्या अधीन राहुन लागणारे दस्त ऐवजांचा संपूर्ण खर्च तथा भाडेपट्ट्याच्या वेळी नमुद करावे लागणारे आवश्यक त्या अटींसह संबंधित ट्रस्टला "व्यायाम शाळे करिता" ९९ वर्षासाठी भाडे पट्ट्याने जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "राष्ट्र गीताने" सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## सोमवार, दिनांक २०/७/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**सोमवार, दिनांक २०/७/९२ रोजी अंदाजे ११:१५ वाजता मा. महापौर श्री. यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेस मा. आयुक्त, उप आयुक्त अधिकारी वर्ग आणि रजिष्टर प्रमाणे खलील स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. अजिमखाँ दादामियाँ अ. रहेमान
२) श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) श्री. अजिजुला बेग वाहिद बोग
४) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
५) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
६) श्री. भगुरे तुळशीराम छगन
७) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
८) श्री. पाटील नरेंद्र यादवराव
९) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
१०) श्री. म. अयुब गुलाम जिलानी
११) श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१२) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१३) श्री. जावेद हसनखान कसीम हसनखान
१४) श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
१५) श्री. स.अ. एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
१६) श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१७) श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग
१८) श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
१९) श्री. अ. रशीद खान (मामु) अ. हमीद खान
२०) सौ. दलाल लता श्रीनिवास
२१) श्री. छापरवाल रमेश नारायण
२२) श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२३) श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२४) डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
२५) श्री. फैय्याजखान अहमदखान
२६) श्री. अलीम बेग मिर्झ करिम बेग
२७) श्री. मोहसीन अहमद बाशीर अहमद
२८) श्री. स. हुसेन स. अहमद
२९) श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
३०) श्री. अलफखान हुसेनखान
३१) श्री. वाघमारे सुदाम भानुदास
३२) श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी

३३) श्री. थोरात किशोर गोविंदराव
३४) श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
३५) श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
३६) श्री. जाहागिरदार अजिज मुख्तार अहमद
३७) श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
३८) श्री. जावळे प्रकाश शिवराम
३९) श्री. गाडे गंगाधर सुखदेव
४०) श्री. परदेशी सुीाष शिवलाल

**"वंदे मातरम्" या गीताने सभेस सुरुवात झाली.**

**संवाद**

**श्री. मधुकर शिंदे** : माझी एक लक्षवेधी सुचना आहे. त्याबाबतचा प्रथमतः विचार व्हावा की, सभागृहात सर्वात मोठा पक्ष "शिवसेना पक्ष" असल्याने या पक्षाचे स. सदस्य काही कारणास्तव उपस्थित नाहीत ते बाहेर गावी गेलेले आहेत तेव्हा सभा कमीत कमी तीन दिवसांसाठी पुढे ढकलण्यात यावी अशी विनंती करण्यात येते.

**श्री. महापौर** : सभागृहात कोरम पुर्ण आहे, फक्त काही स.सदस्य उपस्थित नाही त्यामुळे कोरम पुर्ण व्हायला उशीर झाला. आता सभा सुरु झालेली असुन इतिवृत्तावर चर्चा करण्यात यावी.

**श्री. केशव सोनवणे** : शिवसेना पक्षाचे स. सदस्य काही कारणास्तव बाहेर गावी गेलेले असल्याने आणि आजच्या सभेच्या विषय पत्रिकेवर ह्या काही स. सदस्याचे प्रस्तावावर व अनुमोदक असे नांवे असल्याने त्यांचे विचार ऐकुन घेऊन प्रस्ताव चर्चेस घेणे आवश्यक असून त्या व्यतिरिक्त इतर प्रस्तावा संदर्भातही स. सदस्यांच्या भावना विचारात घेण्यासाठी आजची सभा तीन दिवसांसाठी पुढे ढकलण्यात यावी. कारण यापुर्वीही बऱ्याच वेळा सभा वेगवेगळ्या कारणास्तव तहकुब करण्यात आलेल्या आहेत त्याप्रमाणे ही सभा पुढे ढकलण्यात यावी अशी विनंती आहे.

**मा. महापौर** : स. सदस्यांचे जे काही प्रस्ताव असतील आणि ते स.सदस्य आजच्या सभेसाठी उपस्थित नसतील तर त्यांचे प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्यात येतील.

**श्री. नरेंद्र पाटील** : गेल्या पाच सहा दिवसापूर्वी सिडको कार्यालयात जाऊन संबंधित अधिकाऱ्यांबरोबर प्रशासकीय बाबीवर आपण चर्चा केली. परंतु सिडको भागातील लोक प्रतिनिधी म्हणून काही स. सदस्य असताना त्यांनाही सदरील चर्चेत भाग घेण्यासाठी बोलाविले नाही, किंवा सुचनाही केली नाही ही बाब खेदाची आहे, कारण गेल्या चार वर्षापासून सिडकोतील प्रतिनिधित्व करणारे स. सदस्य हे जनतेच्या प्रश्नांसाठी नव्हे तर जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी सतत पाठपुरावा करीत आहेत आणि करीत राहणार आहेत. या संदर्भात वर्तमान पत्रात जी बातमी प्रसिध्दीस आली ज्यामुळे नागरिकांना सिडको लोकप्रतिनिधी बद्दल गैरसमज व टिकास्त्र होत आहे यासाठी आपण सिडकोच्या लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता चर्चा

केली याचे कारण काय? याबाबत सभागृहात खुलासा करावा अन्यथा दिलगिरी व्यक्त करावी. ज्यामुळे सिडको नागरिकांना आमच्या बद्दलच्या भावना कळुन येतील.

**मा. महापौर** : स. सदस्य मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी सिडको कार्यालयात गेलो नाही तर मला स. सदस्य, श्री. मोतीराम घडामोडे यांनी सिडको कार्यालयात येण्याबाबत सुचना केली होती त्यामध्ये स.सदस्य, श्री. केशव सोनवणे आणि काही सदस्य उपस्थित राहणार असल्याचे सुचित केलेले होते. मी स्वतःहुन कुठेही गेलेलो नाही आणि तुम्हाला डावलण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**श्री. नरेंद्र पाटील** : कोणत्याही बैठकीच्या संदर्भात मा. महापौर हे अध्यक्षस्थानी असल्यास त्यांनी आपले संबंधित स. नगर सेवक किंवा प्रोटोकाल असतात त्यांना विश्वासात घेऊनच कृती करणे आवश्यक असते. आपण जबाबदारी झ टकु शकत नाही हा आमचा हक्कभंग आहे.

**श्री. सुदाम वाघमारे** : इतिवृत्तावर चर्चा करण्यात यावी. सभागृहात इतर बाबींवर चर्चा करुन वेळ वाया घालविण्यापेक्षा चर्चेला काही विषय असतील तरच चर्चा व्हावी.

**श्री. रशीद मामु** : औरंगाबाद येथील उर्दु दैनिक आलमगिर टाईम्सच्या वर्तमान पत्रात अशी बातमी छापून आलेली आहे की, मनपातील काही शिक्षकांनी मिळून प्रायव्हेट शाळा सुरु केल्याचे समजते यामुळे जवळपास मनपाच्या पाच शाळा बंद पडलयाचे वृत्त आहे. ज्यामुळे मुलाचे फार नुकसान होणार. तरी ही मनपातील स.सदस्य गप्प का? आहेत मुग गिळुन का बसतात? असा प्रश्न उपस्थीत केला तो बरोबर आहे कारण सध्या मनपातील राजकारणाने हे सर्व होत आहे. कुणही अधिकारी लक्ष देत नाही तर शिक्षणाधिकारी हे केवळ गोडबोले आहेत त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे नियंत्रण शाळावरती नाहीत यासर्व लहान लहान गोष्टी मा. आयुक्त किंवा महापौर यांना सांगणे योगय वाटत नाही तेव्हा या शाळा बाबत आणि शिक्षणाधिकारी यांचे बाबतीत योग्य ती कार्यवाही व्हावी.

**श्री. अजिज जहागिरदार** : बन्सीलाल नगर येथील चार उर्दुचे वर्ग बंद करण्यात आलेले असून येथील वर्ग राहुल नगर येथील शाळेत भरविणार असलयाचे कळते. या सदर्भात मा. आयुक्ताच्या निर्देशनास ही बाब शाळेच्या एका कार्यक्रमात मी आणुन दिलेली होती.

**सौ. लता दलाल** : इतिवृत्ता व्यतिरिक्त इतर बाबीवर चर्चा करण्यास परवाणगी देण्यात येऊ नये. अन्यथा आम्हालाही इतर बाबीवर चर्चा करता येऊ शकते.

**मा. महापौर** : मी स. सदस्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. त्यांचे बोलणे संपल्यानंतर आपण सुचना करावी.

**सौ. लता दलाल** : केवळ इतिवृत्तावरच चर्चा करण्यास परवाणगी द्यावी अशी माझी मागणी आहे. नसता मला अनेक मुद्यांवरती बोलावयाचे आहे त्यास परवानगी द्यावी.

**श्री. केशव सोनवणे** : आम्ही विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आम्हाला मिळाले नाही. इतर मुद्यांवर चर्चा करण्यापुर्वी स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर अगोदर देण्यात यावे. इतर बाबींवर चर्चा करण्यात येऊ नये.

**मा. महापौर** : स. सदस्य मी आपणास सांगु इच्छितो की, इतिवृत्तावर चर्चा करीत असतांना स. सदस्य, श्री नरेंद्र पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नास योग्य ते उत्तर देण्यात आलेले आहे. आता पुन्हा तयावर चर्चा नको.

**श्री. केशव सोनवणे** : सिडको-हडकोच्या पाणी प्रश्नाचे संदर्भात एक बैठक आयोजिली होती त्या बैठकीस आपण जाणून बुजुन उपस्थित राहु शकला नाही म्हणजे नागरिकांच्या भावनेची आपल्याला कदर नाही असे म्हणावे लागेल. कारण दुसऱ्या ठिकाणी आपण उपस्थित राहता, परंतु काही ज्वलंत प्रश्न बाबत चर्चा करण्यासाठी बोलाविले असता उपस्थित राहत नाही तेव्हा आपण स.सदस्य म्हणुन की, महापौर म्हणुन दुसऱ्या ठिकाणी उपस्थित राहता याचा सभागृहात खुलासा करावा.

**मा. महापौर** : मी ज्या ठिकाणी उपस्थित होतो त्या ठिकाणी महापौर म्हणूनच होतो त्यामुळे गैरसमज करुन घेऊ नये.

**श्री. मधुकर शिंदे** : आम्ही जी सुचना माडली त्याप्रमाणे सभा तहकुब करावी अन्यथा आम्ही सभात्याग करीत आहोत.

**मा. महापौर** : कोरम पुर्ण झालेला आहे त्यामुळे सभेला सुरुवात झालेली आहे. आता इतिवृत्तावर चर्चा व्हावी.

(अंदाजे १२:१० वाजत शिवसेना स.सदस्यांनी सभात्याग केला)

**श्री. अजिज जहागिरदार** : ओरंगाबाद टाईम्स या उर्दु दैनिकात स. सदस्य, श्री.रशीद मामु यांनी सचित केल्या प्रमाणेच बन्सीलाल नगर येथील बंद केलेल्या उर्दु शाळेच्या संदर्भात वृत्त आलेले होते. त्यामध्ये चार वर्ग उर्दुचे राहुल नगर येथील शाळेत येत्या शैक्षणिक वर्षापासून पुर्ववत चालू करण्यात येतील असे सहा महिन्यापूर्वी मा. आयुक्तांनी आश्वासन दिलेले होते. त्यानुसार या शैक्षणिक वर्षात कार्यवाही झालेली आहे काय? याचा खुलासा व्हावा, कारण उर्दु दैनिकात या उर्दुच्या वर्गासंबंधी मा. आयुक्त, मा. महापौर व सभागृह तथा स. सर्व नगर सेवक हे मनपावर गंभीर आरोप केलेले आहेत.

**श्री. अजिजुल्ला बेग** : चार वर्ग उर्दुचे त्या शाळेमध्ये असूनही उर्दुसाठी एकच शिक्षक शिकवीत असे आता ते वर्ग बंद करण्यात आल्याने शहरात व नागरिकांमध्ये असंतोष पसरलेला आहे. शैक्षणिक वर्ष जुन ११ पासुन सुरु झालेले आहे आणि मनपा भाग २६ जुलैला शिक्षकांची मुलाखत घेते व निवड कधी ऑगस्ट महिन्यापर्यंत होणार म्हणजे शिकणाऱ्या मुलांचे शैक्षणिक नुकसान किती होते याचा कोणी विचार करावा.

**श्री. चेनकरण संचेती** : महानगरपालिकेच्या पाच सहा शाळा बंद होणे ही बाब शरमेची आहे. मनपा तील काही क्षिकांनी संगनमत करुन प्रायव्हेट शाळा सुरु करणे व महापालिकेतीलच शिकणाऱ्या मुलांना त्यांचे शाळेत दाखल करणे ही बाबही योग्य वाटत नाही. यासाठी प्रशासनाने शिक्षणाधिकारी व काही शिक्षकांची यासंदर्भात चौकशी करुन माहिती देण्याची करावे.

**मा. महापौर** : स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी सविस्तर खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी** : स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे महानगरपालिकेतील पाच शाळा बंद झाल्या या बाबतची प्रक्रिया मी या कार्यालयात येण्यापूर्वीच झालेली आहे. आता बन्सीला नगर येथील उर्दुचे वर्ग जे बद करण्यात आले ते त्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या नसल्यामुळे बंद करण्या बाबत मा. आयुक्तांशी

चर्चा करुनच निर्णय झालेला आहे. उर्दुची शिक्षीका त्या ठिकाणी कार्यरत आहेतच ज्याही वेळेस उर्दु विद्यार्थ्यांची संख्या वाढेल त्याच वेळेस पुर्ववत उर्दुचे वर्ग सुरु करण्यात येतील.

**श्री. अजिज जहागिरदार :** मला शिक्षणाधिकारी यांनी असे सांगितले होते की, बन्सीलाल नगर येथे बसण्याची व्यवस्था विद्यार्थ्यांना नसल्याने बंद करण्यात येते, परंतु त्यानंतरही मा. आयुक्तांनी मला आश्वासन दिलेले आहे की, शैक्षणिक वर्ष पासून उर्दुचे वर्ग पुर्ववत सुरु करण्यात येतील याबाबत कार्यवाही झालेली आहे काय?

**श्री. चेनकरण संचेती :** मराठीतील दोन व उर्दुचे तीन अशा पाच महानगरपालिकेतील शाळा येथील शिक्षकांनी मिळून स्थापन केलेल्या संस्थेच्या शाळेमुळे बंद झालेल्या आहेत व महापालिका शाळेतील विद्यार्थीही त्यांच्या त्यांच्या संस्थेत घेतलेले आहेत याबाबत शिक्षणाधिकारी सभागृहाची दिशाभुल करित असून योग्य ती चौकशी व्हावी.

(यावेळी अंदाजे १२:१५ वाजता शिवसेना सदस्यांचा सभागृहात प्रवेश)

**श्री. अलफखाँ हुसैनखाँ :** वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दीस आलेल्या वृत्तानुसार मो. अंगुरीबाग येथील एक मराठी शाळा मो. इंदिरा नगर येथे बदली केल्याचे समजते तर तेथील एक उर्दु शाळा बंद करण्यात आली. म्हाजे एकुण महानगरपालिकेतील सात शाळा बंद झाल्याचे समजते यासाठी स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व्यवस्थीत अभ्यासु पणे असल्याचे संबंधित अधिकाऱ्यास सांगावे मला माहिती नाही मी त्यावेळी नव्हतो हे काय अधिकाऱ्याचे उत्तर योग्य वाटत नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती आपल्या विभागाची जवळ ठेवणे आवश्यकच आहे.

**शिक्षणाधिकारी :** याबाबत पाहणी करुन माहिती देण्यात येईल. परंतु शाळा बंद माझ्या कारकिर्दीत झालेल्या नाहीत.

**श्री. चेनकरण संचेती :** शिक्षणाधिकारी साहेब आपण किती वर्षापासून महापालिकेमध्ये आहात आपण म्हणता माझ्या पुर्वीची घटना आहे तर पेपरला आजच्याच सदरील बातमी आहे. तेव्हा आजच्या बातमीचा आणि दोन वर्षाच्या माहितीचा संबंध येत नाही. यासाठी आपण सविस्तर माहिती चौकशी करुनच सांगावी.

**श्री. रशीद मामु :** महानगरपालिकेमध्ये शिक्षकांचे राजकारण चालते हे आपल्याला माहित आहे काय? याबाबत मा. आयुक्तांना आपण कल्पना कधी दिली काय? की आपसात शिक्षक वर्ग राजकारण खेळतात त्यामुळे शाळा बंद होतात किंवा वर्ग सुरळीत चालत नाही. या सर्व चुकांवर नियंत्रण ठेवण्याचे काम कुणाचे आहे शिक्षणाधिकारी यांचे आहे शिक्षकांनी एकत्रित येऊन प्रायव्हेट शिक्षण संस्था स्थापुन त्या शाहेत मनपातील विद्यार्थ्यांस घेतलेले आहे आणि जयामुळे शाळा बंद होत आहेत त्यानवीन शाळांचे उद्‌घाटनाचे कार्ड शिक्षणाधिकारी आपलयाला आलेले आहे. तरीही म्हणता मला माहित नाही या सर्व बाबी मा. आयुक्तांच्या नजरेस न आणुन देता तुम्ही आंधारात ठेवता व माहिती व्यवस्थीत देत नाही याचाच अर्थ या प्रकारात शिक्षणाधिकारी हेच जबाबदार आहेत त्याचप्रमाणे शिक्षण कमिटी आहे त्या कमिटीचे सभापती आहेत यांनीही कधी विचारणा केलेली दिसत नाही व शिक्षणाधिकारी यांनीही या बाबतची कल्पना दिलेली नाही म्हणजे कमिटी

सहित सभापती सुध्दा तितकेच जबाबदार आहेत असा माझा स्पष्ट आरोप आहे.

**श्री. अजिज जहागिरदार** : बन्सीलाल नगर येथील उर्दुचे चार वर्ग बसण्याची व्यवस्था नसल्याने बंद करण्यात आलेले होते सन १९८८ पासून मी पत्राने मा. आयुक्तांना विचारणा केली होती त्यावेळी या संदभा्रत फाईल पुटअप झाली व मा. आयुक्तांनी झो-६ मध्ये चार वर्ग सुरु करण्यासाठी आदेश दिले. परंतु तेव्हापासुन अद्यापही पुर्तता का झालेली नाही? सध्या मा. आयुक्त यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे राहुल नगर येथे शैक्षणिक वर्षापासुन उर्दुचे वर्ग चालू करण्यात येतील त्याप्रमाणे संबंधित विभागाने काय कार्यवाही केली याची माहिती सभागृहात द्यावी.

**श्री. अजिजुल्ला बेग** : याबाबत माझ्या मते मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : शाळेच्या संदर्भात जो मघा उपस्थित झालेला आहे त्यात महापालिकेच्या काही शिक्षकांनी स्वतंत्र खाजगी संस्था स्थापन करुन शाळा काढलेल्या आहेत आणि या शाळा मधून महानगरपालिकेतील विद्यार्थी यांना दाखल केल्या जात आहे. या संदर्भात शिक्षण विभागाने अद्याप कोणतीही माहिती माझ्याकडे दिलेली नाही. परंतु महापालिकेतील काही शिक्षकांनी मिळून खाजगी शिक्षण संस्था स्थापुन महापालिकेतील शाळेचे विद्यार्थी त्यांचे खाजगी शाळेत दाखल करीत असतील तर ताबडतोब याबाबत आम्ही चौकशी करुन आणि प्रशासकीय कार्यवाही शिक्षकांवर करण्यात येईल. दुसरा मुद्दा बन्सीलाल नगर येथील उर्दु वर्गाचे संदर्भात उपस्थित झालेला आहे तेव्हा मागे एका शाळेच्या कार्यक्रमात बन्सीलाल नगर येथे गेलो असताना सुचित केले होते की, तेथील वर्ग सुरु करण्यात येतील आणि ते दिलेले आश्वासन माझे कायम आहे. बन्सिलाल नगर येथील उर्दु शाळेच्या वर्गासाठी पुरेसे विद्यार्थी मिळाल्यास ते वर्ग ताबडतोब सुरु करण्यात येतील.

**श्री. अजिज जहागिरदार :** मो. राहुल नगर येथे उर्दुचे वर्ग सुरु करण्यात यावे.

**मा. आयुक्त** : ठिक आहे. राहुलनगर येथे उर्दु शाळेच्या वर्गासाठी पुरेसे विद्यार्थी व जागा मिळाल्यास ताबडतोब सुरु करण्यात येईल.

**श्री. चेनकरण संचेती** : मा. आयुक्तांनी सुचित केल्याप्रमाणे प्रशासकीय चौकशी होणार आहे या चौकशी अंती काय निष्पन्न होणार हे आपल्याला माहीत आहेच या चौकशीसाठी प्रशासकीय बरोबरच काही स. सदस्य किंवा पदाधिकारी यांचा समावेश असावा आणि ज्या पाच शाळा महापालिकेच्या बंद झालेल्या आहेत त्या बाबत वृत्त पत्रात नावासहीत छापुन झालेले असतांनाही मा. आयुक्त व शिक्षणाधिकारी यांचे पर्यंत कळाले नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे अशी माझी मागणी आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग** : खाजगी संस्था महानगरपालिकेच्या हद्दीत चालू करावयाच्या असल्यास प्रथमतः महापालिकेचे "ना हरकत प्रमाण पत्र" घेणे आावश्यक असते. ज्यावेळी या खाजगी शिक्षण संस्थांचे महापालिकेच्या हद्दीत किंवा महापालिकेच्या शाळा ज्या भागात आहेत त्याच भागात दुसरी शाळा चालू करणेसाठी अर्ज येतो. त्यावेळी संबंधित विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे काय? याबाबतची माहिती द्यावी की अशा किती प्रमाणात ना हरकत प्रमाणपत्र किती शाळांना दिलेले आहे. ज्यामुळे महापालिकेच्या शाळा बंद होत आहेत. त्याचप्रमाणे माहे जुलैच्या २६ तारखेस शिक्षकांची पदे

भरण्यासाठी मुलाखती होत आहे. शैक्षणिक वर्ष जुन मध्ये चालू झालेले असून शिक्षकांचे भरती बाबत इतका उशीर का झाला? याचीही माहीती द्यावी ज्यामुळे २३८ मुले असलेल्या एका वर्गासाठी केवळ एकाच शिक्षकावर जबाबदारी आहे ही बाब योग्य नाही आणि जेवढे पदे भरणार आहेत त्याची माहिती सभागृहासमोर ठेवावी.

**मा. महापौर** : स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे मा. आयुक्त व शिक्षणाधिकारी यांना सुचित करतो की, महापालिकेच्या ज्या शाळा बंद झालेल्या आहेत त्या कोणत्या कारणास्तव व महापालिकेतील शिक्षकांनी मिळून स्थापिलेल्या शिक्षण संस्थेत महापालिकेतील विद्यार्थी नेल्या जात आहे या बाबतची सविस्तर चौकशी करावी त्याचप्रमाणे किती खाजगी संस्थांना महापालिकेच्या हद्दीत ना हरकत प्रमाणपत्र आपण दिलेले आहेत याबाबतही प्रभाग वाईज माहिती पुढील सभेत माहितीसह ठेवावी अशी विनंती करण्यात येते. यामध्ये चौकशी अंती खोटी माहिती आढळल्यास पुन्हा त्यावर चौकशी समिती नेमुण कार्यवाही करण्यात येइल.

**श्री. रशिद मामु :** महापालिकेतील शिक्षण विभगासंदर्भात वर्तमानपत्रात जी बातमी छापुन आली ज्यामुळे मा. आयुक्त व मा. महापौर यांनी चौकशीचे आवाहन केले त्यांचे सर्वांचे अभिनंदन करतो.

**श्री. रतनकुमार पंडागळे:** चौकशीचा अहवाल पुढील सभेपर्यंत न ठेवता एखादी विशेष सभा बोलावून आठ दिवसात निर्णय घ्यावा जेणे करुन शिक्षण विभागाने महापालिकेची बदनामी झालेली आहे व मुलांचेही आर्थिक नुकसान होत आहे. यासाठी जादा कालावधी लावू नये.

**श्री. एकबालसिंग गिल :** इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात यावी.

**श्री. रतनकुमार पंडागळे:** महापौरांची निवड होऊन तिन महिन्याचा कालावधी लोटलेला आहे परंतु सभागृहात, सभागृह नेत्याची निवड झालेली नाही याबाबत खुलासा करावा.

**मा. महापौर** : ठिक आहे. आता इतिवृत्तावर चर्चा व्हावी.

**श्री. अजिजुल्ला बेग** : यापुर्वी मी सुचित केल्या प्रमाणे व सर्वसाधारण सभेत ठरल्याप्रमाणे शासनाकडील जो काही पत्रव्यवहार होतो त्यामधील शासनाचे परिपत्रक किंवा पत्रे प्रशासनाकडे येतात त्याचबरोबर कर्मचाऱ्यांची भरती, जेष्ठता यादी पदोन्नती आणि स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आदींची माहिती सभागृहात प्रतयेक सर्वसाधारण सभेत देणे प्रशासनास बंधन आहे. त्याप्रमाणे गेल्या चार वर्षापासून होत नाही ती कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर** : स. सदस्य आपल्याला सुचित करण्यात येते की, आता इतिवृत्तावर चर्चा करावयाची आहे कृपया प्रश्न इतिवृत्त कायम झाल्यानंतर विचारावे.

**विषय क्र. २३/१ :** दिनांक २१/४/९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे आणि दि. २०/६/९२ रोजी पुढे ढकलण्यात आलेल्या व २४/६/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद

मा. महापौर : इतिवृत्तावर चर्चा करावी.

श्री. रशीद खान मामु : माजी महापौर डॉ. शांताराम काळे यांचे बंधुंचे दु:खद निधन झाले. यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे.

(००.०२ मिनिटे स्तब्धता पाळुन कै. प्रल्हाद यशवंत काळे यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात आली)

श्री. नरेंद्र पाटील : सर्वसाधारण सभा दि. २०/६/९२ रोजीच्या सभेमध्ये उपस्थित स.सदस्यांची संख्या एकुण ४२ दाखविलेली आहे आणि मा. महापौर यांचा निर्णय आहे "गणपूर्ती अभावी सभा पुढे ढकलण्यात येते" याबाबत खुलासा व्हावा.

मा. महापौर : सभागृहाबाहेर स. सदस्यांच्या उपस्थिती बाबत जे स्वाक्षरीस्व रजिष्टर आहे त्यावरुन ही स.सदस्यांची संख्या ४२ एवढी दाखविलेली आहे. परंतु सभागृहात येऊन ते सदस्य बाहेर गेलेत त्यामुळे गणपूर्ती अभावी सभा पुढे ढकलण्यात येते असा निर्णय दिलेला आहे. यामध्ये काही दुरुस्ती सुचवायची असलयास सुचवावे.

श्री. नरेंद्र पाटील : हा नियम चुकीचा आहे कारण सभागृहात प्रवेश करण्याच्या वेळेस उपस्थित स. सदस्यांची संख्या जरी पुर्ण असली आणि सभागृहात नंतर संख्या अपूर्ण असल्यास ती सभा संपपर्यंत सदस्यांची संख्या पूर्ण आहे असे कायम धरण्यात यावी असे माझे मत आहे.

मा. महापौर : ठिक आहे.

श्री. अजिज जहागिरदार: दि. २०/६/९२ चे इतिवृत्तात मा. महापौर यांचे वाक्यात आजची सभा गणपुर्ती अभावी आज पासुन पाच दिवसासाठी पुढे ढकलण्यात येते असे आहे तर दि. २४/६/९२ च्या इतिवृत्तातील पान क्र. ४ मध्ये मा. महापौरांचे वाक्यात दि. २०/६/९२ ची सभा बुधवार दिनांक २४/६/९२ पर्यंत पुढे ढकलण्यात येते असे आहे. म्हणजे दि. २०/६/९२ ची तहकुब सभा पाच दिवसांसाठी पुढे ढकलण्यात आली तर दि. २०/६/९२ पासून पाच दिवस किती तारखेला होतात याबाबत मी आव्हान दिलेले होते की, पाच दिवस पुर्ण झालेले आहेत काय? याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : दि. २०/६/९२ पासून गणपूर्ती अभावी सभा पाच दिवसांसाठी पुढे ढकलण्यात येते ते बरोबर आहे.

श्री. अजिज जहागिरदार : म्हणजे २४/६/९२ ही तारिख सभेची बरोबर आहे काय?

मा. महापौर : होय बरोबर आहे. कृपया आपण मोजनी करावी.

सौ. लता दलाल : मागील सभेत सन १९९२ च्या शालांत परिक्षेत विशष नैपुण्य प्राप्त अपंग विद्यार्थी श्री. प्रविण धोपटे यास महापालिके तर्फे १० हजाराची आर्थिक मदत देण्यासंबंधी प्रस्ताव ठेवलेला होता व तो मंजुरही झालेला होता त्याबाबत दुर्दैवाने या इतिवृत्तात कुठेही नोंद दिसत नाही. याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : स. सदस्या कृपया आपण इतिवृत्तातील पान क्र. ५ मधील ठरावात सदरील मंजुरी देण्यात आली ाअहे अशी नोंद आहे ते पहावे.

श्री. रतनकुमार पंडागळे,

श्री रशीद मामु : दैनिक लोकमतचे पत्रकार, कै. सुरासे यांचे अपघाती दु:खद निधन झाले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

मा महापौर : ठिक आहे.

(००.०२ मिनिटे स्तब्ध राहुन सभागृहात कै. सुरासे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली)

श्री. रतनकुमार पंडागळे: इतिवृत्तातील पान क्र. २५ च्या मुळे प्रस्तावात कामगार अधिकारी या पदासाठी शैक्षणिक पात्रता एम.एस.डब्ल्यु असा आहे परंतु पान क्र. २९ मध्ये ठरावात एम.एस.डब्ल्यु./एम.ए. समाजशास्त्र असा उल्लेख आहे. कृपया दुरुस्ती व्हावी.

मा. महापौर : ठिक आहे. नोंद घ्यावी.

श्री. मधुकर शिंदे : इतिवृत्तातील पान क. ७ मध्ये स. सदस्य, श्री प्रदिप जैस्वाल यांनी निवड समितीने केलेली निवडी संदर्भात माहिती विचारलेली होती व ती माहिती विधली सल्लागार यांनी सांगितली त्यानुसार स. सदस्यांनी विचारलेल्या उप प्रश्नांची उकल झालेली नसल्याने आता सभागृहात माहिती द्यावयाची असल्यास पुढील सभेत स. सदस्यांना देण्यात येईल अशी नोंद घ्यावी

मा. महापौर : स. सदस्यांचे काही प्रस्ताव या सभेत असतील आणि ते सदस्य जर आजच्या सभेत उपस्थित नसतील तर त्यांचे प्रस्ताव पुढील सभेत घेण्यात येईल परंतु काही माहिती द्यावयाची असलयास ती आजच्या सभेत मिळू शकेल.

श्री. मधुकर शिंदे, : स. सदस्यांनी विचारलेल्या ३५ प्रश्नांचे बाबतीत सुरक्षा रक्षकांची जी भरती करण्यात आली त्या सर्वांची अनुक्रमांकानुसार यादी

श्री. सुदाम वाघमारे : सभागृहात सादर करावी.

मा.महापौर : सुरक्षा रक्षकांची निवड निवड समिती मार्फत नियमाप्रमाणेच करण्यात आलेली आहे. आता इतिवृत्त कायम करण्यावर चर्चा करावी त्यावेळी माहिती देत असतांना आपण माहिती ऐकुन घेतलेली नाही आणि सभात्याग केला.

श्री. रतनकुमार पंडागळे: संपुर्ण सभागृहाची मागणी नाही केवळ एक दोन स. सदस्य आपले स्वतःचे स्वार्थासाठी प्रश्न उपस्थित करत आहेत.

श्री. अजिजुल्ला बेग : इतिवृत्तातील पान क्र. ९ मध्ये मा. महापौरांनी सुचित केलेले आहे की, स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती संबंधित अधिकाऱ्याकडून मिळालेली आहे आणि स.सदस्य श्री अजिजुल्ला बेग यांनी जो नियम वाचुन वाचुन दाखविला त्या प्रमाणे विचार करण्यात येइल. तर क्रमवाईज यादी सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आहे. असा आपण निर्णय द्यावा. आपण महापौर म्हणून अध्यक्षस्थानी आहात हा आपला निर्णय अंतीम राहील असा आदेश द्यावा.

मा. महापौर : आपल्याला कोणत्या बाबतीत माहिती पाहिजे याबाबतचा प्रस्ताव लिहुन पाठवावा त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

श्री. अजिजुल्ला बेग : आपण फक्त आदेश द्यावा की, चॅप्टर ३ मध्ये दर्शविल्यानुसार नियमानुसार झालेल्या भरतीची यादी सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

मा. महापौर : मी मा. आयुक्त यांना विनंती करतो की, स. सदस्य श्री अजिजुल्ला बेग यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती आठ दिवसात देण्यात यावी.

श्री. अजिजुल्ला बेग : इतिवृत्तातील पान क्र. १७ मधील बालवाड्या सुरु करण्याच्या प्रस्तावात असे दर्शविलेले आहे की, सध्या अस्तित्वात असलेल्या

चौद बालवाड्या आणि चार शाळांना जागेचा प्रश्न आहे म्हणजे चौदा बालवाड्या आणि चार बालवाड्या असे मिळुण एकुण १८ व नवीन प्रस्तावात ५० बालवाड्या असे सर्व मिळुन ६८ बालवाड्या होतात, तेव्हा बालवाड्या महापालिकेमध्ये अस्तित्वात नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली आहे. याबाबत खुलासा व्हावा.

मा. महापौर : शिक्षणाधिकारी यांनी या बाबतीत सविस्तर माहिती द्यावी.

शिक्षणाधिकारी : चौदा बालवाडया शिक्षण विभागा अंतर्गत चालू आहेत. त्यामुळै प्रकल्प विभागाशी काही एक संबंध नाही.

श्री. अजिजुल्ला बेग : शिक्षण विभाग कडून चौदा बालवाड्या चालु नसून प्रकल्प विभागामार्फत चालू आहेत. या चा खुलासा प्रकल्प अधिकाऱ्यांनी द्यावा.

मा. महापौर : प्रकल्प अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

प्रकल्प अधिकारी : महानगरपालिकेमार्फत प्रकल्प विभागा अंतर्गत एकही बालवाडी सध्या चालू नाही. परंतु शासनाच्या शहरी गरिबांसाठी नागरी मुलभूत सेवा प्रकल्प सर्वसाधारण सभेने मंजुर केलेला आहे. या प्रस्तावामध्ये शासनाने रु. १५/- लाखाचे अनुदान आपल्या महापालिकेला दिलेले आहे. या अंतर्गत ज्या झोपडपट्ट्या मध्ये समाज मंदिर आहेत अशा पाच ठिकाणी सुरुवातीला आपण बालवाड्या चालु करण्यासंबंधी कार्यवाही चालु आहे, परंतु एकुण दहा बालवाड्या चालु करण्यासंबंधिचा प्रस्ताव विषय समिती मार्फत ठेवलेला होता आणि त्यानुसार हा प्रस्ताव शासनाकडे गेलेला आहे. तुर्त ज्या ठिकाणी समाज मंदिरे उपलब्ध आहेत अशा पाच ठिकाणी आपण प्रकल्प विभागामार्फत बालवाड्या चालु करणार आहोत.

श्री. अजिज जहागिरदार : इतिवृत्तातील पान क्र. २३ मध्ये ठरावात दर्शविल्याप्रमाणे सहा महिन्याचे प्रशिक्षण प्रमाणपत्र किंवा एक वर्ष अभस क्रमाची शासकीय परिक्षा उत्तिर्ण असेल अशा गरजुंना लाभ मिळेल परंतु माझी अशी सुचना आहे की, प्रकल्प विभागा अंतर्गत ज्या भागात प्रशिक्षण मिळालेले/झालेले नाहीत अशा भगातील खाजगी प्रशिक्षण देणाऱ्या संस्था असतील तर त्याचे प्रमाण पत्र या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात यावे अशी दुरुस्ती या इतिवृत्तात नाही या बाबत मा. आयुक्तांनी नोंद घेतलेली होती.

मा. महापौर : प्रकल्प अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती द्यावी.

प्रकल्प अधिकारी : स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे विश्लेषण मी करतो की, आमच्या प्रकल्प विभागामार्फत सहा महिन्याचे प्रशिक्षण सुरु केलेले होते आणि आता शासकीय मान्यता मिळाल्यानंतर एका वर्षाचे प्रशिक्षण देत आहोत ज्या महिलांना शासकीय प्रमाणपत्र आहे अशाच महिलांना शिवणयंत्र ५०% अनुदान तत्वावर आपण देणार आहोत त्याचप्रमाणे सहा महिन्याचे प्रशिक्षण प्रमाणपत्र महापालिके तर्फे देण्यात आलेले आहे. अशा महिलांना सुध्दा यामध्ये पात्र ठरविण्यात येईल. प्रश्न असा आहे की, खाजगी संस्थांनी शासकीय प्रमाणपत्र मिळवून दिलेले असेल त्या महिलांना सुध्दा लाभ देता येईल अशी धारणा आहे परंतु प्रमाणपत्र जर त्या खाजगी संस्थेचे असेल तर ग्राह्य धरावे का? याचे कारण असे आहे की, काही खाजगी संस्था या बोगस प्रमाणपत्र देवू शकता. यामध्ये प्रशिक्षण पुर्ण होत नाही केवळ प्रमाणपत्र देवून टाकतात व महिला प्रशिक्षित असतीलच याची शाश्वती मिळणार नाही म्हणून शासनाने आयटीआय दर्जाचे एक वर्षाचा कोर्स असतो तो कोर्स किंवा

प्रशिक्षण कुठेही घेवोत फक्त प्रमाणपत्र शासनाचे असणे आवश्यक आहे किंवा महापालिकेने दिलेले असावे असे बंधनकाकर असणे आवश्यक आहे. अशी विनंती आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : महानगरपालिके मार्फत प्रशिक्षण देण्यात आलेल्या महिलांना कितपत प्रशिक्षित आहेत त्यांना वर्ग चालविता येतात किंवा नाही याची चौकशी कोण करणार?

प्रकल्प अधिकारी : शासनातर्फे ही परिक्षा घेतली जाते.

श्री. महादेव सुर्यवंशी : प्रमाणपत्रही देतो परंतु त्यांना शिवणकला पुर्णपणे अवगत आहेच हे कोण सिध्द करणार?

प्रकल्प अधिकारी : दोनशे महिलांनी सहा महिन्याचे प्रशिक्षण घेऊन त्या स्वतःचे उद्योग सांभाळतात याचा मला आनंद आहे हे सांगावेसे वाटते.

श्री. महादेव सुर्यवशी : इतिवृत्तातील पान क्र. २३ मध्ये मा. महापौरांचे वाक्य आहे रु. ३५ लाखाच्या आर्थिक दृष्ट्या कमकुवत वर्गातील लोकांसाठीचे असणाऱ्या विविध योजना मधुन रु. ६० हजार या योजनेत समाविष्ट करण्यात येते असा निर्णय आहे.

प्रकल्प अधिकारी : शासनाचे जे परिपत्रक आहे. त्यामध्ये व्याख्या अशी केलेली आहे की, अनु.जाती/जमाती, भटक्या विमुक्त जाती/जमाती ह्यांचाच फक्त वर्गांचा समाविष्ट करण्यात येतो. आणि ५%ही रक्कम महापालिकेने राखुन ठेवलेली आहे ही फक्त त्याच वर्गावर खर्च करण्याचे आदेश आहेत. कृपया आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे जे इतिवृत्तात नोंद आलेली आहे ते वगळावे.

श्री. महादेव सुर्यवशी : याबाबतची लिस्ट आहे काय? की आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील किती लोकांना याचा लाभ मिळाला.

प्रकल्प अधिकारी : शासनाचे परिपत्रकानुसार प्रकल्प विभागामार्फत जो प्रस्ताव दर्शविला होता त्यामध्ये अनु. जाती/जमाती व भटक्या विमुक्त जाती/जमाती यांच्यासाठी आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी या प्रस्तावात उल्लेख नाही. त्यामुळे दुर्बल धटकातील यादी आमच्याकडे उपलब्ध नाही.

मा. महापौर : शासनाचा जे परिपत्रक आहे त्यानुसारच कार्यवाही व्हावी आपण यामध्ये कोणतेही जोडणी करु नये. याबरोबरच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींनाही लाभ वहावा शासनास कळविण्यात यावे.

श्री. अजिजुल्ला बेग : आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींना / महिलांना लाभ व्हावा अशी नोंद व्हावी.

मा. महापौर : ठिक आहे.

सौ. लता दलाल : शहरातील घोषित झोपडपट्ट्या आहे तेथील महिलांनाच याचा लाभ होणार आहे काय किंवा अघोषित झोपडपट्ट्या आहेत त्यांनाही याचा लाभ होणार याची माहिती द्यावी. तसेच महापालिकेतर्फे सहा महिन्याचे प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना याचा लाभ होईल परंतु काही खाजगी संस्था असतील त्यांचेकडून प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्र असल्यास त्यांनाही या योजनेचा लाभ व्हावा किंवा नाही याची माहिती द्यावी.

प्रकल्प अधिकारी : स. सदस्या यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की, महापालिके तर्फे ज्या महिलांना सहा महिन्याचा कोर्स पुर्ण करुन प्रमाणपत्र मिळालेले आहे अशा महिलांना या योजनेचा लाभ

होईल. कोणतेही खाजगी किंवा महापालिकेतर्फे संस्थेमधून प्रवेश ोतलेला असेल परंतु शासकीय एक वर्ष कालावधीचा प्रशिक्षण पुर्ण करुन प्रमाणपत्र मिळविलेला असेल तर ते घोषित किंवा अघोषित झोपडपट्ट्या असोत औरंगाबाद महापालिका हद्दीतील ज्या काही महिला असतील त्यांना याचा लाभ देता येईल. फक्त त्यांना शासनाचे किंवा महापालिकेचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

सौ. लता दलाल : ज्या सरकारकमान्य संस्था आहेत त्या संस्था मधुन प्रशिक्षण घेतल्यास प्रमाणपत्र असल्यास या योजनेचा लाभ मिळेल काय?

प्रकल्प अधिकारी : सरकारमान्य संस्थेचे प्रमाणपत्र असल्यास त्यांना लाभ देता येणार नाही कारण अशा कहाी संस्था आहेत ते बोगस प्रमाणपत्र देवू शकतात त्यामुळे शासनाचे तांत्रिक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे शासनाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे

सौ. लता दलाल : आपल्याकडे श्रमिक विद्यापीठामध्ये किंवा एका स. सदस्यांची सुध्दा सरकारमान्य संस्था आहे त्यांचेकडून प्रापत झालेल्या प्रशिक्षणातुन याचा लाभ मिळणार काय?

प्रकल्प अधिकारी : नाही कारण काही संस्थामध्ये एका महिन्याचा सुध्दा कोर्स आहे.

श्री. चेनकरण संचेती : श्रमिक विद्यापीठाचे अंतर्गत जे प्रशिक्षण घेतल्या जाते ते सरकार मान्य आहे. त्यानुसार अशा संस्थेच्या बाबतीत विचार होणार काय असा प्रश्न स. सदस्यांनी उपस्थित केलेला आहे.

श्री. नरेंद्र पाटील : प्रशिक्षण तुम्ही कुठेही घ्या परंतु शासनाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

सौ. लता दलाल : म्हणजे सरकारमान्य संस्थांना या योजनेचा लाभ होणार किंवा नाही याची माहिती द्यावी.

प्रकल्प अधिकारी : नाही.

श्री. प्रकाश जावळे : आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या वर्गासाठी काही योजना राबविण्यासाठी रु. ३५ लाखाची तरतुद आहे. आणि त्यातुन रु. ६० हजार या योजनेसाठी खर्च करण्यात येणार आहे. तेव्हा ज्या घोषित झोपडपट्ट्या असतील तेथील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या व्यक्तींसाठी या योजनांचा लाभ होणार आहे.

प्रकल्प अधिकारी : रु. ३५ लाखाच्या निधी आहे तो कमकुवत घटक कलयाण या शिर्षंतर्गत पैसा उपलब्ध आहे तो या योजनेतुन हा खर्च करण्यात येणार आहे.

श्री. प्रकाश जावळे : म्हणजे रु. ४० हजाराचा जो प्रस्ताव आहे तो याच शिर्षांतर्गत पैसा खर्च करणार किंवा नाही.

प्रकल्प अधिकारी : होय या योजनेतुनच खर्च करण्यात येतात.

श्री. प्रकाश जावळे : याचाच अर्थ असा की, अन्य विभागातील लोकांना याचा फायदा झाला पाहिजे.

श्री. अजिजुल्ला बेग : शहरातील घोषित झोपडपट्ट्रया आहेत त्या व्यतिरिक्त इतर बाहेरील आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या व्यक्तींनाही याचा लाभ मिळाला पाहिजे. कारण यासाठी आपण रु. ३५ लाखाची तरतुद केलेली आहे आणि कमकुवत साठी १५ टक्के ठेवण्यात आलेली आहे.

प्रकल्प अधिकारी : यामध्ये मागासवर्गीय अनु. जाती/जमाती, भटक्या विमुक्त जाती/जमाती याच लोकांना याचा लाभ होणार आहे.

श्री. अजिजुल्ला बेग : प्रकल्प अधिकारी यांचे माहिती प्रमाणे कवेळ तीनच जातीसाठी या योजनेचा लाभ होणार आहे. तर मग बाकी इतर कमकुवत वर्ग आहे त्यांना आपण रु. ३५ लाखाचे खर्चातुन काय करणार आहोत.

मा. महपौर : संबंधित प्रस्ताव जसेच्या तसे मंजुर करुन शासनास पाठवावा आणि इतर कमकुवत घटकांतील वर्गाच्या संदर्भात दुसरा प्रस्ताव घेऊन शासनास कळविण्यात यावे.

श्री. अजिजुल्ला बेग : इतर कमकुवत घटकातील वर्गासाठी आपण काय करणार याचा विचार होणे आवश्यक आहे.

श्री. प्रकाश जावळे : सदरील प्रस्ताव शासनाचे परिपत्रकानुसार मांडण्यात आलेला असून तो प्रस्ताव मंजुर करुन आपण या प्रस्तावाच्या अनुषंगाने काय दुरुस्त्या सुचवायच्या असतील त्याकरुन वेगळा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

श्री. अजिजुल्ला बेग : कार्पोरेशन फंडातून कमकुवत घटकातील लोकांसाठीची योजना राबविण्यासाठी जी ५% रक्कम ठेवण्यात आलेली आहे तीचा उपयोग करण्यात यावा कारण शासनाचीच कल्याणकारी योजना आपण राबविणार आहोत तर शासनाला वेगळा प्रस्ताव करुन पाठविण्याची आवश्यकता नाही.

श्री. तकी हसन खान : सभेमध्ये सध्या कोरम नाही तेव्हा अर्ध्या तासासाठी सभा तहकुब करावी.

मा. महापौर : ठिक आहे. कोरम अभावी सभा ००.१५ मिनीटांसाठी तहकुब करण्यात येते ( वेळ अंदाजे १.०५ वाजता )

(सभेला सुरुवात १.४५ वाजता)

श्री. विठ्ठल पेरकर : इतिवृत्तावर जास्त चर्चा न करता केवळ दुरुस्त्या सुचवाव्यात.

श्री. नरेंद्र पाटील : इतिवृत्तावर चर्चा होऊन दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

श्री. विठ्ठल पेरकर : फक्त तांत्रिकदृष्ट्या दुरुस्त्या असतील तर चर्चा करावी, अन्यथा चर्चा करुन सभागृहाचा वेळ वाया घालवू नये.

मा. महापौर : ठिक आहे.

श्री. अजिज जहागिरदार : महापौर यांचे वक्तव्यात ज्या १५ घोषित झोपडपट्ट्यांना ही योजना राबविण्यासाठी मंजुरी मिळालेली असेल आणि त्या मध्ये नजर चुकीने नाव राहिलेले असल्यास त्यामध्ये समाविश्ठ करुन घ्यावे त्यानुसार या ठरावामध्ये मो. मसनतपुर घोषित झोपडपट्टीचे नाव नजर चुकीने राहुन गेले म्हणून नोंद झाली तशाच प्रकारे मो. राहुल नगर व सादत नगर या झोपडपट्ट्यांच्या भाग नजर चुकीने राहील याचाही समावेश करणे बाबत ठरावात दुरुस्ती करण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे. नोंद घ्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : इतिवृत्तातील पान क्र. १० ते १७ पर्यंत शहरातील बालवाड्या सुरु करणे बाबत चर्चा झाली व या बालवाड्या कोणकोणत्या प्रभागात चालू करणार या बाबतची सविस्तर माहिती पुढील सभेमध्ये देण्यात येणार अशी सुचना केलेली होती. तथापी अद्यापही कोणत्याही स. सदस्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही याचा खुलासा करावा.

श्री. तकी हसन खान : सभागृहात कोरम पुर्ण नाही तेव्हा सभा तहकुब करण्यात यावी विधी सल्लागार यांनी या बाबतची माहिती द्यावी.

मा. महापौर : विधी सल्लागार यांनी माहिती द्यावी.

विधी सल्लागार : सभागृहातील एकंदर सदस्यांची संख्या ६० आहे तर त्यापैकी २० स. सदस्य सभागृहात हजर असणे आवश्यक आहे. (या बाबतचा नियम वाचुन दाखविला)

श्री. अलफखाँ : नियमाप्रमाणे जर सभागृहात १/३ पेक्षा कमी सदस्यांची संख्या असल्यास सभा तहकुब करणे आवश्यक ठरते.

श्री. मोतीराम घडामोडे : सभागृहात प्रवेश करण्या पुर्वी रजिष्टरवर केलेल्या स्वाक्षऱ्या आणि सभागृहातील प्रत्यक्षात असलेली उपस्थिती या बाबतची पडताळणी केल्यास रजिष्टरवर स. सदस्यांच्या ज्या स्वाक्षऱ्या असतात तीच खरी उपस्थिती सभेसाठी समजावी. अन्यथा स. सदस्यांना देण्यात येणारा भत्ता कपात करावा असा आदेश द्यावा.

श्री. अजिजुल्ला बेग : स. सदस्यांनी सभागृहाचा वेळ वाया न घालविता सभ संपेपर्यंत सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. वेळ काढून पणाने सभागृहा बाहेर जाउुन थांबणे व कोरम नाही असे संबोधणे योग्य वाटत नाही.

श्री. मोतीराम घडामोडे : महिन्यातुन एकदा सर्वसाधारण सभा होत असते यामध्ये वार्डातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी स. सदस्य आपआपले मते मांडतात परंतु काही स. सदस्य हेतुपुरस्सर सभागृहाबाहेर उभे राहून सभागृहात काय चालते तेपाहतात म्हणजे ते सभागृहाचा अपमान करु पाहतात अशा सदस्यांबाबत रजिष्टरवर स्वाक्षरी झालेली असल्यास आणि सभागृहात उपस्थिती नसल्यास त्यांचे सदस्यत्वाबद्दल विचार करावा कारण ते स.सदस्य सभागृहा बाहेर जातात तेव्हा कोणत्याही प्रकारचा सभात्याग किंवा निषेध म्हणून जात नाहीत तर त्यांचे सदस्यत्व ग्राह्य धरता येईल काही एक न म्हणता सभागृहाबाहेर जाणे हे स. सदस्यांना पटण्यासारखे नाही यासाठी काही तरी दंडक घालणे महत्वाचे वाटते. अशा स. सदस्यांना नागरिकांची कामे करायचे नाहीत तर सभेसाठी येऊ नये.

श्री.नरेंद्र पाटील : सभेस कोरम पुर्ण असल्यानंतर अचानक सभागृहातुन स.सदस्यांचे गायब होणे सभागृहाच्या दृष्टिने अपमान करणे होय नागरिकांचे कामे करण्यासाठी सर्व स. सदस्य महिन्यातून एकदा एकत्र येतात आणि त्यातही आपले मत व्यवस्थित मांडत नाही हे बरोबर वाटत नाही.

श्री. तकी हसन खान : नियमावली मध्ये काय निर्दिष्ट केलेले आहे याची माहिती द्यावी.

विधी सल्लागार : सभा चालु असतांना कोणत्याही वेळी अध्यक्षस्थानी असलेला प्राधिकारी धरुन उपस्थित पालिका सदस्यांची संख्या ही पालिका सदस्यांच्या एकुण संख्येच्या १/३ पेक्षा कमी आहे असे अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याच्या निदर्शनास आणले तर अध्यक्षस्थानी आलेल्या प्राधिकाऱ्यास सभा सभेसाठीच्या सोयीस्कर वाटेल अशी वेळ व ठिकाण ठरवुन आणि एखाद्या दिवसापर्यंत तहकुब केली पाहिजे आणि अशा सभेत जर कामकाज निकालात काढावयाचे राहीले असेल तर ते कामकाज असा तहकुब सभेत निकालात काढण्यात आले पाहिजे किंवा नंतरची सभाही पुर्ण तहकुब

करण्यात आली तर असे कामकाज त्या नंतरच्या कोणत्याही तहकुब सभेत निकाली काढाणेत आले पाहिजे मग अशा सभेत गणपुर्ती झालेली असो किंवा नसो (नियम वाचुन दाखविला)

मा. महापौर : (नियमावलीतील नियम पुन्हा वाचून दाखविला)

श्री. नरेंद्र पाटील : यामध्ये वेळेचे बंधन दिलेले नाही.

श्री. मोतीराम घडामोडे : स. सदस्य सभागृहात उपस्थित राहतात व कोरम नाही म्हणून सभागृहाबाहेर जातात अशा सदस्यांच्या भत्याबाबत सभागृहहात विचार करणे आवश्यक आहे कारण मागील बैठकीतही कोरम अभावी सभा तहकुब करण्याचे प्रकार काही स.सदस्यांनी केले व भत्ताही घेतला तेव्हा अशा सदस्यांना कोणताही भत्ता देवू नये व सदस्यांनीही सन्मानाने तो घेतलेला भत्ता परत करावा.

श्री. अजिज जहागिरदार : बैठक अशीच सुरु राहिल्यास सभा अनधिकृत आहे असे संबोधण्यात येईल.

श्री. बंडू प्रधान : नागरिकांचे कामे करण्यासाठी आपण सदस्य या ठिकाणी एकत्र येतो परंतु लोकहित बाजुला ठेवून राजकारण या ठिकाणी खेळल्या जाते त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे खोळंबल्या जातात तेव्हा सभा १/२ तासासाठी तहकुब करुन पुन्हा सभा घेण्यात यावी.

श्री. नरेंद्र पाटील : कोणत्याही प्रकारे भावनेच्या आहारी न जाता नियमाप्रमाणे कामकाज चालले पाहिजे. आणि या कामी अशा प्रकारचे प्रकार वारंवार घडू नये म्हणून सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि सर्व स.सदस्यांनी मिळून काय तोडगा काढावयाचा आहे तो कायमसाठी काढावयास पाहिजे ज्यामुळे अशी परिस्थिती निर्माण होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

श्री. मोतीराम घडामोडे : आजच्या सभेसाठी जे १९ स.सदस्य उपस्थित आहेत त्यांनाच बैठकीची भत्ता देण्यात यावा इतर सदस्यांना देण्यात येऊ नये असा निर्णय आपण द्यावा.

श्री. इकबालसिंग गिल : दोन दिवसांसाठी सभा तहकुब करण्यात यावी.

श्री. तुळशीराम : सभेचे कामकाज चालुच ठेवावे ज्या स.सदस्यांना कोर्टात जायचे असेल त्यांना जाऊ द्यावे.

मा. महापौर : आता विधी सल्लागार यांनी माहिती सांगितली की, एकदा जर सभा सुरु झ ाली आणि कोणतेही कामकाज न होता सभा तहकुब झालेली असल्यास सभेसाठी स.सदस्यांना भत्ता देता येत नाही. तेव्हा गणपुर्ती अभावी आजची सभा दोन दिवसांसाठी तहकुब करण्यात येते.

यानंतर "जन गन मन" या राष्ट्रगीताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## गुरुवार, दिनांक २३/७/९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**सोमवार, दिनांक २०/७/९२ रोजी तहकुब झालेली सर्वसाधारण सभा दि. २३/७/९२ रोजी अंदाजे ११:२५ वाजता मा. महापौर श्री. यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली सभेस मा. उपआयुक्त, अधिकारी आणि रजिष्टर प्रमाणे खालील स.सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
२) श्री. तकी हसन खान कासिम खान
३) श्री. स. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
४) श्री. अ. रशीदखान (मामु)अ. हमिदखान
५) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
६) श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
७) श्री. वाघमारे सुदाम भानुदास
८) श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
९) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
१०) श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव

"वंदे मातरम्" या गीताने सभेस सुरुवात झाली.

**<u>संवाद</u>**

**मा. महापौर** : आज पुन्हा सभागृहात गणपुर्ती दिसून येत नाही त्यामुळे आजची सभा दिनांक २७/७/९२ पर्यंत पुढे ढकलण्यात येते. कृपया नोंद घ्यावी.

"जन गन मन" या राष्ट्रगीताने सभा संपली

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक २०/७/९२ व २३/७/९२ रोजी तहकुब झोलेली सर्वसाधारण सभा दिनांक २७/७/९२ रोजी संपन्न झाली तिचे इतिवृत्त

**सोमवार, दिनांक २७/७/९२ रोजी अंदाजे ११:२५ वाजता मा. महापौर श्री. यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेस मा. आयुक्त, उप आयुक्त अधिकारी वर्ग तसेच खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
२) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
३) श्री. अजिजुला बेग वाहिद बोग
४) श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
५) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
६) श्री. भगुरे तुळशीराम छगन
७) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
८) श्री. पाटील नरेंद्र यादवराव
९) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
१०) श्री. म. अयुब गुलाम जिलानी
११) श्री. मुजीब अलमशा खान
१२) श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१३) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१४) श्री. जावेद हसनखान कसीम हसनखान
१५) श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
१६) श्री. स.अ. एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
१७) श्री. ओक जयवंत केशवराव
१८) श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग
१९) श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
२०) श्री. अ. रशीद खान (मामु) अ. हमीद खान
२१) सौ. दलाल लता श्रीनिवास
२२) श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२३) श्री. हाजी मोहमद हाफीजोद्दीन
२४) श्री. छापरवाल रमेश नारायण
२५) श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२६) श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२७) डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
२८) श्री. मोहम्मद इस्माइल अब्दुल करीम
२९) श्री. फैय्याजखान अहमदखान
३०) श्री. मोहसीन अहमद बाशीर अहमद
३१) श्री. स. हुसेन स. अहमद

३२) श्री. मगर शंकर जीजाराम
३३) श्री. मानकापे नामदेवराव शामराव
३४) श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
३५) श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
३६) श्री. अलफखान हुसेनखान
३७) श्री. वाघमारे सुदाम भानुदास
३८) श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
३९) श्री. थोरात किशोर गोविंदराव
४०) श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ
४१) डॉ. काळे शांताराम यशवंतराव
४२) श्री. बारवाल गजानन रामकिसन
४३) श्री. गोडसे आनंद जगदिश
४४) श्री. जाहागिरदार अजिज मुख्तार अहमद
४५) श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
४६) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराम
४७) श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
४८) श्री. नवपुते कचरु चंद्रभान

**"वंदे मातरम्" या गीताने सभेस सुरुवात झाली.**

**संवाद**

श्री. नरेद्र पाटील : मागील इतिवृत्त अद्यापही कायम झालेले नाही. त्यावरच चर्चा करावी असे अपेक्षित आहे.

श्री. विठ्ठल पेरकर : सभागृहात वेळ वाया न घालविता केवळ इतिवृत्तातील काही दुरुस्ती असल्यास ते सुचवावे.

श्री. नरेंद्र पाटील : प्रत्येक स. सदस्यांना आपल्या सुचना मांडण्याचा अधिकार आहे. त्यामुळे कुणी सदस्यांनी अडविण्याचा प्रश्न येत नाही. इतिवृत्तील पान क्र. १७ मध्ये बालवाड्याबाबत चर्चा झालेली आहे. आणि मा. महापौर यांचा आदेश आहे की, सर्व स. सदस्यांनी बालवाड्या शहरात कुठे, किती कोणत्या प्रभागात चालू होणार याची महिन्याभरात कोणतीही संबंधित विभागाकडून दिल्या गेलेली नाही. कृपया याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : मागील सभेमध्ये शिक्षणाधिकारी यांना सुचना दिलेल्या होत्या व शिक्षण अधिकाऱ्यांनी सुध्दा खुलासा केलेला होता. त्यांच्या खुलाशाने समाधान न झाल्याने संबंधित माहिती सर्व सदस्यांना देण्यात यावी असे सुचित केलेले होते. याबाबत एक विशेष बैठक घ्यावी काय असाही विचार होता. तरीही आपण म्हणत असाल तर माहिती मागवून घेता येईल.

श्री. नरेंद्र पाटील : मी यासाठी विचारणा करतो की, शहरातील मनपाकडे बालवाड्या सुरु करण्यासंदर्भात जो प्रस्ताव होता त्यामध्ये किती ठिकाणी आणि कोणकोणत्या प्रभागात बालवाड्या सुरु करणार आहात याची माहिती असणे आवश्यक आहे. आणि प्रस्ताव जर लवकर संमत झाला तर शैक्षणिक

वर्षाला सुरुवात झालेली आहे. तेव्हा प्रस्ताव पास करुन बालवाड्या सुरु करणे आवश्यक आहे.

श्री. अविनाश कुमावत : शहरात गॅस्ट्रोची लागण झालेली आहे असे वर्तमानपत्रात आलेले आहे. त्यानुसार काही ठिकाणी माझ्या मते ड्रेनेज लाईन पिण्याच्या पाईप लाईनला मिळालेली असल्याने पाणी दुषित होऊन ते नळाद्वारे आलेले आहे. त्यामुळेसुध्दा गॅस्ट्रोची लागण होण्याची शक्यता आहे आणि काही दवाखान्यात पेशंट दाखल झालेले असल्याचे समजते. तेव्हा नागरिकांच्या हितासाठी महानगरपालिकेने काय उपाय योजना केली याची माहिती द्यावी.

श्री. शांतराम काळे : संबंधित वार्डाती स.सदस्यांनी जर वेळीच संबंधीत अधिकारी वर्ग यांना लेखी लिहुन कोणतीही तक्रार देऊन कळविले तर संबंधित अधिकाऱ्यांना उपाय योजना करणे सुलभ जाईल यासाठी स.सदस्यांनी काळजी घेतली पाहिजे की, आपले शहर सुंदर कसे राहील वगैरे वगैरे.

श्री. पांडूरंग पैठणकर : झोन कार्यालयातील स्वच्छता निरीक्षकांना वार्डातील स्वच्छता व रस्त्यावर साचलेले पाणी तसेच नाल्या साफसफाई बाबत आठ अठ दिवस सुचना देऊनही ऐकत नाही. ज्यामुळे दुर्गंधीने गॅस्ट्रो व इतर रोगांची लागण होण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे शहरातील बाजार किंवा मार्केटमध्ये उघड्या वरती जे फळे विक्रीला असतात त्यावर झाकणे नसल्याने अशा अशा बसलेल्या फळांमुळे लोकांना काही लागण लागण्याची शक्यता असते याबाबत आरोग्य विभागाने दखल घ्यावी. आणि पाणी पुरवठाबाबत पाण्यामध्ये टाकावयाच्या गोळ्याचे व्यवस्थित वितरण होणे जरुरीचे आहे.

श्री. कचरु नवपुते : रोजंदारीवरील काम करणारे चतुर्थ श्रेणी कर्मचारी व काही कर्मचारी हे झोनच्या बाहेरील वस्तीत राहत असल्याने त्यांचा कामावर येण्या जाण्यासाठी त्रास होतो. परिणामी साफसफाई व्यवस्थित होत नाही. स्वच्छता निरीक्षकांचे नियंत्रण नसते त्यामुळे घाणीने कोणताही रोग गॅस्ट्रोसारखी लागण होण्याची शक्यता असते.

श्री. चंद्रकांत खैरे : स. सदस्याची शहरातील स्वच्छता व गॅस्ट्रोबाबत जी सुचना मांडली त्यानुसार शहराबाहेर जी गॅस्ट्रोची लागण झालेली आपण वर्तमान पत्रात वाचतो, ती परिस्थिती शहरात होऊ नये यासाठी आरोग्य वैद्यकिय अधिकाऱ्यांनी सविस्तर निवेदन करावे.

श्री. अलफखान : मनपातर्फे वर्तमान पत्रात जाहिर निवेदन आरोग्याच्या दृ्ष्टिने व स्वच्छता पाणी गाळुन पिणे बाबत येत आहे ते योग्य आहे. परंतु बऱ्याच भागात पाणी तुंबलेले असते. त्या तुंबलेल्या पाण्याची विल्हेवाट लावल्या जात नाही तर बऱ्याच ठिकाणी ड्रेनेज लाईनला लागुन पाण्याची पाईप लाईन फुटलेली असते त्याचेवर नियंत्रण नसते. यामुळे दुर्गंधी होते आणि गढुळ होऊन रोगराई होण्याची शक्यता असते तेव्हा पाच पाच वेळेस पत्राने संबंधित अधिकाऱ्यास कळवूनही त्यावर कार्यवाही केली जात नाही तर हॉटेल मेघदूत समोर गेले कित्येक दिवसांपासून पाणी साचलेले आहे त्याकडेही मनपाचे लक्ष नाही. त्यामुळे नाईलाजास्तव शासनास कळविण्यात येईल किंवा कोर्टाकडे धाव घ्यावी लागेल याची कृपया नोंद घ्यावी.

श्री. शंकर मगर: मो. इंदिरानगर बायजीपुरा या भागासाठी साफसफाई करणारे कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. सभागृहात निर्णय झालेला आहे की, सहा

कर्मचारी पाठविण्यात यावे मा. आयुक्तांनीही झोन अधिकाऱ्यांना कळविले परंतु संबंधित झोन अधिकाऱ्यांनी अद्यापही ह्या सहा कर्मचाऱ्यांना कामावर पाठविले नाही. ज्यामुळे प्रत्येक भागात साचलेले पाणी. रस्त्यावरील साफसफाई होऊन दुर्गंधी होणार नाही. व रोगजंतु निर्माण होणार नाही ज्यावेळी नागरिकांना कोणत्याही साथीच्या रोगास बळी पडता येणार नाही याची माहिती द्यावी सभागृहाला किंमत का देत नाही. मा. आयुक्तांचा आदेश का मानला जात नाही.

श्री. अजिजुल्ला बेग : रोगराई किंवा साचलेल्या पाण्याने जंतु वाढतात व त्यामुळे रोग होण्याची शक्यता असते परंतु शहरतील कोणत्याही भागात साचलेल्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी पाणी तुंबलेले बाहेर फेकण्यासाठी मनपाकडे काय व्यवस्था आहे याची माहिती द्यावी.

सौ. लता दलाल : शहरातील अनेक भागामध्ये साफसफाई निट होत नाही. त्यामुळे केरकचरा साचलेल्या असतो आणि महिना महिना याकडे लक्ष दिल्या जात नाही. यावर स्वच्छता निरीक्षकांचे नियंत्रण नसते. तसेच विविध प्रकारचे नोव्हान, बिटेक्स, फिनेल आणि फॉगिंग करण्यासाठीचे औषण आरोग्य विभागाकडे उपलब्ध आहेत काय आणि जर उपलब्ध नसतील तर का? नाही याची माहिती द्यावी.

मा. महापौर : आता स. सदस्यांनी शहरातील साफसफाई व ड्रेनेज बाबत ज्या सुचना मांडल्या त्या सुचना बाबत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

श्री. रशीद मामु : माझ्या वार्डातील दोन पेशंट गॅस्ट्रोमुळे दवाखान्यात दाखल झालेले आहेत. याची कृपया नोंद घ्यावी गारखेडा येथे एका गुत्तेदाराने काम थांबविले आहे याची चौकशी व्हावी. सर्व पदाधिकारी आणि मा. आयुक्त, उप आयुक्त यांचेकडे कार आहे तेव्हा एक बैठक घेऊन सात पदाधिकारी यांनी सात झोनला अचानक भेट देऊन कामांची पाहणी करावी. ज्यामुळे स्वच्छतेबाबत आपणास काय स्थिती आहे दिसून येईल. अन्यथा नगरसेवकांना कारची व्यवस्था करावी.

श्री. पांडुरंग पैठणकर : हापसे व स्टँडपोस जवळ पाणी साचलेले असते. त्यामुळे जंतु निर्माण होतात. किंवा तेच पाणी स्टॅडपोस्टच्या ठिकाणी मुरते व ज्यामुळे घाण पाणी प्यावयास मिळते यासाठी योग्य ती व्यवस्था करावी घेण्यास सुरुवात.

श्री. महादेव सुर्यवंशी : शहरातील कर्मचाऱ्यांची घाण माझ्या वार्डात टाकल्या जाते. ज्यामध्ये नारेगांव, ब्रिजवाडी, अंबिकानगर व मांडकी आणि गोपाळपुर हे भाग येतात, या ठिकाणी टाकलेल्या कचऱ्यामुळे इतकी दुर्गंधी पसरलेली असते की, जेवणे सुध्दा कठीण होते. अगोदर बायजीपुरा येथे केरकचरा टाकल्या जात होता त्या ठिकाणी खड्डा होता परंतु आता सर्व केरकचरा माझ्या वार्डात वळविल्याने नागरिकांना दुर्गंधीस तोंड द्यावे लागत आहे. यासाठी सर्व मनपाचे पदाधिकारी तथा मा. आयुक्त यांना विनंती करतो की, सर्वांनी माझ्या वार्डातील परिस्थती काय आहे याची सविस्तर पाहणी करावी.

मा. महापौर : आपली सुचना ऐकलेली आहे. याबाबत संबंधित अधिकारी खुलासा करतील व काय उपाय योजना करावी ते करतील.

श्री. इकबालसिंग गिल : शहरातील गॅस्ट्रोची लागण झाल्याचे वर्तमान पत्रात बातमी आलेली आहे. ती चुकीचे असून एका कार्यकर्त्यांनी ती बातमी दिलेली आहे.

बाहेरगावावरुन जे गॅस्ट्रोचे पेशंट दवाखान्यात आहेत त्यांना शहरातील कुणीही नातेवाईकांनी घरामध्ये येऊ नये याची खबरदारी घ्यावी कारण तो संसर्गजन्य रोग आहे.

श्री. तकी हसन खान : माझ्या वार्डालगत नवाबगल्ली आहे तेथे गॅस्ट्रोची अकरा व्यक्ती असल्याची सुचना मिळाली परंतु प्रत्यक्षात पाहिले असता कुणीही नाही. एका कार्यकर्त्याने पुढील निवडणुकीसाठी डावपेच रचण्यासाठी वर्तमानपत्रात बातमी दिलेली आहे. गॅस्ट्रोचे कुणीही पेशंट नाहीत.

श्री. नरेंद्र पाटील : माझ्या वार्डालगत स. सदस्य श्री. महादेव सुर्यवंशी यांचा वार्ड असल्याने त्याच्या वार्डात काय स्थिती आहे याची मला पुर्ण कल्पना आहे. पावसाळ्यात पाणी साचणे व केरकचरा, साफसफाई व्यवस्थित न होणे त्यामुळे दुर्गंधी वाढते रोगजंतु वाढतात आणि नागरिकांना त्रास होतो यासाठी माझे एक मत आहे की, झोन अधिकाऱ्यांचे स्वच्छता निरीक्षकावर योग्य ते नियंत्रण नसल्याने या बाबी घडत असतात.

मा. महापौर : आरोग्य वैद्यकिय अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती द्यावी.

श्री. रशीद मामु : माझ्या वार्डात गॅस्ट्रोचे दोन पेशेंट दवाखान्यात भरती झालेले आहेत.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : शहरातील तुरळक भागात गॅस्ट्रोचे रुग्ण आहेत. गॅस्ट्रोची शहरात लागण नाही. शहराच्या बाहेर गॅस्ट्रोची लागण आहे. तीची लागण शहरात होण्याची दाट शक्यता आहे. कारण गॅस्ट्रो म्हणजे उलटी आणि संडास झाली म्हणजे गॅस्ट्रो नाही. उलटी आणि संडास होऊन शरिरातील पाणी फार मोठ्या प्रमाणात कमी होते त्या रुग्णास गॅस्ट्रो म्हणतात. सध्या आषाढाचा महिना असल्याने व ढगाळ वातावरण असल्याने खाल्लेले अन्न पचन होत नाही. परंतु संडास लागल्याने गॅस्ट्रो म्हणणे योग्य नाही. याबाबत आम्ही शहरात पाहणी केली असता मो. मुकुंदवाडी व एक सिडको येथे रुग्ण सापडलेले आहेत. घाण पाण्याने गॅस्ट्रो साथ होण्याची शक्यता आहे आणि ते घाण पाणी जंतुचे असल्याने व पोटात गेल्याने साथ फैलण्याची शक्यता आहे आणि एकाच वेळी एकापेक्षा जास्त रुग्ण असे दहापर्यंत आढळलयास त्यांना साथ झाली असे म्हणता येईल. अशा प्रकारची परिस्थिती शहराची नाही. या करिता वैद्यकिय महाविद्यालय येथे इंडेक्स मांडलेला आहे जो की, प्रायव्हेट दवाखान्यात नसतो. ते एकाच पाच असे न दिसनाच्या सालेस केसेस करुन घेण्याचे प्रयत्न आम्ही करतो. यासाठी आम्ही वार्ड एकेडेमिक स्कॉट तयार केलेले आहेत. ज्यमध्ये दोन अन्न निरीक्षक दोन एमपीडब्ल्यु दोन सेवक आणि त्याचे सोबत एक गाडी अशी व्यवस्था केलेली आहे. हे कर्मचारी जाऊन ज्या घरी रुग्ण सापडेल त्यांच्या घरी जाऊन कानटॅक्ट ट्रिटमेंट देणे चालू आहे. त्यांना आपण हॅलोजनच्या गोळ्या वाटतो व आजुबाजुच्या पाण्याचे नमुने घेतल्या जाऊन निरीक्षण केल्या जाते. अशा पाण्याचे नमुने मा. महापौरांना दाखविलेले आहेत. पाण्यामधुन सध्या तरी दुषित पणा आलेला नाही. मी आणि माझे सहकारी शहराध्मध्ये सतर्क असून दुषित पाणी आढळलयास त्याचे नमुने घेऊन पाठवित आहोत. नोवॉन फावारणी करुन माशांचा उपद्रव कमी करण्याचा प्रयत्न होत आहेत. आरोग्य रक्षणाचे आरोग्य शिक्षणाचेही काम सुरु केलेले आहे आणि रुग्ण आढळला तर त्याला औषधोपचारासाठी औरंगाबाद मनपातील सगळ्या आरोग्य केंद्रात औषधी ठेवण्यात आलेली आहे. परवा

मला औषधी खरेदी करणेसाठी मा. सभापती यांनी ऐनवेळी मंजुरी दिली व इतिवृत्त कायम केले त्यामुळे औषधांची खरेदी झालेली आहे. स. सदस्या सौ. दलाल यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावरुन आपण त्याकडे नोवॉन, गॅमेगझीन आणि बिटेक्स आहेत पैकी नोवॉन गॅमेगझीन एक आठवड्याच्या वर पुरेल इतके आहे. परंतु त्वरीत यावर कार्यवाही होईल. कोणतहीही कमतरता ठेवणार नाही. वर्तमानत्रात जी बातमी आली त्याची शहानिशा मी स्वतः व कार्यकारी अभियंता पा.पु. व स. सदस्य श्री.नारायण फत्तेलष्कर इ.नी जाऊन पाहणी कली परंतु तो कोणत्याही प्रकारचा रुग्ण नव्हता व पाणी सुध्दा स्वच्छ होते. त्या ठिकाणी ड्रेनेज ब्लॉक झालेले होते. ते काम सुरु झालेले आहे. अशा प्रकारे शहरात राहुन सतर्क प्रयत्न केले आहे आपणही सहकार्य करावे.

श्री. अविनाश कुमावत : सिल्लेखाना बाबत काय झाले?

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : तो भाग माझ्या कक्षेत नाही.

श्री. अजिजुल्ला बेग : आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी खुलासा केल्याप्रमाणे माझे असे मत आहे की, एमपीडब्ल्यु व अन्न निरीक्षक हे ट्रेंड नसल्याने त्यांना ट्रेनिंगवर पाठवुन नंतरच त्यांचेकडून कामे घ्यावीत. जीवशास्त्रज्ञ पद होते त्यांचेवर नियंत्रणासाठी परंतु आरोग्य वैद्यकीय अधिकारी व त्यांचे पटत नसल्याने त्यांना मुळ खात्यात पाठवून दिले. परंतु कर्मचारी अनट्रेंड आहेत याबाबत माहिती द्यावी.

मा. महापौर : आपण केवळ गॅस्ट्रोबाबत बोलावे संबंधित अधिकाऱ्यांना का पाठविले असे बोलू नये. संबंधित अधिकाऱ्याकडून काही चुका झाल्या आपण काही कार्यवाही करु.

श्री. अजिज शेळके : नोवॉन व बिटेक्स जवळपास दोन महिन्यापासुन नाही अशी माहिती मिळालेली आहे.

श्री. पांडूरंग पैठणकर : आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे फवारणी कोठे कोठे केली याची माहिती द्यावी.

श्री. अजित शेळके : स्वच्छता निरीक्षक माझ्या वार्डात कामाची पाहणी करतांना कधी आढळले नाही.

मा. महापौर : स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे बिटेक्स व नोवॉन नाही आणि आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ही औषधे आहेत असे सुचित केले हे कसे याबाबत माहिती द्यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : नोवॉनचे टेंडर कॉल केलेले आहे नोव्हान परचेस करण्याकरिता टेंडर फायनल केलेले नाही. तरीही आपण १० लि. स्टॉक करुन ठेवलेला आहे. नोवॉन महाग असल्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवावे लागते. त्यामुळे डायरेक्ट कामगारांना देत नाही. पंपामध्ये टाकून देतो. टेंडर फायनल झाल्यानंतर त्वरीत दोन महिन्याचा स्टॉक घेऊन ठेवू.

मा. महापौर : स. सदस्य श्री. अविनाश कुमावत यांनी सिल्लेखाना स्वच्छते बाबत विचारणा केली त्याचे काय?

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : तो भाग माझ्या कडे येत नसुन पशुधन विकास अधिकारी यांचे कक्षेत येतो.

मा. महापौर : पशुधन विकास अधिकारी आहेत काय? त्यांनी माहिती द्यावी.

श्री. इकबालसिंग गिल : पशुधन विकास अधिकारी बैठकीस उपस्थित राहतांना कधी दिसत

श्री. अविनाश कुमावत : नाही. स्थायी समितीच्या बैइकीतही उपस्थित राहतांना दिसत नाही याचे कारण काय? जर बैठकीस जानुनबुजून उपस्थित राहत नसतील तर त्यांचेवर कार्यवाही करणार काय?

मा. महापौर : पशुधन विकास अधिकारी काही कारणास्तव सुट्टीवर असल्याचे समजते. तरीही आपण सर्वांनी सुचित केल्यास संबंधित अधिकारी बैठकीस का उपस्थित नाही म्हणून कार्यवाही करण्यात येईल.

श्री. बंडू प्रधान : आरोग्य विभागाकडून मलेरिया भाग वेगळा करण्याच्या संदर्भात यापूर्वी आम्ही सुचित केलेले होते कारण आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडून आरोग्य केंद्राच्या व्यतिरिक्त इतर भार सांभाळणे कठीण जातो. त्यामुळे मागे शहरातील डासांचा प्रादुर्भाव झालेला होता त्यांचेकडून गँगवारची नियुक्ती कामासाठी न झाल्याने डासांची उत्पत्ती थांबवता आलेली नाही. यासाठी आरोग्य विभागाकडून मलेरिया विभाग वेगळा करणे आवश्यक वाटते.

श्री. अजिज जहागिरदार : स्वच्छता निरीक्षक डायरेक्ट कुनाशी संबंधित आहेत याचा खुलासा व्हावा. दुसरे म्हणजे सभागृहाने दोन उप आयुक्तांची पदे मंजुरी केलेली होती. ती पदे भरण्यास सर्व कामाबाबत योग्य ते नियंत्रण होईल.

श्री. अविनाश कुमावत : विषयांतर होत आहे.

श्री. चंद्रकांत खैरे : स. सदस्य श्री. नामदेवराव मानकापे यांच्या वार्डातील एक शिष्ट मंडळ आलेले आहे. त्यांच्या विविध मागण्या आहेत. गेल्या चार वर्षापासून पुर्ण होत नाही तरीही प्रत्यक्षात भेटून योग्य ती कार्यवाही करण्याचे सांगावे.

श्री. नामदेव मानकापे : माझ्या वार्डातील ठाकुरदार गिरणी येथील वस्तीतील सार्वजनीक संडास, पिण्याचे पाण्याची व्यवस्था आदीबाबत अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली असून कामास अद्यापही सुरुवात का नाही. गेल्या चार वर्षापासून आश्वासने दिली जातात. फाईल गायब केल्या जाते. मागील स्थायी समितीच्या बैठकीत आणि माजी महापौर यांनीही संबंधित कामाच्या बाबतीत मला आश्वासन दिलेले होते. परंतु काहीही झालेले नाही. तेव्हा शिष्टमंडळ आलेले असून त्यांना कृपया भेटावे.

मा. महापौर : ठिक आहे सदरील विषय संपल्यानंतर शिष्टमंडळास भेटता येईल. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रत्येक झोनवाईज स्वच्दता निरीक्षक जे आहेत त्यांचे एकंदरित कामाचे स्वरुप, वार्ड वाईज औषधांची फवारणी केल्या जाते काय याची सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी व मलेरिया विभागा संदर्भात काय उपाय योजना करता येईल याचीही माहिती देण्यात यावी कारण डासांची उत्पत्ती वाढल्याने त्यावर उपाय योजना करणे आवश्यक आहे. मलेरिया कर्मचाऱ्यांची फावारणी करित असतांना संबंधित वार्डाचे स. सदस्य यांना भेटून त्यांची स्वाक्षरी रजिष्टरवर घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे स. सदस्य श्री. अलफाखान व श्री. अजिजुल्ला बेग यांनी सुचित केल्याप्रमाणे ड्रेनेज बाबतीत व पाणी साचलेले असते त्याच्या बाबतीत काय कार्यवाही करता येईल ती त्वरीत करण्यात यावी कोणती मशिनरी आणावयाची ती आणुन पाणी काढण्याची व्यवस्था व्हावी.

श्री. अलफखान : हॉटेल मेघदूतच्या समोर एक अंडरग्राऊंड घर तयार होत असून त्या ठिकाणी खुप पाणी साचलेले आहे आणि त्या पाण्यामुळे डास वगैरे जास्त प्रमाणात होतात. त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे शहरातील मो. फाजलपुरा ते इतर कोणत्याही भागातील ड्रेनेज लाईन व्यवस्थित नाही सर्वत्र ड्रेनेज लाईन नाल्यामध्ये सोडलेली आहे. याकडे संबंधित अधिकारी माझ्याकडून बारा पत्र देवूनही कार्यवाही करित नाही. त्यांना केवळ नवीन कामाचे अंदाजपत्रक तयार लवकर करण्याची काळजी जास्त असते. असे निदर्शनास आलेले आहे. ड्रेनेजचे घाण पाणी नळाच्या पाईपद्वारे मिळाल्यास शहरातील आरोग्य धोक्यात येईल यासाठी माझ्या वार्डातील व इतर काही समर्थनगर येथील वार्डातील जुन्या पाईप लाईन आहेत त्या दुरुस्ती करण्याची त्वरीत कार्यवाही करावी.

मा. महापौर : सभागृहाचे सुचनेनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरीत कार्यवाही करुन पुढील बैठकीत माहिती द्यावी. अन्यथा त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. मुजिब आलमशा खान : माझ्या वार्डातील रोशनगेट ते चंपा मस्जीद रोडवर एका शाळेच्या जवळ ड्रेनेज लाईनचे संदर्भात सुचना केलेली होती ती अद्यापही पुर्ण झालेली नाही. याचे कारण काय? संबंधित अधिकारी यांना वेळोवेळी सांगूनही लक्षात येत नाही याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. कृपया माहिती द्यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांना यापुर्वीच सुचना दिलेल्या आहेत की, स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे आठ दिवसात कार्यवाही व्हावी आणि पुढील बैठकीत माहिती द्यावी.

श्री. मुजिब अलमशा खान : संबंधित अधिकारी कोणतीही कार्यवाही करीत नाही. यापूर्वी मी अनेक वेळा सुचना करुनही काहीच इलाज नाही. तसेच रोशनगेट येथील रसता रुंदीकरणात एका घराचे बाबतीत तडजोड करण्या संदर्भात अद्यापही काहीच झालेले नाही. त्यामुळे रस्त्याचे काम थांबलेले आहे याचे कारण काय?

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

अतिरिक्त शहर अभियंता : रोशनगेट तेचंपा मस्जीदच्या रोडच्या संदर्भात टेंडर वगैरे झ ालेले आहे परंतु या रस्त्यावरील बाधित झालेल्या एका घरासाठी लॅन्ड एक्वीझिशन तर्फे कार्यवाही पुर्ण झालेली नाही. आणि त्यामुळे सदरील जागा पजेशन मध्ये घेण्यात आलेली नाही कार्यवाही करण्यात अडथळा होतो. तो दुर झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. मुजिब अलमशा खान : रसता रुंदीकरणातील केवळ एका घराचा प्रश्न ओ. लॅन्ड एक्वीजिशनच्या अधिकाऱ्याबरोबर चर्चा झालेली आहे. चंपा मस्जीद रोडवरील २०X३० चा प्लॉट होता त्याबाबत आपले नगररचना अधिकारी ऐकत नाही आणि कुणीही ऐकत नाही त्यामुळे हा रस्ता तसाच पडलेला आहे याबाबत त्वरीत व्यवस्था व्हावी रोशनगेट ते चंपा मस्जीद रोडवरील खड्डे झालेले आहेत ते भरणे आवश्यक आहे ज्यामुळे त्या ठिकाणी एक शाळा आहे मुलांना येणे जाणे करण्यासाठी त्रास होणार नाही.

मा. महापौरः आपल्या भावना लक्षात घेता संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांनी या कामाबाबत टाळाटाळ केलेली असल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. मुजिब आलमशा खान : या रोडच्या संदर्भात लॅड एक्वीजिशन व संबंधित व्यक्ती राजी झालेले असून आता काम थांबवू नये आणि या रोडच्या कामास सुरुवात करावी. जर आपल्याला या रोडची अवस्था पाहावयाची असल्यास मा. महापौर आपण स्वत: चालून पहावे. रस्त्यावर तसेच खड्डे झालेले आहेत. त्याचप्रमाणे रस्त्यावरील बरेच लाईट बंद आहेत. संबंधित अधिकाऱ्यांना कित्येक वेळा सुचना देवूनही काहीही केलेले नाही. कृपया याकडे लक्ष द्यावे. अन्यथा आम्ही आमच्या मर्जीनुसार काय करायचे ते करुत.

श्री. मोहसीन अहमद : चंपा मस्जीद रोडवरील ड्रेनेज लाईन व रस्ता रुंदिकरण डांबरीकरण आदींचे कामास सुरुवात कधी होणार याची माहिती द्यावी.

श्री. मुजिब अलमशा खान : रोशनगेट रस्त्यावर एक शाळा आहे. त्या बाजुला दुर्गंधी फार येते याबाबत ड्रेनेज विभागाने कार्यवाही करावी. तसेच रस्त्यावरील खड्डे झ ालेले आहेत ते दुरुस्त करुन डांबरीकरण व्हावे आणि लाईट पुर्ण बंद आहेत ज्यामुळे रसत्यावर अपधात होण्याची शक्यता आहे. वाहतुकीचा मार्ग मोकळा असल्याने रस्ता व लाईटची त्वरीत व्यवस्था होणे आवश्यक आहे. किंवा आपण संबंधित अधिकाऱ्या समवेत येऊन पाहणी करावी.

मा. महापौर: ठिक आहे. पाहणी करण्यात येईल.

श्री. अविनाश कुमावत : शिष्ट मंडळ बाहेर आलेले आहे. कृपया भेट घ्यावी.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांचे सुचनांना विचार झालेला आहे. आता इतिवृत्त कायम करण्यात येते.

**ठराव क्र. २३/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्तातील पान क्र. २५ च्या मुळ प्रस्तावात कामगार अधिकारी पदाची शैक्षणिक पात्रता एमएसडब्ल्यु अशी आहे. परंतु त्या ठरावातील पान क्र. २९ मध्ये शैक्षणिक पात्रता एमएसडब्ल्यु/एम.ए. समाजशास्त्र अशी आहे. तेव्हा एम.ए. समाजशास्त्र इतिवृत्तातुन वगळण्यात यावे.
इतिवृत्तातील पान क्र. ४५ मधील विषय क्र. १८/८ अन्वये शहरातील १५ घोषित झोपडपट्ट्यांना नेहरु रोजगार योजने अंतर्गत घर दुरुस्तीची योजना राबविणे बाबत प्रस्ताव मंजुर झालेला होता. त्यामध्ये नजरचुकीने मो. राहुलनगर व सादातनगर या झोपडपट्टीचा समावेश करण्यात यावा व इतर दुरुस्तीसह दि. २१/४/९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त आणि दि. २०/६/९२ रोजीची पुढे ढकलण्यात आलेली सभा दि. २४/६/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त काय करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४/२ :** दिनांक २८/५/९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र. ३ नुसार सध्याची पाणी टंचाई लक्षात घेता शहर व सिडको भागात नवीन ७५ विंधन विहीरी (बोअरवेल्स) खोदण्यासाठी रु. २५,००,०००/- (रुपये पंचवीस लाख) च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच वरील काम मागच्या वषी ज्या एजन्सी मार्फत विंधन विहीरचे काम करुन घेतले होते त्यांचेकडून काम करुन घेण्यात यावे, जेणेकरुन काम लवकर होईल असे सर्वानुमते ठरले. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

**<u>संवाद</u>**

डॉ. शांताराम काळे : सदरील विषयावर सविस्तर चर्चा झाल्याशिवाय मंजुर करु नये.

मा. महापौर : ठिक आहे. १० मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यात येते.
(अंदाजे वेळ १२.२५ वा)
(सभेला सुरुवात अंदाजे १२.३० वा)

मा. महापौर : आता विषय क्र. दोन वर चर्चा व्हावी.

डॉ. शांताराम काळे : या वर्षीच्या बोरींग घेणेसाठी अंदाजपत्रकात किती बजेट होते? त्या बजेटला अनुसरुन आज जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यास धरुन आहे किंवा नाही याची माहिती द्यावी. कारण गेल्या चार वर्षापासुन आमच्या विविध वार्डातील समस्यांचा प्रश्न आहे. तो सोडविणे आवश्यक आहे. यासाठी दरवर्षी पाणी पुरवठाविभागातर्फे शहरात किती बोरींग घेतल्या जातत त्याची अंदाज पत्रकासहीत माहिती आणि घेतलेल्या बोरींग पैकी किती सध्या कार्यान्वीत आहेत आणि किती नादुरुस्त आहेत याची माहिती द्यावी.

श्री. तकी हसन खान : माझ्या माहितीप्रमाणे दरवर्षी ७० लाख रु. चे अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली होती पैकी ६१ लाख रु. खर्च करण्यात आलेले आहेत आता शिल्लक फक्त ९ लाख रु. आहेत तेव्हा सदरचा प्रस्ताव रु. २५ लाखाचा असुन हे पैसे आणावयाचे कुठून याची माहिती द्यावी.

डॉ. शांताराम काळे : सदरचा प्रश्न मी अधिकाऱ्यांना विचारलेला आहे.

श्री. तकी हसनखान : या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रु. २५ लाखाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. तसेच वरील काम मागील वर्षीच्या एजन्सी मार्फत करुन घेण्यात येईल. म्हणजे एक तर पैसे शिल्लक नाहीत आणि दुसरे जर शासनाकडून जादा अनुदान वगैरे आलेले आहे काय? याची तरतुद आपण कशी करणार जर अनुदान आल्यास कोणत्याही नवीन कामाचे टेंडर कॉल केल्या जाते ते नियमाप्रमाणे प्रोसिजर होते. परंतु टेंडर कॉल न करता रु. २५ लाखाचे काम आपण हाती घेणे नियमाच्या बाहेर आहे.

श्री. अलफखॉ हुसेनखाँ : संबंधीत प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने आलेले आहे काय? जर आलेले असल्यास प्रशासन असे लिहिते की, रु. २५ लाखाचे अंदाजपत्रक आहे. अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार किती खर्च झाला व किती शिल्लक आहे तशी माहिती प्रशासनाने लिहिली काय याची माहिती द्यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर: आपल्या सभेत संबंधीत अधिकारी जसे गैरहजर आहेत तीच परिस्थिती स्थायी समिती सभेत ज्यावेळी हा प्रस्ताव आला त्यावेळेसची होती. यामुळे आम्ही निषेध म्हणून सभात्याग केलेला होता. व प्रस्ताव स्थगित ठेवावे असे सुचित केलेले होते.

श्री. अविनाश कुमावत : रु. २५ लाखाचे काम होत असेल आणि अनुदान जर शासनाकडून मिळत असल्यास स. सदस्य श्री. तकी हसन यांनी सुचित केल्याप्रमाणे नियमाप्रमाणे टेंडर कॉल करुन कार्यवाही व्हावी.

श्री. अजिजुल्ला बेग : सर्वसाधारण सभेत प्रस्ताव आलेला आहे. अंदाजपत्रकास मंजुरी देणेसाठी आणि टेंडर कॉल करुन कोणती एजन्सी फिक्स करुन काम करायचे ते काम स्थायी समितीचे आहे. आपण यामध्ये अंदाजपत्रकास मंजुरी द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : सदरचा प्रस्ताव प्रशासनातर्फे मांडण्यात आलेला आहे काय? जर प्रशासनाने मांडलेला असेल तर या कामासाठी किती खर्च करण्याची तरतुद आहे ते दर्शविले असेल आणि जर तरतुद नसल्यास आपण रु. २५ लाख कोठून आणणार याची माहिती द्यावी. दुसरे असे की, कोणतेही नवीन काम करावयाचे असल्यास ते नियमाप्रमाणे टेंडर कॉल करुन घेणे आवश्यक असते.

मा. महापौर : स. सदस्यांची सुचना लक्षात घेता असे लक्षात येते की, मागील सभेमध्ये बऱ्याचशा सदस्यांनी पाणी पुरवठा बाबत चर्चा केलेली होती. पाण्याचा प्रश्न ज्वलंत आहे यासाठी बोरींग घेणे हे स. सदस्यांच्याच सुचनेनुसार विषय आलेला आहे. आणि आत प्रस्ताव आला तर त्यावर चर्चा होत आहे.

श्री. नरेंद्र पाटील : या प्रस्तावात वरील काम मागच्या वर्षी ज्या एजन्सीमार्फत करुन घेतले त्यांचकडून करुन घेण्यात यावे असे लिहिलेले असल्याने यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

श्री. तकी हसनखान : यापुर्वी रु. ५ लाखाचे बोरींग काम करण्याचा प्रस्ताव होता. ते काम करुन घेण्यात यावे.

श्री. एकबालसिंग गिल : मागील सर्वसाधारण सभेमध्ये शहरातील पाण्याच्या प्रश्नबाबत बरीच चर्चा झालेली होती त्यामध्ये बऱ्याचशा सदस्यांनी आपआपल्या वार्डात बोरींग व स्टडपोस्ट घेण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या. त्यप्रमाणे लिस्ट तयार करण्यात आलेली होती आणि याबाबत काही स. सदस्यांचे पत्रही आलेले आहे. तेव्हा लिस्टवरुन रु. २५ लाख खर्च अपेक्षित धरलेला आहे. अंदाजपत्रकास मंजुरी देवून एजन्सीबाबत शब्द इतिवृत्तातुन वगळण्यात यावा व प्रस्तावास मंजुरी देण्याचा विचार व्हावा.

श्री. शंकर मगर,

श्री. शांताराम काळे: विविध वार्डामध्ये बोरींग घेण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी किती चालु आहेत याची माहिती द्यावी बऱ्याचशा बोरीग चालू अवस्थेत नाहीत हे दिसून येते. केवळ पाण्याच्या नावाने अंदाजपत्रकास मंजुरी मिळवण्यापेक्षा तो खर्च त्याच कामासाठी केला जातो काय? याची पडताळणी करणे आवश्यक आहे.

मा. महापौर : स. सदस्यांच्य सुचना लक्षात घेता संबंधीत एजन्सी मार्फत करुन घेण्याबाबत इतिवृत्तातुन वगळून रु. २५ लाखाचे प्रस्तावास मंजुरी देण्यात यावे.

श्री. शांताराम काळे :

श्री. तकी हसनखान : रु. २५ लाख कोणत्या अनुदानातुन खर्च करणार हे या प्रस्तावात दर्शविणे आवश्यक आहे.

मा. महापौर : एजन्सी वगळून प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

डॉ. शांताराम काळे

श्री. तकी हसनखान : अंदाजपत्रकात रु. २५ लाखाची तरतुद आहे काय? याची माहिती द्यावी तरच प्रस्ताव मंजुर व्हावा. अन्यथा या प्रस्तावास आमचा विरोध आहे याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

मा. महापौर : विरोधाची नोंद घेण्यात आलेली आहे आणि आता प्रस्ताव मंजुर करण्याचा निर्णय देण्यात आला आहे.

**ठराव क्र. ४२/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. २८/५/९२ च्या स्थायी समिती सभेचा ठराव क्र. ३ नुसार सध्याची पाणी टंचाई लक्षात घेता शहर व सिडको भागात नवीन ७५ विंधन

विहरी (बोअरवेल) खोदण्यासाठी रु. २५ लाखाच्या अंदाजपत्रकास सन १९९२-९३ मधुन खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५/३ :** (अ) मुल्य निर्धारण अधिकारी २ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घोषित झोपडपट्टी मध्ये पी.आर. कार्ड टोच नकाशा, रजिस्टर्ड खरेदीखत अभावी नामांतर करता येत नाही.

शासनाचे पत्र क्र. एस.सी.एस. १०८८/सी.आर. १९३५/का-७ गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई-३२ दि. २६/५/१९८८ अन्वये श्रेणीवाढ योजनेत समाविष्ट झालेल्या किंवा होणाऱ्या गणना झालेल्या व अनधिकृत झोपड्यांचे हसतांतरण (निवासी व अनिवासी झोपड्या) झाले असल्यास सदर हस्तांतर कायदेशीर (नियमीत) करण्याच्या दृष्टिने खालील प्रमाणे हस्तांतरण (तबदील) शुल्क आकारण्यात यावा.

१) केवळ निवासी वापरासाठी असलेल्या झोपडीचा हस्तांतराकरीता किंवा अनधिकृत रहिवासी नियमित करण्याकरीता रु. ५००.००

२) ज्या झोपड्याचा वापर हा निवासी कारणासाठी व अंशतः दैनंदिन जिवनाशी निगडीत असलेल्या अनिवासी, कमर्शियल कारणासाठी उदा. धान्य दुकान, गिरणी, भाजीपाल्याची दुकाने व छोटे हॉटेल इत्यादीसाठी होत असेल तर रु. १०००/-

३) अनिवासी, कमर्शियल कारणासाठी संपुर्णपणे वापर होत असलेल्या झोपड्याकरिता रुपये २५००/-

तसेच ज्या झोपड्या श्राणीवाढ योजनेत समाविष्ट नाहीत त्यांचेबाबत इ

१) निवासी वापर झोपडीस रुपये ५०००/-

२) अनिवासी झोपडीस रुपये १००००/-

दिनांक १७/३/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. १२५/२ च्या निर्णयाप्रमाणे शासकीय परिपत्रकाच्या प्रति दि. २४/६/९२ च्या सर्वसाधारण सभेत सर्व स. सभासदांना वितरीत करण्यात आले आहे. या परिपत्रकानुसार प्रस्ताव विचारार्थ सादर.

(ब) दिनांक १/६/९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र. ९ अन्वये मुल्य निर्धारण अधिकारी २ यांनी प्रस्ताव सादर केला की, मुंबई प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण (कराधीन नियम २ चे पोटनियम (३) मध्ये मालकी हक्काचे नामांतरासंबंधी असा उल्लेख आहे की, अशी नोटीस ज्या जागेसंबंधी असेल त्या जागेच्या बाबतीत नोटीसच्या तारखेस देय असलेला मालमत्ता कर भ्रण्यात आला नसेल तर आणि स्थायी समितीची नोटीस वेळोवेळी विहित करेल अशी फी भरण्यात आली नसेल तर अशी कोणतीही नोटीस कायदेशिररीत्या देण्यात आली आहे. असे मानले जाणार नाही. पैकी नोटीसच्या तारखेपर्यंत देय असलेला मलामत्ता करण् भरल्यानंतर व खालीलप्रमाणे नामांतर शुल्क वसुल केल्यानंतर नामांतर करण्याची पध्दत आपल्या कार्यालयात आहे.

१) रुपये १५/- शहर भुमापन कार्यालयात नामांतराची नोंद झाल्या तारखेपासून आपल्या कार्यालयात नामांतरासाठी तीन महन्याचे आत कार्यवाही दाखल केलेल्या प्रकरणासाठी.

२) रुपये २०/- तीन महिन्याचे नंतर दाखल केलेल्याप्रकरणासाठी वरील दर हे दि. १/८/८७ पासुन अंमलात आले आहेत. महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडण्यासाठी खालीलप्रमाणे नामांतर शुल्क प्रस्तावित आहे.

| | |
|---|---|
| १) करयोग्य मुल्य रुपये ५०० पर्यंत - | रुपये ५०.०० |
| २) करयोग्य मुल्य रुपये ५०० ते ५००० पर्यंत | रुपये १००.०० |
| ३) करयोग्य मुल्य रुपये ५००० ते ५०००० पर्यंत | रुपये २००.०० |

४) करयोग्य मुल्य रुपये ५०००० ते १००००० पर्यंत रुपये १००.००
२) करयोग्य मुल्य रुपये १००००० व त्यापुढे रुपये १००.००

या प्रस्तावावर स्थयी समितीने खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडण्याच्या दृष्टिने खालीलप्रमाणेनामांतर शुल्क आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) करयोग्य मुल्य रुपये ५,०००/- पर्यंत रुपये ५०.००
२) करयोग्य मुल्य ५००१ ते ५०००० पर्यंत रुपये १५०.००
३) करयोग्य मुल्य रुपये ५०००१ व त्यापुढे रुपये ३००.००

वरीलप्रमाणे नामांतर शुल्क आकारतांना शहर भुमापन कार्यालयात नामांतराची नोंद झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्याचे नंतर दाखल झालेल्या प्रकरणासाठी अ.क्र. १ ते ३ मधील करयोग्य मुल्यासाठी प्रत्येकी दुप्पट या दराने नामांतर शुल्क आकारण्यात सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

**<u>संवाद</u>**

श्री. अजिजुल्ला बेग : प्रस्तावात मुंबई प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कराधीन नियम २ चे पोटकलम (३) मध्ये मालकी हक्काचे नामांतरासंबंधी असा उल्लेख आहे की, अशी नोटीस ज्या संबंधी असेल त्या जागेच्या बाबतीत नोटीसच्या तारखेस देय असलेला मालमत्ता कर भरण्यात आला नसेल तर आणि स्थायी समितीची नोटीस वेळोवेळी स्विकारण्यासाठी विहित करेल अशी फि भरण्यात आली नसेल तर अशी कोणतीही नोटीस कायदेशीररित्या देण्यात आली आहे, असे मानले जाणार नाही अशी दुरुस्ती व्हावी.

मा. महापौर : ठिक आहे. नोंद व्हावी

श्री. अलफाखाँ हसेनखॉ : हा प्रस्ताव पॉलीसी मॅटरचा असल्याने यावर अभ्यासपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. ज्यामध्ये विधी सल्लागार यांनी पउताळणी करुनच पुढील बैठकीत ठेवावा.

मा. महापौर : मा उप आयुक्त यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त : या प्रस्तावातील "अ" व "ब" साठी प्रशासनातर्फे विनंती आहे की, तो मान्य करण्यासाठी हरकत नसावी कारण ज्या झोपडपट्ट्या आपल्याकडे आलेल्या आहेत, त्या शासनाच्या एका परिपत्रकाप्रमाणे आपण रेग्युलराईज्ड साठी प्रस्ताव मांडलेला आहे आणि शासनाने आपल्याकडे परिपत्रक पाठवुन मुंबई महानगरपालिकेमध्ये जी पध्दती आहे तेवढी फीस आकारुन झोपडपट्टी रेग्युलराईज्ड करता येते. त्याच धर्तीवर या ठिकाणी करण्यास हरकत नसावी. परंतु "ब" बद्दल असे आहे की, स्थायी समितीमध्ये सदरचा विषय दर वाढण्या अधिकृत बाबींची या ठिकाणी पडताळणी होणे आवश्यक आहे. त्या दृष्टिने यामध्ये सब रजिष्ट्रार कडून ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्टखाली पैसे मिळतात ते आणि आपण वसुल केलेले पैसे डबल टॅक्सेशन होऊ नये या दृष्टिने प्रशासनाच्या वतीने परत एकदा तपासण्याची आवश्यकता आहे तेव्हा स. सदस्य श्री. अलफखान यांनी

सुचित केल्याप्रमाणे नागरीकांकडून डबल टॅक्स वसुल होऊ नये या दृष्टिने तपासणी करण्यासाठी प्रस्ताव "ब" मध्ये दुरस्ती करणे आवश्यक असून काही दुरुस्तीसाठी प्रस्ताव "ब" स्थगीत ठेवावा व "अ" प्रस्तावास मान्यता द्यावी.

श्री. अजिजुल्ला बेग : प्रस्तावामध्ये "अ" व "ब" नाही. दुरुस्ती प्रस्तावात उल्लेख आहे त्याप्रमाणे "अ" प्रस्तावात अनु.क्र. १ ते ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे झ ाोपडपट्टीतील सर्वसामान्य नागरीक ही फिस भरण्यास तयार होणार नाही. यासाठी निवासी वापरासाठी रु. १००/- तर अनिवासी वापर असल्यास रु. १५०/- अशी नाममात्र फीस आकारण्यात यावी. कारण १रु. चौ.मी. फीस आकारण्यात येईल असा शासनाचा नियम आहे. याबाबतची माहिती द्यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर: बऱ्याचशा झोपडपट्टी घोषित नाहीत त्यामुळे पी.आर. कार्ड नाही. तेव्हा फीसभरल्यानंतर नामांतर करणार काय?

श्री. स. अहमद स. हुसेन : बऱ्याचशा झोपडपट्टी तील नागरिकांना घराचे नामांतर करण्याच्या संदर्भात कल्पना नाही तर या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे याची अंमलबजावणी १९८७ पासून करणार की प्रस्ताव मंजुर झालेल्या तारखेपासुन करणार याची माहिती द्यावी.

मा. महापौर : याबाबत कर मुल्य निर्धारण अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री. शंकर मगर: यापुर्वी स. सदस्य श्री. महादेव सुर्यवंशी आणि मी मिळून प्रस्ताव मांडलेला होता. स्लम भाग हा अनधिकृत असून रु. ५ च्या बाँडवर जमिनीची रजिष्ट्री करुन घर बांधकाम करण्यात आलेले आहे. परंतु सुरुवातीच्या मालकाने जर ती जागा किंवा घर संबंधित १ ल्या व्यक्तीने दुसऱ्याला विकली तर टॅक्स हा १ ल्या व्यक्तीच्या नावावर येतो तो भरतोही यासाठी दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर टॅक्स लावून घेणेच्या दृष्टिने नामांतर करण्याबाबत पी.आर. कार्ड व रजिष्ट्री असणे आवश्यक आहे. तर यामध्ये काही सुविधा आहे याची माहिती द्यावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : नव्याने समाविष्ठ झालेले १८ खेडे हे गेले ५० वर्षापासून अस्तित्वात आहे. परंतु त्यांचेकडे नामांतर करण्यासाठी टोच नकाशे व पी.आर. कार्ड नाही, परंतु रु. ५०००/- ही फी जास्त असल्याने यामध्ये बदल करण्यात यावा.

मा. महापौर : याबाबत संबंधित अधिकारी खुलासा करतील.

कर निर्धारण अधिकारी : झोपडपट्टीच्या बाबतीत आपल्याकडे बऱ्याच ठिकाणी पी.आर. कार्ड, टोचनकाशा किंवा रजिष्टर खरेदीखत पण नसते आणि फक्त बाँडपेपरवर काही तरी खरेदी केल्याचे असते. त्याची कुठेही नोंद नसते. त्यामुळे आपल्याला झोपडपट्टीमध्ये नामांतर करावयाचे असेल तर अडचणी निर्माण व्हायची त्यासाठी शासनाचे जे जी.आर. आहेत मागील सर्वसाधारण सभेमध्ये सर्व स. सदस्यांना वाटप करण्यात आलेली आहे आणि यामध्ये ट्रान्सफार ऑफ प्रॅापर्टीसाठी की जेथे पीआर कार्ड नाही टोचनकाशा नाही घोषित झोपडपट्टी आहे म्हणजे शासनाने जे जीआर मध्ये दर दिलेले आहे तेच या ठिकाणी दर्शविलेले आहे तरीही आपणास दरामध्ये काही बदल करावयाचा झाल्यास ते यामध्ये मंजुरी घेऊन शासनास कळवावे लागेल.

श्री. अलफखॉंन हुसैनखान : शासनाचे जे दराबाबत जी. आर. आहेत ते मुंबई, पुणे नागपूर सारख्या मोठ्या शहरासाठी आहे. औरंगाबाद हे शहर हे त्या मानाने लहान

आहे. आणि या ठिकाणी झोपडपट्ट्या जास्त आहेत. यासाठी दिलेले दर हे परवडणार नसून आपल्याला सर्वसंमतीने सभागृहात दर कमी करणे बाबत प्रस्ताव मंजुर करुन पाठविणे योग्य राहील.

श्री. महादेव सुर्यवंशी : माझ्या वार्डातील डॉ. आंबेडकर नगर या भागात बाँडवर जागा/घरे विकत घेतलेली आहेत. त्यांचेकडे गेल्या दोन वर्षापासून टॅक्स लावण्यात आलेला आहे व ते भरीत आहेत. परंतु रजिष्ट्री, पी.आर. कार्ड काहीही नसून नामांतर करावयास लागणारा खर्च रु. ५०००/- जास्त असून रु. ३०००/- करुन शासनाकडे पाठविण्यात यावा.

मा. महपौर : या प्रस्तावात दिलेला दर कमी करावयाचा असल्यास ते तसे सुचवावे.

श्री. अजिजुल्ला बेग : या प्रस्तावात जे दर प्रस्थापित केलेले आहेत ते श्रेणीवाढ योजनेत समाविष्ठ असलेल्या व जे श्रेणीवाढ योजनेत नाहीत त्या दोघांचे दरामध्ये पुरक आहे. जे की सरकारी जमिनीवर नसणार तरमाझे असे म्हणणे आहे की या दोघांमध्ये बदल न ठेवता सारखेच दर असावे. त्याकरिता रहिवासी उपयोगासाठी रु. १००/- दर असावे तर आणि रहिवासी व कमर्शियल त्यांचेसाठी रु. २००/- ठेवावे.

श्री. शंकर मगर: प्रस्तावातील दर कमी जास्त करुन मंजुर करण्यात यावा.

श्री. अजिजुल्ला बेग : त्याचप्रमाणे झोपड्या श्रेणीवाढ योजनेत समाविष्ट नाहीत त्यांचेबाबत

१) निवासी वापर झोपडीस रु. ५०००/- ऐवजी वरीलप्रमाणेचरु. १००/- व २) अनिवासी झोपडीस रु. १००००/- ऐवजी रु. २००/- आकारण्यात यावे.

मा. महापौर : स. सदस्यांच्या सुचनांचा विचार करुन प्रस्तावातील अनुक्रमांक १ नुसार केवळ निवासी वापरासाठी असलेल्या झोपडीचा हस्तांतरा करिता किंवा अनधिकृत रहिवासी नियमीत करण्याकरिता रु. ५००/- ऐवजी रु. १००/- २) ज्या झोपड्याचा वापर हा निवासी करण्यास व अंशतः दैनंदिन जिवनाशी निगडीत असलेल्या अनिवासी, कमर्शियल कारणासाठी उदा. धान्य, दुकान, गिरणी संपुर्ण भाजीपाल्याची दुकान, छोटे हॉटेल इ. साठी होत असेल तर रु. १०००/- एवेजी रु. २००/- ३) अनिवासी कमर्शियल कारणासाठी संपुर्णपणे वापर होत असलेल्या झोपड्या करिता रु. २५०/- ऐवजी रु. २००/-

तसेच ज्या झोपड्या श्रेणीवाढ योजनेत समाविष्ठ नाहीत त्यांचे बाबत १) निवासी वापर झोपडीस रु. ५०००/- ऐवजी रु. १००/- तर २) अनिवासी झोपडीस रु. १००००/- ऐवजी रु. २००/- अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. २५/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विषय क्र. २ मधील दुरुस्त प्रस्ताव "अ" मध्ये शासनाचे निर्णय दि. २६/५/८८ अन्वये श्रेणीवाढ योजनेत समाविश्ठ झालेल्या किंवा होणाऱ्या गणना झालेल्या व अनधिकृत झोपड्याचे हस्तांतरण (निवासी अनिवासी झोपड्या) झाले असल्यास सदर हस्तांतरण कायदेशीर (नियमीत करण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे कायदेशिर हस्तांतरण शुल्क आकारण्यात यावा.

१) केवळ निवासी वापरासाठी असलेल्याझोपडीचा हसतांतरा करिता किंवा अनधिकृत रहिवासी नियमीत करण्याकरिता रु. ५००/- ऐवजी रु. १००/-
२) ज्या झोपड्याचा वापर हा निवासी कारणासाठी व अंशतः दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेल्या अनिवासी कमर्शियल कारणासाठी उदा. धान्य दुकान, गिरणी संपुर्ण भाजिपाल्याची दुकाने व छोटे हॉटेल इ. साठी होत असेल तर रु. १०००/- ऐवजी रु. २००/-
३) अनिवासी कमर्शियल कारणासाठी संपुर्णपणे वापर होत असलेल्या झोपड्या करिता रु.२५००/- ऐवजी रु. २००/-

तसेच ज्या झोपड्या श्रेणीवाढ योजनेत समाविष्ठ नाहीत त्यांचे बाबत.

१) निवासी वापर झोपडीस रु. ५०००/- ऐवजी १००/-
२) अनिवासी झोपडीस रु. १००००/- ऐवजी २००/-

अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी आणि "ब" प्रस्ताव दुरुस्तीसाठी स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. २६/४ :** औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक २०/११/८९ ठराव क्रमांक ४८/३ अन्वये गांधीनगर (पदमपुरा) येथील मंजुर विकास योजनेनुसार न.भु.क्र. १९५९४ ते १९५९७ या मिळकतीच्या हद्दीपर्यंत ४० फुट रस्त्या ऐवजी ३० फुट रुंद रस्ता करण्यासाठी महाराष्ट्र प्रोदशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्याचे ठरविले नुसार दिनांक ५/४/९० रोजी या संबंधित अधिसुचना दैनिक आलमगिर टाईम्स व दैनिक अजिंठा मध्ये प्रसिध्द झाली. तसेच दिनांक २५/७/९२ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र औरंगाबाद विभागीय पुरवणी भाग - १ (अ) वरील पान क्रमांक ४७ वर प्रसिध्द झाली. या संबंधी एकही सुचना वा हरकत आलेल्या नाही. संबंधीतांना सुनावणी देण्यात आली. अशा प्रकारे वरील अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये आवश्यक असलेली कार्यवाही पुर्ण केली असून सदर प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करण्यास्तव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**<u>संवाद</u>**

श्री. गजानन बारवाल : सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला होता. आणि ४० फुट रस्त्याऐवजी ३० फुटाचा रस्ता करण्यासाठी प्रस्ताव ठेवणे योग्य नाही याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

मा. महापौर : याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा झालेली आहे. त्यामुळे सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**ठराव क्र. २६/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ४८/३ दि. २०/११/८९ अन्वये मो. गांधीनगर (पदमपुरा) येथील मंजुर विकास योजनेनुसार नभुक्र. १९५९४ ते १९५९७ या मिळकतीच्या हद्दीपर्यंत ४० फुट रस्त्याऐवजी ३० फुट रसता करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्याचे ठरविले व महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात दि. २५/७/९१ रोजी काही सुचना वा हरकती असल्याचे प्रसिध्दीस देवून सुनावणी करण्यात आली. त्या आधारे एकही सुचना वा हरकत न आल्याने मो. गांधीनगर (पदमपुरा) येथील मंजुर विकास

योजनेनुसार नभुक्र. १९५९४ ते १९५९७ या मिळकतीच्या हद्दीपर्यंत ४० फुट रस्त्याऐवजी ३० फुट रुंद रस्ता फेरबदल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७/५ :** अस्थायी पदाचे स्थायी पदामध्ये रुपांतर करण्यासाठी महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. टीइपी-१०६७/१२१०६/३६४६ पाच दिनांक १५/९२६७ व शासन निर्णय क्र. टीइपी - १०६८/१८६२/६८ पाच दिनांक ६/५/१९६८ अन्वये मान्यता दिली आहे की, ७%ा टक्के पदे एकुण अस्तित्वात असलेल्या पदापैकी ज्यांची तीन वर्षापेक्षा जास्त काळ झालेला आहे ती स्थयी पदामध्ये रुपांतरीत करता येईल. त्यानुसार सध्या महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेली पदे जी पाच वर्षापेक्षा जास्त काळ झालेला आहे, त्याबाबत सविस्तर माहिती खालील तक्त्यानुसार आहे. त्यानुसार अस्थायी पदाचे स्थायी पदांमध्ये रुपातर करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | ८०% प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १) | मुख्य लिपीक, जेष्ठ लेखा परिक्षक सहाय्यक जकात अधिक्षक | ८ | ६ | ५ |
| २) | कनिष्ठ अभियंता | ५५ | ४९ | ४० |
| ३) | समुदाय संघटक | ४ | ४ | ३ |
| ४) | वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक | ८ | ७ | ६ |
| ५) | स्वच्छता निरीक्षक | १८ | १७ | १४ |
| ६) | वरिष्ठ लिपीक, कर निरीक्षक, उप लेखापाल, अंतर्गत लेखा परिक्षक, जकात निरीक्षक सहा. लेखा परिक्षक रोखपाल | ७१ | ७० | ५६ |
| ७) | लघुटंकलेखक | ३ | ३ | २ |
| ८) | सुरक्षा अधिकारी | १ | १ | १ |
| ९) | दुय्यम आपेक्षक, इमारत निरीक्षक, तंत्र सहाय्यक | ६० | ४७ | ३८ |
| १०) | मेकॅनिक | ३ | २ | १ |
| ११) | कृषी सहाय्यक | ३ | ३ | २ |
| १२) | सहा. ग्रंथपाल | १ | १ | १ |
| १३) | ए.एन.एम. | ३६ | २२ | १८/६ (ए.एन.एम. जी.प. कडून प्रतिनियुक्तीने आहेत.) |
| १४) | मिश्रक | ९ | ८ | ६ |
| १५) | को. ऑडीनेटर | १ | १ | १ |
| १६) | ऑटो इलेक्ट्रीशियन | १ | १ | १ |
| १७) | शारिरिक शिक्षक | १० | ९ | ७ |
| १८) | शिवणकला शिक्षिका | ४ | ३ | २ |
| १९) | लिपीक/रोडकारकुन/नाका | २३६ | २२६ | १८५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कारकुन/टंकलेखक | | | |
| २०) | टेलिफोन ऑपरेटर | ५ | ४ | ३ |
| २१) | अनुरेखक | १७ | १६ | १३ |
| २२) | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १ | १ | १ |
| २३) | एस.फ.डब्ल्यु. इन्सपेक्टर कलेक्टर | १७ | १६ | १३ |
| २४) | लसटोचक | ८ | ६ | ५ |
| २५) | एम.पी.डब्ल्यु. | २५ | २५ | २० |
| २६) | जनसंपर्क अधिकारी | १ | १ | १ |
| २७) | रचना सहाय्यक | २ | २ | १ |
| २८) | पी.एच.एन. | ४ | ३ | २ (एक पद प्रतिनियुक्तीने |
| २९) | अग्निशमन अधिकारी | १ | १ | १ |
| ३०) | लिडींग फायरमन | ३ | ३ | २ |
| ३१) | फायरमन | १८ | १६ | १३ |

प्रस्ताव मंजुरीस्तव विचरार्थ सादर.

**<u>संवाद</u>**

श्री. अजिजुल्ला बेग : या प्रस्तावाशी संदर्भीत मला असे सांगावयाचे आहे की, शासनाकडील परिपत्रके महानगरपालिकेस येतात ती पत्रके सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे नियमानुसार आवश्यक आहे. त्याचप्रमाणे यामध्ये जी ८० टक्के पदे अस्तित्वात असलेल्या पदापैकी ज्यांची तीन वर्षापेक्षा जास्त काळ झालेला आहे ती स्थायी पदांमध्ये रुपांतरीत करता येईल. परंतु सध्या मनपा मध्ये अस्तित्वात असलेली पदे जी पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे अशी पदे म्हणजे या दोहोंमध्ये दोन वर्षाची तफावत आहे. ती का आहे याची माहिती द्यावी. त्याचप्रमाणे वर्ग - ३ व वर्ग - ४ चे पदांचे बाबतीत कायम करण्यासाठी यामध्ये जास्तीचे दिसत नाहीत. आणि या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकुण मंजुर पदामधून प्रत्येक ठिकाणी भरण्यात आलेली पदे एक किंवा दोन कमीच आहेत याचे कारण काय? याबाबत माहिती द्यावी.

श्री. अलफखाँ हुसेनखान : स. सदस्य श्री. अजिजुल्ला बेग यांनी सुचित केल्याप्रमाणे मनपाचे नियमानुसार शासनाकडील जी परिपत्रके, जी.आर. आणि इतर महत्वाचे कार्यालयीन पत्रे मनपास येतात त्या सर्वांची मनपाला माहिती देणे आवश्यक आहे आणि जर माहिती देत नसाल तर नियम ३ या नियमावलीतुन वगळण्यात यावे बाकी इतर मनपाध्ये सर्व माहिती प्रशासनातर्फे दिली जाते परंतु याच ठिकाणी दिल्या जात नाही ही बाब खेदाची आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर: प्रस्तावातील कनिष्ठ अभियंता व रचना सहाय्यक या दोन पदामध्ये फरक काय आहे याची माहिती द्यावी आणि आस्थापनातर्फे जेष्ठता यादी किती वेळा तयार केली जाते याची माहिती द्यावी.

मा. महापौर : ठिक आहे. मा. उप आयुक्तांना विनंती की, त्यांनी माहिती द्यावी.

मा. उप आयुक्त : आपल्या मनपामध्ये एकुण मंजुर पदे आहेत यामधील ८०% पदे त्या कायम यासाठी करावयाच्या आहेत की, उद्या काही कर्मचारी पेन्शनवर जातात आणि पेन्शनवर जाण्यापुर्वी सुध्दा त्यांना कायम करण्यात येत नाही. कारण कायम पदे जी आहेत, एखाद्या कर्मचाऱ्याला कायम झाल्याच्या सवलती (benefit) द्यावयाचा झाल्यास त्याला (confirmation) कायम करावे लागते आपण जर ८०% कर्मचारी/अधिकारी कायम केले तर त्यांच्या पेन्शनमध्ये कोणताही अडथळा राहणार नाही. आता काही रिटायर्डला आलेल्या पेन्शनवर कर्मचाऱ्यांना आता कायम करण्यात आलेले आहे. अशी काही उदा. आहेत. म्हणून आपण ८० टक्के पदे कायम करण्यासाठी हा प्रसताव ठेवण्यात आलेला आहे. दुसरा मघा स. सदस्य श्री. अलफखान यांनी उपस्थित केल्यप्रमाणे जी.आर. वगैरेची माहिती देत नाहीत. तेव्हा या प्रस्तावाच्या संदर्भात जुना जी.आर. सन १९६८ चा आहे. तो सभागृहासमोर आला असेल म्हणून दाखल झाला नाही. जर आपली इच्छा असेल तर त्या जी.आरच्या प्रति सर्व स. सदस्यांना देण्यात येतील. तिसरा मुद्दा स. सदस्य श्री. अजिजुल्ला बेग यांनी उपस्थित केल्यानुसार यामध्ये काही पदे जास्तीची मंजुर आहेत. परंतु भरलेली पदे कमी आहेत ही भरलेली पदे यामध्ये एन.टी., व्ही.जे.एन.टी. वर्गासाठीची पदे असल्याने त्या पदावर योग्य व्यक्ती उपलब्ध न झाल्याने पदे रिकामी राहिलेली आहेत. तर काही पदांची भरती करण्यासाठी कार्यवाही चालू आहे. काही रिटायर्ड कर्मचारी झालेले असतील त्यामुळे मंजुर पदापेक्षा कमी पदे भरलेली आपणास दिसतील. परंतु मंजुर पदापेक्षा भरलेली पदे जास्त असावीत असे होता कामा नये. अशी परिस्थिती या ठिकाणी नाही. त्यामुळे आक्षेप घेण्याचा प्रश्न नाही. सदरील पदे भरता येतील. चौथा मुद्दा जेष्ठता सुचीबद्दल तेव्हा ही जेष्ठता सुची जी आहे ती तात्पुरती कर्मचारी/अधिकारी वर्गाची तयार करतो आणि त्या यादीवर आक्षेप बोलाविल्या जातात. मग त्यामध्ये सर्व कर्मचारी/अधिकारी किंवा संघटना असो त्या सर्वांचे आक्षेप घेऊन त्यांचे मत लक्षात घेऊन त्यांच्या समोर सुनावणी करुन ती यादी केली जाते. माझ्या माहितीप्रमाणे बहुतेक पदाची जेष्ठता सुची तयार करण्यात आलेली आहे. आता पुढील कार्यवाही म्हणून सदरचा प्रस्ताव आपल्या समोर ठेवण्यात आलेला आहे. यावर योग्य तो निर्णय व्हावा.

सौ. लता दलाल : पद नं. २ कनिष्ठ अभियंता व पद नं. १७ रचना सहाय्यक या दोघांमध्ये काही फरक आहे काय हे सांगावे.

श्री. मुजीब अलमशा खान : उप आयुक्तांनी आज जी माहिती दिली ती योग्य आहे. परंतु अलीकडे आपल्या मनपामध्ये ज्या मुलाखती घेतल्या जात आहेत. त्या मुलाखतीसाठी खालच्या कर्मचारी १० व वरिष्ठ अधिकारी २० असा प्रकार होत असल्याचे सर्वत्र चर्चा आहे. याबाबत योग्य ती माहिती द्यावी.

मा. महापौर : स. सदस्य आपण अशा प्रकारची विचारणा करणे योग्य वाटत नाही. आपण विषयांतर करु नये.

श्री. मुजिब आलमशा खान : असे प्रकार करणे म्हणजे मनपाची बदनामी करणे होय. स. सदस्याची बदनामी होते यासाठी आपण खुलासा करावा.

श्री. अलफखान हुसेनखान : मा. उप आयुक्त यांनी जो खुलासा केला की, कर्मचाऱ्यांचे पेन्शन व इतर सवलतीसाठी हा प्रस्ताव होता. याबाबत जर अगोदर सर्व स.

सदस्यांना माहिती दिली असती तर ही जास्तीची चर्चा होणार नाही. त्यामुळे मंजुर करणे सोयीस्कर होईल.

श्री. गजानन बारवाल,

श्री. सुदाम वाघमारे : कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीबाबत स्थायी समितीमध्ये विचारणा केली परंतु योग्य ते उत्तर संबंधित अधिकारी देवू शकले नाही.

श्री. धनंजय गंगाखेडकर : एकीकडे गेल्या चार पाच वर्षांपासून काम करणारे कर्मचारी आहेत त्यांना आता कुठे कायम करीत आहोत आणि दुसरीकडे आपण मनपामध्ये भरती करण्याच्या बाबतीत सत्र चालू केलेले आहे. पाच सहा पदासाठी अनेकांना मुलाखतीसाठी बोलावले जातात तर या कर्मचाऱ्यांना कायम केले जात नाही. ही जी नवीन भरती होत आहे. अद्याप मनपाची आर्थिक बाजु कमकुवत असून इतर विभागातील बजेट संपलेले असूनही आपण भरतीसाठी का बोलावणे करतो याची माहिती द्यावी.

मा. उप आयुक्त : सध्या ती भरती चालू आहे यामधील मंजुर पदापैकी जे रिक्त पदे आहेत त्यानुसार भरण्याची कार्यवाही होते. त्यामुळे नवीन पदाची मंजुरी घेऊन होत नसुन पुर्वीचीच मंजुर पदे रिक्त असलेली व आवश्यकता असणारी भरली जात आहेत.

सौ. लता दलाल,

श्री. सुदाम वाघमारे : रचना सहाय्यक व कनिष्ठ अभियंता ही पदे वेगळी आहे काय याची माहिती द्यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

सहाय्यक आयुक्त : स. सदस्यांची उपस्थित प्रश्न केल्याप्रमाणे कनिष्ठ अभियंता व रचना सहाय्यक ही दोन्हीही पदे वेगवेगळी आहेत. या पदाबाबत एकत्र करण्यासाठी कार्यवाही चालू आहे. जर एकत्रीत दोन्हीही पदे केली तर कार्यालयीन अंतर्गत बदली करता येऊ शकते.

सौ. लता दलाल : ड्रेनेज विभागातील कनिष्ठ अभियंता यांना नगर रचना वभाग रचना सहाय्यक म्हणून कोणत्या नियमानुसार बसविण्यात आले.

सहाय्यक आयुक्त : दोन पदे नगररचना कार म्हणून आहेत बाकी इतर कनिष्ठ अभियंता म्हणून काम करणारे कर्मचारी आहेत.

सौ. लता दलाल : या दोन्हीही पदाची शैक्षणिक पात्रता काय आहे. याची माहिती द्यावी जोपर्यंत खुलासा मिळत नाही तोपर्यंत प्रस्ताव मंजुर करु नये.

श्री. सुदाम वाघमारे : कनिष्ठ अभियंता व नगर रचनाकार या पदामधुन कनिष्ठ अभियंता पदोन्नतीने नगर रचनाकार हे पद मिळणे आवश्यक आहे.

सौ. लता दलाल : संबंधित अधिकारी माहिती योग्य रित्या देत नाही. स. सदस्यांच्या डोळ्यात धुळ टाकण्याचा प्रकार सध्या प्रशासन करीत आहे. असा माझा स्पष्ट आरोप आहे.

श्री. अजिजुल्ला बेग : जी पदे नव्याने भरल्या जाणार आहेत त्या पदाबाबत वेतन, भत्ते आणि इतर फायदे संदर्भात स्थायी समितीची मंजुरी घेतली आहे काय? त्या नियमाप्रमाणे वेळोवेळी स्थायी समितीच मंजुरी घेणे आवश्यक आहे.

मा. महापौर : या प्रस्तावात काय दुरुस्ती करावयाची त्यावर चर्चा व्हावी.

श्री. धनंजय गंगाखेडकर : पद निहाय कर्मचाऱ्यांचे नावासहीत प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

श्री. गिरजाराम हाळनोर: सदरचा प्रस्ताव योग्य पध्दतीने आलेला नाही.

श्री. शंकर मगर,
श्री. बडू प्रधार : सदरचा प्रस्ताव प्रशासनातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचा असल्याने मंजुर करण्यास हरकत नाही.
मा. महापौर : ठिक आहे. प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.
सौ. लता दलाल : या प्रस्तावास माझा विरोध आहे.
मा. महापौर : नोंद घ्यावी.

**ठराव क्र.२७/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अस्थायी पदाचे स्थायी पदामध्ये रुपांतर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे निर्णय क्र. टीईपी-१०६७/१२१०६/३६४६-पाच दिनांक १५/९/६७ व शासन निर्णय क्र. टीईपी-१०६८/१८६२/६८-पाच दिनांक ६/५/६८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार ८० टक्के पदे एकुण अस्तित्वात असलेल्या पदापैकी तीन वर्षापेक्षा जास्त काळ झालेला आहे. ती पदे स्थायी पदामध्ये रुपांतर करणे आवश्यक असून त्यानुसार महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेली पदे जी पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे त्या अस्थायी पदाचे स्थायी पदामध्ये सोबतच्या तक्त्यात दिलेल्या पदानुसार रुपांतर करण्यासाठीच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८/६ :** औरंगाबाद महानगरपालिकेसाठी सीडको पोलीस स्टेशन समोरील सुमारे ७३ हेक्टर जागेत कृषि उत्पन्न बाजार समितीसाठी मंजुर केलेल्या रेखांकनात १०.०० हेक्टर जागा वाहतुक नगरसाठी प्रस्तावित कलेली आहे. ही जागा जाधववाडी येथील स.न. ५ (भाग), स.न. १६ (भाग) व हर्सुल येथील सर्वे नं. १३५ (भाग) ते १३७ (भाग) पैकी आहे. ही जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही चालु आहे.
शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई मा. सचिव, यांनी औरंगाबाद येथे पिसादेवी रस्त्याला नव्याने विकसित होत असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापारी संकुलालगत वाहतुक नगर साठी जागा आरक्षित करावी नियोजित २४ मी. रुंद रस्ता वाहतुक नगरसाठी अपुरा पडत असल्याने त्यास ४५ मी. रुंद करावा तसेच नॉन कन्फर्मींग इंडस्ट्रीजचे क्षेत्र कमी करुन ट्रान्सपोर्ट नगर मध्ये सामील करावे इत्यादी गौण फेरबदल त्यांचे दि. ९/१०/९१ चे अर्धशासकीय पत्रान्वये कळविले आहे.

प्रकरणी मा. उपसंचालक, नगर रचना औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा तयार करून पुढील वैधानिक कार्यवाहीसाठी पाठविला आहे. प्रकरणी खालील प्रमाणे गौण फेरबदल प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) स.न. १९२,१९३ पासुन पुढे पिसादेवी रस्त्यास जोडणारा २४.०० मी. रुंद रस्ता व पिसादेवी रस्त्याचा जंक्शन पासुन हर्सुल वळण रस्त्यापर्यंत ही २४ मी. रुंद विकास योजना रस्त्याची आखणी केलेली आहे. या २४ मी. रुंद रस्त्याच्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे ४५ मी. करणे.
२) कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मिळणाऱ्या जागेच्या उत्तर पुर्व भागात नॉन कन्फर्मींग इन्डस्ट्रीज साठी असलेला काही भाग वाहतुक नगरासाठी ठेवून सुमारे २०.५ हे जागा वाहतुक नगरासाठी ठेवणे.
३) स.न. १९२, १९३ हर्सुल पासून पुढे जाणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेस असलेले स.न. १५४ ते १५६ या जमीनी निवास भागातुन वगळुन आणि आरक्षण क्र. ८ प्राथमिक शाळा आरक्षण क्र. ९ क्रिडांगण आणि ४० फुट रुंद रसत्याच्याआखणीस रद्द करुन संपुर्ण भाग वाणिज्य वापरासाठी आरक्षित करणे.

शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दि. १५/१०/९१ रोजीचे मंजुरी आदेश क्रमांक -३०८८-४५४-सीआर-५९-८८-युडी-१२ अन्वये मंजुर केलेल्या विकास योजनेत वरील प्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करण्यास प्रस्ताव सवसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद**

**श्री. तुळशीराम भगुरे** : सदरचा विषय माझ्या वार्डातील असून मार्केट कमिटीच्या ७३ हेक्टर जमिनीपैकी १० हेक्टर जमिन आपण ट्रान्सपोर्ट नगर साठी घेणार, आधी १० हेक्टर जमीन मार्केट कमिटीमध्ये ट्रान्सपोर्टनगरसाठी घेण्याचा ठराव झाला. त्याच्या आधी ही जमिन हर्सुलच्या गावच्या उत्तर दिशेला ठेवली होती. परंतु ती बदलून इकडे घेण्यात आली. तेव्हा सदरचा प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा.

श्री. चेनकरण संचेती : सदरील प्रस्ताव कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे अंतर्गत असल्याने मला या बाबत कल्पना नाही. तरीही हा प्रस्ताव कमर्शियल बाबत आहे.

श्री. तुळशीराम भगुरे : या प्रस्तावातील अनु. क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे स.नं. १९२, १९३ हर्सुल पासून पुढे जाणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेस असलेले स.नं. १५४, ते १५६ च्या जमिनी निवास भागातुन वगळून आहे. परंतु या भागामध्ये जवळपास १५० घरांची वस्ती आहे. मग कमर्शियल कशासाठी?

श्री. नरेंद्र पाटील : या प्रस्तावातील १ ल्या दोन गोष्टी मान्य कराव्या लागतील कारण कृषी उत्पन्न बाजार समितीला जागा देवून सर्व बस्तान गावाच्या बाहेर असले पाहिजे. पण या प्रस्तावा बरोबर क्र ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे शाळा व क्रिडांगण आणि घरे आहेत तर ती जागा वगळायची मग या लोकांनी कुठे जावे. या जागेबाबत अनधिकृत विक्री जागेची झालेली आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे आरक्षण न करता जशास तसे ठेवण्यात यावे.

श्री. धनंजय गंगाखेडकर : जी २५ एकर जमिन आहे ती मार्केट कमिटीसाठी आहे. आणि म्हणून कमर्शियल साठी आरक्षीत आहे. त्यालालागुनच घरे असलेली झ ोनचा भाग आहे. त्याला वगळून कमर्शियल करण्याचा उद्देश काय?

श्री. चेनकरण संचेती : या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हा भाग कमर्शियल झोन म्हणून आहे.

श्री. तुळशीराम भगुरे : स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे हा भाग जर कमर्शियल आहे तर आरक्षण क्र. ८ व ९ वगळण्याचा प्रश्न का उपस्थित होतो.

श्री. अजिजुल्ला बेग : अनुक्रमांक ३ हा नामंजुर करण्यात यावा.

श्री. केशव सोनवणे : अनुक्रमांक ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे स.नं. १५४ ते १५६ मध्ये जवळपास १५० घरे झालेली आहेत त्यामुळे निवासी भागातून वगळु नये.

मा. महापौर : सदरचा प्रस्ताव प्रशासनाने मांडलेला असून शासनाचे निर्णयानुसार आहे तेव्हा याबाबत सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे.

श्री. तुळशीराम भगुरे : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १० हेक्टर जागा वाहतुक नगरसाठी प्रस्तावित केलेली आहे. मग पुन्हा दुसरीकडे वगळण्याचा मार्ग काय?

श्री. नरेंद्र पाटील : ज्या ठिकाणी शाळा, घरे, वगेरे आहेत तो निवासी भाग असून तो वगळुन बाकीचा भाग कमर्शियलसाठी घ्यावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवावा.

श्री. शांताराम काळे : या प्रस्तावा प्रमाणे एखाद्या प्रायव्हेट एजन्सीला कमर्शियल झ ोन मधुन इंडस्ट्रियश्ल झोन करता येऊ शकते काय याची माहिती द्यावी.

**ठराव क्र. २८/६ :** सदरील प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत ठेवावा.

**विषय क्र. २९/७ :** औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार औरंगपुरा येथील नाथमार्केट व त्यालगतचा भाग आरक्षण क्र. २७९, "दुकान केंद्र" साठी आरक्षित आहे. विकास योजना अहवालाप्रमाणे या आरक्षणात सुमारे १.७५ हे जागा आरक्षित केलेली आहे. या आरक्षणापैकी विद्यमान नाल्या वर काही भागात सुपर मार्केट (नाथ मार्केट) चे महानगरपालिकेने बांधकाम केलेले आहे. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ७३/१० दिनांक ३०/१/९० अन्वये या आरक्षणापैकी औरंगपुरा ते विधी महाविद्यालय या ८० फुट रुंद रस्त्यालगत ४००.०० चौ.मी. जमीन आरक्षणातुन वगळून निवास भागात सामील करण्याचा ठराव मंजुर झाला आहे. त्यानुसार ९/३/९१ रोजी शासनास हा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केला आहे.

जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे कडील प.क्र. ९१/आर.बी. डेस्क - १/जमीन २/४५७ दि. १३/२/९२ अन्वये पत्र पाठवुन विनंती केली आहे की, आरक्षण क्र. २६९ "दुकान केंद्र" पैकी नाल्याच्या जागेवर महसुल कर्मचारी कल्याण संस्था व मराठवाडा महसुल अधिकारी असोसिएशन औरंगाबाद यांना "महसुल भवन" साठी प्रदान करावयाचे ठरविले असल्याने प्रथम ही जागा आरक्षणातुन वगळुन निवास भागात सामील करण्यास विनंती केली आहे.

औरंगपुरा ते विधी महाविद्यालय या ८० फुट रुंद रस्त्यालगत पत्रकार भवनासाठी प्रस्तावित केलेली जागेच्या दक्षिणेस क्षेत्र सुमारे ८५०.०० चौ.मी. सरकारी जागा प्रदान करण्यासाठी व महसुल भवनाच्या बांधकामाच्या वेळी सदर जागेवर उभारण्यात येणाऱ्या वास्तुपैकी ५०% दुकाने महानगरपालिकेला द्यावी लागतील तसेच नाल्याचा प्रवाह सुरळीत राहील यासाठी बांधकाम करतांना आवश्यक ती उपाययोजना करावी लागेल. या अटींवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये वर प्रस्तावित केलेली आरखण क्र. २७९ "दुकान केंद्र" पैकी सुमारे ८५००.०० चौ.मी. जागा निवास भागात सामील करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद**

**मा. महापौर** : प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री. धनंजय गंगाखेडकर** : सदरील प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महसुल कर्मचारी संस्था व अधिकारी असोसिएशनने मागणी केलेल्या जागे संदर्भात यांना जागेची काही कमतरता नसुन मनपाची ८५०.०० चौ. मी. जागा महसुल भवनाला न देता त्याच जागेवर मनपाचे शॉपिंग सेंटर बांधण्याची व्यवस्था व्हावी. यामुळे आर्थिक उत्पन्न वाढु शकेल.

**मा. महापौर** : महसुल भवनास जागा देण्यात येऊ नये. त्याऐवजी सदरील जागेवर मनपातर्फे शॉपिंग सेंटर बांधण्यात यावे व पत्रकारांना भवनासाठी जागा द्यावी.

**ठराव क्र. २९/७** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार औरंगपुरा येथील नाथ मार्केट व त्या लगतचा भाग आरक्षण क्रमांक २७९ दुकान केंद्रासाठी आरक्षित आहे. विकास योजना अहवालाप्रमाणे या आरक्षणास सुमारे १.७५ ही जागा आरक्षित केलेली आहे. पैकी या नाल्याच्या जागेवर महसुल कर्मचारी कल्याण संस्था व मराठवाडा महसुल अधिकारी असोसिएशन औरंगाबाद यांनी महसुल भवनासाठी औरंगपुरा ते विधी महाविद्यालय या ८० फुट रस्त्यालगत पत्रकार भवनच्या प्रस्तावित केलेल्या जागेच्या दक्षिणेस क्षेत्र सुमारे ८५०.०० चौ.मी. सरकारी जागा महसुल भवनला प्रदान न करता त्या जागी महानगरपालिकेचे शॉपींग सेंटर उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०/८ :** कर आकारणी विभाग १ व २ तर्फे प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्थायी समितीमध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे औरंगाबाद शहरातील घोषित, अघोषित झोपडपट्ट्यातील बांधकामे व इतर अनाधिकृत बांधकामांना ठाणे व सोलापुर महानगरपालिका प्रमाणे कर आकारणी संबंधी कागदपत्रावर "अनाधिकृत/ विना परवाना बांधकाम" असा शिक्का मारुन तसेच" कर आकारणीची नोटीस/घराचे माहितीपत्रक हिशेब तक्ता/करआकारणी रजिष्टर/बील/ मागणी नोटीस/पावती दिल्यामुळे जे बांधकाम विना परवाना किंवा परवान्याच्या विरुध्द अथवा व्यतिरिक्त किंवा विना परवाना वापर आहे त्यास महानगरपालिकेने परवानगी दिली अथवा परवानगी दिली असल्याचे गृहीत धरुन दिली गेली असे समजले जाणार नाही व यामुळ महानगरपालिकेचे कायदेशीर हक्कास व कार्यवाहीस बाधा येणार नाही. "अशी तळटीप छापुन कर आकारणी करण्यात येत आहे. परंतु शासनाचे निर्णय क्र. एसटीपी २१८९/प्र.क्र.६७३/भाग-२/म-१, दिनांक २२ डिसेंबर १९८९ महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई प्रमाणे कर आकारणी करतांना नोंदणी न झालेले दस्ताची नक्कल ग्राह पुरावा धरुन कर आकारणी करु नये व कर आकारणी करतांना नोंदलेल्या दस्ताची मागणी कर निर्धारण अधिकाऱ्यांनी करावी असा आदेश आहे. तथापी मा. आयुक्तांचे दि. ३/१/९२ चे आदेशाप्रमाणे इतर महानगरपालिकांप्रमाणे महसुल वाढविण्यास्तव औरंगाबाद महानगरपालिकेने शहरातील अनाधिकृत बांधकामास कर आकारणी करण्याचे काम चालु केले आहे. ही बाब शासनास कळविणे योग्य राहील. त्यानुसार प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

श्री. मुजीब आलमशा : मनपाच्या नगररचना विभागातुन माहिती द्यावी की, शहरात किती घरे अधिकृत व किती घरे अनधिकृत आहेत.

श्री. अविनाश कुमावत : गारखेडा भागातील बरेच घरे अनाधिकृत आहेत आपण परवानगी देत नाही परवानगी द्यावी.

श्री. मुजीब आलमशा खान : सदरील प्रस्ताव मंजुर करु नये कारण हा प्रस्ताव मंजुर करुन अधिकारी वर्गाचे फावते व नागरीकांचे मरण होते. अनधिकृत बाबत पावती सुध्दा संबंधित विभागात फाडल्या जात नाही. आजही शहरात १० टक्के घरे अधिकृत आहेत तर ९० टक्के घरे अनधिकृत आहेत. आपण या

प्रस्तावावर निर्णय देवून नागरिकांवर अन्याय करु नये व प्रस्तावास मंजुरी देवू नये.

श्री. धनंजय गंगाखेडकर : बांधकामाच्या संदर्भात जी अधिकृत परवानगी दिली जाते ती पावती लाल रंगाची असावी व अनधिकृत परंतु बांधकाम परवानगीसाठी टॅक्स वसुल करणेसाठी पिवळी पावती छापावी म्हणजे ते समजुन येईल.

मा. महापौर : स. सदस्य श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी सुचित केल्याप्रमाणे अधिकृत परवानगीसाठी लाल रंगाची पावती व अनधिकृत परवानगीसाठी पिवळ्या रंगाची पावती वापरता येईल.

श्री. मुजीब आलमशाखान : परंतु मी म्हणतो अशा प्रकारचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवण्याचा उद्देश काय? यामुळे शहरातील अनधिकृत घरांना कायदेशिर अडचणी येण्याचा संभव आहे.

श्री. अलफखान हुसेनखान : प्रस्ताव मंजुर होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर कोणत्याही प्रकारे लाल/पिवळ्या रंगाच्या पावत्या छापण्या पूर्वी मनपाचे मोहर (शिक्का) मारणे आवश्यक आहे. मनपात अशी पध्दत आहे.

श्री. शंकर मगर: स. सदस्य श्री. अलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणे ठस्सा मारणे योग्य वाटत नाही. कारण ठसा मारणे म्हणजे अनधिकृत असल्याचे समजते व त्याची नोंद केलेली नाही. यासाठी शहरातील झोपडपट्टी जे स्लम आहेत त्यांचेकडे कोणत्याही प्रकारचे कागद नसतात म्हणुन त्यांना शासन घोषित करते व टॅक्स लावण्याची कार्यवाही होते. शहरात ८० टक्के घरे अनधिकृत आहेत तर २०% घरे अधिकृत आहेत. कायदेशिर अडचणी येऊ नये या दृष्टिने पुर्वी जसे होते तीच पध्दत अवलंबवावी.

श्री. पांडुरंग पैठणकर : कोणत्या प्रकारची मोहर (ठस्सा) मारायची ती मारावी परंतु एन.ए. ची पध्दत ठेवण्यता येऊ नये.

श्री. शंकर मगर: नागरीकांना टॅक्स पावती लावली तर त्याचे एन. ए. होणार नाही.

मा. महापौर : या सर्व कारणासाठी अधिकृत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

श्री. मुजीब अलमशा खान : आपण जर आज प्रस्ताव मंजुर केला तर पुढे कायदेशिर अडचणी नागरिकांना निर्माण होतील. या प्रस्तावाबाबत अधिकृत किवा अनधिकृत या भानगडीत न पडता प्रस्ताव नामंजुर करावा.

श्री. शंकर मगर: पूर्णपणे लिगली कार्यवाही करुनच टॅक्स लावावा.

श्री. मुजीब आलमशा खान

श्री.स. हुसेन स. अहमद : आपण अनधिकृत घरांना टॅक्स लावावयाचा असल्यास थोडासा दंड आकारुन लावावा.

श्री. बंडू प्रधान : खत्रीनगरलाही टॅक्स लावणार काय? ते पण अनधिकृत आहे.

श्री. महापौर : उप आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. उप आयुक्त : सदरचा प्रस्ताव सभेमध्ये नवीन आलेला नाही. आपण यापुर्वी मान्यता दिलेली आहे. जे काही अनधिकृत झोपडपट्टी किंवा अतिक्रमण आहेत त्यांचेवर टॅक्स लावावा असे आपण ठरविलेले आहे. विशेष सर्वसाधारण सभेमध्ये त्याप्रमाणे प्रशासनाने हा प्रस्ताव मांडला आहे. फक्त फरक असा केलेला आहे की, ज्या ठिकाणी अनधिकृत विकास झालेला आहे, त्या ठिकाणी थोडासा फरक करायचा की, विना परवानगीने बांधकाम करुन घरे बांधलेले आहेत. स. सदस्य श्री. मुजिब आलमशा खान यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावरुन जसे अनधिकृत घरे व अधिकृत घरे शहरात

किती तेव्हा या बाबतीत जो पर्यन्त टॅक्स लागत नाही तोपर्यंत याचा काहीच हिशेब लागू शकत नाही आणि योग्य ती गणना होणार नाही. आता आपण कुठे प्रॉपर्टीमध्ये गणना करावयास सुरुवात केली व टॅक्स लावावयाला सुरुवात केली आणि यामध्ये आपण ठस्सा मारतो कारण याठिकाणी वेगळे अस्तित्व दाखविणे आवश्यक आहे. जर हे दाखविले नाही तर उद्या कोर्ट कचेरी मध्ये असे उपस्थित होतील की, मनपाने अनधिकृत असतांना टॅक्स का लावला. तर त्या दृष्टिने आपण मनपाच्या उत्पन्नात भर पडेल व बाजू बळकट राहील. यामध्ये लाईटचाही प्रश्न आहे. जे मनपाच्या हद्दीत १८ खेड्यांचा समावेश आहे. तीत अनधिकृत घरे आहेत त्यांना टॅक्स लावता येत नाही. त्यामुळे लाईट घेता येत नाही. त्या दृष्टिने प्रशासनाने सुरळीत असा प्रस्ताव ठेवलेला आहे. अाणि आपण म्हणता की, विना परवानगी देवू नका. या ठिकाणी सोलापूर व ठाणे मनपाच्या धर्तीवर टॅक्स प्रपोज्ड केलेला आहे शासन यास बिलकुल मान्यता देणार नाही. कारण रेगुराईज्ड करीत आहात असा त्याचा अर्थ झाला. त्यामुळे हे मान्य करता येणार नाही. एकतर आपण असे सांगा टॅक्स लावू नका आमचे काहीही म्हणणे नाही. प्रशासनातर्फे टॅक्स लावणे बंद करण्यात येईल.

श्री. मुजिब आलमशा खान : यामध्ये उप आयुक्त यांनी सांगितले की, आमच्याकडे माहिती नाही व सांगू शकत नाही. परंतु जणगणना करतेवेळी याबाबत माहिती घेता येऊ शकते. हे सर्व नागरिकांना सतविण्यासाठी जाणुनबुजून करण्यात येत आहे. कोर्टात एखाद्याने केस टाकल्यास कोर्ट विचारणा करेल की, आपण टॅक्स लावला कसा. आपण न सांगता ठसा न मारता मागे जसी टॅक्स लावण्याची पध्दत चालू होती तीच चालू द्यावी. आपण मनपाची बाजू न घेता नागरिकांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. प्रस्ताव मंजुर झाल्यास सभागृहाविरुध्द राहु.

श्री. शंकर मगर,

श्री. स. हुसैन स. अहमद : शहरातील बऱ्याचशा भागात अनधिकृत घरे बांधलेली आहेत. त्यामुळे परवानगी मिळू शकत नाही.

मा. महापौर : कर निर्धारण अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

श्री. मुजिब अलमशा खान : आपण सबंधित अधिकाऱ्यांना घडीघडी खुलासा करण्यासाठी सुचना देवू नये. आपण नागरिकांचे प्रतिनिधित्व करीत आहात त्यामुळे त्यांच्या बाबतीत विचार व्हावा.

मा. महापौर : आपल्याला काय सुचवायचे ते सुचविले. निर्णय द्यावयाचा अधिकार माझा आहे.

श्री. जयवंत ओक : प्रत्येक वार्डात अनधिकृत घरे आहेत. नारळीबाग येथील अनिवासी भाग होता तेथे अनधिकृत घरे बांधल्याने त्या ठिकाणी अजुनही टॅक्स लावलेला नाही. परंतु पुढे काही कोर्टात केस गेल्यास अनधिकृत बांधकाम म्हणुन मनपा पाडावयास येईल याबाबतीत जबाबदारी शासन घेईल काय?

श्री. चंद्रकांत खैरे : मो. हमालवाडा येथे रस्ता रुंदिकरणात ज्यांची घरे आली त्यांना पर्यायी व्यवस्था व्हावी. तसेच रस्ता रुंदीकरण खडी टाकून नंतर डांबरीकरण करणेसाठी संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य त्या सुचना द्याव्यात.

मा. महापौर : ठिक आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी. सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

मा. उप आयुक्त : सदरचा प्रस्ताव स्थगित म्हणजे झोपडपट्टीला टॅक्स आकारणी करायची नाही असे आहे काय?

श्री. मुजीब आलमशा खान,
श्री. शंकर मगर: झोपडपट्टीतील नागरिकांना टॅक्स लावावा, परंतु याबाबत निर्णय देत असताना आपण नागरिकांचे प्रतिनिधित्व करीत आहोत हा विचार करावा.

मा. महापौर : आतापर्यंत टॅक्स ज्या पध्दतीने आकारत होतो त्याच पध्दतीने आकारला जावा. या प्रस्तावात पावती स्वरुपात लाल पिवळी रंगाचा ठसा मारुन पावती न देता यापुर्वी जशी टॅक्स व्यवस्था होती तीच पध्दत झोपपट्टी किंवा स्लम भागासाठी असावी.

**ठराव क्र. ३०/८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आतापर्यंत औरंगाबाद शहरातील झोपडपट्टी व स्लम भागासाठी ज्या पध्दतीने टॅक्स आकारणी चालू होती त्याच पध्दतीने पुढे टॅक्स लावण्याची पध्दत चालू ठेवावी असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जण गण मन" या राष्ट्रगीताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

**गुरुवार दिनांक २० ऑगस्ट ९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**गुरुवार, दिनांक २०/८/९२ रोजी अंदाजे ११:१५ वाजता मा. महापौर, श्री. यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मारतम्" या गीताने सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेस मा. उप आयुक्त तथा अधिकारी व रजिष्टर प्रमाणे खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. अजिमखान दादामियाँ अ. रहेमान
२) श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
३) श्री. अजिजुला बेग वाहिद बोग
४) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
५) श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
६) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
७) श्री. भगुरे तुळशीराम छगन
८) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
९) श्री. पाटील नरेंद्र यादवराव
१०) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
११) श्री. मुजीब अलमशा खान
१२) श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१३) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१४) श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
१५) श्री. स.अ. एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
१६) श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१७) श्री. ओक जयवंत केशवराव
१८) श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग
१९) श्री. अ. रशीद खान (मामु) अ. हमीद खान
२०) सौ. दलाल लता श्रीनिवास
२१) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२२) श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२३) श्री. हाजी मोहमद हाफीजोद्दीन
२४) श्री. छापरवाल रमेश नारायण
२५) श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२६) श्री. फैय्याजखान अहमदखान
२७) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
२८) श्री. स. हुसेन स. अहमद
२९) श्री. मगर शंकर जीजाराम
३०) श्री. मानकापे नामदेवराव शामराव
३१) श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
३२) श्री. सुग्रीम हरलाल रिडलान

३३) श्री. अलफखान हुसेनखान
३४) श्री. वाघमारे सुदाम भानुदास
३५) श्री. थोरात किशोर गोविंदराव
३६) श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ
३७) श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
३८) डॉ. काळे शांताराम यशवंतराव
३९) श्री. दत्त प्रदिप कुमार एस.
४०) श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
४१) श्री. बारवाल गजानन रामकिसन
४२) श्री. जाहागिरदार अजिज मुख्तार अहमद
४३) श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
४४) श्री. जावळे प्रकाश शिवराम
४५) श्री. गाडे गंगाधर सुखदेव
४६) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराम
४७) श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
४८) श्री परदेशी सुभाष शिवलाल
४९) श्री. नवपुते कचरु चंद्रभान

**"वंदे मातरम्" या गीताने सभेस सुरुवात झाली.**

**संवाद**

श्री. रशिद मामु : माजी महापौर श्री. प्रदिप जैस्वाल यांचे वडीलांचे दुःखद निधन झ ाले. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

श्री. प्रभाकर विधाते : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे. कै. शिवनारायण जैस्वाल यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

००.२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन सभागृहात कै. शिवनारायण जैस्वाल यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

श्री. मधुकर शिंदे, श्री. अविनाश कुमावत : लक्षवेधी सुचना आहे त्यावर चर्चा व्हावी. आणि इतर काही प्रश्नांसाठी चर्चा करण्यास का तासाचा अवधी द्यावा.

मा. महापौर : अगोदर इतिवृत्तावर चर्चा करुन विषय क्र. १ मंजुर करुन घ्यावा नंतर लक्षवेधी सुचनांवर चर्चा करण्यात येईल.

श्री. प्रदिप जैस्वाल : ठिक आहे. इतिवृत्तावर कायम झाल्यानंतर आम्ही दिलेल्या लक्षवेधी सुचनांवर चर्चा करयात यावी.

मा. महापौर : ठिक आहे.

**विषय क्र. ३१/१ :** दिनांक २०/७/९२ व २३/७/९२ रोजी तहकुब झालेली आणि दिनांक १७/७/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद</u>**

श्री. प्रदिप जैस्वाल : इतिृत्तातील पान क्र. ७ मध्ये मा. महापौरांचा आदेश वाचुन दाखविला व त्याबाबत मा. आयुक्त किंवा शिक्षणाधिकारी यांनी माहिती दिलेली नाही म्हणुन खुलासा करावा.

मा. महापौर : शिक्षणाधिकारी यांनी माहिती द्यावी.

शिक्षणाधिकारी : सात शाळा बंद झाल्याबाबतचे प्रकरण होते. परंतु त्या शाळा बंद झालेल्यानाहीत. एकाच इमारतीत भरणाऱ्या या शाळा आहेत. या सर्व शाळांचे एकत्रीकरण करण्यात आलेले आहे. उदा. केंद्रीय प्रा. शाळा मोतीकारंजा या शाळेमध्ये मोतीकारंजा नं.२ व अंगुरीबाग येथील शाळा व अंगुरीबाग येथील उर्दु शाळा यांचे एकत्रीकरण करुन शाळा करण्यात आलेली आहे. तसेच रोकडीया हनुमान कॉलनी येथे दोन शाळा होत्या. प्राथमिक शाळा रोकडीया हनुमान कॉलनी व केंद्रीय प्रा. शाळा रोकडीया हनुमान कॉलनी या दोन्हीही शाळा एकाच इमारतीत भरत होत्या. म्हणुन या दोन्हीही शाळा एकत्रीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच रेंगटीपुरा येथील मराठी शाळा ही जिन्सी येथे त्याच इमारतीत भरत होती. त्यामुळे त्या दोन्हीही शाळा एकत्रित करण्यात आल्या. तर चेलीपुरा उर्दु आणि केंद्रिय प्रा. शाळा चेलीपुरा उर्दु अशा एकाच नावाच्या दोन शाळा असल्या नेत्यांना एकत्रीत करण्यात आल्या आहेत. शासनाचे असे धोरण आहे की, एकाच नावाच्या दोन वेगवेगळ्या शाळा एकाच ठिकाणी भरत असतील तर त्याचे एकत्रीकरण करावे. म्हणजे प्रशासनाच्या दृष्टिने सोयीस्कर होईल व शाळांनाही यासाठी सन १९८९ मध्ये मा. मुन्सीलालजी गौतम यांनी हा निर्णय घेऊन अशा प्रकारच्या शाळा एकत्रीत केलेल्या आहेत. कोणत्याही शाळा बंद झालेल्या नाहीत.

श्री. पांडुरंग पैठणकर : दि. २७/७/९२ चे इतिवृत्तातील पान क्र. ३ मध्ये माझ्या वक्तव्यात शहरातील बाजार किंवा मार्केटमध्ये उघड्यावरती फळे विक्रीला असतात त्यावर झाकणे टाकावे असे आहे त्या ऐवजी मिठाई वगैरे विक्रीसाठी असणाऱ्या मिठाईवर झाकणे टाकणे तसेच सडके फळे बाजारात विक्रीस आणू नये अशी दुरुस्ती करण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे. दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. अजिजुल्ला बेग : दिनांक २०/७/९२ च्या इतिवृत्तातील पान क्र. ३ मध्ये माझ्या वक्तव्यात शहरातील बाजार किंवा मार्केटमध्ये उघड्यावरती फळे विक्रीला असतात त्यावर झाकणे टाकावे असे आहे त्या ऐवजी मिठाई वगैरे विक्री साठी असणाऱ्या मिठाईवर झाकणे टाकणे तसेच सडके फळे बाजारात विक्रीस आणु नये अशी दुरुस्ती करण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे. दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. अजिजुल्ला बेग : दिनांक २०/७/९२ च्या इतिवृत्तातील पान क्र. ३ मध्ये स. सदस्य श्री. रशिद मामु यांचे वक्तव्यात मनपातील स. सदस्य गप्प का आहेत कारण सध्या मनपातील राजकारणाने हे सर्व होत आहे हे वाक्य चुकीने आलेले आहे. तेव्हा इतिवृत्तातुन सदरचे वाक्य वगळण्यात यावे.

मा. महापौर : ठिक आहे. सदरचे वाक्य वगळण्यात यावे.

श्री. मधुकर शिंदे : मी लक्षवेधी सुचना मांडलेली होती त्याप्रमाणे चर्चा व्हावी.

श्री. अजिजुल्ला बेग : शासनाकडील जे पत्र परिपत्रके मनपाकडे येतात ती सभागृहासमोर ठेवण्यात यावी. अशी सुचना मागील बैठकीत केलेली होती.

मा. महापौर : आपण मांडलेल्या सुचनाबाबत मी मा. आयुक्त यांचेशी चर्चा केलेली आहे. शासनाकडील पत्र किंवा परिपत्रके जे येतील ती सभागृहासमोर सर्व स. सदस्यांना माहितीस्तव ठेवण्यात येतील असे सांगितले आहे. आता इतिवृत्तावरील चर्चा संपलेली असून इतिवृत्त कायम करण्यात येते.

ठराव क्र. ३१/१ : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. २७/७/९२ चे इतिवृत्तातील पान क्र. ३ मध्ये उघड्यावरती फळे विक्रीला असतात त्यावरती झाकणे टाकावे या ऐवजी मिठाई वगैरे असणाऱ्या मिठाईवर झाकणे टाकावे तसेच सडके फळे बाजारात विक्रीस आणण्यास मनाई करावी अशी दुरुस्ती करण्यात येते. तर दिनांक २०/७/९२ च्या इतिवृत्तातील पान क्र. ३ मध्ये स. सदस्य श्री. रशिद मामु यांचे वक्तव्यात मनपातील स. सदस्य गप्प का आहेत. कारण सध्या मनपातील राजकारणाने हे सर्व होत आहे. हे वाक्य इतिवृत्तातुन वगळण्यास व इतर दुरुस्त्यासह दि. २०/७/९२ व २३/७/९२ रोजीची तहकुब झालेली सभा आणि दि. २७/७/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"लक्षवेधी सुचनांवर चर्चा"

श्री. मधुकर शिंदे : मो. पडेगाव येथील मनपाच्या शाळेमध्ये अनैतिक प्रकार घडला हे खरे आहे काय याची माहिती द्यावी.

मा. महापौर : स. सदस्य आपणास सुचित करण्यात येते की, लक्षवेधी सुचना आपण मांडलेली असून काय प्रकार घडला याची आपण माहिती द्यावी.

श्री. मधुकर शिंदे : या शाळेमध्ये दोन शिक्षक आणि एक शिक्षिका शाळा एक घंटा अगोदर सोडून अनैतिक प्रकार केला हे खरे आहे काय?

श्री. गंगाधर गाडे : स. सदस्यांनी केलेली सुचना योग्य असून यावर सखोल चर्चा होऊन प्रशासनाने खुलासा करावा.

मा. महापौर : शिक्षणाधिकारी यांनी याबाबतचा खुलासा करावा.

श्री. गंगाधर गाडे : शाळासारख्या शिक्षकी पेशवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची अशा प्रकारची वागणुक भयानक आहे. असा प्रकार कोणत्याही मनपामये झ ालेला आढळत नाही. तेव्हा या कर्मचाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

श्री. अविनाश कुमावत : याबाबत अगोदर माहिती द्यावी.

श्री. कचरु नवपुते : चिकलठाणा येथील शाळेत एक शिक्षक दररोज दारु पिऊन येतो या संदर्भात गावकरी मंडळींनी माझ्याकडे तक्रार केलेली आहे व मी स्वतः शिक्षणाधिकरी यांना तोंडी व लेखी सुचना केलेली आहे. परंतु अद्यापही कार्यवाही झालेली नाही. शिक्षणासारख्या पवित्र ठिकाणी असे शिक्षक वर्ग करित असतील तर विद्यार्थी व भावी पिढी त्यांना कदापीही माफ करणार नाही. यासाठी काय कार्यवाही करायची ती तात्काळ व्हावी.

श्री. गिरजाराम हाळनोर: पिरबाजार येथील शाळेच्या गच्चीवर असाच प्रकार घडलेला आहे.

सौ. लता दलाल : एक शिक्षिका दररोज मारोती कारमधुन येते आणि कारमध्येच हजेरी रजिष्टर मागवून स्वाक्षरी करुन निघुन जाते याबाबत मी शिक्षणाधिकारी यांना लेखी तक्रार दिलेली आहे. परंतु अद्यापही कार्यवाही झालेली नाही किंवा उत्तरही मिळालेले नाही. तेव्हा स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची गांभिर्यता लक्षात घेतली जाणार आहे काय? याचा खुलासा व्हावा.

श्री. पांडुरंग पैठणकर : वार्ड क्र. ३९ कैलासनगर येथील शाळेत एका शिक्षकाला दिसत नाही. तेव्हा त्यांचे जागी पर्यायी व्यवस्था म्हणून दुसऱ्या शिक्षकाला पाठविणेसाठी गेल्य सहा महिन्यापासुन सुचना करित आहे. परंतु अद्यापही कार्यवाही केलेली नाही.

मा. महापौर : शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

शिक्षणाधिकारी : पडेगाव शाळेतील प्रकाराबद्दल मला माहिती मिळाल्याबरोबर मी त्या शाळेवर गेलो आणि चौकशी करुन ज्यांचेवर संशय होता त्या दोन शिक्षकांच्या तडकाफडकी बदल्या करण्यात आलेल्या आहेत. आणि त्यांचेवर निलंबना संबंधीची कार्यवाही देखील विचाराधीन आहे.

श्री. मधुकर शिंदे : महानगरपालिकेच्या शाळेमध्ये अशा प्रकारच्या घटना घडल्यास आपण विद्यार्थ्यांना काय शिक्षण देणार?

श्री. गंगाधर गाडे : शहरामध्ये महानगरपालिकेच्या शाळेबाबत आस्था नाही, अनेक तक्रारी आहेत. त्यामध्येच शाळेतील शिक्षकांनी असे प्रकार केल्याने नागरिकांमध्ये विश्वास राहणार नाही. यासाठी स. सदस्य श्री. मधुकर शिंदे यांनी जी सुचना मांडली, त्या बाबत, त्या शिक्षकांच्या बदल्या करुन चालणार नाही. तर संबंधितांवर निलंबनाची कार्यवाही करावी आणि शिक्षणाधिकारी यांची नैतीक जबाबदारी असून त्यांनीही राजीनामा द्यावा अशी मी मागणी करीत आहे.

मा. महापौर : स. सदस्यांना सुचित करण्यात येते की, तुमच्या काय सुचना असतील त्या कळवाव्यात त्यावर विचार करता येईल. याबाबत शिक्षणाधिकारी यांचा खुलासा प्राप्त झालेला आहे.

श्री. मधुकर शिंदे : शिखकांची बदली करुन चालणार नाही. त्यांची केवळ बदली केल्याने इतर शाळेमध्ये ते असेच प्रकार घडवितील. कारण असाच प्रकार गेल्या पंधरा दिवसांपुर्वी उस्मानपुरा येथील शाळेमध्ये झालेला आहे.

श्री. गंगाधर गाडे : शिक्षणासारख्या पवित्र ठिकाणी असाप्रकार घडु नये. ही बाब फार गंभिर स्वरुपाची असून स. सदस्या सौ. दलाल यांनी सुचित केल्याप्रमाण् त्यांचीही तक्रार होती. परंतु त्यावर योग्य ती कार्यवाही झालेली नाही. यासाठी अशा गंभीर प्रश्नावर आळा बसण्यासाठी कठोर कार्यवाही करणे आवश्यक आहे.

श्री. कचरु नवपुते : शिक्षणाधिकारी यांचा यामध्ये काहीही दोष नाही.

श्री. गंगाधर गाडे : शिक्षणाधिकारी यांचा मनपाच्या शाळेवरती अंकुष नसुन त्यांची ही नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे त्यांनी राजीनामा द्यावा.

श्री. किशोर थोरात : सर्वात प्रथम त्या शिक्षकांना निलंबीत करावे आणि कोणते शिक्षक व शिक्षिका आहेत त्यांची नावे सांगावित. या मनपाच्या शिक्षण विभागात शिक्षणाधिकारी यांचा कोणताही अंकुष राहिलेला नसुन त्यांना त्यांच्या मुळ विभागाकडे पाठविण्यात येऊन त्यांचे जागी पर्यायी व्यवस्था म्हणुन कार्यालयीन कर्मचाऱ्यातुन पद भरण्यात यावे.

श्री. अविनाश कुमावत : असे करुन चालणार नाही. तर संबंधित शिक्षकांची योग्य ती चौकशी करुन त्यांचेवर निलंबनची कार्यवाही व्हावी.

श्री. मधुकर शिंदे : शिक्षकांचे प्रकरणाबाबत हि केस पोलीस स्टेशन पर्यंत गेलेली आहे आणि गुन्हा दाखल झालेला असून संबंधित शिक्षकांवर निलंबनाची कार्यवाही व्हावी.

श्री. रशिद मामु : मनापाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षिकांना घराजवळ शाळा पाहिजे. ज्यामुळे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरी बोलावून काम करवून घेतात. दुसरी बाब म्हणजे संबंधित शिक्षकांवर एका बाजुला स. सदस्य म्हणतात की, त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही व्हावी परंतु दुसऱ्या बाजुला स्थायी समिती आहे, त्यावेळी तेच निलंबीत झालेले कर्मचारी स्थायी समितीकडे अपील करुन आपली बिनशर्त सुटका करवुन घेतात कारण असे स्थायी समिती मार्फत घडलेले आहे. याकरिता संबंधिताचे अपिलच समितीने फेटाळून लावावे.

श्री. किशोर थोरात : अगोदर संबंधित शिक्षक व शिक्षकेचे नाव जाहिर करावीत.

मा. महापौर : शिक्षणाधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. आपणाला काय कार्यवाही करण्यासाठी सुचित करावयाचे आहे ती सुचना मांडावी त्याप्रमाणे कार्यवाही होईल. यात माझे काहीही म्हणणे नाही.

श्री. किशोर थोरात,

श्री. अविनाश कुमावत,

श्री. प्रकाश जावळे : मनपाच्या शाळेमध्ये घडलेला प्रकार योग्य नसून शिक्षण क्षेत्रास लाजविणारी बाब आहे. या मनपातील शिक्षण विभागात संबंधित शिखणाधिकारी यांचा अंकुष राहिलेला नसुन त्यांचेवर कार्यवाही व्हावी. केवळ शिक्षकावर कार्यवाही करुन चालणार नाही.

श्री. अजिज जागिरदार : सर्वात प्रथम सदरचा वार्ड मा. महापौर याचा आहे. त्यामुळे त्यांनी भेट दिली आहे काय? आणि संबंधित अधिकाऱ्यांनी आताच खुलासा केल्याप्रमाणे त्या स्थळी जाऊन चौकशी करुन त्यांची तात्काळ बदली केली. परंतु जर त्या शाळेमध्ये गैरप्रकार घडला असेल तर तेथील शिक्षकांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे आणि नंतर चौकशी करावी ज्यामुळे तेथील मुख्याध्यापक किंवा उपशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी जबाबदार आहेत हे दिसुन आल्यास त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री. मुजीब आलमशा खान : मो. शहाबाजार येथील शाळेमध्ये असाच प्रकारे शिक्षक व शिक्षिका यांचे गैरवर्तन चालते यासाठी शाळेवर नियत्रण असणे आवश्यक आहे. त्या शाळेमध्ये गेल्या बऱ्याच वर्षापासून एक विवाहीत शिक्षक व शिक्षिका कार्यरत आहेत. त्यांची बदली होत नाही. त्यांचेमुळे त्या शाळेमध्ये पोलीस कर्मचारी व काही गुंड प्रवृत्तीचे मुले वर्गात जावून बसतात हे मी प्रत्यक्षात पाहिलेले आहे. यासाठी मनपाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे.

मा. महापौर : स. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मो. पडेगाव येथील मनपाच्या शाळेमधील ज्या शिक्षकांनी असे कृत्य केले त्यांना तात्काळ निलंबीत करण्यात येते असा आदेश देण्यात येतो.

श्री. प्रकाश जावळे,

श्री. गंगाधर गाडे : या सोबतच शिक्षणाधिकारी यांचेवरही कार्यवाही व्हावी. कारण ते सुध्दा तेवढेच जबाबदार आहेत.

मा. महापौर : स. सदस्यांनी लक्षवेधी सुचना मांडलेली होती त्यावर चर्चा होऊन कार्यवाही झालेली आहे.

श्री. मुजीब आलमशा खान : माझ्या वार्डात मनपाच्या पाच शाळा आहेत. त्या सर्व शाळांमध्ये गरिब लोकांचे मुले/मुली शिक्षण घेतात. परंतु मनपातील कोणत्याही कर्मचाऱ्यांचे मुले/मुली शिक्षण घेत नाहीत. या शाळेमध्ये शिक्षक मुलांना व्यवस्थित शिकवित नाहीत. ज्यामुळे मुलांना बरोबर लिहीता वाचता येत नाही. यासाठी त्यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी वारंवार शाळेला भेटी देणे आवश्यक आहे. मनपाच्या शाळेची परिस्थिती अत्यंत खराब झालेली असून स्थिती सुधारण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी.

श्री. मधुकर शिंदे : संबंधित शाळेमध्ये दोन शिक्षक व एक शिक्षिका गैरकृत्य करीत होते. तेव्हा आपण दोन शिक्षकांना निलंबीत न करता तिघांनाही निलंबीत करावे.

मा. महापौर : स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता मी मा. आयुक्तांना विनंती करतो की, आता स. सदस्य श्री. मुजिब आलमशा खान यांनी सुचित केल्याप्रमाणे व मो. पडेगाव येथील शाळेमध्ये घडलेल्या प्रकाराची सखोल अशी चौकशी करुन पुढील बैठकीत सभागृहात माहिती द्यावी.

श्री. गंगाधर गाडे : या घडलेल्या घटने संदर्भात शिक्षणाधिकारी हे सुध्दा जबाबदार आहेत.

मा. महापौर : याबाबतची चौकशी उप आयुक्त करुन माहिती पुढील सभेमध्ये देतील.

श्री. प्रकाश जावळे : मनपातील शिक्षण विभाग या घटनेस कारणीभुत आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : आता मा. महापौर यांनी निर्णय दिलेला आहे. तेव्हा जास्त चर्चा न करता मी एक "सिल्लेखाना" बाबत लक्षवेधी सुचना मांडलेली आहे. त्यावर चर्चा व्हावी गेल्या सभेमध्ये सुध्दा याबाबत चर्चा झालेली होती व मी महापौर असतांना सुध्दा या वार्डामध्ये भेट दिलेली होती. सिल्लेखान्यातील नागरिकांना अजुनही पुरेशा सुविधा प्राप्त झालेल्या नाहीत याचे कारण काय? त्या ठिकाणावरुन हाडांचे गोडावुन हलविले जात नाही. ज्यामुळे दुरपर्यंत दुर्गंधी सतत येत असते. तर त्या ठिकाणी मांस विक्रिला लावले जाते ते उघड्यावरच कोणत्याही जाळीचा वापर होत नाही. अजुनही त्या ठिकाणी जनावरांची कत्तल केल्या जाते. यावर आळा बसत नसुन संबंधित विभागाला जाग येत नाही. याचा खुलासा व्हावा.

श्री. प्रकश जावळे : माझी एक सुचना आहे की, स. सदस्या सौ. दलाल यांनी सुचित केल्याप्रमाणे एक शिक्षिका कारमधुन येते आणि कारमध्येच रजिष्टर मागवून स्वाक्षरी करुन निघून जाते तर ती शिक्षिका कोण त्यांचे नाव सांगावे, तिच्यावर कार्यवाही करावी. त्यांना पाठीशी घालता कामा नये. तर त्या शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षणाधिकारी यांना जाब देता आला पाहिजे.

मा. महापौर : पडेगाव शाळेसंदर्भात चर्चा संपलेली आहे. पुढील बैठकीत चौकशी करुन माहिती सभागृहात मिळणार आहे. आता सिल्लेखाना बाबत चर्चा करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सदस्य श्री. प्रकाश जावळे यांनी सुचित केल्याप्रमाणे त्या शिक्षिकेचे नावं सांगावे.

अविनाश कुमावत : सिल्लेखाना बाबत आम्ही लक्षवेधी सुचना मांडलेली आहे त्यावर चर्चा करावी आणि याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी. आणि जर अधिकारी उपस्थित नसतील तर त्यांना निलंबीत करुन त्यांचे जागी दुसऱ्या अधिकाऱ्यांची नेमणुक करावी.

श्री. अजिज जागिरदार : सभागृहाची व स. सदस्यांची शहरात बदनामी होत आहे याबाबत माझी एक लक्षवेधी सुचना आहे. तीवर चर्चा व्हावी.

मा. महापौर : स. सदस्य आपणास विनंती करण्यात येते की, स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी लक्षवेधी सुचना मांडलेली आहे त्यावर चर्चा केल्यानंतरच तुमची काही सुचना असेल ती मांडावी.

श्री. प्रकाश जावळे : मी शिक्षण विभागावर उपप्रश्न विचारलेला आहे. त्याचे उत्तर देण्यात यावे. संबंधित शिक्षिकेचे नाव सांगुन त्याचेवर कार्यवाही नंतर करावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. प्रकाश जावळे आपणास सुचित करण्यात येते की, स. सदस्या सौ. लता दलाल व आपणासह ज्या स. सदस्यांनी प्रश्न विचारलेले आहेत तबाबत सविस्तर माहिती शिक्षणाधिकारी पुढील बैठकीत देतील असा मी आदेश दिलेला आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सदस्य श्री. प्रकाश जावळे यांनी सुचित केल्याप्रमाणे जर त्यांना त्या शिक्षिकेचे नाव माहिती असेल तर त्यांनीच सांगावे विनाकारण चर्चा करण्यात अर्थ् नाही.

श्री. प्रकाश जावळे : संबंधित शिक्षिकेचे नाव आम्हाला माहिती आहे. म्हणूनच मी बोलत आहे. यासाठी विचारणा होत आहे की, आपले शिक्षण विभाग काय काम करते ते आम्हाला पहावयाचे आहे एवढी गंभीर बाब घडली असतांनाही शिक्षण विभागाची नैतिक जबाबदारी होती त्यांनी काय केले याची माहिती द्यावी.

श्री. मधुकर शिंदे : स. सदस्यांनी जर शिक्षणाधिकारी यांना एखादा प्रश्न विचारावयास गेल्यास ते सरळ उत्तरे देत नाहीत.

मा. महापौर : स. सदस्य श्री. प्रकाश जावळे यांनी विचारलेल्या प्रश्नासंदर्भात शिक्षणाधिकारी नावासह पुढील बैठकीत माहिती देतील.

सौ. लता दलाल : संबंधित शिक्षणाधिकारी यांचेवर या संदर्भात काही स. सदस्यांचे दडपण येत आहेत. यासाठी माझी सभागृहाला विनंती आहे की, कोणत्याही स. सदस्यांनी किंवा अधिकाऱ्यांनी या कामी बळी न पडता सत्य जे काय आहे ते बाहेर येण्यास मदत करावी आणि नंतरच कार्यवाही व्हावी मला संबंधित शिक्षिकेचे नाव माहित आहे परंतु आताच सांगु इच्छित नाही. (यावेळी काही स. सदस्य जोरजोरात बोलतात नाव सांगावे, शाळेचे नाव सांगावे)

श्री. रतनकुमार पंडागळे,
श्री. मिर्झा अन्वर बेग : कोणती शाळा आहे. त्या शाळेचे नाव सांगावे.

श्री. मोतीराम घडामोडे : नाव सांगितल्यावरच चर्चा व्हावी. विनाकारण वेळ वाया घालवू नये.

मा. महापौर : स. सदस्या सौ. लता दलला आपण सभागृहात चर्चा करीत असताना मोकळी चर्चा करावी कुणाचेही दडपण येईल असे करु नये आणि जर आपल्याला नाव सांगावयाचे झाल्यास ते सुचवावे की कोणत्या स. सदस्यांनी दडपण आणले. आता सदरच्या प्रश्नावर मी निर्णय दिलेला आहे. तेव्हा सिल्लेखाना बाबत संबंधित अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती द्यावी.

मा. उप महापौर : मो. सिल्लेखाना बाबतचा प्रश्न हा गंभीर स्वरुपाचा आहे आणि यावर गेल्या ४-५ वर्षापासून सतत चर्चा होते. बैठका झाल्या परंतु योग्य त्या सुविधा अद्यापही उपलबध झालेल्या नाहीत. स्लाटर हाऊसचा प्रश्न गेले दोन वर्षापासून सोडविण्याबाबत प्रयतन होत आहे. सिल्लेखाना येथून हटविणे पुर्वी या ठिकाणी काम करणारे कामगार वर्गांना राहण्यासाठी घरे, लाईट, नळ इ. व्यवस्था व सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या सुविधा जोपर्यंत येथील नागरिकांसाठी पुर्ण होत नाही तोपर्यंत हटविणे योग्य वाटत नाही. या बाबत वेळोवेळी स. सदस्यांमध्ये चर्चा घडवून आणल्या जाते. परंतु त्यावर कार्यवाही मात्र तात्काळ झालेली दिसून येत नाही. गेल्या चार वर्षापासून या भागाचा विकास घडवून आणणेच्या दृष्टिने प्रत्येक महापौर भेट देऊन प्रयत्न करीत आहे. यासाठी पडेगाव येथे सर्व सुखयुक्त सोयी मनपाने करुन देणे आवश्यक असून जनावरे कापणे तेथून मांस गाडीद्वारे आणणे, पुरवठा करणे, पाण्याची व्यवस्था, गोडावून, लाईट, तथा कंपाऊंड बांधून देणे पक्के घरे कामगारांना राहण्यासाठी करणे महत्त्वाचे आहे या सर्व गोष्टी करवून घेण्याच्या दृष्टिने सर्वसंमतीने एक विशेष बैठक बोलावून त्यावर अंतिम निर्णय घ्यावा असे मला वाटते.

श्री. चंद्रकांत खैरे : गेल्या ४-५ वर्षापासून सिल्लेखाना बाबत सतत चर्चा होत आहे. परंतु काम मात्र काहीच नाही. सिल्लेखाना येथील लोकांसाठी प्लॉट देण्याचे ठरले ते अद्यापही झालेले नाही. त्यामुळे तेथे घर बांधण्यात आले नाही, त्या ठिकाणी जनावरांचा गोठा, कातड्यांसाठी गोदाम, लाईटची व्यवस्था अपूर्ण पाणी पुरवठा सुरळीत नाही, गाड्यांची व्यवस्था नाही. या सर्व बाबींमुळे कत्तलखाना येथून हटविणे शक्य नाही. तेव्हा आपण प्रत्येक बैठकीत वांरवार बोलतो आणि संबंधित अधिकारी मात्र काहीही करीत नाही. यासाठी आता सा निर्णय ध्यावा की, येथील नागरिकांना सुविधा उपलब्ध जोपर्यंत होत नाही तोपर्यंत हटविणे शक्य नसल्याने अधिकाऱ्यांवर जबादारी टाकणे आवश्यक आहे.

श्री. अविनाश कुमावत : याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आतापर्यंत काहीही केलेले नाही. तेव्हा त्यांना तेथून बदलून इतर अधिकारी यांना तेथील काम करण्याचे सोपविण्यात यावे.

मा महापौर : याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

श्री. अविनाश कुमावत : संबंधित अधिकाऱ्यांकडून या ठिकाणची कामे सुरळीत होत नाही यासाठी त्यांकडून तेथील काम काढून त्यांचे जागी इतर अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यता यावी. असा निर्णय आज द्यावा अन्यथा निषेध म्हणून सभात्याग करण्यात येईल.

श्री. रतनकुमार पंडागळे: सिल्लेखाना बाबत सर्व स. सदस्यांना आपुलकी आहे.

श्री. धनंजय गंगाखेडकर : सिल्लेखाना हटविणेच्या संदर्भात नागरिकांना सोयींचा अभाव असल्याने अडचणी येत आहेत. तेव्हा असा निर्णय द्यावा की,

अतिमहत्वाचे काम समजुन या ठिकाणी रहिवासी व कामगारांना सोसायटी नुसार घरे बांधुन देण्यात यावीत. वॉल कंपाउंड बांधावे या टेंडर किंवा अंदाजपत्रक तयार न करता कामास सुरुवात करावी असे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावे म्हणजे वेळ वाया जाणार नाही.

श्री. रशिद मामु : स. सदस्य श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी जी सुचना मांडली त्यावर विचार व्हावा.

श्री. अलफखान : या ठिकाणी अधिकाऱ्यांची बदलीबाबत सुचना मांडली जात आहे. तेव्हा कोणते अधिकाऱ्यांची बदली करावयाची, बांधकाम पाणीपुरवठा की लाईट, शेडच्या अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा केला म्हणून बदली करायची हे पाहणे आवश्यक आहे.

श्री. अविनाश कुमावत : इतर अधिकाऱ्यांना दोष देण्यापेक्षा ज्यांचेकडे एकच जबाबदारी टाकलेली आहे. त्यांची नैतिक जबाबदारी आहे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. अलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणे तसे केल्यास एकही अधिकारी या मनपामध्ये उरणार नाही. यासाठी तुम्ही आम्ही सर्व जिम्मेदार आहात.

श्री. प्रदिप जैस्वाल : ९५% कत्तलखान्याचे काम हे पडेगाव येथे होते तर ४ ते ५ टक्के काम कत्तलखान्याचे सिल्लेखाना येथे होते त्यांच्या सुविधा नाही मिळाल्या त्यामुळे प्रश्न पडलेला आहे. सुविधा मिळणे आवश्यक असून संबंधित अधिकाऱ्यांना वेळोवेळी सुचना व पत्रके देवुनही कार्यवाहीकरीत नसतील तर त्यांची इतरत्र बदली करण्यात यावी.

श्री. शंकर मगर : गेल्या ४-५ वर्षापासून या प्रश्नावर सतत चर्चा होत आहे. सिल्लेखाना भाग येथून त्वरीत हटविणसाठी त्यांच्या नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने शासनाकडून लाखो रु. खर्च करण्याची कार्यवाही आहे. आणि जर हे सर्व होत नसल्यास सभागृहातील सर्व स. सदस्यांची या कामी जबाबदारी असून सर्वांनी सहकार्य करावे.

श्री. रतनकुमार पंडागळे : सिल्लेखाना संदर्भात काही अधिकाऱ्यांच्या बाबतीत या ठिकाणी चर्चा झाली तेव्हा या संदर्भात त्यांचेकउे आलेल्या तक्रारी एकुण किती आहेत आणि त्यानुसार आतापर्यंत त्यांनी काम करणे आवश्यक होते. सिल्लेखाना येथील कत्तलखाना भाग हा २०० वर्षापुर्वीचा होता आणि त्यावेळी औरंगाबाद शहराच्या बाहेर होता. आज शहर वाढल्याने औरंगाबादच्या बाहेरपर्यंत लोकवस्ती झालेली आहे. ज्या भागात कत्तलखाना हटविल्या जात आहे त्या भागातील ले आऊट जमिन मंजुर झालेली आहे. आणि त्याच जमिनीवर जर पुन्हा लोकवस्ती झाल्यास पुन्हा या ठिकाणाप्रमाणे धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून आपण काही गोष्टी या ठिकाणी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत आणि या भागात सर्व सोयी उदा. घरे, विज, पाणीपुरवठा या त्या-त्या विभागामार्फत झाल्या पाहिजेत आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्या केल्या पाहिजे. हा प्रश्न अतिशय महत्वाचा असून लोकांचा भावनिक झालेला आहे आणि याकरिता बारकाईने लक्ष घालून सर्व सोयी करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी कामे करावीत. केवळ एका अधिकाऱ्यांने काम केलेले नसेल तर सर्वांना दोषी धरुन चालणार नाही. कृपया नोंद घ्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : गेले कित्येक दिवसापासून या प्रश्नावर चर्चा होत आहे आणि लोकप्रतिनिधी नियुक्त येण्यापुर्वी ते आतापर्यंत व यापुढेही या भागासाठी कामाचे जे अधिकारी आहेत तेच अधिकारी करीत आहेत त्यांची इतरत्र बदली नाही. हा प्रश्न आमचा नाही तेव्हा कोणताही अधिकारी यांच्या बाबतीत आपण पाठीशी घालण्याचा प्रयत्न होऊ नये. आपण केवळ निर्णय घ्यावयाचा आणि संबंधित अधिकाऱ्यांनी काम करायचे. व काम न झ ाल्यास आपण पाठपुरावा करायचा. सिल्लेखानाबाबत आता जास्तीची चर्चा न करता एखाद्या नवीन उप अभियंता यांची नव्याने नेणुक करुन त्यांचे ऐवजी अंदाजे एक महिन्यापर्यंत सर्व अंदाजपत्रकासह प्रकल्प तयार करुन काम कसे करण्यात येणार व प्रकरण लवकर निकाली लागेल याचा विचार होणे आवश्यक आहे.

श्री. स. अहमद स. हुसैन : सिल्लेखाना प्रश्नावर अनेक वेळा चर्चा झालेल्या आहेत. तेव्हा विनाकारण चर्चा न करता त्या भागासाठीच्या राहिलेल्या ज्या - ज्या त्रुट्या आहेत त्या विभागवाईज अधिकाऱ्यांची बैठक बोलावून त्या कामासाठीचा लागणाऱ्या खर्चासह एक रिपोर्ट तयार करावा व जर खर्च जास्त येत असेल तर आपल्या बजेटच्या तरतुदीनुसार शासनाकडे विशेष अनुदानासाठी मागणी करुन घेण्याचा पाठपुरावा करावा. यासाठी सर्वांनी सहकार्य करावे तरच प्रश्न सुटण्यास मदत होईल.

श्री. अजिजुल्ला बेग : सिल्लेखाना संदर्भात पडेगाव या ठिकाणी करण्यात येणाऱ्या संपुर्ण सुविधा महानगरपालिकेने योग्य रित्या अद्यापही पुर्ण न केल्याने, यास महानगरपालिका व येथील अधिकारी जबाबदार आहेत. सिल्लेखाना भाग फार जुना असून शहराबाहेरील भाग होता आता त्या ठिकाणी लोकवस्ती झ ालेली आहे. त्यामुळे तेथुन हटविणे साठी प्रयत्न होत आहेत. परंतु त्या लोकांना सर्व सोयी झाल्याशिवाय हटविणे योग्य नाही. यास्तव संबंधित अधिकाऱ्यांनी तेथील कामासंदर्भात काय काय अडचणी येतात काय? किंवा कोणते टेंडर झालेले आहेत याची माहिती जोपर्यंत देत नाहीत तोपर्यंत काम कोठपर्यंत आले हे समजणार नाही.

श्री. अजिज जहागिरदार : सिल्लेखाना हा भाग सध्याचे उप महापौर यांचा वार्ड आहे. ती हलविणेसाठी तर ज्या ठिकाणी हलवायचा आहे तो वार्ड आहे सध्याचे महापौर यांचा तेव्हा यावर जास्त चर्चा न करता या दोन महापौर व उप महापौर यांनी आपसात संगनमत करुन कामास गती देण्याचे प्रयत्न करावे व यापुढे लक्षवेधी सुचना येणार नाही याची दखल घ्यावी.

श्री. रशिद मामु : पहिल्या महापौर पासून ते आजपर्यंत सिल्लेखाना बाबत चर्चा होत आहे की, तेथील पाणी प्रश्न, लाईट, बांधकाम आदि सुविधा पुरविणे बाबत परंतु अद्यापही पुर्ण झालेल्या नाही. त्यामुळे सिल्लेखाना हटलेला नाही. याबाबत काहींच्या भावना दुखावलेल्या आहेत. परंतु डुकरे रस्त्यावरुन फिरतात त्याचे मांस कापुन रस्त्यावर फेकल्या जाते, यामुळे आमच्याही भावना दुखावल्या जातात या डुकरांचे कोंडवाडे आपण तयार केलेले नाहीत, ही मजबुरी आहे. जशी हिंदु धर्माची भावना दुखावते तशीच आमच्याही भावना डुकरे फिरतात त्यावेळी दुखावते. ही बाब योग्य नाही (यावेळी काही स. सदस्य जोरात बोलतात काहीही ऐकु येत नाही) मी काय बोलत आहे ते

माझे म्हणणे एकुण घ्यावे. (यावेळी पुन्हा सेना सदस्य उठून स. सदस्यांनी जातियवाद बोलत असल्याचे सांगतात)

श्री. प्रदिप जैस्वाल,
श्री. गिरजाराम हाळनोर,
श्री. अविनाश कुमावत : स. सदस्यांनी अशा प्रकारचे वक्तव्य करणे योग्य नसुन त्यांनी आपले शब्द मागे घ्यावे.

मा. महापौर : स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, सभागृहात सर्वांनी शांतता राखावी. प्रत्येक स. सदस्यांना बोलण्याचा अधिकार आहे. त्यामुळे स. सदस्य श्री. रशिद मामु काय सांगतात त्यांचे मत ऐकुण घ्यावे.

श्री. रशिद मामु : गेल्या चार वर्षापासून सिल्लेखाना बाबत कार्यवाही चालू आहे. परंतु ती पुर्ण झालेली नाही. त्यामुळे तुमच्या भावना दुखावल्या तशाच तेथील लोकांना पुर्णपणे सुविधा उपलब्ध करुन दिल्या गेल्या नाहीत त्यामुळे त्या भागातील लोकांच्या भावनेचीही कदर करावी असे माझे म्हणणे आहे. आपण अर्थाचा अनर्थ करु नये आपण काय बोलतो ते समजणे अगोदर आवश्यक आहे, की या भागातील लोकांच्या सोयी अद्यापही तयार नाहीत तर त्यांच्या भावनास जबाबदार कोण? यामध्ये खर्चाचे अंदाजपत्रक कमी पडत असल्यास या ठिकाणी आमदार आहेत त्यांनी शासनाकडून आपल्या फंडातून अनुदान मंजुर करुन देण्याची कार्यवाही करावी.

श्री. चंद्रकांत खैरे : सिल्लेखाना संदर्भात वेळोवेळी पाठपुरावा आम्ही सर्व लोक सतत करीत आहोत आणि त्यामुळे ज्या गतीने सरचे काम व्हावे त्या गतीने होताना दिसत नाही तेव्हा या कामासाठीचे संबंधित अधिकारी दोषी कोण याची माहिती द्यावी.

श्री. इकबालसिंग गिल,
श्री. प्रदिप जैस्वाल,
श्री. चंद्रकांत खैरे,
श्री. प्रभाकर विधाते,
श्री. पांडुरंग पैठणकर : आता काही दिवसानंतर निवडणुका येणार आहत त्यामुळे काही लोक गैरफायदा घेण्याची शक्यता आहे. (त्या विधानावर आक्षेप घेतात) अशा प्रकारचे वक्तव्य करणे बरोबर नाही.

श्री. इकबालसिंग गिल : सिल्लेखाना येथील कामकाजाच्या दृष्टिने पडेगाव बाबत ज्या सुविधा अपुर्ण आहेत त्या कामांचे एकंदरीत अंदाजपत्रक तयार करावे आणि या लागणाऱ्या खर्चाचे बाबतीत आमदार हे त्यांचे फंडातून शासनाकडून अनुदान उपलब्ध करुन देणार आहेत तेव्हा लौकरात लवकर कार्यवाही व्हावी.

श्री. पांडुरंग पैठणकर : काम जलद गतीने कसे होणार या संदर्भात एक समिती नेमावी.

श्री. मोतीराम घडामोडे : सिल्लेखाना भागामध्ये जे १०% काम चालू आहे या संदर्भात उप महापौर यांचा वार्ड असल्याने त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन समजुत काढावी व मा. महापौर यांनी या बाबत लवकर कार्यवाही कशी होईल त्या बाबत प्रयत्न करावेत.

मा. महापौर : सिल्लेखाना बाबत अद्यापही काम पुर्ण न होण्याचे कारण काय? तर यास कारणीभुत सर्व नगरसेवक आहेत. सर्व स. सदस्यांनी मिळून स्थायी

समितीला अंदाजपत्रक तयार करुन मंजुरी मिळवून देणेसाठ प्रयत्न केले असते तर कामे करणे सोपे झाले असते.

श्री. फैय्याजखान,

श्री. अविनाश कुमावत : आपण सुचित केल्यानुसार सदरचे काम आपल्या वार्डातील आहे. तेव्हा पुढील काम लवकर कसे होईल याकडे लक्ष द्यावे.

मा. महापौर : याबाबत काय कार्यवाही करता येईल ते आपण सुचित करावे.

श्री. अजिज जहागिरदार : सिल्लेखाना ते पडेगाव या कामाबाबत मा. महापौर व उपमहापौर यांच्या वार्डातील काम असल्याने सर्वस्वी जबाबदारी आपल्या दोघांची आहे. आपण इतर स. सदस्यांना दोष देवू नये.

श्री. चंद्रकांत खैरे : सिल्लेखाना येथील कामाबाबत आणि पडेगाव संदर्भात संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

मा. महापौर : पशुधन विकास अधिकारी यांनी माहिती द्यावी.

मा. उप महापौर : पडेगाव येथील काम किती दिवसात पुर्ण होईल याची माहिती प्रथम घेणे आवश्यक असून त्या कामाचा अंदाज घेऊन सभागृहाने कामकाजाचा सतत पाठपुरावा करण्यासाठी जबाबदारी घ्यावी.

श्री. अविनाश कुमावत : याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी. पडेगाव येथील काम सहा महिन्यात पुर्ण करण्यात येईल अशी जबाबदीर घेऊन कामास लागावे.

पशुधन विकास अधिकारी : माहे एप्रिल ते जुलै ९२ पर्यंत एकुण ३२६८ जनावरांची कटाई करण्यात आली. पडेगाव येथील खाटीक खाण्यासाठी टायर रोड तयार करण्यात आलेला आहे. जनावरे बांधण्यासाठी मोठे शेड तयार केलेले आहेत. त्या ठिकाणी वॉल कंपाऊंड बांधण्यास मा आयुक्तांनी परवानगी दिलेली आहे. पाण्याची सुविधा पुर्ण करण्यासाठी काम चालु असून टेंडर कॉल करुन कामाचे आदेश तयार करण्यात आलेला आहे. १०X२ ली. चे दोन टँक बांधण्यात येणार आहे. आणि दररोज तिन टँकर पाण्याचे ३० हजार लि. पाणी या ठिकाणी सतत पुरवठा केला जात आहे. सध्या स्लाटर हाऊस येथे रस्त्यावर लाईट नसुन त्या ठिकाणी वाढीव पोल बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना कळविण्यात आलेले असून त्यावर लौकरच कार्यवाही होणार आहे. याबाबत मा. आमदार व अति. शहर अभियंता यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना कळविलेले आहे. त्याच्प्रमाणे मुंबईला सुध्दा स्लाटर हाऊसच्या संदर्भात पत्राने कळविण्यत आलेले आहे व केंद्र शासनाकडे याची शिफारीस होऊन रुपये १ कोटी देण्याची मागणी केलेली आहे. त्यामध्ये असे दिसून येते की, ज्यांचा अर्ज प्रथम येईल त्या प्रमाणे विचार होण्याची शक्यता आहे अशी माहिती मिळालेली आहे. त्या अनुषंगाने एक अहवाल तयार करण्यात आलेला आहे. उदा, पाण्याची टाकी, शेड आणि रोड यामध्ये आदी कामांचा समावेश आहे. मनपाने पडेगाव येथे पाच हाडांचे गोडाऊन बांधून दिलेले आहे व त्या दुकानांचे भाडे रु. ३००/- प्रमाणे ठरविण्यात आलेले आहेत. श्हरामध्ये एका ठिकाणी हाडे जमा करतात व एकत्र करुन पडेगाव येथे घेऊन जातात. त्यामुळे सिल्लेखाना येथील हाडा सोबतची जी चरबी असते त्यामुळे त्याचा अधिक वास येतो व त्या वासाने त्या भागातुन जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना त्रास सहन होत नाही. यासाठी

पडेगाव येथुन शिक्का मारलेली जनावरेच कापली जातात. वाहतुकीसाठी दोन गाड्या आहेत. शहरातील मटन दुकाने तपासण्यासाठी मनपाने एक पथक तयार केलेले असून सिल्लेखाना भागात पोलिसांच्या सहकार्याने घरोघरी जाऊन तपासणी होत असते.

श्री. प्रदिप जैस्वाल : शहरात बऱ्याच ठिकाणी उघड्यांवर मांस कापल जाते यावर आपा काय कार्यवाही केली.

पशुधन विकास अधिकारी : शहरातील दुकानदारांनी उघड्यांवर मांस विक्री करु नये असा नियम आहे. त्यानुसार संबंधित अशा दुकानदारांच्या तक्रारीनुसार वेळोवेळी अशा विक्री करणाऱ्या दुकानदारांना ताकिद देण्यात येतात. तरीही काही वेळेस अचानक भेट द्यावयाची ठरल्यास त्यावेळी दुकानदार त्या समोर जाळी लावून बसतात व नंतर काढून घेतात.

श्री. प्रदिप जैस्वाल : बुढीलेन भागामध्ये बरीचशी दुकाने आहेत की, ती दुकाने उघड्यावरच मांस विक्री करतात. त्यांचेवर आपण कार्यवाही का करित नाही. त्यांचे लायन्सेंस जप्त का होत नाही? हिंदु धर्माच्या लोकांना अशा उघड्यावरील दुकानांने व एखाद्या वेळी मांस रसत्यावर पडलयास शहरात तणाव होण्याची शक्यता आहे. यासाठी आपण नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

पशुधन विकास अधिकारी : या संदर्भात कार्यवाही चालू आहे. प्रत्येक वहॅन सोबत एका गार्डची व्यवस्था करण्यात आली आहे.

श्री. अविनाश कुमावत : रक्त व हाडे ही मनपाच्या मालकीची असतात काय? कार मुंबई मनपाकडे तशी व्यवस्था आहे.

पशुधन विकास अधिकारी : रक्ताच्या संदर्भात ८/१० महिन्याच्या करारावर आपण देत असतो. मुंबई येथे स्वत:चे मालकीचे कर्मचारी कामावर असतात. आपल्याकडे तशी व्यवस्था नाही.

श्री. मुजिब आलमशा खान : शहरामध्ये बऱ्याच भागासाठी सर्व्हे झालेला नसल्याने कामांचे अदांजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. माझ्या भागाकडे ठिकाणी जागा उपलब्ध आहे त्या बाबत कार्यवाही व्हावी.

श्री. अजिजुल्ला बेग : सिल्लेखाना येथे गार्डची व्यवस्था व्हावी.

मा. महापौर : या संदर्भाचा प्रस्ताव आजच्या विषय पत्रिकेत आहे.

श्री. अजिजुल्ला बेग : कमीत कमी शंभर कर्मचारी राहतील अशी व्यवस्था त्या ठिकाणी करण्यात यावी.

पशुधन विकास अधिकारी : जी दुकाने उघड्यावरती आहेत त्यांचे बाबतीत तक्रारी असल्यास पोलीस व त्या भागातील नगरसेवक यांचे ना हरकत प्रमाणपत्र असलस आपण परवानगी देतो.

श्री. गंगाधर गाडे : शहरामध्ये किती दुकानदारांना नियमाप्रमाणे लासेंस दिलेले आहेत याची माहिती द्यावी.

पशुधन विकास अधिकारी : साधारणत: २०० लोकांना लायसेंस दिल्या गेलेले आहे.

श्री. गंगाधर गाडे : माझ्या माहितीप्रमाणे शहरात बऱ्याच ठिकाणी कोणताही परवाना किंवा लायसेंस न काढता दुकाने चालविल्या जात आहेत. त्यांचेवर काय कार्यवाही होत नाही.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांना विनंमती करण्यात येते की, सिल्लेखाना हा मुख्य प्रश्न असून या संदर्भात काय करायचे यावर आपले मत मांडावे.

श्री. प्रदिप जैस्वाल : या संदर्भात एका महिन्याचा कालावधी ठरवून संबंधित अकािऱ्यांना काम पुर्ण करण्यास सांगावे. त्यांचेकडून काम योग्य रित्या पार न पडल्यास त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री. मुजिब आलमशा खान : ज्या भागामध्ये दुकाने नाहीत आणि उघड्यावरती दुकाने बसलेली आहेत. यासाठी काही भागामध्ये जागेच्या संदर्भात सर्व्हे करुन अंदाजपत्रकासह दुकाने बांधण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. रशीद मामु : जी शहरातील दुकाने विना परवाना सध्या अस्तित्वात आहेत आणि त्यांनी जर परवानगीसाठी अर्ज केलेला असल्यास त्यांना नियमाप्रमाणे लायसेंस देण्याची कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार सिल्लेखाना बाबत कामांची सुधारणा व सोयी करुन घेण्यासाठी एक महिना अवधी अपुरा पडतो तर त्याऐवजी तीन महिन्याचा अवधी द्यावा.

श्री. चंद्रकांत खैरे : ठिक आहे. तीन महिन्याचा कालावधी दिला तरी हरकत नाही. परंतु सिल्लेखाना भाग संपुर्णपणे शिफ्ट होईल याची काळजी घ्यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : पशुधन विकास अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे सर्व कामास मंजुरी मिळालेली आहे. आता त्या सर्व कामांची त्वरीत कार्यवाही करण्यास आदेश देवून इतिवृत्तास मंजुरी द्यावी.

श्री. अलफखान : जी कामे या भागासाठी करावयाची आहेत त्या सर्व कामांची पाहणी करुनच पुढील कार्यवाही व्हावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रत्येक कामाप्रमाणे अंदाजपत्रकात तरतुद असते त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्री. चंद्रकांत खैरे : स. सदस्य श्री. अलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणे त्या कामांची पडताळणी करुनच निर्णय घ्यावा.

श्री. धनंजय गंगाखेडकर : स. सदस्य श्री. चंद्रकांत खैरे यांनी सुचित केल्याप्रमाणे तीन महिन्याचा कालावधी ठरवुन तेथील सर्व सुविधा उपलब्ध करुन संपुर्ण भाग शिफ्ट करण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. अलफखान : जास्त घाई न करता कोणकोणत्या विभागांची कामे अर्धवट आहेत त्या विभागांच्या कामानुसार त्यांचे अंदाजपत्रकात काय तरतुद आहे त्याची पडताळणी करुनच पुढील सभेत माहिती द्यावी.

श्री. धनंजय गंगाखेडकर : सिल्लेखाना (कत्तलखान्यात) जे कामगार कर्मचारी वगैरे असतील त्यांना पुरेसे आर्थिक सहाय्य किंवा निवासाची व्यवस्था व इतर लागणऱ्या बाबी पडताळुन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

श्री. चंद्रकांत खैरे : तिन महिन्याचा कालावधी सिल्लेखाना येथील कामांच्या संदर्भात ठेवावे परंतु ते काम एवढ्या जलद गतीने होणार नसुन यावर एका अधिकाऱ्यांची पुन्हा देखरेखीसाठी नियुक्ती करुन काम त्वरीत करण्याबाबत आज निर्णय घेण्यात यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय,
श्री. रशिद मामु : ठिक आहे. आता जास्त चर्चा न करता त्वरीत निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : सिल्लेखाना भागातील व पडेगाव कत्तलखान्या संदर्भात जे शिल्लक काम आहे आणि ज्याबाबत काम सध्या चालू आहे ते चालूच ठेवावे. परंतु जलद गतीने काम होण्यासाठी संबंधित अधिकारी यांना सुचना देण्यात

येतात त्याप्रमाणे त्यांनी योग्य ती दखल घेऊन पुढिल कामास सुरुवात करावी.

श्री. चंद्रकांत खैरे : या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी जकात अधिक्षक यांची विशेष अधिकारी म्हणून नेमणूक व्हावी.

श्री. गंगाधर गाडे : संबंधिताकडे चार्ज देण्यात यावा.

मा. महापौर : सदरचे काम प्रशासनाचे असून याबाबत प्रशासन कसे कामे करवून घ्यायचे ते ठरवितील.

श्री. मुजिब आलमशा खान,

श्री. रशिद मामु : तेथील काम करणाऱ्या कामगाराबाबत निर्णय घेऊन ज्या अधिकाऱ्यांची नावे सुचवितील त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : स. सदस्य आपण सुचित करतात ते नाव योग्य नसुन अशा कामासंदर्भात तांत्रिक ज्ञान असणाऱ्या अधिकाऱ्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

श्री. मुजिब आलमशा खान : आपल्याश् शहरामध्ये ड्रेनेज/रस्ते/पाणी आदीाबबत सर्व कामे फेल ठरलेली असून तांत्रीक अधिकाऱ्याकडून कोणतीही कामे यशस्वी झालेली नाहीत.

श्री. प्रदिप दत्त : या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी मनपाचे सचिव यांना अनुभव दांडगा असून त्यांची या कामी नियुक्ती व्हावी.

श्री. चंद्रकांत खैरे : सभागृहात आपण जकात अधिक्षक यांचे बाबत आदेश द्यावा. ते दोन्हीही काम सांभाळतील.

मा. महापौर : आपण सर्वांनी जो निर्णय घेण्यास सुचवाल त्याप्रमाणे आदेश देता येईल.

श्री. अजिज जहागिरदार : जकात अधिक्षक यांचेवर काम सोपविण्यापेक्षा उप आयुक्त आहेत त्यांचेवर ही जबाबदारी टाकण्यात यावी किंवा उप आयुक्तांनी दोन पदे भरण्यात यावी व त्यांना अशा कामांची विभागणी करुन देण्यात यावी.

मा. महापौर : सर्व स. सदस्याच्या सुचनेनुसार पडेगाव येथील कत्तलखाना कामांचे संदर्भात तीन महिन्यापर्यंत राहीलेली कामे पूर्ण करण्यात येतील. या कामांची जलद गतीने सुरुवात व्हावी. यावर विशेष लक्ष ठेवण्यासाठी म्हणुन जकात अधिक्षक यांची नेमणुक करण्यात येते. त्यांनी ते काम कसे लवकर साध्य होईल याकडे लक्ष ठेवून कामास सुरुवात करावी.

श्री. प्रदिज जैस्वाल : महानगरपालिकेच्या निवडणुकांचे काम करण्यास ज्या कर्मचाऱ्यांनी भाग घेतलेला आहे त्या कर्मचाऱ्यांना अद्यापही कोणताही लाभ दिल्या गेलेला नाही यासाठी अशा कर्मचाऱ्यांना विशेष बाब म्हणून दोन वार्षिक वेतनवाढी देण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे. देण्यास मंजुरी.

श्री. धनंजय गंगाखेडकर : बन्सीलाल नगर येथील कोंडवाड्यातुन दोन गायी चोरीला गेल्याचे समजते तेव्हा याबाबत जबाबार कोण याची माहिती द्यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

श्री. तकी हसन खान : गायी किंवा चामडे चोरिला जाणे म्हणजे तेथील कामावरील चौकीदारास जबाबदार अधिकारी नाही.

मा. महापौर : याबाबत संबंाति अधिकारी माहिती देतील आणि त्यानंतर आपल्याला काय सुचना करावयाची ती करावी.

श्री मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सदस्य श्री. तकी हसन खान यांना बोलण्यास संधी द्यावी.

मा. महापौर : अगोदर संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी. त्यानंतर स. सदस्यांनी सुचना कराव्यात.

श्री. तकी हसन खान : मला बोलण्याची संधी का देत नाही?

मा. महापौर : मी अगोदरच सुचित केले आहे की, संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी. त्यानुसार अधिकाऱ्यांनी माहिती दिल्यानंतर आपण आपले मत मांडावे परंतु तत्पूर्वी जर आपण बोलणार तर इतिवृत्तात आपण बोलण्याची नोंद होणार नाही.

सहाय्यक आयुक्त-२ : झोन क्र. ६ च्या अधिकारान्वये त्यांनी दिलेल्या रिपोर्ट नुसार बन्सीलाल नगर कोंडवाड्यातील गायी चोरी प्रकरणी संबंधित काम करणाऱ्या चौकीदारास निलंबीत करण्यात आले आहे.

श्री. धनंजय गंगाखेडकर : परंतु तेथील जनावरे चोरीला गेलीत त्याचे काय? आपण मनपातर्फे काही नुकसान भरपाई देणार काय?

श्री. तकी हसन खान : कोंडवाड्यातील वॉचमन निलंबीत केले परंतु कोंडवाड्यातील जनावरे जर दरवाजे तोडून पळुन जात असतील किंवा एखाद्या चोरांनी दरवाजे तोडून गायी पकडून नेल्या त्यास मनपा जबाबदार आहे काय?

श्री. मुजिब आलमशा खान : ती जनावरे मनपाने पकडून नेल्याने, त्यास मनपाच जबाबदार आहे.

श्री. अजिज जहागिरदार : ज्या चौकीदारास निलंबीत केले त्याचें सभागृहात नाव सांगावे आपण कुणास निलंबीत केले त्या दिवशी तेथील चौकीदार सुट्टीवर होता तेव्हा त्याचे जागी दुसऱ्या कर्मचाऱ्यास कामाचा आदेश दिलेला होता तेव्हा कोणत्या कर्मचाऱ्यास आपण निलंबत केले याची माहिती द्यावी.

मा. महापौर : याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

सहाय्यक आयुक्त : झोन - ६ चे अधिकारी यांचे रिपोर्ट प्रमाणे कोंडवाड्याचे चौकीदारांची प्रत्येक दिवशी आठ-आठ तासाची बदलती ड्युटी असते. त्यावेळी जो कर्मचारी कामावर नसेल त्यास निलंबीत केलेले आहे.

श्री. मुजिब आलमशा खान,
श्री. रशिद मामु : याबाबत योग्य ती चौकशी करुन कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : याबाबत उप आयुक्त यांनी संपुर्ण चौकशी करुन पुढील बैठकीत सविस्तर माहिती द्यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल,
श्री. धनंजय गंगाखेडकर : संबंधित अर्जदाराने विनंती पत्र दिलेले आहे. तेव्हा त्यांच्या गायी परत मिळणेसाठी आपण काही मदत द्यावी.

मा. महापौर : ठिक आहे. पुढील बैठकीत माहिती मिळाल्यानंतर कार्यवाही होईल.

श्री. चंद्रकांत खैरे : शहरातील विविध वार्डातील अनेक तक्रारी आहेत. बरेचसे रस्ते नादुरुस्त असून डांबरीकरण केलेले नाहीत ज्या ठिकाणी डांबरीकरण झालेले आहेत ते ही रस्ते खराब झालेले आहेत. खड्डे पडलेले आहेत त्यामुळे

नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा करावी.

मा. महापौर : स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे शहरातील ही जी परिस्थिती आहे ती सत्य आहे. त्यामुळे खुलासा करण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री. अजिज जहागिरदार : बऱ्याच ठिकाणी कच्चे रस्ते पडलेले आहेत काही ठिकाणी अतिक्रमण होतात त्यामुळे रस्ता रुंदीकरण करण्यात अडचणी येतात. यासाठी शहरातील वाढती रहदारी लक्षात घेता रुंदीकरण करुन डांबरीकरण होणे आवश्यक आहे.

मा. महापौर : आपण सुचित केल्याप्रमाणे ज्या रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करावयाचे आहेत त्यांची नावे द्यावीत त्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सुचना देवून कामे जलद होण्यास मदत होईल परंतु या कामी कुणीही अधिकारी दिरंगाई किंवा दोषी आढळल्यास त्यांचेवर कार्यवाही होईल.

(लक्षवेधी सुचनांची चर्चा संपली)

विषय क्र. ३२/२ : स्थायी समिती ठराव क्र. १८ दिनांक २३/६/९२ अन्वये सन १९९२-९३ वर्षाकरिता पाणी पुरवठा २,३ व स्लम विभागातर्फे विविध ठिकाणी टाकण्यात येणाऱ्या जलवाहिनीचे कामासाठी लागणारे स्लुसव्हॉल्व खरेदी करण्याकरिता रक्कम रुपये १३,६६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : मंजुर

ठराव क्र. ३२/२ : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र. १८ दिनांक २३/६/९२ अन्वये सन १९९२-९३ वर्षाकरिता पाणी पुरवठा १,२,३ व स्लम विभागातर्फे विविध ठिकाणी टाकण्यात येणाऱ्या जलवाहिनीचे कामासाठी लागणारे स्लुस व्हॉल्व खरेदी करण्याकरीत रक्कम रुपये १३,६६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३३/३ : कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९२-९३ वर्षासाठी पाणी पुरवठा विभाग क्र. १,२ व ३ व स्लम विभागा अंतर्गत टाकण्यात येणऱ्या जलवाहिनीच्या कामाकरिता सी.आय. पाईप्स खरेदी करणे आहे.

सदरील पाईप्स खरेदीच्या रक्कम रुपये ८२,०७,८००/- च्या अंदाजपत्रकास मा आयुक्त यांनी दिनांक ११/४/९२ रोजी मंजुरी दिलेली आहे.

तरी र. रुपये ८२,०७,८००/- च्या सी.आय. पाईप्स खरेदी करणेच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

संवाद

श्री. अविनाश कुमावत : प्रस्तावात दर्शविलेले अंदाजपत्रक रुपये ८२ लाखाचे आहे तर शिल्लक खर्चासाठी अनुदान आहे काय?

श्री. प्रदिप जैस्वाल : संबंधित विभागाचे अंदाजपत्रक संपलेले असल्यास इतर लेखा शिर्षमधुन या कामासाठीची तरतुद करण्यात यावी कारण आज शहरातील ड्रेनेज बाबतची परिस्थती अत्यंत खराब झालेली आहे. यासाठी आपण तशी व्यवस्था करवुन घेण्यास सुचना देवून मंजुरी द्यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर: पाणी पुरवठ्या कामाबाबतचे अंदाजपत्रक शिल्लक असल्यास तो खर्च या कामासाठी खर्च करावा कारण शहरातील ड्रेनेज बाबतची परिस्थती अत्यंत नाजुक आहे.

श्री. अजिज जहागिरदार : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभाग क्र. १,२,३ म्हणजे नेमके काय याची माहिती द्यावी.

मा. महापौर : उप आयुक्त यांनी माहिती द्यावी.

मा. उप आयुक्त : प्रशासकीय अंदाजपत्रकामध्ये पाणी पुरवठा १,२, व ३ असा भाग पाडलेला आहे. या बाबतची सविस्तर माहिती घ्यावयाची असल्यास संबंधित अधिकारी देतील.

श्री. अजिज जहागिरदार : पाणी पुरवठा विभाग क्र. १,२,३ मध्ये सिडको हउको भाग येतो काय? जर येत असल्यास स. सदस्य श्री. मोतीराम घडामोडे यांनी मागे सुचित केलेले होते की, सिडको हडकोतील नागरीक टॅक्स भरीत नाही. तेव्हा जोपर्यंत ते टॅक्स मनपाकडे भरीत नाही तर आपण सिडकोला पाणी पुरवठ्याची व्यवस्था करण्यासाठी योजना कशाला अखावयाची अगोदर टॅक्सेस भरु द्यावेत नंतरच कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर** : सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. ३३/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९२-९३ वर्षासाठी पाणी पुरवठा विभाग क्र. १,२, व ३ स्लम विभाग अंतर्गत टाकण्यात येणाऱ्या जलवाहिनीच्या कामाकरिता सी.आय. पाईप्स खरेदी करीता रक्कम रुपये ८२,०७,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४/४ :** सहाय्यक आयुक्त - २ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कत्तलखाना पडेगाव व शाहाबाजर या दोन्ही ठिकाणी जनावरे हलाल करण्यासाठी दोन मुल्लाची आवश्यकता आहे. जेणे करुन शहरात खात्रीने हलाल केलेल्या जनावरांचे मास मिळेल. महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकेत मुल्लाची नेमणुक केली आहे काय याबाबत माहिती मागविण्यात आली असता मुंबई, पुणे महानगरपालिकेतील अशी नेमणूक करण्यात आली आहे. तरी या महानगरपालिकेतील मुल्लाची दोन पदे वर्ग-४ मध्ये रुपये ८२५-१५-९००-इबी-२०-१२०० या वेतनश्रेणीत निर्माण करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर. या पदासाठी अर्हता "हाफीज" किंवा "आलीम" असणे जरुरीचे आहे व त्यांना जनावरे हलाल कशा रितीने करायचे याची जाणीव असणे जरुरीचे आहे.

**<u>संवाद</u>**

श्री. प्रदिप जैस्वाल : ज्याप्रमाणे मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी हे काम करतात. त्याप्रमाणे या प्रस्तावास अनुसरुन ही पदे भरल्यानंतर कत्तलखान्यातील रक्त व साचणारी हाडे हे मनपाच्या मालकीच्या राहतील किंवा नाही याची माहिती द्यावी.

श्री. तकी हसन खान : मुंबई मनपामध्ये कर्मचारी जास्त आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी कर्मचारी व्यवस्था करतात. या ठिकाणी कर्मचारी नाहीत त्यामुळे या सामानाची व्यवस्था होणार नाही.

श्री. बंडू प्रधान : माझ्या वार्डात खाटीक काम करणारे व्यक्ती आहेत.

श्री. रशीद मामु : ज्या कर्मचाऱ्यांना या बाबतची ट्रेनिंग किंवा ज्ञान आहे अशांनाच घेण्यात यावे.

सौ. लता दलाल : प्रस्तावात हाफिज किंवा अलिम असे नाव नमुद केले आहे. ही शैक्षणिक अर्हता म्हणजे काय? याचे मराठीत अनुवाद करुन माहिती द्यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

पशुधन विकास अधिकारी : हाफिज किंवा आलिम असा मराठीत नेमका शब्द नाही. परंतु कुर्रानला जो आठवतो (मुखपाठ करतो) त्या हाफिज संबोधावे व इस्मीयतचा कोर्स आहे. ते पास झाले म्हणजे त्याला अलिम म्हणतात.

मा. महापौर : मंजुर.

**ठराव क्र. ३४/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कत्तलखाना पडेगाव व शहाबाजार या दोन्ही ठिकाणी जनावरे हलाल करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेत दोन पदे वर्ग - ४ मध्ये वेतन श्रेणी ८२५/१५/९०० इबी२०/१२०० या श्रेणी ज्याची शैक्षणिक अर्हता "हाफिज" किंवा "आलिम" असावे व जनावरे हलाल करण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५/५ :** मुख्य लेखापरिक्षक औरंगाबाद महानगरपालिका ह्यांनी प्रस्ताव सादर केला ओह की, श्री. सतिश त्रिपाठी मा. सचिव नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे अशासकीय पत्र क्रमांक जी इ.एन. १०९२/९-८९ व क्र. ७३/९२ दिनांक ५ जून १९९२ अन्वये महाराष्ट्र राज्य स्थित सर्व महानगरपालिका प्राधिकारणास आवाहन केले आहे की,

स्थानिक स्वराज्य संस्थामधील पदाधिकारी व अधिकारी यांना प्रशिक्षण देणेसाठी नागरी समस्या व नियोजन या बाबत सल्ला, संशोधन व विचारांचे आदान प्रदान घडवून आणणेसाठी एक स्वतंत्र राज्य स्तरीय संस्था प्रस्थपित करण्यात यावी. तद अनुषंगाने दिनांक १५/५/९२ रोजी शासनाच्या मुख्य सचिवांच्या अध्यखतेखाली पार पडलेल्या सुकाणु समितीच्या बैठकीत सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. सदरील स्वतंत्र राज्य स्तरीय "महाराष्ट्र राज्य नागरी नियोजन व व्यवस्थापन संस्था" प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेत सर्व महापालिकांचा सहभाग असावा आणि त्यासाठी त्यांनी त्यांचे वार्षिक उत्पन्नाच्या १ टक्के एवढी रक्कम आगामी ५ वर्षात समान हप्त्यात अदाई करणे संबंधी दिनांक ७ मे १९९२ रोजी मा. नगर विकास मंत्री यांचे अध्यक्षतेखाली पार पाडलेल्या बैठकीत समस्त महानगरपालिकांच्या मा. महापौर व मा. आयुक्तांनी संमती दर्शविली आहे.

प्रस्तावित पत्रान्वये मा. सचिव नगर विकास विभाग यांनी र. रु. ४०.०० लाख पाच वर्षीय कालावधीत द्यावेत असे आवाहन केले आहे. परंतु औरंगाबाद महानगरपालिकेचे वार्षिक उत्पन्न रुपये २०.०० कोटी पाहता सदरचे संस्था स्थापनेसाठी रक्कम रुपये ४०.०० लक्ष (२ टक्के) देणगी देणे मनपास शक्य होणार नाही. असे यापुर्वीच शासनास कळविले आहे. तरी औरंगाबाद महानगरपालिकेने आपल्या वार्षिक उत्पन्नातून १

टक्के म्हणजेच रुपये २० लक्ष प्रतिवर्षी रुपये ४.०० लाखाप्रमाणे अंशदान देणेस प्रस्ताव केले आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. ३५/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सचिव, नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांचे अ.शा.पत्र क्र. जीइएन-१०९२/९-८९५ प्र.क्र. ७३/९२ दि. ५ जुन ९२ नुसार मनपास आवाहन केल्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थामधील पदाधिकारी व अधिकारी यांना प्रशिक्षण देणेसाठी एक राज्यस्तरीय संस्था स्थापीत करण्यास महाराष्ट्र राज्य नागरी नियोजन व व्यवस्थापनासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यखतेखाली सुकाणु समितीच्या बैठकीस मान्यता मिळाली. या प्रक्रियेस महाराष्ट्रातील सर्व मनपाचा सहभाग असणे जरुरीचे असल्याने यासाठी त्यांचे वार्षिक उत्पन्नाच्या १ टक्क्यांनी एवढी रक्कमे प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे वार्षिक उत्पन्न रुपये २० कोटी पाहता रुपये २० लाख या प्रमाणे रुपये ४.०० लाखाप्रमाणे प्रतिवर्षी सदरील संस्थेस अंशदान देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## "पुरवणी विषय पत्रिका"

**विषय क्र. ३६/१ :** सिडको प्रशासन व महानगरपालिका प्रशासन यांच्यात सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याबाबत शासकिय पातळीवर कार्यवाही चालू आहे. या प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाने सर्वसाधारण सभेला विश्वासात घेतलेले नाही.

यापुर्वीच सिडकोचा पाणी पुरवठा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. पाणी पुरवठा हस्तांतरणाचे वेळी सिडकोने महानगरपालिका प्रशासना सोबत करार केलेला होता. त्या करारानुसार ठरलेल्या अटी प्रमाणे सिडको प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळै महानगरपालिकेला सिडकोच्या पाणी पुरवठ्यात आर्थिक झळ सोसावी लागत आहे.

म्हणून सिडकोचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे करतांना सर्वसाधारण सभेला जो पर्यंत विश्वासात घेतले जाणार नाही तोपर्यंत महानगरपालिका आयुक्तांनी सिडको प्रशासनाशी कुठल्याही प्रकारचा करार करु नये.

सुचक :- श्री. रतनकुमार पंडागळे.
अनुमोदक :- श्री. तकी हसन खाँ कासिम हसन खाँ
श्री. बंडू गोविंदराव प्रधान
दिनांक :- १०.७.१९९२

<u>**संवाद**</u>

**श्री. प्रदिप जैस्वाल** : कोणताही करार करावयाचा झाल्यास सभागृहाला विश्वासात घेऊन करावे असा महापालिकेचा नियम आहे.

**मा. महापौर** : ठिक आहे.

**ठराव क्र. ३६/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको प्रशासन व महापालिका प्रशसन यांच्यात सिडकोचे महानगरपालिका प्रशासन यांच्यात सिडकोचे हसतांतर करण्याबाबत शासकीय पातळीवर कार्यवाही चालू आहे. म्हणून सिडकोचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे करतांना

सर्वसाधारण सभेला जोपर्यंत विश्वासात घेतले जात नाही तोपर्यंत महानगरपालिका आयुक्तांनी सिडको प्रशासनाशी कुठल्याही प्रकारचा करार करु नये असे सर्वानुमते ठरवून मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७/२ :** मिल कॉर्नर ते मध्यवर्ती बस स्थानक या सार्वजनिक रस्त्यांचे कडेला फुटपाथवर दर वर्षी तिबेटी (नेपाळी) लोकांना स्वेटर विक्रीसाठी महानगरपालिकेमार्फत जागा भाड्याने देण्यात येते. सदर लोक महापालिकेत आगाऊ रक्कम भरुन जागा भाडयाने घेतात व त्यांचा हा व्यवसाय साधारणत: ६ ते ८ महिने चालतो.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, या वर्षी महानगरपालिकेने या जागी अन्य लघु उद्योजकांना टपऱ्या टाकणेस रितसर परवानगी दिली आहे. परिणामी स्वेटर विक्रेत्यांना या जागी पुढील हंगामात स्वेटर विक्रीची दुकाने चालविण्यास परवानगी नाकारली जाईल अशी दाट शक्यता आहे. सालाबादाप्रमाणे याही वर्षी तिबेटी विक्रेत्यांना मिल कॉर्नर ते मध्यवर्ती बस स्थानक या जागी स्वेटर विक्रीची दुकाने चालविण्यास रितसर परवानगी देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक :- श्री. प्रदिपकुमार जैस्वाल
अनुमोदक :- श्री. प्रभाकर विधाते.
दिनांक :- ३/७/९२

<u>**संवाद**</u>

श्री. अजिज जहागिरदार : शहरात वास्तव्य असलेल्या नागरिकांना आपण प्राधान्य द्यावे त्यांचा तो हक्क आहे. बाहेरील व्यक्तींना आपण विचारार्थ घेऊ नये ज्या ठिकाणचे अतिक्रमणात घरे पाडल्या जातात त्यांच्या बाबतीत विचार व्हावा.

श्री. बंडू प्रधान : अफगानीस्थानचे २० लाख लोक दिल्लीत वास्तव्य करुन राहतात आणि ते सोडून जाण्यास तयार नाही त्यामुळे यांचा विचार होऊ नये. अनधिकृत टपऱ्या काढून या ठिकाणी बसविण्यात याव्यात.

श्री. प्रदिप जैस्वाल : तिबेटी लोक व्यवसायासाठी या ठिकाणी आलेले आहेत आणि महापालिकेस ६ ते ८ महिन्याची आगाऊ रक्कम देतात त्यामुळे इतरांनी अतिक्रमण करण्यापेक्षा या लोकांकडून भाडे वसुली होते व महापालिकेस उत्पन्न मिळते. यासाठी प्रस्ताव मंजुर व्हावा.

श्री. अजिजुल्ला बेग : काही टपऱ्या त्या ठिकाणी बसलेल्या आहेत त्यांना नियमानुसार परवानगी दिलेली आहे काय? आणि या तिबेटी कडून ७ ते ८ महिन्याचे भाडे रु. ८०-९० हजार उत्पन्न महापालिकेस वार्षिक मिळते तेव्हा आयुक्तांना रु. ३०००/- पेक्षा जास्त उत्पन्न भाडे आकारणी करावयाची असल्यास तो अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. तो आयुक्तांना नाही याचा खुलासा करावा.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. सदरची बाब प्रशासनाची आहे. ते निर्णय घेतील.

मालमत्ता अधिकारी : सदरल जागेवर तिबेटी लोकांव्यतिरिक्त इतर कुणालाही भाड्याने जागा दिलेली नाही. माहे सप्टेंबर पर्यंत या लोकांकडून भाडे घेतलेले होते पुढील प्रोसेस आता पुन्हा सुरु होईल.

मा. महापौर : मंजुर.

**ठराव क्र.३७/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिल कॉर्नर ते मध्यवर्ती बस स्थानक या सार्वजनिक रस्त्याच्या कडेला फुटपाथवर दरवर्षी तिबेटी (नेपाळी) लोकांना स्वेटर विक्रीसाठी जागा भाड्याने घेऊन दुकाने चालविण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८/३ :** हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यात प्राणार्पण करणाऱ्या महान देश भक्तात या शहरातील क्रांतीकारक, हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे यांचा समावेश होता. वयाच्या १८ व्या वर्षी हसत हसत फासावर चढलेल्या ह्या अमर हुतात्म्याचे उचित स्मारक ह्या शहरात होणे आवश्यक आहे. ते आजच्या तरुण पिढीस प्रेरणादायी ठरेल. हुतात्मा अनंत आनहेरे यांचे यांचे वास्तव्य सराफा भागात होते. नगर परिषदेने शहर पोलीस स्थानका समोरील चौकात हुतात्मा अनंत कान्हेरे चौक असे नांव दिलेले आहे. तसा नाम फलक देखील या चौकात बसविलेला होता. परंतु सदर नाम फलक आता अस्तित्वात नाही.

शहर पोलीस स्थानकासमोरील चौकात हुतात्मा अनंत कान्हेरे यांचा पुर्णकृती पुतळा उभारण्यात यावा व या चौकास हुतात्मा अनंत कान्हेरे चौक असे नाव देऊन तसा नाम फलक वरील चौकात पुर्ववत बसविणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : १)श्री. अविनाश कुमावत
२) श्री. जयवंत के. ओक
अनुमोदक : १) श्री. गिरजाराम हाळनोर
२) श्री. महादेव सुर्यवंशी
दिनांक : १५/७/९२

संवाद

श्री. रशीद मामु : सदरील प्रस्ताव शॉ सिराज रोड नावाने नगर परिषद काळात मंजुर झालेला आहे. हे हिंदुस्थानचे सुप्रसिध्द उर्दुचे शायर होते आणि याची खबर काळ्या दरवाजाकडे आहे तेव्हा त्याचे नावाचा अद्यापही बोर्ड असून आपण पुन्हा दुसऱ्या नावाचा प्रस्ताव मंजुर करण योग्य नाही.

श्री. रमेश छापरवाल : सिटी चौक ते कामाक्षी लॉज पर्यंतच्या रोडसाठी शॉ सिराज रोड असा मार्ग आहे सराफा ते चौकसाठी कान्हेरे चौक असे आहे.

श्री. रशिद मामु : प्रस्ताव मंजुरम करु नये या चौकात मी सांगितल्या प्रमाणे पाटी आहे.

श्री. तकी हसन खान : अगोदर शहरात किती पुतळे बसवायचे कोणकोणत्या ठिकाणी बसवायचे याची माहिती द्यावी आणि ठरावाचे रेकॉर्ड पहावे.

मा. महापौर : स. सदस्य आपल्याला सुचवू इच्छितो की, सदरचा प्रस्ता अगोदर मंजुर झालेला आहे.

श्री. रशिद मामु : रंगार गल्लीचा रोड रुंद करुन घ्यावा. नंतरच नाव व पुतळा बसविण्यात यावा.

श्री. प्रदिप जैस्वाल : हा प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. रशिद मामु : नाही प्रस्ताव मंजुर करु नये.

सौ. लता दलाल : संपूर्ण देशभरात ९ ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा झ ालेला आहे. आणि त्याच धर्तीवर हा प्रस्ताव आहे. स्व. कान्हेरे यांनी

देशासाठी प्राणची आहुती दिली आणि त्यांचे वासतव्य याच रोडवर होते त्यावेळी त्यांचे सोबतचे काही मंडळींनी त्यांचे नावाचे फलक त्या ठिकाणी लावलेला आहे. त्यावेळी नगर परिषद होती किंवा नाही याची कल्पना नाही परंतु अशा थोर क्रांतीकारकाच्या प्रस्तावास विरोध न होता एक मताने मंजुरी द्यावी.

मा. महापौर : स. सदस्य री. रशिद मामु यांचा पुतळ्याचा प्रस्तावास विरोध नसुन त्यांचे काय म्हणणे आहे ते ऐकुण घ्यावे.

श्री. तकी हसन खान : प्रस्ताव मजुर करु नये. सदरचा भाग हा माझ्या वार्डालगत असल्याने माझी सही असल्याशिवाय मंजुरी देवू नये. जर त्या ठिकाणी पुतळा बसविला तर त्या ठिकाणी तणाव होण्याची शक्यता आहे कारण आजुबाजुला मुस्लिम वस्ती व मस्जिद आहे.

श्री. अजिजुल्ला बेग : सदरचा प्रस्ताव वगळण्यात यावा व रेकॉर्ड तपासून घ्यावे.

श्री. प्रदिप जैस्वाल : प्रस्ताव मंजुर व्हावा अन्यथा पोल घ्यावे. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा तणाव होणार नाही. (यावेळी सेनेचे स. सदस्य पोल पोल असे ओरड करतात)

श्री. रशिद मामु : स. सदस्यांना माहित नाही. शॉ सिराज हे हिंदुस्थानातील १ ले उर्दु शायर असल्याने त्यांच्या नावाचा रोडसाठी नगर परिषदेत प्रस्ताव मंजुर झालेला आहे. आम्हाला कोणतेही नाव देण्यास विरोध नाही परंतु त्या वेळेसचे जुने कार्यकर्ते आहेत त्यांचेशी विचारणा करावी आणि पुतळे बसविणे म्हणजे झाले असे नाही तर योग्य ती व्यवस्था व निगराणी ठेवणेसाठी प्रत्येक पुतळ्याजवळ एक चौकीदार ठेवावे.

श्री. अजिज जहागिरदार : स. सदस्य, श्री. अलफखाफंन यांना सुपंर्ण माहिती आहे. त्यांना बोलू द्यावे.

श्री. अलफखान : शॉ सिराज नावाने त्या चौकाचे नामकरण झालेले आहे असा ठराव पास आहे आणि आपण त्याच जागेवर दुसरा ठराव करणे योग्य नसुन इतर ठिकाणी नाव देण्याबाबत विचार करावा.

मा. महापौर : संबंधित चौकास कुणाचे नाव आहे या बाबतचा रेकॉर्ड तपासुन सभागृहात माहिती देण्यात येईल आणि नंतर कार्यवाही करणेत येईल.

श्री. प्रदिप जैस्वाल,
श्री. जयवंत ओक : आम्हाला या विषयावर पोल मागण्याचा अधिकार आहे. पोल द्यावा सर्वानुमते प्रस्ताव मंजुर व्हावा अशी आमची इच्छा आहे. जर काही विरोध होत असेल तर पोल द्यावा.

श्री. धनंजय गंगाखेडकर : एका क्रांतीकारकाच्या पुतळ्यासाठी सभागृहात फार मोठ्या प्रमाणात चर्चा होणे ही बाब योग्य वाटत नाही. ते फार मोठे क्रांतीकारक होते. एका कलेक्टरचा नाशिक मध्ये जाऊन त्यांनी खुन केला त्यामुळे त्यांना फाशी झाले. त्यांचे देशासाठी महान कार्य आहे. त्यांच्या नावासाठी विरोध होत असल्यास मला वैयक्ति त्रास होत आहे. (यावेळी पुन्हा सर्व सेना सदस्य पोल पोल असे ओरडतात)

श्री. प्रदिप जैस्वाल,
श्री. मोतीराम घडामोडे : या प्रश्नावर कुणाचा विरोध असेल तर सभागृहाचा कौल घ्यावा कारण त्यांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला. (यावेळीसेना सदस्य पोल पोल असे ओरडत होते)

श्री. बंडू प्रधान : अर्ध्या तासासाठी सभा तहकुब करावी. (पुन्हा काही स. सदस्य ओरडतात)

श्री. प्रदिप जैस्वाल,

श्री. मोतीराम घडामोडे : एक मतानेप्रस्ताव मंजुर व्हावा अशी आमची इच्छा आहे.

श्री. प्रकाश जावळे : खेदाची बाब आहे की, एका बजुला १ ला उर्दु शाहीर तर दुसऱ्या बाजुला थोर क्रांतीकारक यांच्या नावासाठी वाद होणे योग्य वाटत नाही. यासाठी सामंजस्याने प्रश्न सुटावा म्हणुन एकत्रित चर्चा व्हावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : कोरम पुर्ण आहे सभागृहात पोल घ्यावा.

मा. महापौर : सदरील प्रस्तावास कुणाचाही विरोध नाही. प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. परंतु पुतळा बसविणे बाबत कोणत्या जागेवर पुतळा बसविला याची बसून स्थळ निश्चिती करण्यात येईल. (यावेळी सेना सदस्य विरोध करतात तर स. सदस्य, श्री. नारायण फत्तेलष्कर याला जातीयवादाचे स्वरुप होऊ नये बोलतात)

श्री. रशिद मामु : आमचा पुतळा बसविण्यास विरोध नाही, परंतु जे जुने लोक आहेत आमदारांचे वडिल वगैरे यांच्यासारख्या जुन्या लोकांना विचारात घेऊन माहिती घ्यावी.

श्री. तकी हसन खान : ज्या चौकामध्ये पुतळा बसविण्याचा प्रस्ताव आहे त्या जागेजवळ प्रार्थना स्थळ आहे आणि लगतच मुस्लिम धार्मिय वस्ती आहे. यासाठी इतर ठिकाणी पुतळा बसवावा परंतु या ठिकाणी बसवू नये. (यावेळी सेना सदस्य विरोध करतात व महापौरांच्या आसनाजवळ जाऊ "भारत माता की जय" अशा जोरजोरात घोषणा देतात काही ही ऐकु येत नाही) महात्मा गांधीला गोळी मारुन हत्या करणेवाले हिरो म्हणता तुम्ही.

**ठराव क्र. ३८/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यात प्राणार्पन करणाऱ्या या शहरातील क्रांतीकारक हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे यांचे उचित स्मारक म्हणुन शहर पोलिस स्थानकासमोरील चौकात पुर्णाकृती पुतळा उभारण्यास व त्या चौकास हुतात्मा अनंत कान्हेरे चौक असे नाम फलक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९/४ :** औरंगाबाद महानगरपालिकेचे सर्वसाधारण सभेने ठराव करुन इतर महानगरपालिकेप्रमाणे महानगरपालिकेचा नगर रचनाकार असावा म्हणून ठराव मंजुर केला आहे. त्यानुसार महानगरपालिकेने, महानगरपालिकेचा नगर रचनाकाराची नेमणुक केली. दरम्यान डिसेंबर ९० मध्ये शासनाचे नगर रचना खात्याचा पुन्हा एक नगर रचनाकार रुजु झाला त्यावेळेस सुधारीत विकास योजनेचे काम हाती असल्याने त्या कामासाठी त्यास रुजु करुन घेण्यात आले.

आता शासनाने सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी स्वतंत्र स्टॉपची निर्मिती केलेली आहे. म्हणून सुधारीत विकास योजनेच्या कामासाठी नगर रचनाकार खात्याचे नगर रचनाकार यांना परत त्यांच्या खात्यात दि. १/८/९२ पासून कार्यमुक्त करावे व सध्या महानगरपालिकेच्या नगर रचनाकार यांना संपुर्ण काम देण्यत यावे व तसा तपशिलवार प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव पाठविण्यात यावा.

सुचक :- श्री. रतनकुमार पंडागळे

अनुमोदक :- श्री. महादेव सुर्यवंशी, श्री. अलफखान

दिनांक :- १५/७/९२

**<u>संवाद</u>**

श्री. अलफखांन : दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, या सभागृहात एकदा पारित झालेले प्रस्ताव शासनाकडे पाठविल्या जात नाही याचे कारण काय, खरे असो खोटे असो सर्व प्रस्ताव प्रशासनाने शासनाकडे मंजुरीस्तव पाठवावे अशी माझी विनंती आहे. शासनाने सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी सवतंत्र स्टाफची निर्मिती केलेली आहे. त्यानुसार त्यांचेकडून आलेल्या नगर रचनाकार यांना परत पाठवुन महापालिकेचे नगर रचनाकार यांचेकडे सर्व भार सोपवावा.

श्री. नारायण फत्तेलष्कर: इतर महापालिकांमध्ये नगर रचनाकाराचे पद बाहेरील आहे की कार्यालयीन आहेत याची माहिती द्यावी.

श्री. अजिज जहागिरदार : सन १९८९ मध्ये या बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर माडला होता त्याचे सुचक मी स्वतः होतो व अनुमादक श्री. अजित शेळके होते आणि सदरचा विषय क्र. १४५/१६ दि. १७/१/८९ ला ३१ विरुध्द २७ मतांनी पास झालेला असतांनाही अद्यापही शासनाकडे मंजुरीस्तव का पाठविला नाही.

मा. महापौर : ठिक आहे. सदरचा प्रस्ताव मंजुर करुन पाठविण्यात येईल.

श्री. बंडू प्रधान,

श्री. अजिजुल्ला बेग : जेष्ठता यादी व शैक्षणिक पात्रता पाहुनच या पदावर नियुक्ती करता येणे शक्य आहे.

मा. महापौर : ठिक आहे.

**ठराव क्र. ३७/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतर महानगरपालिकेप्रमाणे महानगरपालिकेचा नगर रचनाकार असावा म्हणून ठराव मंजुर झालेला आहे. आता शासनाने सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी स्वतंत्र स्टॉफची निर्मिती केलेली आहे म्हणुन सुधारीत विकास योजनेच्या कामासाठी नगररचनाकार खात्याचे नगर रचनाकार यांना परत त्यांच्या मुळ खात्यात दि. १/८/९२ पासून कार्यमुक्त करावे व सध्या महानगरपालिकेच्या नगररचनाकार यांना संपुर्ण काम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०/५ :** प्रभाग क्र. (९) नारेगाव लगत अस्तित्वात असलेल मांडकी गावाच्या शिवरातील ट्रेचिंग ग्राऊंड येथे शहरातील सर्व कचरा, घाण, मैला व मृत जनावरे आणुन टाकण्यात येतात. कचरा सर्व परिसरात इतस्ततः पसरुण सर्व घाण दुर्गंधी पसरते. परिणामी लगतचे मो. नारेगाव, ब्रिजवाडी, गोपाळपुर, मांडकी या गावातील नागरिक विविध साथीचे रोगाने आजारी पडतात.

मुंबई महानगरपालिकेने सायन येथील कोळीवाडा परिसरात कचऱ्यावर गॅस निर्मिती प्रकल्प तयार केला आहे. त्यामुळे उत्तम खत तयार होते व गॅस देखिल मिळतो. त्याच धर्तीवर मांडकी शिवारात टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यावर गॅस निर्मिती प्रकल्प महापालिकेमार्फत उभारण्यात यावा. जेणे करुन, गॅस निर्मिती होईल. गॅस या भागातील रहीवाशांना मिळेल तसेच उत्तम प्रतिचे खत देखील या भागातील शेतकऱ्यांना माहापालिकेमार्फत विकण्यात येईल. ज्यामुळे महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडुन या भगातील साथीच्या रोगांना आळा बसेल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक :- श्री. महादेव सुर्यवंशी

अनुमोदक :- श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. जयवंत ओक, श्री. अविनाश कुमावत

दिनांक :- १६/७/९२

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव क्र. ४०/५ :**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. (५) नारेगाव लगत अस्तित्वात असलेल्या मांडकी गावाच्या शिवरातील ट्रेचिग ग्राऊंड येथे शहरातील सर्व कचरा, घाण, मैला व मृत जनावरे आणुन टाकतात यासाठी मुंबई महानगरपालिकेने सायन येथील कोळीवाडा परिसरात कचऱ्यावर गॅस निर्मिती प्रकल्प तयार केला आहे त्यामुळे खत व गॅस देखील मिळतो त्याच धर्तीवर या ठिकाणी औरंगाबाद महानगरपालिके मार्फत कचऱ्यावर गॅस व खत निर्मिती प्रकल्प तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१/६ :** (१) शिवाजी मैदान (आमखास मैदान) जवळील टी.बी. क्लिनिक सार्वजनिक आरोग्याला धोकादायक असल्यामुळे तेथन हलवून इतर योग्य ठिकाणी स्थलांतरीत करण्याबाबत ठराव मंजुर करुन पुढील कार्यवाहीस शासनास कळविणे बाबत.

सुचक :- श्री. अजिजुल्ला बेग

अनुमोदक :- श्री. रतनकुमार पंडागळे

दिनांक :- १७/७/९२

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव क्र. ४१/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवाजी मैदान (आमखास मैदान) जवळील टी.बी. क्लिनीक सार्वजनिक आरोगयाला धोकादायक असल्यामुळे तेथुन हालवून इतर योग्य ठिकाणी स्थलांतरित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२/७ :** झोन क्र. ३ शहागंच यांचे विभाजन करुन गणेश कॉलनी येथे म.न.पा. ने संपादित केलेल्या भागात नवीन झोन बनविण्यात यावा. कारण झोन क्र. ३ च्या व्याप्ती नुसार कर्मचारी वर्ग नसल्यामुळे झोन नं. ३ मध्ये येणाऱ्या कित्येक वस्त्यामध्ये साफ सफाई ड्रेनेज चोकअपची कामे लवकर होत नाही. तरी नागरी सुविधांच्या दृष्टिने झोन नं. ३ चे विभाजन करुन गणेश कॉलनी येथील मनपाने संपादित केलेल्या जागेवर नवीन झोन बनविण्यात यावा. या विषयी भुतपूर्व मनपा आयुक्त यांनी झोन बनविण्यास संमती दिली होती परंतु अद्यापही त्यावर कार्यवाही झालेली नाही.

सुचक :- श्री. मुजिब आलमशा खान

अनुमोदक :- श्री. रतनकुमार पंडागळे

दिनांक :- १७/७/९२

संवाद

श्री. मुजिब खान : झोन क्र. ३ च्या अंतर्गत बऱ्याच वार्डाचा व्याप असल्याने आणि झोन मध्ये अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने नगरी समस्या वस्त्यांमधील साफ सफाई व्यवस्थित होत नाही यासाठी मनपाने संपादित केलेल्या गणेश कॉलनी येथील जागेवर नवीन झोन बांधण्यास लवकरात लवकर कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : मंजुर.

**ठराव क्र. ४२/७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. ३ शहागंज या भागाच्या व्याप्ती नुसार नागरी सुविधाच्या दृष्टिने मो. गणेश कॉलनी येथे महानगरपालिकेने संपादित केलेल्या जागेवर झोन क्र. ३ चे विभाजन करुन नवीन झोनाची निर्मिती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३/८ :** विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त रात्री बेरात्री काम करावे लागते. परंतु त्यांनी वेळोवेळी प्रशासनाकडे त्यांच्या अडचणी मांडल्या नंतरही त्यांच्या मागण्या मान्य करण्यात आलेल्या नाही. करीता खालील मागण्यांना सभेमध्ये मंजुरी देण्यात यावी.

(१) नगर परिषद असतांना लाईन मनला नाईट अलाऊन्स मिळत असे. महानगरपालिका झ ाल्यानंतर तो त्यांना देण्यात येत नाही. तेव्हा आता त्यांना नाईट अलाऊंस देण्यात यावा.
(२) पेट्रोल अलाऊन्स देण्यात यावा.
(३) आय.टी.आय. ट्रेड धारकांना (डिप्लोमा धारक) दुय्यम आवेक्षकांना जी वेतन श्रेणी देण्यात येते ती वेतनश्रेणी देण्यात यावी.
(४) कार्यालयाकडून गमबुट, टुल्स, रेनकोट देण्यात यावेत.

या मागण्यांवर चर्चा करण्यात येऊन सदर मागण्यास मान्यता देणे बाबत सर्वसाधारण सभेत कार्यवाही व्हावी.

सुचक :- श्री. जावेद हसन खान
अनुमोदक :- श्री. रशिद खाँ (मामु)
दिनांक :- १४/८/१९९२

**मा. महापौर** : सदरील प्रस्तावाचे सूचक नाहीत त्यामुळे प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र. ४२/७ :** प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

## "ऐन वेळेचा विषय"

**विषय क्र. ४४/९ :** महानगरपालिका हद्दीत चिकलठाणा एम.आय.डी.सी. प्लॉट क्र. ४-२ वर एक अद्ययावत कॅन्सर हॉस्पीटल टाकण्यात येत आहे. त्याचे काम चालू आहे. सदर हॉस्पीटलसाठी लागणारे कोबाल्ट मशिन परेदशातुन आयात करावे लागले आहे. सदर मशिनची ऑर्डर दिल्यावर सध्य सरकारकडे कस्टम ड्युटी माफीसाठी अर्ज केला असता माफी देते वेळी त्याच्या कडून इनडोअर पेशंट १०% व आऊट डोअर ४०% मोफत करणेचे मान्य करुन घेतले आहे.

सदर मशिनची ऑर्डर देते वेळी डालरचा दर १७/१८ रुपये होता तो आता ३०/३१ झाल्यामुळे मशीनची किंमत रुपयामध्ये पावने दोन पट द्यावी लागली आहे. बांधकामाचाही खर्चही वाढला आहे. पण मराठवाडा कॅन्सर हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर प्रा. लिमिटेड यांनी जिद्दीने काम चालु ठवले आहे. मशिनची किंमत अंदाजे ५० ते ५५ लाख रु. आहे तरी मा. सभागृहास विनंती की, सदर मशिन वरील जकात कर माफ करुन रुगण वाहीका वरील जकात कर माफ करुन या हॉस्पीटलच्या ध्येयपुर्तीस मदत करावी व उपकृत

करावे. १९९२ रोजी अखेर पर्यंत कोबाल्ट विभाग चालू होईल असा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला आहे. तरी सर्वानुमते हा "ऐन वेळीचा विषय" मंजुर करण्यात यावा ही विनंती.

सुचक :- १) अविनाश कुमावत २) धनंजय गंगाखेडकर
अनुमोदक :- १) गजानन बारवाल २) प्रदिप जैस्वाल

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव क्र. ४४/९ :** दि. २०/८/९२ च्या सर्वसाधारण सभेमध्ये ऐन वेळी आलेल्या अर्जावर सभागृहात चर्चेअंती खालील प्रमाणे मंजुरी देण्यात आली.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीत चिकलठाणा एम.आय.डी.सी. प्लॉट क्र. ४-२ वर एक अद्ययावर कॅन्सर हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर प्रा. लि. संस्थेद्वारे टाकण्यात येत आहे. या हॉस्पिटलसाठी लागणारे कोबाल्ट मशिन परेदशातुन आयात करावे लागले आहे. सदरील मशिनची किंमत अंदाजे रु. ५० ते ५५ लाख इतकी असून संबंधित कोबाल्ट मशिन व रुग्णवाहिका येथे आणल्यानंतर या दोन्हीही वस्तुंवर जकात कर औरंगाबाद महापलिके मार्फत माफ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्याचप्रमाणे श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय माजी महापौर यांनी तोंडी विनंती सभागृहात कल्यानुसार त्यांचे वडिलांचे स्मरणार्थ करमसिंग बी. ओबेरॉय चॅरिटेबल ट्रस्ट, उस्मानपुरा, औरंगाबाद या नावाने रुगणवाहीका खरेदी केली त्यावरील जकात सुध्दा माफ करण्यात यावे असे चर्चे अंती सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जण गण मन" या राष्ट्रगीताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## बुधवार दिनांक १६/९/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**बुधवार, दिनांक १६/९/९२ रोजी अंदाजे ११:४५ वाजता मा. महापौर, श्री. यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मारतम्" या गीताने सर्वसाधारण सभेस सुरुवात झ ाली.**

**या सभेस मा. आयुक्त, मा. उप आयुक्त तथा अधिकारी व रजिष्टर प्रमाणे खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. अजिमखान दादामियाँ अ. रहेमान
२) श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) श्री. अजिजुला बेग वाहिद बोग
४) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
५) श्री. भगुरे तुळशीराम छगन
६) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
७) श्री. पाटील नरेंद्र यादवराव
८) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
९) श्री. आयुब गुलाम जिलानी
१०) श्री. मुजीब अलमशा खान
११) श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१२) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१३) श्री. जावेद हसनखान कसीम हसनखान
१४) श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
१५) श्री. स.अ. एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
१६) श्री. ओक जयवंत केशवराव
१७) श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग
१८) श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
१९) श्री. अ. रशीद खान (मामु) अ. हमीद खान
२०) सौ. दलाल लता श्रीनिवास
२१) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२२) श्री. हाजी मोहमद हाफीजोद्दीन
२३) श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२४) डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
२५) श्री. म. इस्माईल अ. करीम
२६) श्री. फैय्याजखान अहमदखान
२७) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
२८) श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद
२९) श्री. स. हुसेन स. अहमद
३०) श्री. सुग्रीम हरलाल रिडलान

३१) श्री. अलफखान हुसेनखान
३२) श्री. थोरात किशोर गोविंदराव
३३) डॉ. काळे शांताराम यशवंतराव
३४) श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
३५) श्री. बारवाल गजानन रामकिसन
३६) श्री. गोडसे आनंद जगदीश
३७) श्री. जाहागिरदार अजिज मुख्तार अहमद
३८) श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
३९) श्री. जावळे प्रकाश शिवराम
४०) श्री परदेशी सुभाष शिवलाल

**"वंदे मातरम्" या गीताने सभेस सुरुवात झाली.**

**संवाद**

श्री. मोहसिन अहमद : अतिवृष्टीने शहरातील विविध भागातील लोकांना मृत्यु आले. त्या सर्वांना सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. त्यांची नावे सादर करण्यात येतील.

श्री. महादेव सुर्यवंशी : वार्ड क्र. ९ मधील ब्रिजवाडी भागात गॅस्ट्रोचे साथीने चार जण मृत्युमुखी पडले. त्या संदर्भात मी लक्षवेधी सुचना मांडलेली आहे. त्यावर विचार व्हावा.

मा. महापौर : माझ्याकडे स. सदस्य श्री. महादेव सुर्यवंशी, जयवंत ओक आणि बंडू प्रधान व शांताराम काळे यांनी मांडलेल्या सुचनंचे लेखी पत्र आलेले आहे त्या लक्षवेधीवर चर्चा होईल.

श्री. मुजीब आलमशा खान : स. सदस्य श्री. रेंद्र पाटील यांची महाराष्ट्र शासनाने एम.एस.एस.आय.डी.सी. व दुरसंचार विभागाचे सल्लागार पदावर नियुक्ती केलेली आहे. त्याबाबत सभागृहात अभिनंदनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

मा.महापौर : ठिक आहे. (स. सदस्यांनी सभागृहात टाळ्या वाजवुन अभिनंदन केले)

श्री. अलफखान : स. सदस्य श्री. मोहसिन अहमद व मुजिब आलमशा खान यांनी सुचित केल्यानुसार माझी एक सुचना आहे. की, मो. जुनाबाजर पोष्ट ऑफीसच्या समोर अतिवृष्टीने अंगावर भिंत पडुन एक मुलगा मृत्युमुखी पडला. त्या मुलाच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजुक आहे आणि त्याची आई विधवा आहे. त्यामुळे त्याला कोणताही आधा नव्हता सदरील मुलाच्या आईस मुलाच्या दुःखद निधनाने आर्थिक मदत मनपातर्फे देण्याबाबत विचार व्हावा ही विनंती.

श्री. महादेव सुर्यवंशी : मो. ब्रिजवाडी येथील गॅस्ट्रोच्या साथीने सर्व श्री. सुरेखा महेंद्र शिंदे, गिताबाई सखाराम शेंडगे छाया काशिनाथ साबळे व राजु काशिनाथ मोकळे या व्यक्तीचा समावेश असुन श्री. सुरेश सखाराम शिंदे हा मो. मसनतपुर येथील विहिरीत पडून मृत्युमुखी पडला तेव्हा या सर्वांना मनपातर्फे आर्थिक मदत देण्याचे करावे. या भागात गॅस्ट्रोची लागण होण्याचे

कारण म्हणजे या भागाला लागुनच औद्योगिक कारखाने आहेत आणि या कारखान्यातील रासायनीक द्रव्य जमिनीत मुरल्या जाते. त्यामुळे येथील काही विहीरी व हापसे आहेत त्यामुधुन या रासायनिक द्रव्यासारखे विशेषत: दारुच्या रंगाचे पाणी येथील लोकांना प्यावयास मिळते. त्यामुळेच गॅस्ट्रो सारख्या रोगाने काही व्यक्तींना प्राणास मुकावे लाले. तर सन १८८८-८९ ला या भागात जवळपास ३०० मेंढ्या मरण पावल्या. तेव्हा ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी कुणीही आले नाहीत. मा. आयुक्त, उप आयुक्त आणि जलगृह अभियंता सिडको यांनी प्रत्यक्षात भेट देवून पाहणी केली आणि मा. आयुक्तांच्या आदेशानुसार जलगृह अभियंता यांनी स्टँड पोस्ट नवीन बसवुन दिले आणि या भागासाठी त्वरीत उपाययोजना केली त्याबद्दल अभिनंदन. परंतु मनपाने औद्योगिक भगातील रासायनिक द्रव्यांच्या घाण पाण्याची व्यवस्था न केल्याने येथील नागरिकांना सतत त्रास सहन करावा लागत आहे यासाठी या भागातील लोकांसाठी औद्योगिक क्षेत्रापासून नवीन पाण्याची लाईन टाकुन देण्याची त्वरीत कार्यवाही करावी. अन्यथा पुन्हा असे कित्येक बळी जाण्याची शक्यता आहे. या भागाकडे आरोग्य अधिकारी कधी फिरकलेही नाही. त्यामुळे माझा स्पष्ट आरोप आहे की, आरोग्य विभागाने कोणतीही व्यवस्था न केल्याने परिणामत: पुन्हा एकदा नारेगाव येथील श्रीमती शेवंताबाई देविदास जाधव यांना घाटी दवाखान्यात दि. ११/९/९२ ला भरती करण्यात आले त्याचा रजि. नं. २८९७३ असा आहे. परंतु त्यांची प्रकृती ठिक झाल्याने त्यांना घरी जाण्यास सांगितले.

श्री. नरेंद्र पाटील : स. सदस्यांनी जी भुमिका विषद केली त्यामध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे काही बाबी खऱ्याही असू शकतात परंतु महत्वाचा मुद्दा म्हणजे ज्यावेळी औद्योगिक भाग विकसित होत होता त्यावेळी त्या भागातील एकही गाव किंवा झोपडपट्टी अस्तित्वात नव्हती. बरेचसे कारखाने चालू झाले त्याचेवळेस झोपड्या तयार होऊ लागल्या त्यामुळे औद्योगिक विभागातील कारखान्याचा काहीही दोष नाही. फक्त कारखान्यातील रासायनिक द्रव्याची विल्हेवाट पुर्णपणे लावणे आवश्यक होते. तथापी ते अजून झालेले नाही. त्यामुळे लोकांना अनेक बिमाऱ्या होण्याची शक्यता आहे. एवढेच नव्हे तर मागील वेळेस जवळपास ३०० शेळ्या, मेंढ्या मृत्युमुखी पडल्या त्यावेळेस पासुन आजपर्यंतही येथील आरोग्य वैद्यकिय अधिकारी या भागाकडे साधे फिरकलेही नाही. हा माझा अनुभव आहे. तेव्हा लवकरात लवकर मो. ब्रिजवाडी व मसनतपुर येथे औद्योगिक पाईप लाईन मधुन येथील पाण्याच्या टाकीत पणी सोडून लोकांना होणारा त्रास वाचवावा. याच भागात सुरेश शिंदे नावाचा इसम विहिरीत पडून मरण पावला त्याला आर्थिक मदत देण्याची कार्यवाही करावी.

श्री. बंडू प्रधान : साथीने बरेचसे लोक मृत्युमुखी पडले. त्यांना तर मनपातर्फे आर्थिक मदत देण्यात यावीच परंतु जे मृत्यु पावले, जीवनातुन गेले यास जबाबदार कोण? आपले आरोग्य विभाग इतके निष्क्रिय आहे. याबाबत मी गेल्या तीन बैठकांपासून सतत सांगत आहे की, शहरामध्ये कॉलरा व गॅस्ट्रोची साथ आहे. त्यामुळे बरेच जण मृत्युमुखी पडण्याची शक्यता आहे. तरीही आमहाला सांगितल्या जाते की, ते रोगी औरंगाबादचे नसुन जालना व इतर भागातील आहेत. परंतु ज्यावेळी चार रुग्ण जीवानिशी गेलेत त्यावेळी

आरोग्य विभागास खात्री झाली की, संबंधित रुग्ण कॉलराव गॅस्ट्रोने मृत्युमुखी पडले म्हणून मी सतत सुचना करित आहे की, शहरातील विविध भागामंध्ये गोळ्या औषधे वगैरेंची वाटप करणे आवश्यक आहे. परंतु आरोग्य विभागाने याबाबत कोणतीही कार्यवाही अद्याप तरी केलेली नाही. शताब्दीनगर येथे श्री. शिवराम शेजवळ नावाचा व्यक्ती मेंदुज्वराने मरण पावला त्यानंतर मी आरोग्य अधिकाऱ्यांना सांगितले होते की, या भागामध्ये योगय ती तपासणी करावी. कॅम्प घ्यावा परंतु आरोग्य अधिकाऱ्यांची निष्क्रियता दिसून आली त्यामुळे या सर्व बाबीस संबंधित अधिकारीच जबाबदार आहेत असा माझा स्पष्ट आरोप आहे. यासाठी शासनाकडून आरोग्य अधिकारी वर्ग - १ च्या पदास मान्यता देवून त्वरीत भरण्याची कार्यवाही करावी. ज्यामुळे येथील आरोग्य विभाग सुरळीत चालेल व नागरिकांच्या कोणत्याही तक्रारी राहणार नहीत. कारण शासनाकडून डेपुटेशनवर आलेला कर्मचारी यांना भिती निर्माण होऊ शकते, त्यांचे वर एक टांगती तलवर राहते. त्यामुळे चांगले काम करु शकतात. जर आरोग्य विभागाकडून चांगले काम होत नसल्यास नागरिकांनी कोणताही टॅक्स भरु नये आणि याबाबत दाद मागण्यास कोर्टामध्ये केस दाखल करावी लागेल याची आपण नोंद घ्यावी, यासाठी मनपाने आरोग्य अधिकारी वर्ग - १ पद त्वरीत भरण्यात यावे.

श्री. शांताराम काळे : स. सदस्य श्री. महादेव सुर्यवंशी यांनी जी लक्षवेधी सुचना मांउली व त्यावर स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील, बंडू प्रधान यांनी आपले विचार मांडले. त्यांच्यामताशी मी सहमत आहे परंतु जे विश्लेषण स. सदस्यांनी केले त्याप्रमाणे एक विचार होणे आवश्यक आहे की, प्रत्येक जण महानगरपालिकेला जबाबदार का धरतात. माझ्या माहितीप्रमाणे मी आपणास सांगु इच्छितो की, पावसाळ्यापुर्वी मा. आयुक्त यांनी एक जाहिर प्रगटन वर्तमानपत्रात दिलेले होते की, नाल्याच्या दोन्ही बाजुस काही घरे असतील तर पावसामुळे कोणतीही अपघाती घटना घडु नये यासाठी सावधान रहावे. स. सदस्य श्री. महादेव सुर्यवंशी यांनी जे सुचविले की, पाण्याद्वारे दारुचे घाण पाणी येते. याबाबत महानगरपालिका जबाबदार आहे काय? याचाही विचार होणे आवश्यक आहे. कारण मसनतपुर येथील पिण्याच्या पाण्याद्वारे दारुचे घाण पाणी मिळते. त्यामुळे अनेक रोग होण्याची चिन्हे दिसतात. तर सन १९८८-८९ ला जी घटना घडली ती याचमुळे घडली हे सर्वज्ञात आहे परंतु पुर्वग्रहदुषित संबंधित अधिकारी यांनी काहीही केलेले नाही म्हणून त्यांचेवर रोष पत्करणे योग्य वाटत नाही. कारण पोलूषण बोर्डावर यांनी केस दाखल केलेली आहे.

श्री. बंडू प्रधान : स. सदस्यांनी जी सूचना केली ते योग्य नसून पूर्वग्रहट्टाने आम्ही सांगत नसून मो. जयभिमनगर येथे एकास गॅस्ट्रो झाला त्या व्यक्तीस आरोगय विभागाने कधी विचारपूस केली काय? याची पडताळणी करावी.

श्री नरेंद्र पाटील: स. सदस्य श्री. शांताराम काळे गेले तिन चार वर्षे पोलूशन बोर्डाचे सदस्य असूनी त्यांनी काहीही केले नाही.

मा. महापौर : स. सदस्य श्री. बंडू प्रधान आपण आपले विचार मांडले, तेव्हा वेळोवेळी बोलणे योग्य नाही.

श्री. तकी हसन खान : काही स. सदस्यांनी शहरातील विविध भागामध्ये गॅस्ट्रोने तिन चार लोक मृत्युमुखी पडले की अजून किती लोक मरण पावले याचा नेमका आकडा स्पष्ट दिसून येत नाही. कारण जे व्यक्तीमरण पावले त्यांचे बाबतीत डॉ. जैस्वाल व डॉ. मुनवर खॉंन यांनी मृत्यु प्रमाणपत्र लिहुन देणे आवश्यक आहे की, सदरील व्यक्ती ही गॅस्ट्रोने मरण पावली. परंतु तसे या ठिकाणी दिसून येत नाही. तर ब्रिजवाडी येथील जी व्यक्ती मरण पावली त्याची माहिती मी स्वतः घेतली व वाचली तेव्हा जी बाई मरण पावली तिचे वडील व भावानी लेखी चौकशी अंती लिहून दिलेले आहे की, मृत सदरील बाई ही गेली चार महिन्यापासून बिमार असून गॅस्ट्रोने मेलेली नाही आणि यानंतरही जर गॅस्ट्रोने मेलेली आढळलस तसे संबंधित इलाज करणाऱ्या डॉक्टरांना लिहून देणे आवश्यक आहे. व मृत्यु प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. हे सिध्द झाल्यास संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांवर कार्यवाही करता येणे शक्य आहे.

श्री. मुजिब आलमशा खान : अतिवृष्टीने नाल्यावरील कटकट दरवाजाकडील काही घरे कोसळुन लोक मृत्युमुखी पडले याबाबत मा. आयुक्त, उप आयुक्त, शहर अभियंता, उप महापौर यांनी प्रत्यक्षात येऊन पाहणी केली व योग्य ते निर्देश दिले. परंतु मागील आयुक्तांच्या वेळी असे ठरले होते की, जी काही नाल्यावरल घरे आहेत त्यांची मोजमाप करुन अशा व्यक्तींना पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. या बाबत मा. जिल्हाधिकारी यांनीही तशा सुचना दिलेल्या आहेत तेव्हा मनपातर्फे मोजमाप करुन रिपोर्ट दाखल करावा व नाल्यावरील जी घरे आहेत त्यंचे बाबतीत पर्यायी व्यवस्था वहावी.

श्री. अजिज जहागिरदार : ब्रिजवाडी, मसनतपुर येथील भाग हा औद्योगिक क्षेत्राजवळ विकसीत झालेला आहे. आणि या औद्योगिक भागामध्ये महाराष्ट्र डिस्टलरीज नावाची दारुची कंपनी आहे. या कंपनीचे घाण पाणी जे बाहेर पडते ते जमिनीत मुरल्या जाते व ते मुरलेले पाणी पिण्याच्या पाण्यात समाविष्ट होते त्यामुळे विविध रोग होऊन बळी जाण्याची शक्यता असते. याच प्रकारामुळे गेल्या वेळेस १०० मेंढ्या मेलेल्या होत्या. तेव्हा असा कारखाना आहे. त्या कारखान्याने प्रदुषण होते व मनपास हानीकारक असते. त्यामुळे संबंधित कारखाना बंद कसा करता येईल यावर लक्ष द्यावे.

श्री. मोहसिन अहमद : स. सदस्य श्री. मुजिब आलमशा खान यांनी जो प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावास माझा संपूर्ण पाठींबा आहे. कारण त्या वार्डालगतच भाग म्हणजे माझ्या कक्षेतील बाब असल्याने कटकट दरवाजाकडील नाल्यातील घरे अतिवृष्टीने पडझड झाली तर काही घरे वाहुन गेली त्यामुळे जवळपास १७० लोकांना मी स्वतः सहारा दिला तसेच जिल्हाधिकारी व मा. आयुक्त तसेच आरोगय विभाग यांनी सतत प्रयत्न केले त्यामुळे त्यांचे अभिनंदन करतो. सन ६/८/८३ ला सुध्दा अशाच प्रकारे पुरामुळे घरे उध्दवस्त झालेली होती. त्यावेळी प्रशासक म्हणून श्री. सतिष त्रिपाटी होते. त्यांनी त्यावेळी उपाय योजना करण्याचे सुचित केले होते तेव्हा भागातील नाल्यावरील लोकांची योगय ती पुनर्रचना करणेच्या दृष्टीने कार्यवाही व्हावी ही विनंती.

श्री. अजिजुल्ला बेग : पावसाळा सुरु होण्यापूर्वी मनपातर्फे साफ-सफाई व घाण साफ करण्यासाठी एक विशेष पथक नेमुन कार्य केले जाते. या वर्षी सुध्दा

२०० मजुरांची भरती करण्यासाठी सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे, आणि शहरातील साफ सफाई व कोणती घरे पडण्याचा स्थितीत आहेत त्या सर्वांचा सर्व्हे करुन घरांना नोटीसा बजावण्याचे काम मनपा करते. परंतु मनपाने याबाबत दखल घेतलेली दिसत नाही. ज्यामुळे अशा परिणाम भोगावे लागले. ज्या घरमालकाने स्वत:हुन घर पडत असल्याची नोटीस किंवा लेखी पत्र देवून मनपाला कळविले त्यावेळसे मनपा कार्यवाही करते किंवा नाही तेव्हा अतिवृष्टीने जी पडझड झाली व लोकांचे नुकसान झाले यास मनपा जबाबउदार आहे. त्याचप्रमाणे जुना बाजार, पोस्ट ऑफीस जवळ श्री. शेख अजहर शेख वजीर नावाचा मुलगा अंगावर भिंत पडून मरण पावल त्याला वडील नाही अशा अनाथ मुलाच्या आईस मनपाने आर्थिक मदत देण्याची कार्यवाही करावी.

श्री. अय्युब जागिरदार : स. सदस्य श्री. मुजिब आलमशा खान यांनी जी सुचना मांडलेली आहे ती स्वागतार्ह असून त्यानुसार कार्यवाही व्हावी कारण कटकट दरवाजा जवळील नालयावर व संपुर्ण नाल्यात अतिक्रमनाने घरे बसलेली आहेत ती सर्व प्रत्येकी मिळालेली आहेत. अशा सर्व बेघर लोकांना मनपाने त्याच्या बाजुला असलेली पडीत जमीन पर्यायी व्यवस्था म्हणुन घरे बांधण्यासाठी देण्यात यावी. अन्यथा काही प्रपोजल असल्यास शासनाची दुसरी जमिन सर्व्हे नं. २०५ येथे आहे. त्या जमिनी बाबत जिल्हाधिकारी यांचेकडून कार्यवाही करण्याची व्यवस्था व्हावी. या नाल्यावर नाला ट्रेचिंगचे काम रु. २२/- लाखाचे तयार करण्यात येणार होते. परंतु नंतर ११/- लाखाचे केले व आता पुन्हा सुधारित अंदाजपत्रक तयार केले आता रु. ४/- लाखाचे नाला ट्रेचिंग करण्यासाठी अंदाजपत्रक तयार आहे. याबाबतची त्वरीत कार्यवाही व्हावी.

श्री. मुजिब आलमशा खान : रु. २२/- लाखाचे किंवा ११ लाखांचे नाला ट्रेचिंगचे अंदाजपत्रक असो याबाबत आपल्याला काही म्हणावयाचे नसुन जेवढा नाला आहे तो सपाटीकरण करणे आवश्यक नसुन शासनाने ठरविलेल्या निर्णयानुसार सर्व नाल्यांचे सर्व्हे करुन जेवढा भाग सपाटीकरण करता येईल तो भाग सपाट करावा. त्यासाठी रु. ४ लाखाचे अंदाजपत्रक लागो की रु. ११ लाखाचे हे र्व खर्च शसनाच्या खर्चातुन करावयाचा आहे.

श्री. प्रकाश जावळे : मो. ब्रिजवाडी, मसनतपुर आणि सिंधीबन या भागाबाबत गेल्या दिड वर्षापुर्वीही सभागृहात चर्चा झालेली होती आणि चर्चा होऊनही प्रशासनाने तेथील नागरिकांसाठी काहीही उपाय योजना केलेली दिसत नाही. जे या भागातील चार जण मृत्युमुखी पडले. त्यांच्या संदर्भात, ते कशामुळै मृत्यु पडले आरोग्य विभागाने काय कार्यवाही केली किंवा या कारणास कोणी जबाबदार आहेत काय याचाही विचार होणे आवश्यक आहे. कारण औद्योगिक क्षेत्रातील महाराष्ट्र डिस्टलरीज नावाची दारुची कंपनी आहे. या कंपनीचे पाणी दुषित आहे. ते जमिनीत मुरते, लोकांना पाण्याद्वारे बाधा होते. अशा कंपनीला मनपाने योग्य ती कार्यवाही करण्याचे सुचवावे किंवा ते घाण पाणी शहराबाहेर काढण्यासाठी उपाययोजना करण्यास त्या कंपनीला सांगावे अन्यथा ती कंपनीच बंद करण्यासाठी शासनास कळवावे.

श्री. रशीद मामु : शहरातील साफ सफाईचा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. गेल्या दोन तीन वर्षापासून मी सभागृहाला सतत सांगत आहे की, त्या नाल्यात ड्रेनेज

लाईन सोडलेली आहे. ज्यामुळे घाण पाणी नालयाद्वारे वाहते तर त्या सर्व नाल्यांची साफ सफाई करण्यासाठी सन १९९१-९२ मध्ये अंदाजपत्रकात तरतुद केलेली हाती तथापी अद्यापही काहीही कार्यवाही केलेली दिसत नाही. ड्रेनेजच्या कामाबाबत ज्या गुत्तेदारांना काम देतो ते अर्धवट सोडतात. त्यांना नोटीसा बजावत नाही किंवा त्यांचें नाव ब्लॅक लिस्ट मध्ये टाकत नाही. ही दुर्देवाची बाब आहे. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीने नाल्याच्या काठावरील घरे उध्वस्त झाली अशा घरांना अगोदर मनपाने नोटीसा बजावाव्यात उदा. जुनाबाजार नाला येथील बाम्बे कर्मटाईल बंक, नागेश्वरवाडीतील काही घरे तर सुराणा बिल्डींग आणि अन्य घरांच्या बाबतीत मनपाने पुर्ण सुचना देणे आवश्यक आहे. त्यामध्ये नातेवाईक व मित्रत्व यांना थारा देवू नये तसेच दारुच्या कंपनीने सामान्य माणसावर मृत्युचीपाळी येत असल्यास अशा कंपनीवर गुन्हा दाखल करुन कंपनी बंद पाडण्याची कार्यवाही करावी. जशी पैठण येथील एका कंपनीवर अशाच प्रकारची कार्यवाही झालेली आहे.

श्री. जयवंत ओक,
रतनकुमार पंडागळे
श्री. बंडू प्रधान, : माझी एक लक्षवेधी सुचना आहे त्यावर चर्चा व्हावी. या प्रश्नावर
श्री. पिटर वंजारे, जास्त चर्चा न करता सभगृहाच्या संमतीने आपण निर्णय घ्यावा.

मा. महापौर : स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनीही लक्षवेी सुचना मांडलेली आहे आणि ती सुध्दा आरोग्य व पावसाच्या संदर्भात आहे. तेव्हा त्यांचाही विचार होणे आवश्यक आहे. यासाठी सर्वांची सुचना घेऊन नंतरच निर्णय घेता येईल.

श्री. जयवंत ओक : नारळीबाग येथील जवळपास शंभर ते एकशे तीस घरे मनपाच्या हलगर्जीपणामुळे उध्वस्त झालेली आहेत. त्या सर्व लोकांना आपण घरे बंधून देणार आहात काय? मनपातर्फे नाला ट्रेचिंगचे काम चालु आहे ते एकतर्फी आहे त्यामुळे याबाबतची कार्यवाही अगोदर होणे आवश्यक होते. तथापी ती न झाल्याने नारळीबाग येथील अतिवृष्टीने २५-३० घरे पुर्णतः उध्वस्त झालेली आहेत. त्यांना रु. ५००/- फक्त प्रत्येकी मिळालेली आहे. त्यामुळे त्यांचे घरसंसार उजाडणार आहे काय? यासाठी मनपातर्फे या सर्व लोकांना पर्यायी व्यवस्था करण्याची कार्यवाही करावी व अशा प्रकारे धोका निर्माण होणार नाही मनपाने दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे जुनाबाजार येथील भिंत अंगावर पडून मयत श्री. अजहर शेख यास मनपातर्फे तातडीने मदत द्यावी.

मा. महापौर : ठिक आहे. सर्व स. सदस्यांच्या सुचना लक्षात घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मागील वर्ष अशच प्रकारची घटना घडलेली होती. त्यावेळी आरोग्य विभागातर्फे विविध भागात कॅम्प ोण्यात आलेले होते परंतु त्या विभागातील स. सदस्यांना पुरेशी कल्पना मिळालेली नव्हती. त्याचप्रमाणे या वर्षी सुध्दा शहरातील साफ सफाईची व्यवस्था आणि विशेषतः स्लम भागांमध्ये आरोग्य विभागामार्फत दुपारुन चार तासासाठी आरोग्याचे कॅम्प लावल्यास गॅस्ट्रोची साथ निवारण करयास मदत होईल. परंतु त्या भागातील

स. सदस्यांना त्यापुर्वी माहिती देवून असे कॅम्पविषयी सहकार्य घ्यावे. जेणे करुन कोणत्याही साथीस आळा बसेल. त्याचप्रमाणे जसे विविध भागामध्ये काही मृत्युमुखी पडले. तसेच माझ्याही वार्डातील तीन मुले एलोरा येथे अपघाती निधनाने मृत्यु पावले त्यांना मनपातर्फे आर्थिक मदत देण्याची कार्यवाही करावी.

श्री. अलफखान हुसैनखान : एखाद्या कारखान्याला ज्या वेळी परवानगी दिली जाते. लायसेंस दिल्या जाते त्यावेळी वॉटर पोलशन वार्डाकडून योग्य ती पाहणी केल्या जाते की त्या कारखान्याचे पाणी कुठे जाते वगैरे त्यानंतर मनपाचे कर्तव्य असे असते की, त संबंधित कारखान्याचे पाणी कारखान्यातुन बाहेर पडल्यानंतर त्याची विल्हेवाट कशी लावावी अथवा त्या कंपनीला नियमाप्रमाणे नोटीस बजावावी. परंतु मनपा नियमांचे पालन करीत नाही. आपले अधिकार दाखवत नाही. त्यामुळे विविध प्रश्न उपस्थित होतात आणि वेळेवर धावपळ सुरु होते. शहरातील विविध नाले आहेत. त्या नाल्यावर घरे बांधण्याची मनपाने परवानगी दिलेली आहे परंतु त्या नाल्याची सफाई ती त्या मालकाने करावे असा करार आहे. परंतु याबाबतही मनपा लक्ष देत नाही. वा स्वत:ही करीत नाही. दलालवाडी येथील श्रीमान श्रीमतीचे दुकान आहे त्या नाल्याच्या संदर्भात मनपाने काय केले. त्या ठिकाणी साफ सफाई होणे आवश्यक आहे. अन्यथा दुर्गंधी पसरते अथवा नाल्याच्या कडेला असलेली घरे कोसळून पडतात यासाठी संबंधितांनी नोटीसा देणे आवश्यक आहे. याबाबत मनपातर्फे कोणतीही कार्यवाही होत नाही.

मा. महापौर : स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता ज्या ज्या भागामध्ये गॅस्ट्रोची लागण झालेली आहे आणि त्या भागासाठी मनपाने आतापर्यंत काय कार्यवाही केली याबाबतची सविस्तर माहिती आरोग्य वैद्यकीय अधिकारी देतील.

श्री. नरेंद्र पाटील : बऱ्याचशा स. सदस्यांनी औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यासंबंधी आपल्या विविध सुचना मांडल्या त्याबाबत मला काही बोलायचे नाही. परंतु एम.आय.डी.सी. मध्ये ड्रेनेज लाईन नाही याची जबाबदारी कुणाची आहे याची माहिती द्यावी.

श्री. स. हुसैन स. रफत: रोशनगेट ते कटकट दरवाजा या भागातील नाल्याच्या संदर्भात स.सदस्यांनी ज्या सुचना मांडलया त्याबाबत विचार व्हावा. त नाल्यावर ट्रेचिंग करणेसाठी जे अंदाजपत्रक तयार केलेली आहे. त्याप्रमाणे त्वरीत कार्यवाही व्हावी आणि घडलेल्या दुर्घटनेनुसार मनपाने सहकार्य करावे. ज्यामध्ये काही मृत्युमुखी पडले त्यांना मनपातर्फे आर्थिक मदत जाहीर करावी.

श्री. शांताराम काळे : शहरातील विविध नालयावरती नाला ट्रेचिंग करित असतांना त्या नाल्याची लांबी रुंदी किती आहे याची पुर्णपणे तपासणी करावी. अर्धवट किंवा एका बाजुने काम करु नये. उस्मानपुरा जयोतीनगर या भागातील एका नाल्यावर ट्रेचिंग करित असतांना १५ फुटाचा नाला तो आता २ १/२ फुटाचा शिल्लक आहे. अशी परिस्थिती होवू नये याची खबरदारी घ्यावी.

सौ. लता दलाल : आतापर्यंत काही स. सदस्यांनी दोन्ही बाबतीत चर्चा केी. परंतु यामध्ये लोकांची किंवा मनपाची एकट्याची चुक झालेली असे समजुन चालणार नाही तर दोघांचीही चुक झालेली आहे. अतिवृष्टीने नाल्यांना पुर

येऊन काही घरांना धोका झाला. याचे कारण म्हणजे काही नाल्यावरती बड्या बिल्डर्सनी घरे बांधलेली आहेत त्यामुळे त्या ठिकाणी कचरासाचुन पाण्याचा प्रवाह थंबतो आणि कुठेतरी धोका निर्माण होतो. तशाच प्रकारे औरंगपुरा, बारुदगर नाला, जो आहे त्या नाल्याचे पाणी आणि निराला बाजार येथून वाहणाऱ्या नालयाचे पाणी या दोन नाल्यांचा संगम माझ्या वार्डातील नाल्याला मिळतो आणि या दोघांच्या पाण्याच्या प्रवाहाने त्या कडेला असलेल्या घरांना धोका निर्माण झाला. यासाठी स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी सुचित केल्याप्रमाणे नाला ट्रेचिंग केवळ एका कडेला न बांधता दोन्हीही बाजुने बांधावे जेणे करुन घरांना कोणताही धोका होणार नाही.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : ब्रिजवाडी येथील गॅस्ट्रोमुळे जी घटना घडली त्या दिवशी मी तीन दिवसाच्या रजेवर होतो व माझा चार्ज डॉ. भिडे यांचेकडे होता आणित्यांनी तत्परतेने त्यांचे कार्य पार पाडले. ब्रिजवाडी येथील चार जण मृत्यु पावले अशी वर्तमानपत्रात बातमी छापुन आली त्याबाबतचे असे म्हणणे आहे की, तेथील वस्तुस्थिती पाहता त्या गावाला नळाचा पाणी पुरवठा होत असून त्या गावा शेजारी एक विहिर आहे. त्या विहिरीमध्ये १ तारखेला झालेल्या अतिवृष्टीने त विहिरीतील पाणी प्रदुषित झाले. अशी माहिती असूनही गावातील लोकांनी त्या विहिरीतील पाणी पिण्यास व सांडपाण्याचा वापर कला. त्यामुळे चार जणांना लागण झालेली होती. त्या पैकी एक जण वैद्यकीय महाविद्यालय येथे उपचारार्थ आला होता व तो पुर्णतः बरा होऊन परत गेलेला आहे. जे रुगण मृत्यु पावलेले आहेत त्यापैकी एकही जण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मृत्यु पावलेले नाहीत. जे मृत्यु झालेले आहेत ते खाजगी दवाखान्यात झालेले आहेत त्या डॉक्टरांची नावे डॉ. सलीम आणि डॉ. जैस्वाल यांचेकडे उपचार घेत होते. जोपर्यंत मृत्युचे प्रमाणपत्र अमुक ह्या रोगाने मृत्यु आला असे लिहून येत नाही तोपर्यंत आम्ही मनायला तयार नाही. त्याबाबतचे मृत्युचे प्रमाणपत्र देणे जरुरीचे आहे. त्याचप्रमाणे संबंधित डॉक्टरांशी आम्ही संपर्क साधला असता, ते खाजगी डॉक्टर गॅस्ट्रोमुळे मृत्यु झाला किंवा नाही किंवा मृत्युचे प्रमाणपत्र सुध्दा द्यावयास तयार नाहीत. यामुळे संबंधित रुग्ण गॅस्ट्रोने वारले आहेत यात संदेह आहे. परंतु गिताबाई शेंडगे ही बाई परगावची राहणारी होती. तिला गॅस्ट्रोची लागण नव्हती किंव उलटी संडासचा त्रास नव्हता व ती गॅस्ट्रोने मरण पावलेली नाही. त्या ठिकाणी दि. ४ ला डॉ. भिडे यांच्या मदतीने त्या गावामध्ये ताबडतोब कॅम्प घेऊन रुग्णंची तपासणी करण्यात आली परंतु ४-५ रुग्ण या तपासणीमध्ये सापडले व ते सर्व अगदी पुर्णपणे दुरुस्त झाले. यामध्ये मनपा आरोग्य विभागाने तत्परतेने कार्य करुन दाखविले. रात्रंदिवस कॅम्प घेऊन लोकांची विचारपुस करीत होतो. त्याचप्रमाणे अशा प्रकारचे रुग्ण आढळल्यास ताबडतोब शासकीय रुग्णालयात घेऊन जाणे अशी सुचनाही त्या गावातील नागरिकांकडे आम्ही केलेली होती. आरोग्य विभागाने घेतलेल्या कॅम्प प्रमाणे माहिती अशी की, तारीख ३ ला ४ रुग्णास लागण झालेली होती त्यापैकी दोन जण मरण पावले, ते खाजगी दवाखान्यामध्ये परंतु ते ही खाजगी डॉक्टरर्स मृत्यु प्रमाणपत्र देण्यास तयार नाहीत, त्यानंतर ४ तारखेला घरोघरी जाऊन

तपासणी केली तेव्हा ११० पैकी पाच रुग्ण गॅस्ट्रोचे आढळले त्यांचेवर योग्य ते उपचार करण्यात आले एकही मृत्युमुखी नाही. त्यानंतर ५ तारखेला १३० जनांना तपासले तसेच ६ व ७ तारखेला सुध्दा तपासले परंतु कोणीही गॅस्ट्रो लागण झाल्याचे रुग्ण आढळले नाही किंवा मरण पावलेले नाहीत. त्यामुळे मी स्वतः संबंधित गावामध्ये जाऊन पाहणी केली. चौकशी अंती कुणीही रुग्ण आढळले नसल्याचे निदर्शनास आले. तरीही ९ तारखेपासून ब्रिजवाडी, मसनतपुर, नारेगाव, मुकुंदवाडी आणि संजयनगर या गावामध्ये आरोग्य विभागामार्फत कॅम्पची व्यवस्था केलेली होती. आमचे कर्मचारी घरोघरी जाऊन गोळ्या वाटप करणे व रुग्ण तपासणीचे काम जोरात केले परंतु आतापर्यंत कुणीही रुग्ण आढळले नाही. ही अभिनंदनाची बाब आहे. रोगनिदान शिबीरात हगवणी नंतर त्वरीत उपचार करण्यात आले. ज्या भागांमध्ये आमच्या आरोग्य विभागाने कॅम्प घेतला त्या सर्व ठिकाणी नळाचे पाण्याची टेस्ट साठी नमुने गोळा केले. खाजगी विहिरीवरील पाण्याचे सुध्दा नमुने घेतले. शिवाय काही भागांमध्ये ड्रेनेज लाईन फुटलेल्या आहेत तेथील ड्रेनेजचे पाणी जमिनीत मुरते. त्यामुळे आरोग्यावर परिणाम होतो. अशा खजगी विहिरीच्या मालकांना व त्या ठिकाणी सदरील पाणी पिण्यास मनाई आहे. असा बोर्ड लावण्याची सुचना केलेली आहे. जवळपास २० हजार गोळ्या या भागामध्ये घरोघरी वाटप करण्यात आल्या आहेत. या विभागामार्फत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आलेले असून स. सदस्य श्री. बंडू प्रधान यांनी सुचित केल्याप्रमाणे शताब्दीनगर येथील एक रुग्ण मेंदुज्वराने मरण पावला. तो रिपोर्ट खोटा असून तो रुगण दारुमुळे मरण पावला याबाबतचा माझ्याकडे रिपोर्ट आहे. आणि मी मा. महापौर, आयुक्त व उपमहापौर यांच्या निदर्शनास ही बाब आणलेली आहे. कबीरनगर येथे ड्रेनेजचे लाईन फुटल्याने पाणी दुषित झालेले होते. त्या भागात स. सदस्य श्री. प्रकाश जावळे यांच्या सहकार्याने त्वरीत उपाययोजना करण्यात ओली आहे. तसेच एम.आय.डी.सी. तेथील महाराष्ट्र डिस्टलरिज कंपनी बाबत जी चर्चा गेल्या ३ वर्षापासून चालू आहे व तेथील पाणी दुषित आहे त्या संदर्भात प्रासिक्युशन दाखल करण्यात आलेले आहे. ज्या ठिकाणी पाण्याची सोय योग्य नाही. त्या भागामध्ये टँकरद्वारे पुरवठा तर साफसफाई व औषधांची फवारणी सर्वत्र आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्यात येत असून किमान एक महिना तरी याबाबत सतर्क राहण्यास सुचना दिलेल्या आहेत.

श्री. मोतीराम घडामोडे : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी जो खुलासा केलेला आहे, त्याबाबत दोन गोष्टीची परत माहिती द्यावी की, सरकारी घाटी दवाखान्यामध्ये जो रुगण उपचार घेत होता त्याला लागण कशामुळे झाली याची माहिती द्यावी.

मा. महापौर : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी आताच खुलासा केलेला आहे.

श्री. मोतीराम घडामोडे : आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जी माहिती दिली ती संपुर्ण खोटी असून त्यांनी संपुर्ण शहरातील आरोग्याच्या दृष्टीने खबरदारी घेतलेली नाही व सभागृहाची ते दिशाभुल करीत आहेत.

श्री. शांताराम काळे : लागण कशामुळे झाली याची माहिती सभागृहात द्यावी.

श्री. बंडू प्रधान : गेल्या ३ वर्षापासून मी सतत सांगत आहे की, मनपाचे आरोग्य विभागाचे कार्य योग्य रित्या चालत नसुन फक्त पैशांची उधळपट्टी होत आहे. आरोग्य विभागाच्या अकार्यक्षमतेने नागरिकांचे नुकसान होते. मागील महिन्यातच मी सुचित केले होते की, माझ्या वार्डात एक व्यकती मेंदुज्वराचा आहे. त्याबाबत उपाययोजना व्हावी. परंतु त्यांचे बाबतीत काहीही कार्यवाही झालेली नाही उलट आरोग्य अध्किाऱ्यांनी या ठिकाणी चुकीची माहिती सांगुन सभागृहाची दिशाभुल करित आहेत.

श्री. रतनकुमार पंडागळे: मा. महापौर आपण केवळ चर्चा न करता या गंभिर प्रश्नावर सभागृहात निर्णय घ्यावा.

श्री. नरेंद्र पाटील : स. सदस्यांनी लक्षवेधी सुचनाद्वारे विचार मांडलेले आहेत. केवळ जे लोक मरण पावलेले आहेत त्यांना मनपातर्फे आर्थिक मदत देण्याचा विचार व्हावा.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा केलेला आहे. आपण काय निर्णय घ्यावयाचा ते सर्वांनी सुचित करावे.

श्री. बंडू प्रधान : आरोग्य विभागाच कारभार चांगला नसुन महाराष्ट्र शासनाकडून प्रशासनाकडे पत्र आलेले ओ की, या ठिकाणी वर्ग १ चे पद निर्माण करावे. तेव्हा त्यानुसार वर्ग १ चे पदास या ठिकाणी मंजुरी देऊन भरण्याची कार्यवाही करण्यास याच बैठकीत ठरवावे.

श्री. महादेव सुर्यवंशी : आरोग्य अधिकाऱ्यांनी खुलासा केल्यानुसार जो रुगण दवाखान्यात मरण पावला तो गॅस्ट्रोने किंवा कशाने याबाबत शंका येते. ब्रिजवाडी नारेगाव ते घाटी दवाखाना हे अंतर जवळपास १० कि.मी. वर आहे. जर रुग्ण उलटी व संडास करित असेल आणि त्याला या ठिकाणी खाजगी इलाज करण्यासाठी डॉक्टर सुध्दा नाहीत तेव्हा रिक्शाही मिळत नाही तर घाटी दवाखान्यात कसे पोहचेल. तो पर्यंत तो रुग्ण मरणार नाही तर राहील काय? मग घाटीत इलाज करेपर्यंत ते प्रमाणपत्र काय म्हणून देतील. याचे उत्तर डॉक्टरांनी द्यावे. माझ्या माहितीप्रमाणे १५ दिवसांनी नाही परंतु एक किंवा वर्ष भरात दोन महिन्याच्या अंतराने आरोग्य विभागाचे एकदा पथक तपासणीसाठी येत असे. प्रत्येक मृत्यु झालेल्याच्या पालकास रुपये १०,०००/- देण्याची मंजुरी द्यावी.

मा. महापौर : ठिक आहे. स. सदस्याच्या भावना लक्षात घेता आरोग्य विभागाने यापुढे तत्परता दाखविली आणि कोणत्या प्रभागामध्ये किती वेळेस शिबिरे किंवा तपासणी केलीत याची माहिती पुढील वेळेस द्यावी. त्याचप्रमाणे १८ खेड्यांचा जो समावेश करण्यात आला त्या भागामध्ये सुध्दा वेळोवेळी शिबिरे घेण्यासाठी सुचना केलेली होती त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी.

श्री. रतनकुमार पंडागळे,
श्री. मोतीराम घडामोडे : संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती वगैरे न मागविता त्यांच्या निष्क्रीयते बद्दल त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही व्हावी. किंवा दोन वेतनवाढी थांबवाव्यात. अशा प्रकारचा निर्णय आपण द्यावा म्हणजे आरोग्य विभागावर एक प्रकारे वचक राहील.

श्री. इकबालसिंग गिल : संबंधित अधिकाऱ्यावर कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी एक चौकशी समिती नेमून त्यानंतर कार्यवाही करावी. तोपर्यंत नाही.

श्री. शांताराम काळे : एखाद्या अधिकाऱ्यांना निलंबित करुन दुसरे वर्ग १ चे पद निर्मिती केल्यास ते भरुन शहराचा आरोग्य विभागाची सुधारणा होणार आहे काय? त्याचा सविस्तर विचार व्हावा.

श्री. बंडू प्रधान : महाराष्ट्र शासनाकडून मा. आयुक्त यांचेकडे एक पत्र आले आहे की, या मनपामध्ये एक आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वर्ग १ चे पद निर्मित करुन भरण्यात यावे. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

श्री. रशिद मामु : आरोग्य विभागास कारणीभुत म्हणून आरोग्य कमिटी व त्यांचे सभापती जबाबदार आहेत कारण त्यांनी काहीही केलेले नाही.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, एका मुद्दावर चर्चा व्हावी. ज्या भागामध्ये अतिवृष्टीने काही लोकांचे बळी केले त्यांना मनपातर्फे काय आर्थिक मदत करता येईल याची चर्चा व्हावी. नंतर आरोग्य विभागाबाबत निर्णय घेण्यात येईल. तशा सुचना मांडाव्यात.

श्री. प्रकाश जावळे : मृत्यु पावलेल्या प्रत्येक वस्तीतील लोकांना मनपातर्फे रुपये १० हजार प्रत्येकी देण्यात याव्यात.

श्री. मुजिब आलमशा खान : पावसाळ्यापुर्वी सफसफाईसाठी जे चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्यात आली त्याप्रमाणे माझ्या वार्डातील अजय कॉलनी, मुजिब कॉलनी भागात नाल्याची साफसफाई अद्यापही झालेली नाही. मग वाढीव कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन काय फायदा. कोणत्या भागामध्ये साफसफाईचे कामे केल्या जातात याची माहिती द्यावी. येथील नाल्या पुर्णपणे भरुन गेलेल्या दिसतात. कधीही साफसफाई होत नाही. त्यामुळे दुर्गंधी येते. लोकप्रतिनिधी अधिकाऱ्यासमोर सुचना मांडतात परंतु त्यावर कार्यवाही होत नाही. आपण आजही सभागृहात चर्चा करु परंतु उद्याला अधिकारी त्या चर्चेवर काम करायला धजत नाही. गेल्या चार वर्षापासून बऱ्याचशा स. सदस्याची कामे झाली नाहीत. जी सभागृहाच्या चर्चेने झाली आहेत अशी नावे दाखवावी. सिल्लेखानाबाबत एवढी चर्चा होऊनही अद्यापही काहीही नाही याचे कारण काय?

डॉ. चेनकरन संचेती : स. सदस्याच्या तिव्र भावना लक्षात घेता स. सदस्याच्या काही कामाबाबत ज्या सुचना असतात त्या संबंधित अधिकाऱ्यांना सांगतात, परंतु ते अधिकारी काम करीत नाहीत. त्यासाठी प्रशासनाने कार्यभार सुरळीत चालणेसाठी मा. आयुक्त यांचेवर योगय ती जबाबदारी टाकावी आणि त्यांनी तो निर्णय घ्यावा असे ठरवावे.

श्री. मोतीराम घडामोडे : मा. आयुक्तांना प्रशासनाचा कार्यभार चालवित असतांना संबंधित विभागाचे धिकारी हे आकडेवारी दर्शवून सांगतात त्यामुळे आयुक्त काही वेळोवेळी प्रत्यक्ष स्थळी जाउन पाहणी करीत नाही. त्यामुळे मा. आयुक्तांनाही, अधिकारी वर्ग सविस्तर माहिती देत नाही हे दिसून येते. दुसरे असे की, विविध भागामध्ये जे लोक मृत्यु पावले त्यांना मनपातर्फे रुपये १० हजार आर्थिक मदत द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : मेलेल्या व्यक्तींना मदत मनपातर्फे जाहीर करित असतांना अंदाजपत्रकात किती तरतुद आहे याची माहिती घेऊनच पुढील कार्यवाही व्हावी.

श्री. तकी हसन खान : स. सदस्यांनी काही त्यांच्या वार्डातील लोक गॅस्ट्रोने मरण पावले त्यामुळे त्यांना मनपातर्फे आर्थिक मदत देण्याचे सुचित केले परंतु

मनपाची काही चुक आहे काय? याचाही विार होणे आवश्यक आहे. अपघाती मृत्यु झालेले आहे तर काहींचे गॅस्ट्रोने मृत्यु झाले असल्याचे प्रमाणपत्र नाही तर आपण मदत का देणार? जर तसे असेल तर मी सुध्दा माझ्या वार्डातील चार पाच व्यक्ती मृत्यु पावले असल्याची माहिती देऊन विना प्रमाणपत्राची मी आर्थिक मदतीची मागणी करतो. मग आपण कुणाकुणाला देणार.

मा. महापौर : अपघाती निधन झाले अशा व्यक्तींनाच आपण आर्थीक मदत देणार आहोत. माझ्याही वार्डात एक-दोन व्यक्ती आहेत. त्यामुळे असे बरेच वार्डातील लोकांचे अपघाती निधनाबाबत सभागृहाच्या निर्णयानुसार विचार करणे आवश्यक आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मदत देणे अथवा न देणे हानंतरचा प्रश्न आहे. परंतु सामाजिक बांधीलकी म्हणून सद्‌भावना या दृष्टिने मनपातर्फे आर्थिक मदत देण्यास हरकत नाही. परंतु जबाबदारी म्हणून नाही. माझ्या वार्डातील तीन व्यक्तींचे अपघाती निधन झाले त्यांना मदत द्यावी.

श्री. अजिज जहागिरदार : अतिवृष्टीने माझ्या वार्डामध्ये अंगावर भिंत पडून विविध ठिकाणी चार लोक मेले त्यांची नावे मी देईन. त्यांनाही आर्थिक मदत देण्याची कार्यवाही करावी. माझ्या वार्डात नाले आहेत. त्यामुळे बरेच नुकसान झाले.

मा. महापौर : स. सदस्यांच्या सुचना लक्षात घेता ज्या वार्डातील अपघाती निधनाने लोकांचे बळी गेले अशांना रुपये ५ हजार प्रत्येकी मंजुरी देण्यात येते.

श्री. नारायण फत्तेलष्कर: मृत्यु मुखी पडलेल्यांना आर्थिक मदत देण्याबाबत पुनर्विचार व्हावा. त्यास माझा विरोध आहे. कारण ज्या नाल्यावरील घरे आहेत ती शासनाची जमीन असून त्याव अतिक्रमणे करुन घरे बांधलेली आहेत. त्यांनी जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतलेली आहे काय? या नाल्यामध्ये अतिवृष्टीने घरे वाहुन गेली त्यामुळे जबाबदार मनपा नाही. तरीही शासनातर्फे रुपये ५००/- प्रत्येकी दिलेले आहत. तर यास तहसिलदार जिल्हाधिकारी व महाराष्ट्र शासन जबाबदार आहे. मनपाने याबाबतची जबाबदारी घेऊ नये. प्रायव्हेट जमीन मालक असेल ते त्यांनी पहावे. याबाबत मनपाने सहकार्य करु नये.

श्री. मुजिब आलमशा खान : यास कारणीभुत मनपा आहे. मनपाचे कर्तव्य होते की, त्या भागातील लोकांचे पंचनामे करुन त्यांचे बाबतीत रेकॉर्ड लिहुन घ्यावे. परंतु तसे या ठिकाणी झालेले नाही या कारणीभुत कोण आहे तर मनपाच आहे.

श्री. नारायण फत्तेलष्कर: याबाबत प्रशासनान जिल्हाधिकारी यांचेकडे योग्य ती चौकशी करुन नाल्यावरील घरांचे बाबतीत माहिती द्यावी. आणि ज्यांचे अपघाती निधन झाले अशंनाच आर्थिक मदत द्यावी कारण मनपाचा पैसा म्हणजे लोकांचाच पैसा आहे. आपण कुणालाही वाटून चालणार नाही. तर योग्य ती चौकशी करुनच कार्यवाही करावी.

श्री. रशिद मामु,
श्री. मोहमंद हफिजोद्दिन: माझ्या वार्डामध्ये मृत्युमुखी पडले त्यांना आर्थिक मदत मनपातर्फे देण्याची कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : जे मृत्युमुखी पडले त्यांना मनपातर्फे रुपये ५ हजार प्रत्यकी आर्थिक मदत देण्यात यावी आणि जे दोषी असतील त्यांचेवर कडक कार्यवाही करण्यात यावी.

श्री. मोतीराम घडामोडे : काय कडक कार्यवाही करणार? असा निर्णय न देता संबंधित आरोगय वैद्यकीय अधिकाऱ्यांची निलंबनाची कार्यवाही करावी किंवा दोन वेतनवाढी थांबविण्यात यावी.

श्री. रतनकुमार पंडागळे: जखमेवर मिठ चोळण्याचा प्रयत्न होऊ नये.

मा. महापौर : मी याबाबत एका चौकशी समितीची नियुक्ती करतो.

श्री. बंडू प्रधान : चौकशी समिती नेमुन काहीच होणार नाही. आणि चौकशी समितीवर आमचा विश्र्वास नाही.

श्री. मोतीराम घडामोडे : चौकशी समिती केवळ निलंबनाच्या कार्यवाहीसाठी नेमावी आणि आरोग्य अधिकाऱ्यांच्या कामांचे निष्क्रियते बद्दल दोन वेतनवाढी थांबविण्यात याव्यात.

श्री. रतनकुमार पंडागळे,

श्री. पिटर वंजारे,

श्री. बंडू प्रधान : चौकशी समितीची या ठिकाणी आवश्यकता नाही. आम्हाला निर्णयाची अपेक्षा आहे. गेल्या वेळेस पासून वर्तमान पत्रात डॉक्टरांचे बाबतीत व आरोग्याबाबत वृत्त प्रसिध्द झालेले आहे.

श्री. प्रकाश जावळे : समितीची वाट न पाहता मा. महापौर, मा. आयुक्त व उप महापौर आहेत. आपण तिघांनाच निर्णय द्यावा. तो आम्हाला मान्य राहील.

श्री. किशोर थोरात : संबंधित अधिकाऱ्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी व याबाबतचा निर्णय पंधरा दिवसात द्यावा.

श्री. शांताराम काळे : स. सदस्य श्री. बंडू प्रधान यांनी पुर्वग्रह दुषित अनुषंगाने वैयक्तीक बोलू नये. तेव्हा जी काही कार्यवाही करावयाची असेल त्याबाबत आत्मपरिक्षण करणे आवश्यक आहे. पडताळणी केल्यानंतरच पुढील कार्यवाही व्हावी. विनाकारण सभागृहात बोलण्यात काहीच अर्थ नाही. अन्यथा एकही अधिकारी या सभागृहात बसणार नाहीत. दुराग्रह करुन सभागृहात वेगळी प्रथा पाडू नये.

सौ. लता दलाल : कोणत्याही अधिकाऱ्यांची चौशी करावयाची असेल तर अगोदर स्थायी समितीकडे प्रकरणयेते आणि त्यानंतर त्याच्या निर्णयानंतर विषय सर्वसाधारण सभेकडे येतो हे मनपाच्या नियमावलीच्या आधारे असे करणे आवश्यक आहे. तोपर्यंत कोणत्याही अधिकाऱ्यांना विना चौकशी काही करता येऊ शकत नाही.

श्री. बंडू प्रधान : मा. महापौर साहेब हा आजचा अजंडा यामध्ये मागील सभेचे इतिवृत्त आहे त्यात वाचले असेल की, एका शाळेतील दोन शिखकांना विना चौकशी निलंबित केले हे कसे काय? कोणती चौकशी समिती नेमली हे नियमाच्या अधीन आहे काय याची माहिती द्यावी.

श्री. मोतीराम घडामोडे : निलंबनाची कार्यवाही नंतर करावी परंतु सध्या दोन वेतनवाढी गोठविण्यात यावे.

श्री. बंडू प्रधान : दोन शिक्षकांना निलंबित केले त्यावेळी एखादी समिती नेमेलेली होती काय याची माहिती द्यावी. (यावेळी सभागृहात स. सदस्याचा फार आवाज चालू असतो काहीही ऐकु येत नाही)

श्री. प्रकाश जावळे : मृत्युमुखी पडलेल्यांना मनपातर्फे आर्थिक मदत द्यावी. व या प्रकरणी जे कुणी दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करायची. असा आपण निर्णय दिलेला आहे. या गॅस्ट्रो प्रकरणी सभागृहात गल्लत निर्माण होत आहे. स. सदस्य श्री. धडामोडे यांनी सुचित केल्याप्रमाणे जर या गॅस्ट्रोच्या प्रकरणी आरोग्य अधिकारी यांच्या निष्क्रीयते बद्दल त्यांचे दोन ऐवजी एक वेतनवाढी थांबवावी आणि निलंबनाची कार्यवाही चौकशीनंतर करावी. मागील बैठकीत ज्या दोन शिखकांना निलंबीत केले. त्याबद्दल शिक्षण अधिकाऱ्यांनी सभागृहात योग्य ती माहिती दिलेली नव्हती त्यामुळे वेगळा निर्णय चुकीने दिला गेला. त्या शाळेतील शिखकांवर पोलीस केस झालेली नव्हती. तर गावातील लोकांवर त्या शिक्षकांनी पोलीस केस केली त्यामुळे त्या शाळेमध्ये संबंधित शिक्षकांना लोकांनी मारहाण केली असा खुलासा शिक्षण अधिकाऱ्यांनी सांगितला असता तर शिक्षकांवर कार्यवाही झालीच नसती. म्हणजेच ब्रिजवाडी येथील घटनेच्या संदर्भात चौकशी करण्यापुर्वी आरोग्य अधिकाऱ्यांचे वेतनवाढ रोखण्यात यावी.

श्री. तकी हसन खान : स. सदस्य श्री. प्रकाश जावळे यांनी मागील बैठकीत त्या दोन शिक्षकांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती नसतांना व विचार विनिमय न करता सभागृहात बोलले व त्यांचेवर कार्यवाही करण्ययास भाग पाडले आणि आता नेमके त्या बाजुने बोलण्यात काय अर्थ.

श्री. प्रकाश जावळे : तसे नसून मागील बैठकीत शिक्षण अधिकारी यांनी सभागृहात चुकीची माहिती दिलेली होती. त्यामुळे सभागृहात कुणाची बाजु न घेता जे दोषी आहेत. शिक्षणासारख्या पपित्र ठिकाणी मनपाची लाज वेशीवर टांगल्या जाते तेव्हा त्या शिक्षकांना योग्य ती शिक्षा झालीच पाहिजे म्हणून आम्ही स्वतः सुचित केले परंतु नेमके कारण वेगळे असल्याने याबाबतचा निर्णय फिरवावा असे आमचे मत आहे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. प्रकाश जावळे आपण सुचित केल्याप्रमाणे ती कार्यवाही झालेली आहे आता पुन्हा आपण त्याच प्रकरणाबाबत सुचवित असाल तर त्याबाबत आम्ही विचार करणार आहोत.

श्री. तकी हसन खान : ज्या शाळेमध्ये घटना घडलेली आहे त्या शाळेच्या शिक्षिकांचे पती इयत्ता सातवी पासुन त्या शिक्षिकेस पालन पोषण करुन सांभाळीत आहेत आणि ते सध्याही सुखाचा संसार करीत आहेत. अशा पवित्र शिक्षिकेस बदनामी करुन त्यांचा संसार उध्वस्त करणे योग्य नसून ती चर्चा न समजता मागील बैठकीत झाली ती चुकीने झाली. तशीच चर्चा आरोग्य अधिकाऱ्यांच्या बाबतीत विना चौकशीने करायची व पुढील बैठकीत माफ करायचे हे धोरण योगय वाटत नाही. यासाठी विचारपुर्वक सभागृहात बोलावे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. तकी हसन खान आपणास सुचित करण्यात येते की, आपण विषयांतर करु नये.

श्री. मोतीराम घडामोडे : आरोग्य अधिकाऱ्यांनी जे चार लोक मृत्युमुखी पडले त्याबाबत निष्क्रियता दाखविली नसेल तर त्यांचा रुपये ५०००/- देऊन सत्कार करावा, त्यास आमचा पाठिंबा आहे.

श्री. बंडू प्रधान : आणि आमचे अनुमोदन आहे. आरोग्य अधिकाऱ्यांनी पाच वर्षात आतापर्यंत कधी कोणत्या रुग्णास तपासले नाही किंवा इंजेक्शन दिलेले नाही.

मा. महापौर : गॅस्ट्रोच्या प्रकरणी एक समिती नेमण्यात येते ज्यामध्ये स्थायी समितीचे सभापती, मा. आयुक्त

श्री. बंडू प्रधान,

श्री. पिटर वंजारे : समितीचे गठण नको. आमचा समितीवर कोणताही विश्वास नाही.

श्री. मोतीराम घडामोडे : या समितीमध्ये रतनकुमार पंडागळे, पिटर वंजारे, मा. आयुक्त, बंडू प्रधान व माझ्यासकट चेनकरण संचेती यांना घ्यावे.

मा. महापौर : ठिक आहे. सर्वांच्या सुचनेनुसार आरोग्य विभागाची गॅस्ट्रोने घडलेल्या घटने संदर्भात मा. आयुक्त हे चौकशी करतील.

श्री. मोतीराम घडामोडे,

श्री. बंडू प्रधान : मागील बैठकीत आरोग्य वैद्यकीय अकािऱ्यांनी यांना सदस्यांनी गॅस्ट्रोच्या संदर्भात विचारणा केली असता तंनी साथ नाही असे सांगितले. त्यानंतरही गॅस्ट्रोने चार रुग्ण मेले. या घटनेच्या व आरोग्य विभागाचा निषेध आम्ही करतो. व सभात्याग करतो. (अंदाजे वेळ १:३० वा. स. सदस्य श्री. घडामोडे, सुर्यवंशी, रतनकुमार पंडागळे, बंडू प्रधान यांनी सभात्याग केला)

मा. महापौर : ठिक आहे.

श्री. किशोर थोरात : सभागृहाचा वेळ वाया न घालविता प्रत्यक्षात इतिवृत्तास सुरुवात करण्यात यावी व नागरिकांचे कामे करावी. समिती नेमू नये. शहराच्या विकासासाठी सर्वांनी प्रयत्न करावे.

मा. महापौर : बरोबर आहे. तर या संदर्भात मा. आयुक्त योग्य ती चौकशी करतील. त्याचबरोबर स. सदस्य श्री. अलफखान, सौ. लता दलाल यांनी सुचित केल्याप्रमाणे नाल्यातील केरकचरा व्यवस्थीत साफसफाई होणे आवश्यक असून नाल्याच्या कडेला असलेल्या घरांना मनपातर्फे नोटीस देणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत मा. आयुक्त योग्य ती चौकशी करुन पुढील बैठकीत माहिती देतील.

श्री. जयवंत ओक : माझ्या वार्डामध्ये मा. आयुक्त यांनी चौकशी केलेली आहे. जी घरे वाहुन गेली त्यांचे बाबतीत काय?

मा. महापौर : याबाबत मा. आयुक्त योग्य ती कार्यवाही करतील.

मा. महापौर : ठिक आहे, आता इतिवृत्तावर चर्चा करण्यात यावी.

(इतक्यात सभागृहात अंदाजे १:४० वा. स. सदस्य श्री. बंडू प्रधान यांचा प्रवेश)

श्री. बंडू प्रधान : मी सभागृहाला विनंती करतो की, आरोग्य अधिकाऱ्यांनी हॅलोजनच्या गोळ्या कधी विकत घेतल्या आणि त्याची एक्सपायर तारीख काय आहे याची माहिती द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : मा. महापौर एका सदस्यांनी एकाच वेळेस किती वेळा बोलावे, याबाबत आपण समज द्यावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. बंडू प्रधान आपणास सुचित करण्यात येते की, तो विषय आता संपलेला आहे. आपण कृपया खाली बसावे.

श्री. अजिज जहागिरदार : विषय क्र. १ ला सुरुवात व्हावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. बंडू प्रधान आपण विचारलेल्या प्रश्ना संदर्भात योग्य ती माहिती पाहिजे असल्यास तुम्ही माझ्या दालनामध्ये यावे मी आपणास सर्व माहिती संबंधित विभागाकडून मिळवून देतो.

श्री. बंडू प्रधान : जोपर्यंत मला हॅलोजनच्या गोळ्या कधी विकत घेतल्या व त्याची मदत कधी संपते याची माहिती देत नाही तोपर्यंत मी आपल्या समोर बैठा सत्याग्रह करीन.

मा. महापौर : स. सदस्य श्री. बंडू प्रधान आपणास पुन्हा विनंती करण्यात येते की, आपण सभागृहाचा वेळ वाया घालवू नये या इकाणी न बसता आपण आपल्या जागेवर स्थानापन्न व्हावे.

श्री. बंडू प्रधान : मी नागरिकांच्या प्रश्नाबाबत या ठिकाणी मांडीत आहे आपण मला संबंधित प्रश्नाची माहिती द्यावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. बंडू प्रधान आपणास पुन्हा विनंती करण्यात येते की, आपण सभागृहाचा वेळ घालविण्यापेक्षा तुम्ही माझ्या दालनात या मी तुम्हाला सविस्तर माहिती देतो.

(यावेळी सभागृहात स. सदस्य श्री. रतनकुमार पंडागळे, सुर्यवंशी, घडामोडे, यांचा प्रवेश वेळ अंदाजे १:४५ वाजता)

श्री. बंडू प्रधान : मी विचारलेली माहिती मला आताच द्यावी. अन्यथा मलाही या प्रश्नासाठी सभागृहात काचा फोडण्याचा प्रकार करावा लागेल. कृपया याची नोंद घ्यावी.

मा. महापौर : तो विषय आता संपलेला आहे. आपण त्यावर चर्चा करु नये.

श्री. जयवंत ओक : मा. महापौर आपण आपल्या गार्डला सांगुन स. सदस्यांना बाहेर घालवावे.

श्री. बंडू प्रधान : मला मी विचारलेल्य प्रश्नांची माहिती त्वरीत द्यावी अन्यथा सभगृहाचे कामकाज चालू देणार नाही (असे बोलून सभाध्यक्षांच्या आसनजवळ खाली बसतात)

मा. महापौर : स. सदस्य श्री. बंडू प्रधान आपणास पुन्हा एकदा वार्निंग देण्यात येते की, आपण आपल्या जागेवर स्थानापन्न व्हावे. कोणताही नियमाचा भंग करण्याचा प्रयत्न करु नये.

श्री. नरेंद्र पाटील : स. सदस्य श्री. बंडू प्राधान म्हणतात की, मी मनपाचे नुकसान करीन तेव्हा काही फर्निचर वगैरेची नुकसान झाल्यास त्याचा सर्व खर्च संबंधित सदस्यांकडून घ्यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सदस्य श्री. बंडू प्रधान यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत माहिती देण्यासाठी दुपार ३:०० पर्यंतचा कालावधी द्यावा. म्हणजे स. सदस्य आपल्या जागेवर स्थानापन्न होतील.

मा. महापौर : ठिक आहे. दुपारी ३ वाजता याबाबत माहिती देण्यात येईल.

श्री. जयवंत ओक : महानगरपालिकेच्या सार्वत्रीक निवडणुकीमध्ये मिटिंग विभागातील सहा कर्मचारी वर्गांनी जी निवडणुकीच्या संदर्भात चोख कामगिरी पार पाडली त्या सहा कर्मचाऱ्यांना एक आगाऊ वेतनवाढ देण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे, वरील सहा कर्मचाऱ्यांना एक आगाऊ वेतनवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## "लक्षवेधी सुचना संपली"

**विषय क्र. ४५/१ :** दिनांक २०/८/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

श्री. अजिज जहागिरदार : पान क्र. ३२ मध्ये ठराव क्र. ३९/४ मध्ये नगर रचनाकार यांना त्यांचे मुळ खात्यात दि. १/८/९२ पासून ऐवजी दि. १/१०/९२ पासून कार्यमुक्त करावे, अशी दुरुस्ती व्हावी.

मा. महापौर : ठिक आहे. दुरुस्त करण्यात यावी.

श्री. प्रकाश जावळे : इतिवृत्तातील पान क्र. ४ ते ७ मध्ये पडेगाव शाळेतील दोन निलंबित शिक्षकांचे बाबतीत

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : याबाबत शिक्षकांचे बाबतीत निलंबनाऐवजी पुर्ण चौकशी करुन निर्णय घेण्यात यावी अशी दुरुस्ती व्हावी.

श्री. प्रकश जावळे : मागील इतिवृत्तात पान क्र. ८ मध्ये मा. महापौर आपण शिखकांना निलंबित करण्याचे आदेश दिलेत. यामध्ये शिक्षण अधिकाऱ्यांनी सभागृहाला खोटी माहिती दिली त्यामुळे संबंधित शिखक/शिक्षिकांची बेअब्रु झाली यास जबाबदार शिक्षण अधिकारी आहेत. त्यामुळे त्यांचेवर कार्यवाही व्हावी. आणि शिक्षकांवर केलेली निलंबनाची कार्यवाही रद्द करण्यात यावी व त्यांना कामावर हजर राहण्याचे आदेश द्यावेत.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : शिक्षकांवर निलंबनाची कार्यवाही केली त्याबाबत स्थगिती देऊन चौकशी नंतर निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : ठिक आहे. स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे मो. पडेगाव येथील दोन शिक्षकांना निलंबनाची कार्यवाही मागील बैठकीत केलेली होती. त्यास स्थगिती देऊन योग्य ती चौकशी नंतर निर्णय घेण्यात येईल. अशी दुरुस्ती करण्यात येते.

श्री. मुजिब आलमशा खान : इतिवृत्तातील पान क्र. १३ मध्ये सुचित केल्याप्रमाणे सिल्लेखाना बाबत कार्यवाही त्वरीत करण्याबाबत सुचना द्याव्यात.

मा. महापौर : ठिक आहे.

श्री. रशिद मामु : इतिवृत्तातील पान क्र. १४ वर माझ्या वाक्यामध्ये परंतु डुकरे रस्त्यावरुन फिरतात त्यांचे मांस कापुन रस्त्यावर फेकल्या जाते. तसे वाक्य नसुन यामध्ये दुरुस्ती व्हावी. (वगळण्यात यावे)

मा. महापौर : ठिक आहे. या वाक्यात दुरुस्ती करण्यात यावी. आणि विषय क. १ यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ४५/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्तातील पान क्र. ३२ मध्ये ठराव क्र. ३९/४ मध्ये नगररचनाकार यांना त्यांचे मुळ खात्यात दिनांक १/८/९२ पासून ऐवजी दिनांक १/१०/९२ पासून कार्यमुक्त करावे अशी दुरुस्ती करण्यात येते.

इतिवृत्तातील पान क्र. ७ मध्ये मो. पडेगाव येथील मनपाच्या शाळेतील दोन शिक्षकांना निलंबित केले. त्या निर्णयास स्थगिती देऊन या प्रकरणी चौकशी करुन नंतर निर्णय घ्यावा अशी दुरुस्ती करण्यात येते.

इतिवृत्तातील पान क्र. १४ मध्ये स. सदस्य श्री. रशिद मामु यांच्या तोंडून आलेले वाक्य परंतु डुकरे रस्त्यावरुन फिरतात त्यांचे मांस कापुन रस्त्यावर फेकल्या जाते हे वाक्य इतिवृत्तातुन वगळण्यात येते. या व इतर दुरुस्त्यासह दिनांक २०/८/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४६/२ :** (दि. २७/७/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे ठराव क्र. २८/६) औरंगाबाद महानगरपालिकेसाठी सिडको पोलीस स्टेशन समोरील सुमारे ७३ हेक्टर जागेत कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी मंजुर केलेल्या रेखांकनात १० हेक्टर जागा वाहतुक नगरासाठी प्रस्तावित केलेली आहे. ही जागा जाधववाडी येथील स.नं. ५ (भाग), स.नं. १६ (भाग), व हर्सुल येथील स.नं. १३५ (भाग) ते १३७ (भाग) पैकी आहे. ही जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही चालु आहे.
शासन नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई मा. सचिव यांनी औरंगाबाद येथे पिसादेवी रस्त्याला नव्याने विकसित होत असलेल्या कृषी उतपन्न बाजार समितीच्या व्यापारी संकुला लगत वाहतुक नगरसाठी जागा आरक्षित करावी नियोजित २४ मी. रुंद रस्ता ाहतुक नगरासाठी अपुरा पडत असल्याने त्यास ४५ मी. रुंद करावा तसेच नॉनकनफर्मींग इंउस्ट्रीजचे क्षेत्र कमी करुन ट्रान्सपोर्ट नगरमध्ये सामील करावे इत्यादी गौण फेरबदल त्यांचे दिनांक ९/१०/९१ चे अर्धशासकीय पत्रान्वये कळविले आहे.
प्रकरणी मा. उपसंचालक, नगर रचना औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा तयार करुन पुढील वैधानिक कार्यवाहीसाठी पाठविला आहे. प्रकरणी खालील प्रमाणे गौण फेरबदल प्रस्तावित करण्यात येत आहे.

(१) स.नं. १९२, १९३ पासुन पुढे पिसादेवी रस्त्यास जोडणारा २४.०० मी. रुंद रस्ता व पिसादेवी रस्त्याचा जंक्शन पासून हर्सुल वळण रस्त्यापर्यंत ही २४ मी. रुंद विकास योजना रस्त्याची आखणी केलेली आहे. या २४ मी. रुंद रस्त्यास नकाशवर दर्शविल्या प्रमाणे ४५ मी. करणे.

(२) कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मिळणाऱ्या जागेच्या उत्तर पूर्व भगात नॉन कनफर्मींग इंडस्ट्रीजसाठी असलेला काही भाग वाहतुक नगरसाठी ठेवून सुमारे २०.५ हेक्टर जागा वाहतुक नगरसाठी ठेवणे.

(३) स.नं. १९२, १९३ हर्सुल पासुन पुढे जाणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेस असलेले स.नं. १५४ ते १५६ च्या जमीनी निवास भागातुन वगळून आणि क्र. ८ प्राथमिक शाळा, आरक्षण क्र. ९ क्रिंडांगण आणि ४० फुट रुंद रस्त्याच्या आखणीत रद्द करुन संपुर्ण भाग वाणिज्य वापरांसाठी आरक्षित करणे

शासन नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक १५/१०/९१ रोजीचे मंजुरी आदेश क्र. टीपीएस-३०८८-४५४-सी-आर-५९८८-युडी-१२ अन्वये मंजुर केलेल्या विकास योजनेत वरील प्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २७ अन्वये गौण फेरबदल करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

<u>**संवाद**</u>

मा. महापौर : सदरचा विषय शासनामार्फत आल्याने त्यास मंजुरी देण्यात येते.
**ठराव क्र. ४६/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. २८/६ दि. २७/७/९२ अन्वये मंजुरीनुसार कार्वाही चालू असून शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अर्धशासकीय पत्राने काही भाग गौन फेरबदल करण्याचे सुचित केले, त्यानुसार

उपसंचालक, नगररचना औरंगाबाद यांनी प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा तयार करुन वैधानिक कार्यवाहीसाठी पाठविला आहे.

(१) स.नं. १९२, १९३ पासून पुढे पिसादेवी रस्त्यास जोडणारा २४.०० मी. रुंद रस्ता व पिसादेवी रस्त्याचा जंक्शन पासून हर्सुल वळण रस्त्यापर्यंतही २४.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याची आखणी केलेली आहे. या २४.०० मी रुंद रस्त्यास नकाशावर दर्शविल्याप्रमाणे ४५.०० मी. करणे.

(२) कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मिळणाऱ्या जागेच्या उत्तरपुर्वी भागात नॉन कन्फर्मीन इंडस्ट्रीजसाठी असलेला काही भाग वाहतुक नगरासाठी ठेऊन सुमारे २०.५ हेक्टर जागा वाहतुक नगरासाठी ठेवणे.

(३) स.नं. १९२, १९३, हर्सुल पासुन पुढे जाणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेस असलेले स.नं. १५४ ते १६ च्या जमिनी विकास भागातुन वगळून आणि क्र. ८ प्राथमिक शाळा, आरक्षक क्र. ९ क्रिडांगण आणि ४० फुट रुंद रस्त्याच्या आखणीत रद्द करुन संपुर्ण भाग वाणीज्य वापरासाठी आरक्षित करणे आदीबाबत मंजुरी विकास योजनेत वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## "पुरवणी विषय पत्रिका"

**विषय क्र. ४७/३ :** वार्ड क्र. २५ कैसरकॉलनी (शिट नं. ४८) ४० फुट डी.पी. रोड रद्द करणे संबंधी.

सदरील डी.पी. रोड हा डॉ. रझवी व श्री. बेग कॉन्ट्रॅक्टर यांचे घरावरुन ते सुत गिरणीपर्यंत आहे. तसेच पाठीमागील श्री. इसमाईल टिनमेकर यांचे घरापासुन ते रणछोडदास यों गिरणीपर्यंत असा हा रोड नकाशामध्ये दाखविलेला आहे. सदरील रोडची काहीही गरज नाही तेव्हा कैसर कॉलनीतील (या भागातील) लोकांना एन.ओ.सी. मिळत नाही म्हणून सदरील रोडचे आरक्षण रद्द करुन एन.ओ.सी. व इतर सुविधा घेता याव्यात.

सुचक :- मोहसीन अहमद
अनुमोदक :- फैय्याजखान
दिनांक :- १४/७/९२.

**संवाद**

मा. महापौर : सदरील विषयांचे अनुमोदक नसल्याने पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात येते.

**ठराव क्र. ४७/३:** विषय क्र. १ ते ५ पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात यावे.

**विषय क्र. ४८/४ :** यांत्रिकी विभागात दररोज गाड्याचे दुरुस्तीचे काम दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या मनपाचे मालकीच्या ७९ गाड्या आहेत. तसेच चालु अर्थसंकल्पामये १७ गाड्या खरेदी करण्याचे ठरले. यांत्रिकी विभागामध्ये उप अभियंता या पदाची एक जागा आहे व दोन कनिष्ठ अभियंता आहे. तरी कामाचा व्याप जो वाढत आहे ते ध्यानात घेऊन या विभागास अणखीन एक उप अभियंता व एक कनिष्ठ अभियंता ही नवीन पदे करण्यात येऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावी.

सुचक :- श्री. मोहसिन अहमद
अनुमोदक :- फैय्याजखान
दिनांक :- १४/७/९२

**मा. महापौर** : सदरील विषयांचे अनुमोदक नसल्याने पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात येते.

**ठराव क्र. ४८/४ :** विषय क्र. १ ते ५ पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात यावे.

**विषय क्र. ४९/५ :** औरंगाबाद महापालिका हद्दील शहरात ज्या ज्या ठिकाणी वस्ी लगत नाले आहे असे नाल्यांना कंपाऊंडवाल बांधण्यात यावे. ज्यामुळे पासात होणारा नागरिकांचा व वस्तीतील घराचे नुकसान टाळता येईल. विशेष म्हणजे बारुदगरनाला कटकट गेट नाला, गणेश कॉलनी नाला, कबाडीपुरा नाला, नवामोंढा नाला, आठवडी बाजार येथील नाला, बारापुल्ला गरम पाणी नाला, टाऊन हॉल नाला, जुनाबाजार नाला, नागेश्वर वाडी नाला, किराडपुरा रहेमानिया कॉलनी नाला, संजयनगर जिन्सी नाला व इत्यादी नाल्यास कंपाऊंडवाल बांधण्याची मंजुरीस्तव सादर.

सुचक :- अजिमखान दादामिया
अनुमोदक :- धनंजय गंगाखेडकर
दिनांक :- ८/९/९२.

**मा. महापौर** : सदरील विषयाचे अनुमोदक नसल्याने पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात येते.

**ठराव क्र. ४९/५ :** विषय क्र. १ ते ५ पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात येते.

**विषय क्र. ५०/६ :** शहराचा वाढता विस्तार व त्याच बरोबर नगरविकास यांच्या विविध नागरी समस्या बाबत वाढत्या तक्रारी विचारात घेता व विकास कामे तसेच समस्या वेळेवर निवारण करणेसाठी दि. १९/२/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रस्ताव क्र. ११७ नुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांमधुन जेष्ठता, शैक्षणिक पात्रता लक्षात घेऊन दोन अधिकाऱ्यांना उप आयुक्त म्हणून आहे त्याच वेतनावर शासनाची या पदास मंजुरी येईपर्यंत काम देणे बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर झालेला आहे.
त्यानुसार श्री. शमिम आफदी, जकात अधिक्षक व २) श्री. अंभोरे जी.एम., सचिव यांना उपरोक्त ठरावा नुसार उप आयुक्त म्हणून नियुक्ती ताबडतोब करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक :- १) श्री. धनंजय गंगाखेडकर
२) श्री. प्रदिप जैस्वाल
अनुमोदक :- १) श्री. अविनाश कुमावत
२) श्री. प्रकाश जावळे
दिनांक :- ९/९/९२.

**मा. महापौर** : सदरील विषयांचे अनुमोदक पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात येते.

**ठराव क्र. ५०/६ :** विषय क्र. १ ते ५ पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात यावे.

**विषय क्र. ५१/७ :** श्री. आनंदपुर सत्संग आश्रम गोविंदनगर बन्सीलाल नगर ७९९.५० चौरस मिटर जागा ९२ वर्षाचा करार देण्यात यावे.

सुचक :- श्री. रतनकुमार पंडागळे
अनुमोदक :- श्री. विठ्ठल पेरकर
दिनांक :- ११/९/९२

**मा. महापौर** : सदरील विषयांचे अनुमोदक नसल्याने पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात येते.

**ठराव क्र. ५१/७ :** विषय क्र. १ ते ५ सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात यावे.

याबरोबरच "जन गन मन" राष्ट्रगीताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## मंगळवार दिनांक २०/१०/१९९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**मंगळवार दिनांक २०/१०/९२ रोजी ११.०० वाजता मा. महापौर, श्री. अशोक यादव सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गीताने सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेस मा. आयुक्त, उप आयुक्त, अधिकारी तथा खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. अजिमखान दादामियाँ अ. रहेमान
२) श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
४) श्री. अजिजुला बेग वाहिद बेग
५) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
८) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
९) श्री. पाटील नरेंद्र यादवराव
१०) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
११) श्री. आयुब गुलाम जिलानी
१२) श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१३) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१४) श्री. जावेद हसनखान कसीम हसनखान
१५) श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
१६) श्री. स.अ. एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
१७) श्री. मिर्झा अन्वरबेग हमीद बेग
१८) श्री. ओक जयवंत केशवराव
१९) श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग
२०) श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
२१) श्री. अ. रशीद खान (मामु) अ. हमीद खान
२२) सौ. दलाल लता श्रीनिवास
२३) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२४) श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२५) श्री. हाजी मोहमद हाफीजोद्दीन
२६) श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२७) श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२८) डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
२९) श्री. म. इस्माईल अ. करीम
३०) श्री. फैय्याजखान अहमदखान
३१) श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद
३२) श्री. मगर शंकर जिजाराम

३३) श्री. मानकापे नामदेवराव शामराव
३४) श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
३५) श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
३६) श्री. अलफखान हुसेनखान
३७) श्री. वाघमारे सुदाम भानुदास
३८) श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
३९) श्री. थोरात किशोर गोविंदराव
४०) श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४१) डॉ. काळे शांताराम यशवंतराव
४२) श्री. दत्त प्रदिप कुमार एस.
४३) श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
४४) श्री. बारवाल गजानन रामकिसन
४५) श्री. गोडसे आनंद जगदीश
४६) श्री. जाहागिरदार अजिज मुख्तार अहमद
४७) श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
४८) श्री. जावळे प्रकाश शिवराम
४९) श्री. गाडे गंगाधर सुखदेव
५०) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
५१) श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५२) श्री. परदेशी सुभाष शिवलाल
५३) श्री. नवपुते कचरु चंद्रभान

**<u>संवाद</u>**

श्री. रशिद मामु : महानगरपालिकेचे कर्मचारी पै.जी.ए. खान सभागृह नेते श्री. धनंजय गंगाखेडकर यांचे भाऊजी कै. प्रकाश भालचंद्र मानके तसेच कै. आसारामजी मुगदिया यांचे देहावसान झाले तेव्हा मी सभागृहास विनंती करतो की, यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे. सभागृहात ००.०२ मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात यावी. (सभागृहात पै.जी.ए. खान कै. प्रकाश भालचंद्र मालके आणि कै. आसारामजी मुगदिया यांना ०.२ मिनिटे आदरांजली वाहण्यात आली)

मा. महापौर : सर्वप्रथम दिवाळी निमित्त सर्व अधिकारी/कर्मचारी तथा पत्रकार बंधु आणि स. सदस्य यांना शुभेच्छा व्यक्त करतो की, सर्वांची दिवाळी सुखसमृध्दीची व भरभराटीची जावो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना.

श्री. प्रदिप जैस्वाल : सभेच्या विषय पत्रिकेला सुरुवात करण्यापुर्वी मी सुचना मांडू इच्छितो की, स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी काही प्रस्ताव सभेसाठी मांडलेले होते. परंतु त्यांचे प्रस्ताव या सर्वसाधारण सभेमध्ये का घेतलेले नाही. याचा खुलासा व्हावा.

श्री. जयवंत ओक : काही पुतळ्या संबंधीचे प्रस्ताव मी मांडलेले होते का घेण्यात आलेले नाहीत.

मा. महापौर : पुतळ्यासंबंधी तर याबाबत पुतळा कमिटी आहे आणि आतापर्यंत बरेच प्रस्ताव पुतळ्याचे मंजुर झालेले आहेत. त्यांचे बाबतीत अजुनही काहीही झालेले नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : या देशामध्ये जे क्रांतीवीर होऊन गेलेले आहेत अशा महापुरुषांचे पुतळे शहराच्या विविध भागामध्ये उभारण्यासाठी प्रस्ताव होते. तथापी आपण या सीभेमध्ये स्विकृत केलेले नाही तेव्हा आपण विषय पत्रिकेवर प्रस्ताव घेऊन चर्चा करावी. यापुर्वी सुध्दा शाहु महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. आंबेडकरांचे पुतळे आपण उभारण्याबाबत प्रस्ताव मंजुर केलेले आहेत. त्याचप्रमाणे या प्रस्तावात सुध्दा आपण विषय पत्रिकेवर घेऊन मंजुर करावेत.

श्री. जयवंत ओक : खेदाची बाब आहे की, छत्रपती शाहु महाराज यांचा पुतळा मिलकॉर्नर येथे बसविण्यासंबंधी प्रस्ताव मंजुर झालेला होता. जवळपास दोन वर्षाचा कालावधी लोटलेला आहे परंतु अद्यापही काहीही झालेले नाही याचे कारण काय? तसेच अण्णाभाऊ साठे यांचाही पुतळा बसविणे बाबत प्रस्ताव मंजुर झालेला आहे. त्याबाबतही माहिती द्यावी.

श्री. केशव सोनवणे : स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी मांडलेले प्रस्ताव आपण विषय पत्रिकेवर का घेतलेले नाहीत याची माहिती द्यावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. जयवंत ओक, यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार छत्रपती शाहु महाराज यांचा पुतळा अद्यापही का बसविण्यात आलेला नाही याबाबतची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावी.

अति. शहर अभियंता : छत्रपती शाहु महाराज यांचा पुतळा तयार झालेला आहे.

मा. महापौर : पुतळा तयार झालेला आहे. परंतु बसविण्यास विलंब का लागतो व मंजुर होऊन त्याचा कालावधी किती होता याची माहिती द्यावी.

अति. शहर अभियंता : सदरील पुतळ्या बाबत लौकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल.

मा. महापौर : संबंधित पुतळा बसविण्याची लोकरात लवकर कार्यवाही व्हावी.

श्री. रशिद मामु : ज्या ठिकाणी पुतळा बसविण्या संबंधीकार्यवाही होईल त्या ठिकाणच्या परिसरात आजुबाजुला काही अडचणी येतील काय? याचा विचार होणे आवश्यक असून पुतळा बसविल्यानंतर त्या ठिकाणी एखाद्या वॉचमनची नेमणुक असावी. ज्यामुळे योग्य ती व्यवस्था व निगराणी राहील.

मा. महापौर : स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी सुचित केलेले प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्यात यावे.

श्री. जयवंत ओक : मी मांडलेले प्रस्ताव नियमानुसार असून ते सर्व प्रस्ताव या सभेमध्ये घेण्यात यावे.

श्री. महादेव सुर्यवंशी : अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविणे बाबत अद्यापही कार्यवाही झालेली नाही. त्या ठिकाणी फक्त आयलॅडचे मार्क आऊट करण्यात आलेले आहे.

श्री. रशीद मामु : पुतळ्यांचे प्रस्ताव या सभेत न ठेवता पुढे ढकलण्यात यावे आणि जे प्रस्ताव पुतळ्याचे मंजुर झालेले आहेत ते कधीचे आहेत याची माहिती द्यावी.

श्री. बंडू प्रधान : पुतळ्या संबंधीचे जे प्रस्ताव मंजुर झालेले होते ते सर्व नगर परिषद यांच्या काळातील होते. आता फक्त त्याची अंमलबजावणी होत आहे.

मा. महापौर : बरोबर आहे. पुतळ्यांचे प्रस्ताव पुर्वीच मंजुर झालेले असून आता अंमलबजावणी होत आहे.

श्री. गंगाधर गाडे : ज्या ज्या महापुरुषंचे पुतळ्यांचे संदर्भात प्रस्ताव मंजुर झ ालेले आहेत त्याची त्वरीत अमलबजावणी व्हावी. तसेच जालना रोड हा दिवसेंदिवस अपघाताचा रोड होत असल्याने जे भरधाव ट्रक जाणे येणे करतात त्यास आळा बसण्यासाठी बिड रोडकडून महानुभाव मंदिराजवळ पैठण रोडवर जो बायपास रस्ता येऊन मिळविलेला आहे त्या रस्त्याबाबत प्रशासनातर्फे किंवा सार्वजनिक बांधकाम विभागास मनपातील सर्व स. सदस्यांनी एकत्रीत येऊन शासनास पाठपुरावा करावा नव्हे तर दबाव आणुन जालना रोड वरील अपघातास आळा बसविण्यासाठी बीड रोड कसा लौकर सुरु होईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, जेणे करुन ऐन दिवाळीच्या आंनदाच्या वातावरणात अजुन किती लोक बळी पडणार याची दक्षता घेऊन त्वरीत कार्याही करावी.

श्री. नरेंद्र पाटील : स. सदस्य श्री. गाडे यांनी मांडलेली सुचना योग्य आहे या सुचनावर मागील वर्षी सुध्दा बरीच चर्चा झालेली होती. परंतु त्यानंतर काहीच झालेले नाही. जालना रोडवर रहदारी फार वाढलेली आहे. पिंट्रव्हॅल ते सिडको बस स्थानक पर्यंत रस्त्यावर अतिक्रमणे फार मोठ्या प्रमाणात झ ालेली आहे. रस्ता अरुंद वाटतो यासाठी जी अतिक्रमणे वाढली ती काढण्याचे काम मनपाने करावे की, सर्वाजनिक बांधकाम विभागाने करावे याची माहिती द्यावी आणि जर मनपाने करायचे तर आजपर्यंत का नाही काढले.

मा. महापौर : ठिक आहे. आपण सुचित केल्याप्रमाणे या संदर्भात शासनावर दडपण आणनेच्या दृष्टीने एका कमिटीचे वतीने मा. महापौर, उप. महापौर, स्थायी समितीचे सभापती, सभागृह नेता आणि विरोधी पक्ष नेता आदींचे वतीने मा. मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन लक्ष केंद्रीत करु.

श्री. अजिज जहागिरदार : स. सदस्य श्री. पाटील यांनी सुचित केल्याप्रमाणे जालना रोडवर अतिक्रमणे वाढली या संदर्भात मागील ३-४ वषा्रपासुन मी शासनास लेखी तक्रारी देऊन विचारणा केलेली आहे. की हा रोड १३२ फुटाचा असून १६/१६ फुटी हा प्लॅटफार्मसाठी आहे तथापी या रोडवरील विविध दुकानदार, हॉटेल्स आणि छोटे छोटे उद्योगधंदे वाल्यांनी अतिक्रमणे करुन प्लॅट फार्मची जागा अतिक्रमीत केलेली आहे. यास सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार आहे. कारण या रोडवर प्लॅट फार्मच्या जागेसाठी मनपाने लाखो रुपये जागेच्या मोबदल्यात दिलेले आहे. तेव्हा याबाबतीत त्वरीत कार्यवाही व्हावी.

श्री. अलफखान : जालना रोडच्या अपघात प्रकरणाने बऱ्याच जनांचे बळी गेलेले आहेत यासाठी आपण असे बंधन घालणे आवश्यक आहे की, सकाळी आठ ते सायंकाळच्या आठ वाजेपर्यंत जड वाहनास या रोडवर संपुर्णत: बंदी असावी. हे शासनास दिसत नाही तो पर्यंत कोणतीही पुढील कार्यवाही होणार नाही.

श्री. कचरु नवपुते : क्रांतीचौक ते विमानतळापर्यंतचा रोड रुंद झालेला आहे.परंतु विमानतळ ते चिकलठाण गावापर्यंतच रस्ता रुंदीकरण करण्यात आलेला नाही. याबाबत एक प्रस्ताव मंजुर झालेला आहे. तथापी अद्यापही कार्यवाही झालेली नाही. तसेच क्रांतीचौक ते मुकुंदवाडी पर्यंत मध्यवर्ती लाईटींगची

व्यवस्था झालेली आहे. परंतु त्यापुढे गावापर्यंत झालेली नाही. ती त्वरीत करावी.

मा. महापौर : लाईटींगचे काम लवकरात लवकर पुर्ण होईल.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : जालना रोड संपुर्ण १३२ फुटी आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाने फक्त १५ फुटी फुटपाथ ठेवलेला आहे आणि बाकीच्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे त्यामुळे वाहनेही बरीच उभी रहातात आणि अपघात होण्याची शक्यता असते यासाठी सिल्लेखाना ते सिडको व आणखी एक दुसरा इंटरनल रोड बाहेर निघण्यासाठी मनपाने तयार करणे आवश्यक आहे. जोपर्यंत असे रस्ते तयार करणार नाही. तोपर्यंत बीड रोडकडे वळण करणे बरोबर वाटणार नाही. यासाठी दरररोज हजारो वाहणे अटकुन पडण्याची शक्यता आहे. यास्तव अतिक्रमीत भाग त्वरीत हालविणे आवश्यक वाटते.

श्री. गंगाधर गाडे : ज्या दुकानदारांनी, हॉटेल्स वाल्यांना जागेचा योग्य तो मोबदला मनपाने देऊनही अतिक्रमण रस्त्यावर केलेले असल्यास यासाठी मनपाने सुध्दपातळीवर अतिक्रमण हटविण्याबाबत कार्यवाही करावी.

मा.महापौर : स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार जालना रोड वरील अतिक्रमणे युध्द पातळीवर हटविण्यासाठी सर्व स. सदस्यांनी योग्य ते सहकार्य करावे आणि मा. आयुक्त यांना विनंती की, या कामाच्या वेळी कोणताही भेद न बाळगता शासकीय असो व खाजगी अतिक्रमणे असो ते त्वरती हटविण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री. अविनाश कुमावत : सर्वप्रथम या रोडवर जडवाहणे जे भरधाव धावतात त्याचे कारण मोंढा भाग ओह. यासाठी मोंढा येथुन हलविणे आवश्यक आहे.

श्री. शांताराम काळे : जालना रोडवर ज्या स.सदस्यांच्या आशिर्वादाने रस्त्यावर अतिक्रमणे करुन दुकाने आहेत ते सर्वप्रथम हटविणे आवश्यक आहे. त्यास सहकार्य करावे तसेच रस्त्यावर जे ट्रक उभे राहतात त्यांना उभे राहु देता कामा नये या दोन गोष्टीची दक्षता घेण्याबाबत सुचना कराव्यात.

श्री. अजिजुल्ला बेग : दिवसेंदिवस जालना रोडवर बरेच अपघात होतात यासाठी क्रांतीचौक पासून एक ओव्हर हायवे ब्रिज तयार करण्याचे प्रपोजल करुन शासनाकडे पाठवावे. सन १९९३-९४ चा प्लॅन मंजुर करतांना याबाबतचा विचार करावा. असे शासनास कळवावे. ज्यामुळे जड वाहनासाठी वेगळा रस्ता तयार होईल आणि अपघात होणार नाहीत.

श्री. अजिज जहागिरदार : पुणे, मुंबई, सोलापुर, कोल्हापुर इ. ठिकाणी कार्यालयीन वेळेपुर्वी ८ ते ११ व सायंकाळी ५ ते ८ जड वाहनास बंदी घालतात तशी पध्दत या रोडसाठी अवलंबवावी.

श्री. म. इस्माईल : जालना रोडवर रस्त्याच्या कडेला जे विद्युत मंडळाचे व टेलीफोनचे खांब आहेत ते त्वरीत हटविण्याची कार्यवाही करावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : विषयांतर करु नये अति महत्वाचा जालना रोडच्या प्रश्नासंदर्भात चर्चा असल्याने आम्ही गप्प बसलो परंतु स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी मांडलेल्या प्रस्तावाचे बाबतीत काय करणार याची माहिती द्यावी.

मा. महापौर : याच बैठकीत घेण्यात येणार आहेत.

श्री. प्रकाश जावळे : स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे जालना रोड बाबत युध्द पातळीवर अतिक्रमण हटविणे बाबत कार्याला लागावे.

मा. महापौर : ठिक आहे. स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे जालना रोड बाबतीत युध्द पातळीवर कामास सुरुवत करण्यात यावी.

**विषय क्र. ५२/१ :** दिनांक १६/९/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>**संवाद**</u>

श्री. गिरजाराम हाळनोर,
श्री. प्रदिप जैस्वाल : इतिवृत्तातील पान क्र. २१ मध्ये मिटिंग विभागातील सहा कर्मचारी यांना मनपा निवडणुकीच्या वेळी काम केल्याबद्दल एक वेतनवाढ देण्यात यावी असे सुचित केले होते. त्याबद्दल अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

मा. महापौर : ठिक आहे. आपण सुचित केल्याप्रमाणे या कर्मचाऱ्यांना एक आगाऊ वेतनवाढ देण्यात यावे.

श्री. मोतीराम घडामोडे : पान क्र. २१ मध्ये मा. महापौर यांनी असा निर्णय दिलेला आहे की, स. सदस्य श्री. बंडू प्रधान यांनी विचारलेल्या हलोजनच्या गोळ्या संदर्भातील प्रश्नांची माहिती दुपारी ३ वाजता देण्यात येईल तेव्हा सदरची माहिती मळाली किंवा नाही हे सभागृहाला सांगावे.

मा. महापौर : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी माझ्याकडे माहिती दिलेली आहे.

श्री. बंडू प्रधान : त्याच दिवशी दुपारी ३ वाजता मी मा. महापौर यांच्या दालनात बसुन होतो तथापी आरोग्य वैद्यकीय अधिकारी या दालनाकडे आलेलेच नाहीत.

श्री. प्रदिप जैस्वाल : इतिवृत्तामध्ये काही दुरुस्त्या सुचवावयाच्या असल्यास त्या सुचवाव्यात.

श्री. मोतीराम घडामोडे : स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती सभागृहाला मिळत नाही ही दुर्देवी गोष्ट आहे.

**मा. महापौर** : इतिवृत्तास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र.५२/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्तामधील काही दुरुस्त्यासह दि. १६/९/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३/२ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, ओरंगाबाद शहरतील नागरिकांना घर वापरासाठी व तर विद्युत कनेक्शन घ्यावयाचे असल्यास महानगरपालिकेतर्फे विद्युत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते. परंतु अद्यापपर्यंत विद्युत ना हरकत प्रमाणपत्रासाठी महानगरपालिकेतर्फे कुठलीही फीस आकारण्यात आलेली नाही. नागरिकांना ना हरकत प्रमाणपत्र विनामुल्य दिली जातात. परंतु जर विद्युत ना हरकत प्रमाणपत्रासाठी महानगरपलिकेतर्फे काही आकार (फिस) आकारल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. स्लम विभागाकरिता रुपये २५/- व इतर भागाकरिता रुपये ५०/- प्रति ना हरकत प्रमाणपत्र असा आकार आकारणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ना हरकत प्रमाणपत्र द्यावयाच्या नियम व अटी खालील प्रमाणे**

(१) विद्युत ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज देणे आवश्यक आहे व अर्जास ६५ पैशाचे कोर्ट फी स्टॅम्प लावणे  आवश्यक आहे.

(२) अर्जासोबत घराचा स्थळ दर्शक नकाशा द्यावा लागेल.

(३) अर्जदाराने चालु आर्थीक वर्षापर्यंतचा संपुर्ण मालमत्ता कर भरलेला असणे जरुरी राहील.

(४) मालमत्ता कर आकारलेला नसेल तर महानगरपालिकेचा बांधकाम परवाना जोडणे आवश्यक राहील.

(५) बांधकाम परवान्याची मुदत संपलेली असल्यास त्याचे नुतनीकरण आवश्यक राहील.

(६) भाडे करार ना हरकत प्रमाणपत्र लागत असल्यास घर मालकाचे नो ऑब्जेक्शन व संपुर्ण कर भरलेला असावा.

तरी उपरोक्त अटी व नियम मंजुर असल्यास विद्युत ना हरकत प्रमाणपत्रासाठी आकार (फीस) आकारणे बाबतचे जाहिर प्रगटन नियम व अटीसह स्थानिक वृत्तपत्रास प्रसिध्द करुन प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेनंतर दिलेल्या तारखेपासून उपरोक्त दर्शविलेल्या आकार आकारला जाईल करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

<u>**संवाद**</u>

श्री. प्रकाश जावळे : माजी महापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या कालावधीत झ ोपडपट्टी व स्लम भागातील अतिक्रमणीत घरांना विद्युत पुरवठा करणेसाठी " ना हरकत प्रमाणपत्र" देण्याचे ठरलेले आहे. तरीही याठिकाणी प्रशासनामार्फत पुन्हा काही अटीसह हा प्रस्ताव  आलेला आहे. यासाठी स्लम भागातील लोकांना कोणत्याही प्रकारची अट लादु नये व विनामुल्य ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे आणि इतर भागाकरिता रुपये ५०/- ऐवजी २५/- ना हरकत प्रमाणपत्र देणेसाठी आकारावे.

मा. महापौर : सदरील विषय संदर्भात सविस्तर चर्चा करुन पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : या प्रस्तावास विरोध करु नये कारण मनपाची आर्थिक स्थिती पाहता अत्यंत नाजुक आहे. तेव्हा सर्वानुमते प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मागील वर्षी असे ठरलेले होते की, जो भाग आरक्षित आहे आणि तशा जागेवर अतिक्रमण होऊन घरे झालेली आहेत व तो स्लम आहे अशा भागातील नागरिकांना कोणतही प्रकारची फीस आकारणी करु नये. व आरक्षीत असलेली जमीन रद्द करण्याची कार्यवाही करावी.

श्री. अलफखान : प्रस्तावातील अटी व नियमावलीतील अनु.क्र. ४ मध्ये मालमत्ता कर आकारलेला नसेल तर मनपाचा बांधकाम परवाना जोडणे आवश्यक राहील. हे बरोबर आहे परंतु अलीकडेच शासनाने दिनांक २/६/९२ अन्वये एक जी.आर. काढलेले आहे त्याचे अवलोकन करावे आणि त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी तसेच "ना हरकत प्रमाणपत्र" देतांना मंदिर, मस्जीद, बौध्द मंदिर, चर्च वगैरे बाबत ज्या संख्या आहेत मंडळे आहेत त्यांचेकडून कोणत्याही प्रकारची फीस आकारणी करु नये अशी सुचना व्हावी.

श्री. शांताराम काळे : घर बांधकाम व लाईटसाठी "ना हरकत प्रमाणपत्र" आशा दोनसाठी प्रमाणपत्र आवश्यक आहे. शहरातील नागरीक गरीब / श्रीमंत

आहेत. त्यामुळे या कामासाठी सर्वांनाच गरज भासणार तेव्हा सर्वसाधारण लोकांना या कामासाठी दहा वेळेस मनपाकडे धिरट्या घालावे लागणार नाही याची खबरदारी घ्यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : जो भाग खरोखरच स्लम आहे. अशा भागाला याचा लाभ व्हावा परंतु एखाद्या स. सदस्यांनी म्हटले की, माझा भाग स्लम करावा तर तो होईल काय? मनपाची आर्थिक स्थिती नाजुक असल्याने यावर जास्त चर्चा करु नये.

श्री. गंगाधर गाडे : स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांच्या मुद्दाशी मी सहमत आहे. त्यांचे सुचनेनुसार जे स्लम शासन निर्णय आहेत त्यांना याबाबतचा फायदा व्हावा परंतु आज शहरामध्ये ५१ ते ५२ स्लम आहेत. त्या स्लम भागातील नेमके किती भागांना लाभ होतो याचा विचार होणे आवश्यक अआहे. म्हणजे जे स्लमच्या नावाखाली काही फायदे घेण्याचे प्रयत्न करतात त्यांना आळा बसणे आवश्यक आहे. यासाठी प्रस्तावातील नियम क्र. २ , ३, ४ यातुन वगळण्यात यावे.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, आपल्या ज्या काही सुचना आहेत त्या सुचना मांडाव्यात त्यावर काही दुरुस्ती असल्यास पुढील बैठकीत दुरुस्तीसह ठेवता येतील.

श्री. प्रकाश जावळे : या प्रस्तावास स्थगिती दिलेली आहे तोपर्यंत मागील नियमाप्रमाणे कार्यवाही होणार काय?

मा. महापौर : होय.

श्री. रशिद मामु : सदरील प्रस्ताव गरिबांवर अन्याय करणार आहे असे वाटते. यामध्ये भाडेकरु व मालक असे दोन भाग करावे जर स्लम भागातील नागरिकांनी टॅक्स भरलेला नसेल आणि बांधकामाची परवानगी तर मिळत नाही व घेतही नाही तेव्हा अशावेळी या अटी लावलेल्या आहेत त्या योग्य नसुन त्या वगळण्यात याव्यात.

श्री. तकी हसन खान : स. सदस्यांनी काही सुचना द्यावयाच्या असल्यास लोखी स्वरुपात द्याव्यात.

श्री. अजिज जगिरदार : अटीमधील क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे स्लम भाग आहे त्या भागातील नागरिकांनी टॅक्स भरलेला नाही व बांधकाम परवानगी घेतलेली नाही तेव्हा आपण त्यांना "ना हरकत प्रमाणपत्र" देणार काय? याची माहिती द्यावी.

श्री. अजिजुल्ला बेग : रिकामा प्लॉट ओह. आणि या जागेला टॅक्स नाही. घर सुध्दा लवकर बांधावयाचे नाही केवळ वॉचमनला राहण्यासाठी लाईटची आवश्यकता आहे. याबाबत आपण काय करणार यामधील शर्ती २,३,४ वगळण्यात याव्यात.

श्री. शंकर मगर : प्रस्तावातील अटी ३,४ वगळून यामधील काही रुपये कमी जास्त करुन प्रस्ताव घ्यावा.

श्री. अविनाश कुमावत : मंदिर, मस्जीद, बौध्दमंदीर, चर्च, गुरुद्वारा आदीबाबत या प्रस्तावातुन वगळण्यात यावे.

मा. महापौर : ठिक आहे. त्यानुसार कार्यवाही होईल, परंतु काही सुचना आहेत त्यांचा विचार करणेत येईल.

**ठराव क्र. ५३/२ :** पुढील सभेपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ५४/२ :** मालमत्ता अधिकारी मा. आयुक्त यांचे मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहेत की, भुतपुर्व नगर परिषद काळात जाहिरात कराचे जे नियम लागू होते त्यानुसारच आजपर्यंत जाहिरात कर आकरला जात आहे.
महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर सन १९८६ मध्ये महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७, १४६, ४५४, व ४५७ अनुसार जाहिरात कराचे नियम तयार केलेले आहेत. सदरहु कायद्यानुसार जाहिरात कराची आकारणी करावयाची झाल्यास या कायद्याचे कलम १२७ (२) (फ) मध्ये सदरहु कर अंतर्भुत करुन घेण्यासाठी सदरहु कायद्याचे कलम १४९ (१) (इ) अन्वये शासनाची पुर्व संमती प्रथम घेणे आवश्यक असले अी परवानगी घेणे बाबत कार्यालयाने १९८६ वर्षात कार्यवाही केलेली आहे. मात्र तांत्रिक अडचणीमुळे अशी परवानगी अद्याप शासनाकडून प्राप्त झालेली नाही. आता या प्रस्तावित ठरावाद्वारे शासन मंजुरी प्राप्तीतील अडचण दुर होणार आहे.
स्थायी समिती ठराव क्र. ३९०/१३ दि. १०/३/९२ अन्वये जाहिरात कराचे सुधारित वाढीव दर सोबत जोडलेल्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे कायम करण्यात आलेलेले आहेत. मात्र शासन मंजुरी प्राप्त होत नाही तो पर्यंत सदरचे दर लागू करता येणार नाहीत. सबब आता वर उल्लेखीत ठरावाद्वारे स्थायी समितीने मंजुर केलेल्या जाहिरात कराचे सुधारीत वाढीव दरास सर्वसाधारण सभेची मंजुरी प्रापत झाल्यानंतर वर उल्लेख केल्याप्रमाणे शासन मंजुरी प्राप्त करुन घेउुन नंतर सदरचे सुधारित दर लागू करणे शक्य होईल.
स्थायी समितीने ठरव क्र. ३९०/९२ कद १०/३/९२ अन्वये निश्चित केलेल्या जाहिरात करचे सुधारित दरास मान्यता मिळणेस्तव तसेच सदरहु कायद्याचे कलम १२७(२) (फ) मध्ये जाहिरात कर अंतर्भुत करुन घेण्यासाठी या कायद्याचे कलम १४९ (१) (इ) अन्वये शासन मंजुरी प्राप्त करुन घेणेस्तव शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस व शासन मंजुरी प्राप्त झ ाल्यानंतर सदरचे सुधारीत दर लागु करण्यास मान्यता मिळणे बाबत विचार होणेस्तव प्रस्ताव सादर.

<u>संवाद</u>

श्री. अलफखान : संबंधित प्रस्तावाबाबत प्रशासनाने मागे दराचे बाबतीतप्रस्ताव करुन पाठविलेला आहे. परंतु पुन्हा शासनाकडून त्या नियमाच्या आधारे प्रतिबंध करण्यासाठी परत आलेला होता तो प्रस्ताव सन १९८६ चा आहे याबाबत प्रशासनाने पडताळणी करावी.

श्री. अजिजुल्ला बेग : सदरचा प्रस्ताव स्थायी समिती सभेमध्ये मंजुर करण्यात आलेला आहे. केवळ सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव प्रस्ताव शिफारीस केलेले आहे.

मा. महापौर : मंजुर.

**ठराव क्र. ५४/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र. ३९०/१३ दि. १०/३/९२ अन्वये मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२७, १४६, ४५४ व ४५७ अनुसार जाहिरात कराचे नियम तयार केलेले आहेत. याकरिता शासनाची पुर्वसंमती घेणे करिता नियम १४९ (१) (अ) अन्वये शासनाकडे मंजुरीस्तव पाठवुन सुधारीत दर लागू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५/४ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ हे लवकरच जालना रोडवरील अद्यावत इमारतीमध्ये स्थलंतरीत होणार आहे. सध्या अस्तितवात असलेल्या भव्य इमारतीबाबत महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणेच्या दृष्टीने कार्यवाहीकरण्यासाठी संबंधित सार्वजनिक बांधकाम व इतर विभागाशी पत्र व्यवहार करुन सध्याची खंडपीठाची इमारत महानगरपालिकेकडे घेण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

<u>संवाद</u>

श्री. नरेंद्र पाटील : सदरील प्रस्तवानुसार ती इमारत घेऊन आपण त्याचे काय कर्तव्य बजावणार ते सांगावे.

श्री. रशिद मामु : ही इमारत घेण्याचे ठरल्यास त्यासाठी किती खर्च येणार याची माहिती द्यावी आणि कोणत्या कामासाठी?

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : उच्च न्यायालयाची इमारत शासनाकडून मिळेल काय?

श्री. बंडू प्रधान : जिल्हा परिषदेने सदरची इमारत घेण्यासाठी प्रस्ताव अगोदरच मंजुर केलेला आहे.

मा. महापौर : स. सदस्यांना सुचित करण्यात येते की, या प्रस्तावावर कोणतीही चर्चा होता कामा नये. आपल्या सर्वाच्या सहकार्याने काही पदाधिकारी मिळून मा. मुख्यमंत्री यांना एका निवेदनाद्वारे यबाबत चर्चा करुन परंतु प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे अगोदर पाठविणे आवश्यक आहे.

श्री. गंगाधर गाडे : या प्रस्तावास माझी संमती आहे हा प्रस्ताव ऐतिहासिक आहे. यास मंजुरी द्यावी.

श्री. रशिद मामु,
श्री. तकी हसन खान,
श्री. मिर्झा अन्वर बेग

श्री. अजिजुल्ला बेग : मनपामध्ये नवीन इमारत बांधुन पडलेली आहे तिचे उद्घाटन अजून नाही आणि दुसरी इमारत ताब्यात घेण्याचे कारण काय? यासाठी खर्च किती अपेक्षित राहणार याची माहिती द्यावी.

श्री. अजिज जहागिरदार : मध्यवर्ती इमारत मनपाकडे घेण्याची साजिष अशी आहे की, मनपाची पाच एकर जागा पंचवटी हॉटेल च्या समोर इमारत बांधकामासाठी आरक्षित केलेली असून मध्यवर्ती इमारत मनपाने ताब्यात घेतल्यास सदरची जागा डिलीट करता येईल.

श्री. अजिजुल्ला बेग : मध्यवर्ती इमारत मनपा घेण्याचे कारण काय आहे. याचा उपयोग कशासाठी होणार, इमारत फ्रि मिळणार आहे काय? या ठिकाणी मनपाची इमारत असतांना इतरत्र मागणी करण्याची आवश्यकता नाही यास माझा विरोध आहे. या संदर्भात मा. आयुक्त यांनी आपला अभिप्राय व्यक्त करावा.

मा. महापौर : अजुन प्रस्तावच मंजुर नाही. तर इमारत कशी मिळणार. सर्वप्रथम प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठवावा आणि नंतर मंजुरी मिळाल्यानंतर कशासाठी इमारतीचा उपयोग करायचा ते ठरविता येईल. जी नवीन इमारत मनपाची सध्या अस्तित्वात आहे तिचे लौकरात लवकर उद्घाटन होईल.

श्री. तकी हसन खान : उच्च न्यायालयाची इमारत रिकामी झाल्यानंतर मनपाकडे घेण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु यामध्ये सदरचा प्रस्ताव कोणत्या विभागामार्फत आला याचा यामध्ये कोणताही उल्लेख नाही. कारण प्रशासनातर्फे प्रस्ताव असलस स्पष्ट उल्लेख असतो की, मालमत्ता विभाग किंवा शहर अभियंता किंवा मा. आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे, असा असतो परंतु या ठिकाणी काहीही उल्लेख नाही. याचा अर्थ आपण काय समजायचा. या करिता हा प्रस्ताव अनिाकृत असून आम्हाला मान्य नाही. करिता संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. तकी हसन आपणास सुचित करण्यात येते की, सदरचा प्रस्ताव प्रशासना मार्फत ठेवण्यात आलेला असून याबाबत आपण आपले मत मांडावे अजंडा ज्यावेळी इतिवृत्त पुर्ण करुन सचिवाच्या सहीने बाहेर पडते. याचाच अर्थ प्रशासनामार्फत आहे.

श्री. तकी हसन खान : कोणत्या विभागामार्फत प्रस्ताव मांडला याची माहिती द्यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : सदरचा प्रस्ताव नगर रचना विभागामार्फत जागा संपादन करणे बाबत येणे आवश्यक होते.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : सदरचा प्रस्ताव प्रशासनामार्फत मांडण्यात आलेला आहे. त्यावर नाव असो अथवा नसो तो प्रशासकीय आहे.

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. ५५/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ हे लवकरच जालना रोडवरील अद्यावत इमारतीमध्ये स्थलांतरीत होणार आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या भव्य इमारती बाबत महानगरपालिकेकडे हसाांतरण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्या करिता संबंधित सार्वजनिक बांधकाम व इतर विभागाशी पत्र व्यवहार करुन सध्याची खंडपीठाची इमारत महानगरपालिकेकडे घेण्याकरिता प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६/५ :** प्रकल्प अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, "दत्तक बालीका योजना" अंतर्गत महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी साठी लागू करण्यात येणाऱ्या दत्तक बालीका योजनाचे नियम, निकष व अटी यास मान्यता मिळणेस्तव.

"नियम निकष व अटी"

(१) सदर योजनेचे नाव "दत्तक बालीका योजना" असे राहील.
(२) महानगरपालिका, औरंगाबादच्या शाळामध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थीसाठी लागू राहील.
(३) वार्षिक उत्पन्न रुपये ११,०००/- (दारिद्र्य रेषेखालील) असणाऱ्या पालकांच्या बालीकांना या योजनेचा लाभ मिळू शकेल.
(४) मनपा शाळांमधुन परिपत्रक पाठवून वृत्तपत्रातुन निवेदन करुन अर्ज मागविण्यात येतील.
(५) एका कुटुंबातील एका बालीकेस योजनेचा लाभ देण्यात येईल.
(६) योजने अंतर्गत दरवर्षी संपुर्ण शालेय साहित्य (हकमत मर्यादा रुपये ५००/- प्रति वर्ष) विनामुल्य पुरविण्यात येईल. त्यात शाळेस गणवेश, वह्या क्रमीक पुस्तके, स्कुल बॅग, पाटी, पेन पेन्सील, रबर, बुट सॉक्स, कंपासपेटी, रंगपेटी, रेनकोट किंवा छत्री इत्यादी साहित्यचा समावेश असेल.

(७) प्रथम वर्षी २०० बालिकांना या योजनेचा लाभ देण्यात येईल. प्रति बालीका रुपये ५०० प्रति वर्ष खर्च करण्यात येईल. गतवर्षी खर्ची न पडलेली रक्कम पुढील वर्षी वापरता येणार नाही.

(८) बालिकांना/पालकांना दोन प्रतीत "मागणी पत्र" (डिमांड स्लिप) देण्यात येतील. एक प्रत कार्यालयाची स्थळप्रत असेल वेळोवेळी आवश्यकतेनुसार पालकांना वरील साहित्य पुरविण्यात येईल. प्रत्येक बालिकेची वेगळी संचिका ठेवण्यात येईल.

(९) योजनेचे वेगळे लेखाशिर्ष हिशोब ठेवण्यात येईल.

(१०) शालेय साहित्य पुरविण्यासाठी वर्षासाठी निविदेद्वारे दर मागविण्या येतील.

(११) महिला समुह संघटक मानधन द.म. रुपये १२००/- (बी.ए./एम.ए. सोशॅलॉजी अथवा एम.एस.डब्ल्यु) वार्षिक करारावर नेमण्यात येईल.

(१२) योजनोठी दानशुर व्यक्ती, पत्रकार, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी कर्मचारी अधिकारी यांचा देणगी स्वरुपात (प्रति बालीका रुपये ५००/-) सहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न केले जातील. सदर रक्कम त्यांनी मनपात आगाऊ जमा करावी. शासनाकडून शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजने अंतर्गत प्राप्त अनुदान रुपये १५ लक्ष मधुनही खर्च करण्यात येईल. भविष्यात जर शासकीय अनुदान बंद झाले तर मनपा स्वखर्चाने सबब योजना राबविल.

"प्रथम वर्षाचा प्रस्तावित खर्च" प्रति वर्ष प्रति बालीका रुपये ५००X२०० बालीका = रुपये १ लक्ष समुह संघटकाचे मानधन रुपये १२००X१२=१४,४०० स्टेशनरी व किरकोळ खर्च रु. ३०,०००/-

खालील परिस्थितीत मदत करण्यात येईल.

अ) बालीका अनुत्तीर्ण झाल्यास.

ब) दिलेल्या मदतीचा गैरवापर झालेला आढळल्यास खोटी माहिती पुरवुन मनपाची दिशाभुल केल्यास.

क) मनपाची शाळा सोडल्यास.

ड) बालिकेची हजेरी सबळ कारणाशिवाय ७५% पेक्षा कमी आढळल्यास.

इ) पालकाच्या आर्थिक स्थितीत समाधानकाकर बदल झाल्यास.

वरील मदत मंजुरी अथवा नामंजुरीचे अधिकार उप आयुक्तांना राहतील.

त्यांना निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक राहील.

## संवाद

श्री. अजिजुल्ला बेग : शहरातील ज्या घोषित स्लम झोपडपट्ट्या परंतु त्या ठिकाणी महानगरपालिकेची शाळा नाही. अशा खाजगी शाळेच्या विद्यार्थीनीसाठी दत्तक बालीका योजना लागू व्हावी.

सौ. लता दलाल : दत्तक बालीका योजने करिता ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ११,०००/- पर्यंत आहे त्यांना या योजनेचा लाभ मिळेल. त्याचप्रमाणे या प्रस्तावाच्या अटीमध्ये असा उल्लेख आहे की, दरवर्षी २०० बालिकांना या योजनेचा लाभ होईल व भविष्यात जर शासकीय अनुदान बंद झाले तर मनपा स्वखर्चाने सबब योजना राबवील तेव्हा या योजनेकरिता एकंदर किती खर्च वार्षिक येणार व दोनशे बालिकांची निवड आपण कशा पध्दतीने करणार आणि कोणकोणत्या भागास याचा लाभ होईल. या सर्व गोष्टीची माहिती देण्यात यावी.

श्री. प्रभाकर विधाते : प्रस्तावाच्या शर्ती व अटीमध्ये खालील परिस्थितीत मदत बाद करण्यात येईल असे दिलेले आहे. त्यापैकी पालकाच्या आर्थिक स्थितीत समाधानकारक बदल झाल्यास आणि वरील मदत मंजुरी अथवा नामंजुरीचे अधिकार उप आयुक्तांना राहतील याबाबत आपण दरवर्षी संबंधित भागाचा सर्व्हे करणार काय याची माहिती द्यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

प्रकल्प अधिकारी : महाराष्ट्र शासनाकडून नागरी मुलभूत सेवा योजना या योजनेसाठी खास १५ लक्षरुपये प्राप्त झालेले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सदरची योजना आखलेली आहे. यामध्ये स्लम भ्ज्ञागामध्ये ज्या ठिकाणी मनपाच्या शाळा आहेत त्या शाळेतील विद्यार्थीनी करिता याला लाभ व्हावा असा मर्यादीत प्रस्ताव आहे. कारण खाजगी शाळा या फीस घेऊन शाळा चालवितात व त्यांचे पालक फीस भरण्यास पात्र असतात. परंतु मनपाचे स्लम भागातील शाळामध्ये दरिद्र रेषेतील बालकांना याचा लाभ होणार आहे. त्याचप्रमाणे दोनशे बालिकांची निवड करण्याकरिता समुह संघटक आहेत त्यांनी मनपाच्या शाळेच्या मुख्याध्यापकाकडून ज्या दोन नावांची शिफारस आलेली असल्यास त्यांनी प्रत्यक्षात गृह भेट घेऊन पाहणी पउताळणी करतील व त्यानुसार निवड केली जाईल. समुह संघटक यांना देण्यात येणारे मानधन रुपये बाराशे हे शासनामार्फत देण्यात येणार आहे.

सौ. लता दलाल : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दिल्याप्रमाणे यात संपुर्ण माहिती मिळालेली नाही त्यामध्ये समुह संघटक किती राहणार जर एकच समुह संघटकाचे पद असल्यास या दोनशे बालिकांची निवड करण्यास उशीर लागण्याची शक्यता आहे आणि ही योजना कधीपासुन सुरवात होईल याचाही उल्लेख नाही तेव्हा साधरणतः शाळा सुरु झाल्यानंतर एका महिन्याने जर दत्तक बालिक योजना राबविण्यासाठी मुख्याध्यापकाकडून शिफारस आल्यास समुह संघटक यांना सर्व्हे करण्यास दुसरा महिना लागणार आहे आणि संपुर्णतः निवड होईपर्यत तीन महिन्यांचा कालावधी लागेल मग संबंधित मुलींना शालेय साहित्य आपण कधी पुरविणार याचाही विचार होणे आवश्यक आहे.

मा. महापौर : ठिक आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सदरील योजनेसाठी लागणारा खर्च शासनामार्फत होणार असून शाळा सुरु झ ााल्यापासून तीन महिन्याच्या आत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल तेव्हा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ५६/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दत्तक बालिका योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्याथ्रीनीसाठी लागू करण्यात येणाऱ्या दत्तक बालिका योजनांसाठी सोबतच्या नियम निकष व अटीसह सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>"पुरवणी विषय पत्रिका"</u>

**विषय क्र. ५७/६ :** वार्ड क्र. ३५ कैसर कॉलनी (शिट नं. ४८) ४० फुट डिपी रोड रद्द करणे संबंधी.

सदरील डी.पी. रोड रझवी व श्री. बेग कॉन्ट्रक्टर यांचे घरावरुन ते सुतगिरणी पर्यंत आहे. तसेच पाठीमागील श्री. इस्माईल टिनमेकर यांचे घरापासुन ते रणछोडदास यांचे गिरणीपर्यंत असा हा रोड नकाशामध्ये दाखविलेला आहे.
सदरील रोडची काहीही गरज नाही. तेव्हा कैसर कॉलनीतील (याभातील) लोकांना एन.ओ.सी. मिळत नाही. म्हणून सदरील रोडचे आरक्षण रद्द करुन एन.ओ.सी. व इतर सुविधा घेता याव्यात.

सुचक :- श्री. मोहसिन अहमद
अनुमोदक :- श्री. फैय्याजखान
दिनांक :- १४/७/९२

<u>**संवाद**</u>

मा. महापौर : प्रस्तावाचे अनुमोदक नसल्याने विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.
**ठराव क्र. ५७/६ :** पुढील बैठकीपर्यंत स्थगित ठेवण्यात यावे.

**विषय क्र. ५९/८ :** औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत शहरात ज्या ज्या ठिकाणी वस्ती लगत नाले ओ असे नाल्यांना कंपाऊंड वॉल बांधण्यात यावे. ज्यामुळै पावसात होणारा नागरिकांचा व वस्तीतील घराचे नुकसान टाळता येईल विशेष म्हणजे बारुदगरनाला, कटकट गेट नाला, गणेश कॉलनी नाला, कबाडीपुरा नाला, नावामोंढा नाला, आठवडी बाजार, येथील नाला, बारापुल्ला गरम पाणी नाला, टाऊनहॉल नाला, जुनाबाजार नाला, नागेश्वरवाडी नाला, किराडपुरा रहेमानिया कॉलनी नाला, संजयनगर जिन्सी नाला व इत्यादी नाल्यास कंपाऊंड वॉल बांधण्याची मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. अजिमखान दादामियाँ
अनुमोदक :- श्री. धनंजय गंगाखेडकर
दिनांक :- ८/९/९२

<u>**संवाद**</u>

**श्री. जयवंत** : या प्रस्तावामध्ये मो. नारळीबाग भागाचा उल्लेख नाही.
**मा. महापौर** : ठिक आहे. प्रस्ताव मंजुर
**ठराव क्र. ५९/८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मनपाच्या हद्दीत शहरात ज्या ज्या ठिकाणी वस्तीलगत नाले आहेत. अशा नाल्यांना कंपाऊंड वॉल बांधण्यात यावे. ज्यामुळे पावसात होणारा नागरिकांचा व वस्तीतील घराचे नुकसान टाळता येईल. यामध्ये प्रामुख्याने बारुदगरनाला, कटकट गेट नाला, गणेश कॉलनी, कबाडीपुरा, नवा मोंढा, आठवडी बाजार, बारापुल्ला गरमपाणी, टाऊन हॉल, जुनाबाजार, नागेश्वरवाडी, किराडपुर, रहेमानिया कॉलनी, संजयनगर जिन्सी व नारळीबाग इ. नाल्यास कंपाऊंड वॉल बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०/९ :** शहराचा वाढता विस्तार व त्याच बरोबर नगरवासियांच्या विविध नागरी समस्याबाबत वाढत्या तक्रारी विचारात घेता व विकास कामे तसेच समस्या वेळेवर निवारण करणेसाठी दि. १९/२/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रस्ताव क्र. ११७ नुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांमधुन जेष्ठता, शैक्षणिक पात्रता लक्षात घेऊन दोन अधिकाऱ्यांना उप आयुक्त म्हणून आहे. त्याच वेतनावर शासनाची या पदास मंजुरी येईपर्यंत काम देणे बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर झालेला आहे.

त्यानुसार श्री. शमिम आफंदी, जकात अधिक्षक व २) श्री. अंभोरे जि.एम., सचिव यांना उपरोक्त ठरावानुसार उप आयुक्त म्हणून नियुक्ती ताबडतोब करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक :- १) श्री. धनंजय गंगाखेडकर
२) श्री. प्रदिप जैस्वाल
अनुमोदक :- १) श्री. अविनाश कुमावत
२) श्री. प्रकाश जावळे
दिनांक :- ९/९/९२.

**संवाद**

श्री. अविनाश कुमावत : प्रस्ताव मंजुर करुन दिवाळीपुर्वी दोन्हीही पदे भरण्यात याव. हा दिवाळीचा बोनस मिळालेला आहे.

मा. महापौर : मंजुर

**ठराव क्र. ६०/९ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराचा वाढता विस्तार तसेच नगरवासीयांच्या विविध नागरी समस्याबाबत तक्रारी वेळेवर निवारण करण्यासाठी दि. १९/२/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रस्ताव क्र. ११७ नुसार मनपाच्या कर्मचाऱ्यांमधुन जेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार श्री. शमिम आफंदी, जकात अधिक्षक व श्री. जि.एम. अंभोरे, सचिव यांना उप आयुक्त म्हणून त्याच वेतनावर शासनाची या पदास मंजुरी येईपर्यंत ताबडतोब नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१/१० :** श्री. आनंदपुर सत्संग आश्रम गोविंदनगर बन्सीलाल नगर ७९९.५० चौरस मीटर जागा ९२ वर्षाचा करार देण्यात यावे.

सुचक :- श्री. रतनकुमार पंडागळे
अनुमोदक :- श्री. विठ्ठल पेरकर
दिनांक :- ११/९/१९९२

**संवाद**

श्री. नरेंद्र पाटील : महानगरपालिकाचे ज्या शहरातील मोकळ्या जागा आहेत त्या जागेवरतील कॉम्प्लेक्स, दुकाने आदींचा विकास करावा परंतु कुणालाही करारावर जागा देण्यात येऊ नये. यास माझा विरोध आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : सदरचा प्रस्ताव मागील सभेमध्ये मंजुर झालेला आहे.

श्री. शांताराम काळे : गोविंद नगर, बन्सीलाल नगर येथे यापुर्वीही महानगरपालिकेने एका शाळेस जागा दिलेली आहे. तेव्हा एकुण खुली जागा या गोविंदनगर मध्ये किती आहे. याची माहिती द्यावी.

मा. महापौर : ठिक आहे. गोविंदनगर, बन्सीलाल नगर येथे मनपाची खुली जागा किती आहे. याची पुढील सभेमध्ये माहिती द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : सदरचा प्रस्ताव स. सदस्यांनी मांडलेला आहे. तो प्रशासकीय नसुन प्रशासना मार्फत येणे आवश्यक आहे.

श्री. विठ्ठल पेरकर : असे कुठे लिहिलेले आहे काय? यावर आपला विरोध असेल तर तो फक्त नोंदवावा.

श्री. प्रकाश जावळे : मनपाची खुली जागा ९२ वर्षाच्या करारावर न देता दोन:तीन वर्षाच्या करारावर देण्याबाबत प्रस्तावात नमुद करावे कारण

संबंधीत जागा मनपा कधीही परत घेऊ शकेल. या अटीवर प्रस्तावास मंजुरी द्यावी.

श्री. अजिज जहागिरदार : गोविंदनगर, बन्सीलालनगर येथील खुल्या जागेवर रुपये पाच लाखाचे कंपाऊंड वॉल बांधलेले आहे त्याचे काय?

श्री. प्रकाश जावळे : स. सदस्य श्री. अजिज जागिरदार यांनी सुचित केल्याप्रमाणे रुपये ५/- लाखाचे कंपाऊंड वॉल बांधलेले आहे. ते खरे आहे काय?

श्री. शांताराम काळे : मो. पन्नालाल नगर येथे मनपाच्या खुल्या जागेवर कंपाऊंड वॉल बांधलेली असतांनाही विद्युत मंडळास लिजवर जागा दिली आहे आणि त्या दिलेल्या जागेचा मोबदला रुपये ९६०००/- मनपाला मिळालेला ओ याची माहिती उप आयुक्त व संबंधीत अधिकाऱ्यांना आहे.

मा. महापौर : स. सदस्याच्या सुचना लक्षात घेता मागील वेळेस ज्या पध्दतीप्रमाणे सदील जागा दिलेली आहे त्याचप्रमाणे आताही तशीच करारावर पध्दतीनुसार देण्यास मंजुरी देण्यात येते.

श्री. अविनाश कुमावत : गजानन महाराज मंदिराजवळ मनपाची खुली जागा आहे त्यावर एक व्यक्तीने अतिक्रमण केलेले आहे त्यावर अद्यापही कार्यवाही झ ाालेली नाही.

मा. महापौर : ठिक आहे. आपण लेखी लिहुन द्यावे संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सुचना देण्यात येतील.

**ठराव क्र. ६१/१० :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. आनंदपुर सत्संग आश्रम गोविंदनगर बन्सीलाल नगर ७९९.५० चौरस मिटर जागा मागील वेळेस ज्या पध्दतीने दिले त्याच पध्दतीने देण्यास प्रस्ताव सर्वानुमते मंजुरी देण्यात येतील. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२/११ :** औरंगाबाद मनपाच्या पशुधन विकास विभागाचे प्राणी संग्रहालय येथे गेल्या दोन वर्षापासुन दैनिक वेतनावर काम करत असलेल्या श्री. संतोष श्रीवास्तव यांन कायम स्वरुपाचे नौकरी देण्यात यावी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. स.अहमद एकबालुद्दीन
अनुमोदक :- श्री. अविनाश कुमावत
दिनांक :- १७/७/९२

<u>संवाद</u>

**श्री. प्रदिप जैस्वाल,**
**श्री. अविनाश कुमावत** : सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावे.
**मा.महापौर** : सदरील प्रस्ताव प्रशासनामार्फत मांडण्यात यावा.
**ठराव क्र. ६२/११ :** प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६३/१२ :** औरंगाबाद शहर विकास आराखड्याप्रमाणे मो. नागेश्वरवाडी येथील सि.स.नं. ४६४६ ची २६३१.० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा शैक्षणिक विस्तारासाठी आरक्षित करण्यात आलेली आहे. ही जागा शहराचे मध्यवस्तीत आलेली आहे. या जागेचा वापर गेल्या १०-१५ वर्षापासुन रहिवाशी उपयोगासाठी करण्यात येत आहे. या ठिकाणी बांधण्यात आलेल्या घरांवर मनपा कडून मालमत्ता करही वसुल केला जातो. या बाबीचा विचार करता मोहल्ला नागेश्वरवाडी येथील सि.स.नं. ४६४६ ची २६३१.० चौ. मी. क्षेत्रफळाची जागा शहर

विकास आराखड्याचे शैक्षणिक विस्तार या प्रयोजनातुन वगळून रहिवासी उपयोगी या प्रयोजना करिता उपयोगात आणण्याची परवानगी घ्यावी.

सुचक :- श्री. विठ्ठल पेरकर

अनुमोदक :- श्री. सुभाष परदेशी, श्री. राधाकृष्ण मोटे, श्री. विजय पालीवाल, श्री. तुळशीराम भगुरे.

दिनांक :- ३०/९/९२

<u>संवाद</u>

**श्री. प्रदिप जैस्वाल,**

**सौ. लता दलाल** : प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**मा. महापौर** : पुढील सभेपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**ठराव क्र. ६३/१२ :** प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६४/१३ :** भारताचे माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा सिल्लेखाना जवळील चौकामध्ये बसविण्यात यावा. असा ठराव मी मांडीत आहे. तरी हा ठराव सर्वसाधारण सभेत ठेवावा.

सुचक :- श्री. अजिमखॉन दादामियाँ

अनुमोदक :- श्री. विठ्ठल पेरकर

दिनांक :- ६/१०/९२

<u>संवाद</u>

श्री. प्रदिप जैस्वाल,

श्री. अविनाश कुमावत : कै. राजीव गांधी यांचा पुतळा रेल्वे स्टेशन येथे बसविण्याबाबत प्रस्ताव झालेला आहे. तेव्हा तो पुर्वीची जागा रद्द करण्यात यावी.

मा. महापौर : कै. राजीव गांधी यांच्या रेल्वे स्टेशन येथील पुतळा बसविणे बाबत प्रस्ताव पुर्वी मंजुर झालेला होता. परंतु जागा व्यवस्थित मिळाली नाही तेव्हा मागील प्रस्ताव समजुन जागा बदलली आणि सिल्लेखाना येथे पुतळा बसविण्याची मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ६४/१३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारताचे माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा रेल्वे स्टेशन ऐवजी मो. सिल्लेखाना चौकामध्ये बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४/१४ :** प्रभाग क्र. (९) नारेगांव या प्रभागात मो. ब्रिजवाडी, फुलेनगर, एम.आय.डी.सी. चा काही भाग तसेच लगतचे गोपाळपुर, सहजतपुर, मांडकी, मिसारवाडी या मोहल्यांचा समावेश असून सदर प्रभागात जवळपास २५ ते ३० हजार लोकसंख्या आहे. या प्रभागातील काही मोहल्ले घोषित झोपडपट्टी असून येथे महानगरपालिकेचे प्राथमिक आरोगय केंद्र नाही. नुकतीच या भागात मोठ्या प्रमाणात गॅस्ट्रोची लागण होऊन त्यात चार व्यक्ती मृत्यु पावल्या त्यावेळी या भागात महापालिकेने तात्पुरते प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु केले होते. वरील बस्त्यांमध्ये अत्यंत भरिव रहिवासी रहात असून या भागात जवळपास दवाखाना नसल्यामुळे येथील आजारी, व्यक्ती रुग्ण यांना शहरात दुरवरुन आणावे लागते. परिणामी औषधोपचारास विलंब होऊन रुग्ण वाटेतच दगावतात. मो. नारेगांव भागात प्राथमिक आरोग्य केंद्र याच ईमारतीत सुरु आहे. या भागातील गरीब जनतेची रुग्णालयाची

आत्यावश्यक गरज व वाढती मागणी लक्षात घेता या भागात महापालिकेचे आरोग्य केंद्र सुरु करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक :- श्री. महादेव सुर्यवंशी
अनुमोदक :- १) श्री. प्रदिप जैस्वाल, २) श्री. अविनाश कुमावत,
३) श्री. कचरु चंद्रभान नवपुते
दिनांक :- ६/१०/९२

**<u>संवाद</u>**

श्री. प्रदिप जैस्वाल : प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री. नरेंद्र पाटील : सदरील भाग हा माझ्या वार्डालगत येत असल्याने दोघांच्य संमतीने मध्यवर्ती ठिकाणी इस्पितळःदवाखाना केंद्र सुरु करण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : माझ्या भागामध्ये आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत काही सुचना आहेत त्या पुढील प्रमाणे आरोग्य केंद्र त्यामध्ये काही रुग्णांना खाटांची व्यवस्था, एक फिरती जिप, आरोग्य कर्मचारी आणि आठवड्यातून एकदा आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पथक पाहणीसाठी येणे आवश्यक आहे. तसेच मो. ब्रिजवाडी येथे मागील ४ तारखेपासून आतापर्यंत जी गॅस्ट्रोची लागण झालेली होती ती साथ आटोक्यात आणण्याचे अथक प्रयत्न आरोग्य वैद्यकीय अधिकारी आणि त्यांचे कर्मचारी यांनी केले त्याबद्दल त्यांचे आभारी आहे.

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. ६४/१४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. (९) मो. नारेगाव येथील लगत अनेक भागांचा / मोहल्यांचा समावेश येत असून २५ ते ३० हजार लोकसंख्या आहे. या प्रभागातील काही मोहल्ले घोषित झोपडपट्टीत येत असून या वस्तीजवळ कोणतेही आरोग्य केंद्र नाही. त्यामुळे रुग्णांना शहरा पर्यंत येण्या जाण्यास त्रास होतो यासाठी नागरिकांच्या मागणी नुसार महानगरपालिके तर्फे एक आरोग्य केंद्र सुरु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६/१५ :** दि. १० ऑगस्ट १९९२ च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात महापालिकेत मुंबई प्रांतीक महापालिका अधिनियम १९४९ अन्वये कलम ३० अंतर्गत महिला व बालकल्याण समिती समाविष्ठ करण्यात आलेली आहे,परंतु अद्याप ती समिती आपल्या मनपा अंतर्गत कार्यान्वित नाही. तरी शासकीय अध्यादेशा नुसार औरंगाबाद महापालिकेत अंतर्गत महिला व बाल कल्याण समितीचे कार्य त्वरीत सुरु करावे.

सुचक :- सौ. लता दलाल
अनुमोदक :- १) श्री. प्रदिप जैस्वाल
२) श्री. प्रभाकर विधाते
दिनांक :- १३/१०/९२

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. ६६/१५ :** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे दि १० ऑगस्ट १९९२ च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात महापालिकेत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ अन्वये कलम ३० अंतर्गत महिला व बाल कल्याण समिती समाविष्ठ करण्यात आलेली आहे. ही समिती अद्यापही कार्यान्वित नाही. तरी औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत महिला व बाल कल्याण समितीचे कार्य सुरु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७/१६ :** महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे सध्या महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी देतांना शहर विकास शुल्क वसुल करणे सुरु झाले आहे. शासन निर्णय दिनांक १० ऑगस्ट ९२ रोजी झालेला आहे. तेव्हा पासून या निर्णयाची अमलबजावणी होणे आवश्यक आहे. परंतु महापालिके मार्फत दिनांक १० ऑगस्ट ९२ पुर्वी बांधकाम परवानगी मिळणेसाठी दाखल केलेल्या प्लॉट धारकांकडून देखिल विकास शुल्क, विकास निधी व इतर फीस वसुल करण्यात येते आहे. विकास शुल्काची रक्कम दिनांक १० ऑगस्ट ९२ पुर्वी दाखल झालेल्या प्लॉटधारकांकडून वसुल करण्यात येऊ नये. १० ऑगस्ट ९२ नंतर दाखल होणाऱ्या बांधकाम परवानगी संचिकेवर विकास शुल्क आकारणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक :- १) श्री. अविनाश कुमावत
२) श्री. अजिज जहागिरदार मुख्तार अहमद
३) गिरजाराम हाळनोर

अनुमोदक :- १) श्री. धनंजय गंगाखेडकर
२) श्री. नारायण फत्तेलष्कर
३) श्री. तकी हसनखान

दिनांक :- ८/१०/९२

<u>**संवाद**</u>

श्री. प्रदिप जैस्वाल : सदरील प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. १० ऑगस्ट पुर्वी ज्याकाही फाईली नगर रचना विभागात बांधकाम परवाणगीसाठी दाखल झालेली आहेत त्या फाईल वरील प्लॉट धारकाकडून विकास शुल्काची रक्कम वसुल करण्यात येऊ नये, बऱ्याचशा फाईली चार-चार महिने निकाली लागत नाहीत यास जबाबदार कोण? आपले नगररचना विभाग जबाबदार आहे. त्याचे चुकीमुळे नागरिकांवर अन्याय होत आहे ते आम्ही सहन करणार नाही.

मा. महापौर : या बाबत सविस्तर माहिती मागवून घेण्यात येईल.

श्री. रशिद मामु : काही फाईली आमच्या सारख्यांनी मुद्दामहुन अडकवून ठेवल्याने उशिर झालेला होता तर काही फाईल्स रेगुलर अधिकारी आल्यावर करण्यात येतील या आधारे झालेले आहे. त्यामध्ये गरिबांचे काही कामे झालेली नाहीत. तर काही श्रमंताचे

श्री. शांताराम काळे : १० ऑगस्टच्या पूर्वीच्या काही महिन्याचा ठराविक कालावधीत फाईल परवानगी साठी दाखल झालेली असल्यास तशी सुट देण्याबाबत शिथीलता ग्राह्य मानावी.

श्री. अजिज जहागिरदार,
श्री. धनंजय गंगाखेडकर : १० ऑगस्ट पूर्वी ज्या प्लॉटधारकांनी फाईल्स अर्ज संबंधित विभागात दाखल केलेले ाहेत त्यांचेवर या नियमाची पाबंदी घालू नये.

मा. महापौर : ज्यांनी त्या तारखेच्या आत फाईल्स दाखल केलेल्या आहेत आणि त्यांचे बाबतीत कार्यवाही काहींची चालू आहे आणि काहींची झालेली आहे. त्यांचेबाबतीत करणे आवश्यक आहे तर ज्यांना नोटीस त्या विभागामार्फत दिलेली आहे त्यांचे बाबतीत काहीही करता येणार नाही.

श्री. रशिदमामू,
श्री. गजानन बारवाल : ज्या धारकांना नोटीस दिलेली आहे आणि त्यांचे काम नंतर होणार आहे अशांना आपण पैसे परत करणार काय?

श्री. प्रदिप जैस्वाल : बांधकाम परवानगीच्या वेळी संबंधित आर्किटेक्ट कडून सर्व कागदपत्रे व्यवस्थित आहेत किंवा नाही याबाबतची पडताळणी करुनच फाईल नगररचना विभाग पडताळणी करुनच फाईल नगर रचना विभाग दाखल करुन घेतात त्यामुळे नोटीस वगैरे देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. केवळ नगर रचना विभागाच्या चुकांमुळे जनतेला भुर्दंड का? यासाठी सदरील प्रस्ताव मंजुर करावा.

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

श्री. नारायण फत्तेलष्कर: जर प्रस्तावांची अंमलबजावणी होत नसेल तर या सभागृहाला अर्थच नाही.

मा. महापौर : बांधकाम परवानगीसाठी एकदा संचिका दाखल केल्यानंतर जर साठ दिवसांच्या कालावधी लोटून काहीही झालेले नसल्यास नियमाप्रमाणे ती संचिका मंजुर समजावी.

श्री. प्रदिप जैस्वाल,
श्री. शांताराम काळे : संबंधित अिकाऱ्यांकडून माहिती विचारावी.

मा. महापौर : सदरील प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविण्यात येईल या बाबतची सहाय्यक संचालक, नगररचना यांनी माहिती द्यावी.

सहा. संचालक नगररचना : शासनाच्या परिपत्रकाची माहिती वाचुन दाखविली.

श्री. तकी हसन खान : इतर महानगरपालिकेमध्ये सदरचा नियम अद्यापही लागू करण्यात आलेला नाही.

श्री. चेनकरण संचेती : काही जिल्ह्यांमध्ये तालुक्या मधील नगर परिषदेत अशा प्रकारचा नियम लावण्यात आलेला नाही.

श्री. शांताराम काळे : या बाबत सविस्तर माहिती द्यावी.

सहाय्यक संचालक नगर रचना : या संदर्भात कार्यवाही चालू असून सदरील नियम दि. १०/८/९२ पासून अंमलात येतो.

(यावेळी स. सदस्य श्री. अविनाश कुमावत यांनी या प्रस्तावावर विरोध करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणे बाबत चर्चेवेळी ऐन वेळचा प्रस्ताव मांडला)

श्री. अविनाश कुमावत,
श्री. धनंजय गंगाखेडकर : महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे बांधकाम परवानगी घेण्यासाठी नगर रचना विभाग महानगरपालिका हे विकास शुल्काची नव्याने आकारणी करते या शासनाच्या निर्णयास विरोध म्हणून प्रस्ताव ठेवण्यात येतो.

मा. महापौर : विरोधी पक्ष नेता यांनी विकास शुल्कास विरोध दर्शविण्याबाबत जो प्रस्ताव मांडलेला आहे तो महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात यावा काय?

श्री. प्रदिप जैस्वाल : ठिक आहे. महाराष्ट्र शासनाकडे या महानगरपालिकेचा विकास शुल्क आकारणीस विरोध म्हणून प्रस्ताव संमत करुन पाठवावा कारण पुणे, सोलापूर, महापालिकेला अद्यापही शुल्क आकारलेला नाही.

मा. महापौर : ठिक आहे विरोध प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

श्री. रशिद मामु : परंतु इतर नागरिकांचे पैसे परत करणार काय?

मा. महापौर : मा. आयुक्त यांचेकडे संबंधित प्रकरणे दाखवावित ते या बाबतीत पडताळणी करुन कार्यवाही करतील.

श्री. अजिज जहागिरदार : ज्या धारकांनी चॅलेंज केलेले असेल त्यांना पैसे परत करु नये.

श्री. गजानन बारवाल : आमच्या सारख्या काही लोकांनी नियमाप्रमाणे परवानगी घेतलेली आहे. तेव्हा अशा बाबतीत आपण काय करणार?

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

सहा. संचालक न.र. : याबाबत योग्य ती विचारणा करुनच कार्यवाही करता येणे शक्य आहे.

श्री. धनंजय गंगाखेडकर : अगोदर शासनाच्या नियमाप्रमाणे ६०:४० असा नियम लागू होता आता नगर रचना विभागाने १/३ नियम लागू केलेला आहे.

सहा. संचालक न.र. : अशा प्रकारचा नियम महापालिकेमार्फत केलेला नसून शासनाच्या निर्णयानुसार करण्यात येतो.

मा. आयुक्त : ज्यावेळी डी.पी. प्लॅन मंजुर होऊन आलेला होता तेव्हा तो नियम लागू करणे आवश्यक होते.

श्री. धनंजय गंगाखेडकर : जर तसे नियम असल्यास ६० ते ६५ टक्के नियमाप्रमाणे बांधकाम परवानगीच मिळणार नाही याबाबत आपले मत काय ते सांगावे अन्यथा विशेष बैठक बोलावून निर्णय घ्यावा.

मा. आयुक्त : अशा प्रकारचा प्रस्ताव आपल्याकडे नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : असे जर असेल तर महानगरपालिकेकडे परवानगी मागायला कोण येणार?

श्री. अविनाश कुमावत : नागरिकांना विविध भागांमध्ये अद्यापही नागरी सुविधा मिळत नाही त्याचे काय?

श्री. नरेंद्र पाटील : औद्योगिक क्षेत्रातील विकास कर जास्त असून तो कमी करण्यात यावा.

मा. महापौर : स. सदस्य, श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी सुचित केल्याप्रमाणे याबाबत एक विशेष बैठकीचे आयोजन करण्यात येईल.

**ठराव क्र. ६७/१६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून निर्णयाप्रमाणेसध्या महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी देतांना शहर विकास शुल्क वसुल केल्या जाते. शासनाचा निर्णय दि. १० ऑगस्ट ९२ रोजी आलेला असून यापुर्वी बांधकाम परवानगीसाठी दाखल केलेल्या प्लॉटधारकाकडून सदरची फिस वसुल करण्यात येऊ नये तसेच शासनाच्या वरील तारखेच्या निर्णयास औरंगाबाद महानगरपालिकेचा विरोध असणे बाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८/१७ :** कुंभारवाडा चौक (रंगार गल्ली) ते सिटीचौक या सार्वजनिक रस्त्यास कै. आसाराम मुगदिया (काकाजी) यांचे नाव देण्यात यावे ते सदर प्रभाग मधून सतत चार वेळेस नगरसेवक म्हणून निवडून आले. या काळात ते नगरपरिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष होते. सदर सार्वजनिक रस्त्यास कै. आसाराम मुगदिया (काकाजी) यांचे नाव देणे बाबत या भागातील रहिवाशांनी मागणी केली आहे. तरी वरील प्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. प्रदिपकुमार जैस्वाल

अनुमोदक :- श्री. प्रभाकर विधाते.

दिनांक :- १४/१०/९२.

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. ६८/१७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कुंभारवाडा चौक (रंगार गल्ली) ते सिटीचौक या सार्वजनिक रस्त्यास कै. आसाराम मुगदिया (काकाजी) यांचे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९/१८ :** मो. इंदिरानगर बायजीपुरा भागात समाज मंदिर नसल्यामुळे येथील रहिवाशांची अत्यंत गैरसोय होते. या भागात समाज मंदिर बांधण्यात यावे. या भागाची जवळपास १५ ते २० हजार लोकसंख्या असून येथे अत्यंत गरिब रहिवाशी राहतात. हा भाग घोषित गलिच्छ वस्ती निर्मुलन विभाग (स्लम) असून या भागात समाज मंदिर बांधणे बाबत येथील रहिवाशांनी वारंवार मागणी केलेली आहे. येथील गरीब जनतेची अत्यावश्यक गरज लक्षात घेता मो. इंदिरानगर, बायजीपुरा भागात समाज मंदिर बांधणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. प्रदिपकुमार जैस्वाल
अनुमोदक :- श्री. शंकर मगर, श्री. प्रभाकर विधाते
दिनांक :- १५/१०/९२

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव क्र. ६९/१८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इंदिरानगर बायजीपुरा भागातील लोकसंख्या जवळपास १५ ते २० हजाराची असून हा भाग स्लम (घोषीत) आहे. येथील नागरिकांच्या मागणीनुसार या भागात समाजमंदिर बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०/१९ :** मो. चिकलठाणा येथील बाजारगल्ली भागातील चौकामध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे पुर्णाकृती पुतळ्यासाठी प्रशस्त जागा उपलब्ध असून या भागात सदर पुतळा बसविणे बाबत येथील रहिवाशंनी वारंवार मागणी केली असून सदर चौकास कै. अहिल्याबाई होळकर चौक म्हणून संबोधण्यात येते. या भागातील नागरिकांनी स्वखर्चाने पुतळा खरेदी केलेला असून १०X१० या आकाराच्या जागेत सदर पुतळा उभारल्यास रहदारीस कुठलाही अडथळा निर्माण होणार नाही. मो. चिकलठाणा येथील बाजारगल्ली भागातील चौकात कै. अहिल्याबाई होळकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेस व सदर चौकास कै. अहिल्याबाई होळकर यांचे नाव देणेस प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. अविनाश कुमावत
श्री. कचरु नवपुते
अनुमोदक :- श्री. प्रदिप जैस्वाल
श्री. नारायण फत्तेलष्कर,
श्री. गिरजाराम हाळनोर
दिनांक :- १५/१०/९२

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव क्र. ७०/१९ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. चिकलठाणा येथील बाजारगल्ली भागातील चौकामध्ये येथील नागरिकांनी स्वखर्चाने १०X१० या आकाराच्या जागेत कै. अहिल्याबाई होळकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेस व सदर चौकास कै. अहिल्याबाई होळकर चौक असे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## "ऐन वेळचे प्रस्ताव"

**विषय क्र. ७१/१ :** मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहराचा विकास व्हावा व शहराची प्रतिष्ठा वाढावी म्हणुन ज्या नागरिकांनी निरलस वृत्तीने उल्लेखनिय कार्य केले आहे अशा नागरिकांच्या कार्याचा महानगरपलिकेच्या वतीने "औरंगाबाद भुषण" पुरस्कार देऊन यथोचीत गौरव करावा.
सदरील पुरस्काराची व्याप्ती ही औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रापुरती मर्यादित आहे प्रत्येक क्षेत्रातील नामवंत उदा. शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय, तांत्रिक, प्रशसकीय कार्य, लेखन बालसाहित्य निर्मिती, पर्यावरण, क्रिडा, सांस्कृतिक, नृत्य, नाट्य, संगित, साहित्य, उपयोजित कला, चित्रकारिता, पत्रकारिता, सामाजिक कार्य वा तत्सम क्षेत्रातील उल्लेखनिय कार्य केलेल्या व्यक्तींच्या कार्याचा हा गौरव ठरेल. निवड करणे करिता एका उच्चस्तरीय समितीचे गठण होईल व पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी प्राप्त अर्जदारांच्या कामगिरीचे मुल्यमापन तज्ञ समिती मार्फत करणेत येईल. ह्यासाठी प्रतीवर्षी एकुण सहा व्यक्तींची निवड करण्यात येईल व त्यांना रु. १००१/- रोख व मानपत्र (उच्च प्रतीचे) देऊन त्यांचा येथोचित गौरव केला जाईल.
सदरील उपक्रम प्रथम धोरण म्हणून मान्य करावा व त्यानंतर त्यासाठी रु. २५०००/- (रुपये पंचविस हजार) ची आर्थिक तरतुद करण्यास मान्यता देण्यात यावी. योजनेची कार्यवाही डिसेंबर पर्यंत पुर्ण करुन २६ जानेवारी वा १ मे या शुभ दिवशी समारंभपुर्वक "औरंगाबाद भुषण" हा पुरस्कार प्रदान करणेत येईल.
प्रशासकीय प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद</u>**

**श्री. चेनकरण संचेती** : महापालिकेच्या वर्धापन दिनी सदरील कार्यक्रम घडवून आणावा अशी माझी सुचना आहे.

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. ७१/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचा विकास वहावा व शहराची प्रतिष्ठा वाढावी म्हणून ज्या नागरिकांनी निरलस वृत्तीने उल्लेखनिय कार्य केले अशा औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रापुरती मार्यादित प्रत्येक क्षेत्रातील नामवंत उदा. शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय, प्रशासकीय कार्य, लेखन, बालसाहित्य निर्मिती, पर्यावरण, क्रिडा, सांस्कृतीक, नृत्य, नाट्य, संगीत, साहित्य, उपयोजित कला, चित्रकारिता, पत्रकारिता आणि सामाजिक कार्य कारणाऱ्या एका तज्ञ समिती मार्फत मुल्यमापन करुन प्रतिवर्षी सहा व्यक्तींची निवड करुन "औरंगाबाद भुषण" हा पुरस्कार व रोख रक्कम रु. १००१/- मानपत्र (उच्च प्रतीचे) देऊन त्यांचा गौरव करण्यात येईल. त्यासाठी रु. पंचवीस हजाराची आर्थिक तरतुद करुन या योजनेची कार्यवाही २६ जानेवारी वा १ मे शुभ दिवशी समारंभपुर्वक पुरस्कार प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२/२ :** मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने भारताचे प्रथम नागरिक व मा. राष्ट्रपती व भारताचे उप राष्ट्रपती, मा. पंतप्रधान, श्री. पी.व्ही. नरसिंहरावजी, मा. ना. शिवराज पाटील चाकुरकर, सभापती (लोकसभा) मा. ना. श्रीमती नजमा हेपतुल्ला, उप सभापती मा.ना.

शंकर रावजी चव्हाण, गृहमंत्री भारत सरकार मा. ना. शरदरावजी पवार, संरक्षण मंत्री मा. ना. सुधाकररावजी नाईक, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य पद्मविभुषण श्री. गोविंदभाईजी श्रॉफ या प्रतिष्ठित व्यक्तींचा मानपत्र देऊन सत्कार करण्यात यावा.
या समारंभासाठी एकुण दोन लाख रुपयापर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरील सत्कार कार्यक्रम धोरण म्हणून मान्य करण्यात यावा. व त्या प्रित्यर्थ लागणारी रु. दोन लाख ची आर्थिक तरतुद करण्यास मान्यता देण्यात यावी. प्रशासकिय प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

<u>**संवाद**</u>

**श्री. चंद्रकांत खैरे, श्री. तकी हसन खान,**
**श्री. अविनाश कुमावत, श्री. एकबालसिंग**
**गिल, श्री. बंडू प्रधान, श्री. प्रदिप जैस्वाल,**
**श्री. रशिद मामु, श्री. विठ्ठल पेरकर,**

श्री. पिटर वंजारे : सदरील प्रस्ताव मंजुर करावा सोबतच हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे डॉ. माई उर्फ सविता आंबेडकर, तिबेटी नेते दलाई लामा, मदर तेरेस, नेल्सन मंडेला, पंजाबचे मुख्यमंत्री बिआंतसिंग, जी.एम. बनावतवाला, श्री. अटल बिहारी वाजपेयी, शाहरी माणिक साबळे, आदिनाही या सत्कार सोहळ्यासाठी सन्मानाने बोलावण्यात यावे.

(यावेळी सभागृहात स. सदस्यांमध्ये सारखा आवाज चालु असतो)

मा. महापौर : आपण सर्व स. सदस्यांनी जी नावे सुचविली ती योग्य आहेत परंतु अगोदर प्रस्ताव मंजुर करुन नंतर याबाबत विचार करु.

श्री. नरेंद्र पाटील : अशा प्रकारचा सन्मान घडवून आणणे म्हणजे चुकीचा पायंडा पाडणे असे मला वाटते. (पुन्हा काही स. सदस्यांमध्ये आपसात आवाज चालु असतो काही समजत नाही)

श्री. बंडू प्रधान : सन्मानपत्र द्यावयाचे असल्यास प्रस्ताव मंजुर करावा परंतु इतक्या मान्यवरांचा या शहरी सत्कार करावयाचा ठरल्यास येथील नागरिकांना माहिती मिळाल्यास ते हसतील तेव्हा मी सुचित केलेला तिबेटी नेते दलाई लामा यांचे बाबतीचा प्रस्ताव मी मागे घेत आहे.

मा. महापौर : ठिक आहे आपण आपली सुचना मागे घेतली त्याच बरोबर काही स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार बाळासाहेब ठाकरे, डॉ. सविता आंबेडकर, अटल बिहारी वाजपेयी, मदर तेरेसा आदी मान्यवरांचाही सन्मान पत्र देवून गौरव करण्यात येईल.

**ठराव क्र. ७२/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने भारताचे प्रथम नागरिक व मा. राष्ट्रपती, मा. उप राष्ट्रपती, मा. पंतप्रधान श्री. पी.व्ही. नरसिंहराव, मा. ना. श्री. शिवराज पाटील चाकुरकर, सभापती लोकसभा मा.ना. श्रीमती नजमा हेपतुल्ला उप सभापती, मा.ना. श्री. शंकररावजी चव्हाण गृहमंत्री भारत सरकार, मा. ना. श्री. शरदरावजी पवार संरक्षण मत्री, मा.ना. श्री. सुधाकररावजी नाईक मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, पद्मविभुषण श्री. गोविंदभाई श्रॉफ याच सोबत मा. बाळासोब ठाकरे, डॉ. माई उर्फ सविता आंबेडकर, श्री. अटलबिहारी वाजपेयी, मदर तेरेसा, श्री. जी.एम. बनातवाला आदी नेत्यांचा तसेच शाहीर माणिक साबळे आदी प्रतिष्ठित व्यक्तींचा "मानपत्र" देऊन सत्कार करण्यात यावा. यासाठी सत्कार कार्यक्रम धोरण म्हणून रु. दोन लाखाची आर्थिक तरतुद या कार्यक्रमासाठी ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३/३ :** श्रेयनगर येथील गट क्रमांक ४६ ची जमीन "खुली जागा" म्हणून शहर विकास योजने अंतर्गत राखुन ठेवण्यात आलेली आहे.
सदरील जमीन शहर विकास योजनेच्या "खुली जागा" या आरक्षणातुन वगळून त्याऐवजी ती जमीन "निवासी उपयोगा" करिता ठेवण्याबाबत दिनांक २०/१०/१९९२ रोजी संपन्न होणाऱ्या सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. इकबालसिंग गील.
अनुमोदक :- श्री. विठ्ठल पेरकर
दिनांक :- ७/९/९२.

<u>**संवाद**</u>

**श्री. शांताराम काळे** : श्रेयनगर येथील प्रस्तावाबाबत सभागृहात चर्चा व्हावी नंतरच प्रस्ताव मंजुर करावा कारण संबंधीत प्रभाग माझ्या वार्डातील आहे.

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. ७३/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रेयनगर येथील गट क्रमांक ४६ ची जमीन खुली जागा म्हणून शहर विकास योजने अंतर्गत राखुन ठेवण्यात आलेली आहे. सदरची खुली जागा या आरक्षणातुन वगळून त्या ऐवजी ती निवासी उपयोगाकरिता ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४/४ :** १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात आपल्या प्राणाच्या आहुतीने महिलात जागृती देश प्रेम निर्माण केले, त्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांचा पुर्णाकृती पुतळा सिडको बसस्टॉप अलिकडील जालना रोड वरील चौकात उभारणे बाबत

सुचक :- जयवंत केशवराव ओक (बंडू)
अनुमोदक :- प्रभाकर विधाते
दिनांक :- १७/१०/१९९२

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. ७४/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात आपल्या प्राणाच्या आहुतीने महिलात जागृती, देशप्रेम निर्माण केले त्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांचा पुर्णाकृती पुतळा सिडको बसस्टॉप अलिकडील जालना रोड वरील चौकात उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५/५ :** ब्रिटीश साम्राज्यशाहस सशस्त्र प्रहार करणारे, कॉंग्रेस अध्यक्ष राहिलेले आझाद हिंद सरकारचे पहिले राष्ट्रपती, आझाद हिंद सेनेचे पहिले सरसेनापती थोर राष्ट्रभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुर्णाकृती पुतळा रेल्वे स्टेशन समोर उभारणे बाबत.

सुचक :- जयवंत केशवराव ओक (बंडू)
अनुमोदक :- मधुकर शिंदे
दिनांक :- १७/१०/९२.

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव क्र. ७४/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यशाहीस शेवटचा सशस्त्र प्रहार करणारे कॉंग्रेस अध्यक्ष राहिलेले आझाद हिंद सरकारचे पहिले राष्ट्रपती पुर्णाकृती पुतळा रेल्वेस्टेशन समोर उभारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६/६ :** हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यात ज्यांच्या दैदिप्यमान कामगिरीने सारा देश आदराने नतमस्तक झाला. असे क्रांतीवीर सरदार भगतसिंग, शिवराम राजगुरु व सुखदेव याचा पुतळा उस्मानपुरा भागात उभारणे बाबत.

सुचक :- जयवंत केशवराव ओक (बंडू)
अनुमोदक :- मधुकर शिंदे
दिनांक :- १६/१०/१९९२.

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. ७६/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यात ज्यांच्या दैदिप्यमान कामगिरीने सारा देश आदराने नतमस्तक झाला, असे क्रांतीवीर सरदार भगतसिंग, शिवराम राजगुरु व सुखदेव यांचा पुतळा उस्मानपुरा भागात उभारणीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७/७ :** हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी आनंदाने हसत हसत फाशीच्या तक्तावर चढणारे अमरशहीद अशफाक उल्लाखाँन यांचे उचित स्मारक रोशन गेट भागात स्मारक उभारणे बाबत.

सुचक :- श्री. जयवंत केशवराव ओक (बंडू), श्री. मधुकर शिंदे
अनुमोदक :- श्री. चंद्रकांत खैरे, श्री. प्रभाकर विधाते.
दिनांक :- १६/१०/१९९२.

**मा. महापौर** : मंजुरी.

**ठराव क्र. ७७/७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी आनंदाने हसत हसत फाशीच्या तक्त्यावर चढणारे अमर शहीद अशफाक उल्लाखाँ यांचे अचित स्मारक रोशनगेट भागात उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ७८/८ :** अत्यंत जुलमी अत्याचारी रँड व आयर्स्ट या क्रुर ब्रिटिश अधिकारी यांचा वध करणारे व देशद्रोही गद्दारांन शिक्षा ठोठावणारे व त्याबद्दली गळ्यात फास आनंदाने स्विकारणारे तीन सख्ये व विवाहीत बंधू व बंधुसमाज मित्र दामोदर चाफेकर, बाळकृष्ण चाफेकर व वासुदेव चाफेकर व महादेव रानडे यांचे अर्धपुतळे महापालिका वाचनालय खडकेश्वर समोर बसविणे बाबत.

सुचक :- जयवंत केशवराव ओक (बंडू)
अनुमोदक :- प्रभाकर विधाते
दिनांक :- १६/१०/१९९२.

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव क्र. ७८/८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ब्रिटिश अधिकारी यांचा वध करणारे व देशद्रोही गद्दारांना शिक्षा ठोठावणारे व त्याबद्दल गळ्यात फास आनंदाने स्विकारणारे तीन सख्ये व विवाहीत बंधू व बंधूसमाज मित्र दामोदर चाफेकर, बाळकृष्ण चाफेकर, वासुदेव चाफेकर व महादेव रानडे यांचे अर्धपुतळे महापालिका वाचनालय खडकेश्वर समोर बसविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९/९ :** औरंगाबाद महानगरपालिकेत सध्या कार्यरत असलेले श्री. पी.एल. रोडे, उप अभियंता यांचा शासनाकडील प्रतिनियुक्तीचा कालावधी संपलेला असून महापालिकेतील त्यांची सेवा विचारात घेता त्यांना पुन्हा एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात यावी. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. गजानन बारवाल
अनुमोदक :- श्री. बंडू प्रधान
दिनांक :- १५/१०/९२

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव क्र. ७९/९ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका येथे सध्या कार्यरत असलेले श्री.पी.एल.रोडे, उप अभियंता यांचा शासनाकडील प्रतिनियुक्तीचा कालावधी संपलेला असून त्यांच्या संपलेल्या मुदतीपासुन पुन्हा एक वर्षाच्या मुदतीपर्यंत मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८०/१० :** औरंगाबाद महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर सध्या कार्यरत असलेले श्री. जे.आर. देवरे, लेखाधिकारी यांचे प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेत यावा, कारण ते महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर आल्यापासून त्यांनी लेखाधिकारी म्ळणून केलेले उल्लेखनिय कार्य विचारात घेता त्यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीची मुदत एक वर्ष्ज्ञ वाढविणे आवश्यक आहे. लेखा विभागामधील कामकाजात सुसुत्रता व नियोजनासाठी श्री. जे.आर. देवरे, लेखाधिकारी यांचे प्रितिनियुक्तीचा कालावधीस एक वर्षाची मुदतवाढ मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. प्रदिपकुमार जैस्वाल.
अनुमोदक :- श्री. अविनाश कुमावत, श्री. प्रभाकर विधाते.
दिनांक :- १५/१०/९२

**मा. महापौर** : मंजुर.

**ठराव क्र. ८०/१० :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका येथे सध्या कार्यरत असलेले श्री. जे.आर. देवरे, लेखाधिकारी यांची शासनाकडील प्रतिनियुक्तीचा कालावधी संपलेला असून त्यांच्या संपलेल्या मुदतीपासुन पुन्हा एक वर्षाच्या मुदतीपर्यंत वाढवून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## **"ऐन वेळची चर्चा"**

**संवाद**

श्री. चंद्रकांत खैरे : छावणी बोर्डाचे उपाध्यक्ष व अधिकारी यांचे बरोबर माझी एक बैठक झालेली होती. मागे एक प्रस्ताव पारित करण्यात आलेला होता की, छावणी बोर्डाच्या हद्दीत महापालिकेचा जकात नाका ओ. आणि या जकात नाक्यातून महापालिकेने ३% जकात छावणी बोर्डाला द्यावे असा करार करण्यात आलेला होता त्याचप्रमाणे त्याऐवजी छावणी बोर्ड महापालिकेला तीन एकर जागा देण्याचेही ठरलेले होते व ती जागा महापालिकेच्या ताब्यात घ्यावयाचे ठरले परंतु महापालिका आणि छावणी बोर्ड यांच्या पत्रव्यवहारामध्ये हा वाद अद्यापही संपुष्टात आलेला नसून

छावणी बोर्डानी वारंवार विचारणा करीत आहेत तेव्हा याबाबत आवश्यक ती त्वरीत कार्यवाही व्हावी. ज्यामुळे छावणी बोर्डाला आर्थिक लाभ प्राप्त होऊ शकेल.

मा. महापौर : माझ्या माहिती प्रमाणे अडचण काहीही नाही. केवळ जो दोघांमध्ये करार होता तो पुर्णपणे झालेला नाही.

श्री. चंद्रकांत खैरे : या बाबत मा. आयुक्त यांनी प्रकरण निकाली काढणे बाबत निर्णय घ्यावा कारण छावणी बोर्डातील कर्मचाऱ्यांचे पगार सुध्दा यावरच अवलंबून आहेत अशी त्यांची परिस्थिती आहे.

श्री. शांताराम काळे : श्रेयनगरच्या बाबतीत प्रस्तावाचे काय झाले यावर चर्चा व्हावी.

मा. महापौर : मा. आयुक्त खुलासा करीत आहेत आपण नंतर चर्चा करावी.

मा. आयुक्त : छावणी बोर्डाशी जो करार झालेला आहे त्या करारानुसार ३% जकात द्यावयाचा आहे. त्यांनी या मोबदल्यात तीन एकर जागा आपल्या ताब्यात द्यावयाची आहे आणि ताब्यात अशी द्यावयाची आहे की, आपणास जकात नाका, बांधता आला पाहिजे कारण जागा ताब्यात देवून प्रश्न सुटणार नसून मिलीटरी विभाग असल्याने बांधकाम करण्यासाठी मिलीटरी व छावणी बोर्डाची परवानगी आवश्यक आहे, त्यामुळे तिन एकरचे पझेशन छावणी बोर्डाकडून अद्यापही मिळालेले नसून पजेशन मिळाल्यानंतर त्यांनी आपल्याला तात्पुरती का होईना बांधकाम करायला परवानगी देणे जरुरीचे आहे. कारण दोन गोष्टी पुर्ण झाल्या शिवाय करार पुर्ण होणार नाही आणि झालेला करार शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे आवश्यक आहे. पहिली अट पुर्ण झाल्यानंतर आणि त्यानंतरच हा करार अस्तित्वात येईल.

श्री. चंद्रकांत खैरे : जो करार झालेला होता त्याचा प्रस्ताव शासनाकडे का पाठविला नाही.

मा. आयुक्त : याचे कारण असे आहे की, जो करार केलेला होता त्याप्रमाणे करार पुर्णपणे अस्तित्वात आलेला नाही. तीन एकराचे पझेशन मिळालेले नाही.

श्री. चंद्रकांत खैरे : तेथील मुख्य अधिकारी व उपाध्यक्षांचे म्हणणे आहे की, आम्ही बांधकामचे ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. त्याप्रमाणे बांधकाम करावे आणि दिल्ली येथील वरिष्ठ कार्यालयाकडून होकारार्थी उत्तर येईल असे म्हणणे आहे.

मा. आयुक्त : आमच्याकडे अद्यापही लेखी स्वरुपात ना हरकत प्रमाणपत्र आलेले नाही आणि मुख्य कमांडिंग यांची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. छावणी बोर्डाचे मुख्य अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्राने बांधकाम करता येणार नाही.

श्री. चंद्रकांत खैरे : ना हरकत प्रमाणपत्र ते देणार आहेत त्याचप्रमाणे भारताचे संरक्षण ंत्री येत्या ३ नोव्हेंबरला औरंगाबादला येत आहेत त्यावेळी आम्ही सर्वजण प्रत्यक्षात भेटून माहिती देणार आहोतच.

मा. आयुक्त : स. सभागृहानेच यापुर्वी प्रस्ताव मंजुर केलेला आहे. त्याप्रमाणे प्रशासन कार्यवाही करते. तसे वाढत असल्यास पुन्हा मागील प्रस्ताव रद्द करावा. आमची काही हरकत नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : छावणी बोर्डानी असा प्रस्ताव मंजुर केलेला आहे की, प्रवेश फी आकारणी करायची तेव्हा अशा प्रकारचा पुन्हा फी आकारणी करायची

म्हटल्यास आपल्याला भार पडेल. यासाठी येत्या एक दोन दिवसात दोन्हीही कार्यालयातील अधिकारी आणि मा. महापौर यांनी एकत्र बसून योग्य तोडगा काढावा, कारण दिल्ली वरुन परवानगी केंद्र शासनाकडून येण्यास उशीर लागणार आहे.

श्री. चंद्रकांत खैरे : माझ्या स्वेच्छा निधीतून जे काम केलेले होते तशा प्रकारचे केल्यास पहावे आणि दोन तीन दिवसात बैठकीचे आयोजन करावे.

मा. महापौर : तसे करणे योग्य नाही. याबाबत आपण एक बैठक बोलावून योग्य तो तोडगा काढता येईल.

मा. आयुक्त : डी.पी. प्लॅन ज्यावेळी मंजुर झाला त्यावेळी नियम बदलले आहेत त्याच्याप्रमाणे १/३ म्हणजे आर-२ गावठाणाची जी बाहेरची तरतुद आहे ती कायद्याप्रमाणे नियमाप्रमाणे आहे.

श्री. मधुकर शिंदे : महापौर निवासस्थानातील विद्युत बिल न भरल्याने तेथील लाईट कट करण्यात आली. या बाबतची सायंदैनिक गोरज वार्ता या वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्दीस आली ते खरे आहे काय? जर असे असल्यास हा महापौरांचा अपमान होय.

श्री. रशिदमामु : अशाच प्रकारे अग्निशामक दल येथीलही विद्युत मंडळाने लाईन कट केलेली आहे. अग्निशामक दलाकडील लाईट बिल रु. ३० लाख घेणे करिता तेथील लाईन कट केलेली आहे. याबाबत उप आयुक्त यांनाही माहिती आहे. त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा करावी.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

अति.शहर अभियंता : महापौर निवासस्थानातील विद्युत मंडळाकडील बिल भरलेले आहेत तसेच अग्निशामक दल येथीलही विद्युत बिल भरणा केलेले आहे.

श्री. नारायण फत्तेलष्कर: कार्यकारी अभियंता, विद्युत मंडळ यांचे बाबतीत कार्यालयातर्फे नोटीस द्यावी त्यांचे अलीकडे काम करण्याबाबत अनेक तक्रारी आहेत. त्यांची सर्वानुमते निर्णय घेऊन बदली करणेची शिफारस करावी.

श्री. चंद्रकांत खैरे : विद्युत मंडळाचे मुख्य अधिकारी, श्री. दवे यांचेकडे अशा तक्रारी नोंदवून योग्य त्या सुचना देणे आवश्यक आहे.

श्री. जयवंत ओक : महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांचा कोणताही दोष नसून विद्युत

श्री. रशिद मामु मंडळातील अधिकारी यांचा मनमानी कारभार आहे. ते लाईनमन सुध्दा वेळेवर पाठवित नाहीत. या बाबत सर्वांनी विचारणा करणे आवश्यक आहे.

मा. महापौर : आपण सर्वांनी जर सुचना केली तर त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. नारायण फत्तेलष्कर: विद्युत मंडळातील संबंधित अधिकाऱ्यांची बदली करणेसाठी प्रयत्न करावेत. त्याशिवाय अडचणी दुर होणार नाहीत असे माझे मत आहे आणि संबंधितांना नोटीस देवून या ठिकाणी बोलविण्यात यावे.

मा. महापौर : ठिक आहे. त्याप्रमाणे नोंद घेण्यात यावी. जर महानगरपालिकेने विद्युत बिल वेळेवर भरलेले असूनही जर मंडळातील संबंधित अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार महापौर निवासस्थानातील लाईन व अग्निशामक कार्यालयातील लाईट कट केलेले असल्यास अशा अधिकाऱ्यांवर कार्यालयीन नोटीस बजावून जाब विचारण्यात यावा आणि याच संदर्भात महापालिका,

कार्यालयाकडून एखादा अधिकारी/कर्मचारी वर्गाची चुक आढळल्यास त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी."जन गन मन" राष्ट्रगीताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## गुरुवार दिनांक १९/११/१९९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**गुरुवार दिनांक १९/११/९२ रोजी अंदाजे दुपारी १२.०० वाजता मा. महापौर, श्री. अशोक यादव सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गीताने सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली.**
**सभेस अधिकारी व खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. अजिमखान दादामियाँ अ. रहेमान
२) श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) श्री. विधात प्रभाकर सिताराम
४) श्री. अजिजुला बेग वाहिद बेग
५) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
८) श्री. भगुरे तुळशिराम छगन
९) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
१०) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
११) श्री. आयुब गुलाम जिलानी
१२) श्री. प्रधान बंडू गोविंदराव
१३) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१४) श्री. जावेद हसनखान कसीम हसनखान
१५) श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
१६) श्री. स.अ. एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
१७) श्री. मिर्झा अन्वरबेग हमीद बेग
१८) श्री. ओक जयवंत केशवराव
१९) श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग
२०) श्री. अ. रशीद खान (मामु) अ. हमीद खान
२१) सौ. दलाल लता श्रीनिवास
२२) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२३) श्री. हाजी मोहमद हाफीजोद्दीन
२४) श्री. छापरवाल रमेश नारायण
२५) श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२६) श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२७) डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
२८) श्री. म. इस्माईल अ. करीम
२९) श्री. फैय्याजखान अहमदखान
३०) श्री. अलिमबेग मिर्झा कलिम बेग
३१) श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद

३२) श्री. स. हुसेन स. अहमद
३३) श्री. मगर शंकर जिजाराम
३४) श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
३५) श्री. अलफखान हुसेनखान
३६) श्री. वाघमारे सुदाम भानुदास
३७) श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
३८) श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ जा.क्र. १८७४/ दि.१८/११/९२ नुसार पत्र दिले आहे.
३९) श्री. दत्त प्रदिप कुमार एस.
४०) श्री. बारवाल गजानन रामकिसन
४१) श्री. जाहागिरदार अजिज मुख्तार अहमद
४२) श्री. जावळे प्रकाश शिवराम
४३) श्री. गाडे गंगाधर सुखदेव
४४) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
४५) श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
४६) श्री. परदेशी सुभाष शिवलाल
४७) श्री. नवपुते कचरु चंद्रभान

**विषय क्र. ८१/१ :** दिनांक २०/१०/१९९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>संवाद</u>

श्री. अविनाश कुमावत : मागील बैठकीत आम्ही जो प्रस्ताव ठेवला होता त्या संदर्भात
श्री. प्रदिप जैस्वाल : चर्चा केलेली होती परंतु इतिवृत्तात नोंद झालेली नाही.
श्री. अजिजुल्ला बेग : चर्चा झालेली नसल्यास इतिवृत्तात नोंद होणे शक्य नाही.
मा. महापौर : आपण सुचित केल्याप्रमाणे प्रस्तावावर चर्चा होईल, परंतु अगोदर विषय क्र. १ ला मंजुरी मिळाल्यानंतर पुढील विषयास सुरुवात करता येईल.
श्री. केशव सोनवणे : आजच्या बैठकीस मा. आयुक्त उप आयुक्त उपस्थित नाहीत याचे कारण काय?
मा. महापौर : शासनातर्फे अंदाज समिती महानगरपालिकेची पाहणी करण्यासाठी आलेली असल्याने मा. आयुक्त, उप आयुकत उपस्थित नाहीत तरी काही हरकत नाही.
श्री. अजिजुल्ला बेग : इतिवृत्तातील पान क्र. ८ मधील विषय क्र. ५३/२ यामध्ये विद्युत ना हरकत प्रमाणपत्रासाठी महानगरपालिकेतर्फे स्लम भागासाठी रु. २५/- व इतर भागासाठी रु. ५०/- प्रति अशा प्रकारची फीस आकारणीचा प्रस्ताव होता. तेव्हा रु. ५०/- ही सर्वासाठीची फीस आकारणी करावी अशी दुरुस्ती करुन प्रस्ताव मंजुर करावा अशी माझी सुचना आहे.
मा. महापौर : ठिक आहे.
श्री. बंडू प्रधान : इतिवृत्तातील पान क्र. ३० मधील विषय क्र. ७२/२ च्या ठरावामध्ये खा. प्रकाश आंबेडकर यांचे नाव नाही. कृपया दुरुस्ती व्हावी.

मा. महापौर : ठिक आहे. तशी इतिवृत्तात दुरुस्ती करण्यात यावी. आता इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ८१/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्तातील पान क्र. ३० मधील विषय क्र. ७२/२ च्या ठरावा

----

---

---

उद्योगधद्यासाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १/२" | २०३ | ३६००.०० | ७.३० |
| ३/४" | ४९ | ६५००.०० | ३.१९ |
| १" | ६७ | १३०००.०० | ८.७९ |
| १ १/२" | १० | २९३००.०० | २.९३ |
| २" | ११ | ४३४००.०० | ४.७७ |
| ३" | ०४ | १३०३००.०० | ५.२१ |
| ४" | ०२ | २३१६००.०० | ४.६३ |
| ६" | ०१ | ५२१२००.०० | ५.२१ |
| | | | ४१.९५ |
| | | | ४२.०० |

<u>इतर</u>

१) टँकर पासून मिळणारे उत्पन्न २.५०

२) पाणी करापोटी मिळणारे सरासरी सार्वजनिक नाळाचे १०.००

एकुण ५२२.००

पाणी पुरवठ्यासाठी येणाऱ्या खर्चाबाबतचा अहवाल

अ) वाढीव दराने खरेदी रु. ४२०.०० लाख

ब) अस्थापना खर्च :

| | |
|---|---|
| पगार व भत्ते | ४१.६१ |
| स्टेशनरी | ००.०१ |
| दुरध्वनी | ००.२९ |
| विद्युत खर्च | ०१.७१ |
| इंधन (पेट्रोल व इतर) | ०९.२५ |
| मोटर खरेदी | ००.८१ |
| रसायन | ०१.०९ |
| पाईप लाईन दुरुस्ती | १९.७० |
| पंप दुरुस्ती | ०५.५८ |
| मशिन खरेदी | ००.११ |
| एम.आय.डी.सी. कडील पाणी खरेदी | ५०.०० |
| एकुण रु. | ५०.०० |

स्वाक्षरीत /-
कार्यकारी अभियंता
(पाणी पुरवठा व जलनिस्सारण)
महानगरपालिका, औरंगाबाद.

नळ कनेक्शनचे जुने दर व प्रस्तावित वाढीव दर मिटरचे दर खालील प्रमाणे

| नळ कनेक्शनचा | जुने कनेक्शन दर | | नवीन नळ कनेक्शन दर | |
|---|---|---|---|---|
| | जुने दर | मिटरचे दर | प्रस्तावित वाढीव दर | प्रस्तावित मिटरचे वाढीव दर |
| घरगुती वापरासाठी | | | | |
| १५ एम.एम. (१/२") | रु. ४००.०० | १००० लि. ला रु. १.१५ | १०००.०० | १००० लि.ला रु. २.५० |
| २० एम.एम. (३/४") | रु. ७३०.०० | --//-- | १८००.०० | --//-- |
| २५ एम.एम. (१") | रु. ११६०.०० | --//-- | ३६००.०० | --//-- |
| उद्योगधंद्यासाठी | | | | |
| १५ एम.एम. (१/२") | रु. १४५०.०० | १००० लि. ला रु. ४.०० | ३६००.०० | १००० लि. ला रु. ८.०० |
| २० एम.एम. (३/४") | रु. २६५०.०० | --//-- | ४५००.०० | --//-- |
| २५ एम.एम. (१") | रु. ४२००.०० | --//-- | १३०००.०० | --//-- |
| तात्पुरत्या स्वरुपाचे | | | | |
| १५ एम.एम. (१/२") | रु. २००.०० दरमहा | | | ५००.०० दरमहा |
| २० एम.एम. (३/४") | रु. ३५०.०० दरमहा | | | ८७५.०० दरमहा |
| २५ एम.एम. (१") | रु. ५५०.०० दरमहा | | | १३७५.०० दरमहा |
| १००० लि. ला दरमहा बांधकामासाठी | रु. ४.५० पैसे | | | १००० ला वाढीव दर रु. ८.०० |

स्वाक्षरीत /-, कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद.

# "पुरवणी विषय पत्रिका"

**विषय क्र. ८३/१ :** मोहल्ला हर्षनगर (वार्ड क्र. १६) मध्ये आरोग्य केंद्र बांधण्यात आलेले असून, सदर आरोग्य केंद्र कार्यरत करणेसाठी त्या ठिकाणी डॉक्टर, नर्स, ड्रेसर व आरोग्य केंद्रासाठी लागणारा कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे. त्या करीता आरोग्य केंद्रासाठी लागणाऱ्या कर्मचारी वर्गास सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी देण्यात येवून, पुढील कार्यवाहीस्तव शासनाकडे पाठविण्यात यावा. करिता सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीस्तव व विचारास्तव.

सुचक :- श्री. जावेद जसनखाँ कासिमखाँ
अनुमोदक :- श्री. ॲड. इकबालसिंग गिल
दिनांक :- ११/११/९२

**मा. महापौर** : या प्रस्तावाचे सुचक व अनुमोदक नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र. ८३/१ :** प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येते. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ८४/२ :** औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत शहराचे विविध भागात टपऱ्या टाकणेसाठी परवानगी देण्यात येते. शहरात अनधिकृत टपऱ्यांचे प्रमाणे देखील दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. शहरात टपऱ्यांना परवानगी देणेसाठी समितीचे गठन करण्यात यावे. सहाय्यक संचालक (नगररचना) व मालमत्ता अधिकारी यांनी प्रथम शहराचा सर्व्हे करुन शहरातील ज्या ज्या ठिकाणी टपऱ्या टाकावयाच्या आहेत त्या प्रभागाचे स.नगर सेवकास विश्वासात घेऊन टपऱ्यांना परवानगी देण्यात यावी. जेणे करुन अनधिकृत टपऱ्या वाढणार नाहीत, रहदारीस अडथळा येणार नाही. महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल व टपऱ्या योग्य जागी बसविल्या जातील. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. प्रदीपकुमार जैस्वाल.
अनुमोदक :- श्री. प्रभाकर विधाते
दिनांक :- १२/११/९२.

<u>**संवाद**</u>

श्री. प्रदिप जैस्वाल : सदरचा प्रस्ताव या ठिकाणी यासाठी मांडलेला आहे की, शहरात जवळपास एक ते दिड हजारापर्यंत अनधिकृत टपऱ्या झालेल्या आहेत. आणि आणखीनच वाढतही आहेत यासाठी नगर रचना विभागातील अधिकारी व मालमत्ता अधिकारी आणि काही स. सदस्यांची एक समिती गठण करुन त्याद्वारे कार्यवाही व्हावी असे वाटते.

श्री. पांडुरंग पैठणकर : शहर सुधार समिती आहे या समितीला पुर्ण अधिकार देण्यात आलेले आहेत की, शहरातील ८० व १०० फुट डी.पी. रोडवर कोणत्याही प्रकारचे टपऱ्या बसविण्यात येऊ नयेत. तर इतर लहान रोडवर टपऱ्या बसविण्यास परवानगी द्यावी. त्याप्रमाणे कार्यवाही केल्यास बरे होईल.

श्री. केशव सोनवणे : उप समित्या सध्या कार्यान्वित आहेत काय?

श्री. प्रदिप जैस्वाल : जे सुशिक्षित बेकार युवक आहेत त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी या समितीचे गठन करुन गरिब लोकांना सहाय्य करण्यासाठी उपयोग होईल.

श्री. प्रभाकर विधाते : उप समित्यांचे मुदत संपली आहे काय? याची माहिती द्यावी.

मा. महापौर : उप समित्यांचे गठन लवकरच करण्यात येईल.

श्री. गंगाधर गाडे : माझ्या माहिती प्रमाणे शहरामध्ये काही लोक टपऱ्या फार जुन्या टाकुन बसविलेले आहेत त्यातील काही टपऱ्या लाखो रुपयांना दुसऱ्यांना विकत दिलेल्या आहेत. यावर विशेष लक्ष द्यावे. तर मागसवर्गीय सुशिक्षीत व बेकार युवकांसाठी टपऱ्यांसाठी जे अर्ज केलेले आहेत त्यांचे अर्ज हेतुपुरस्सर बाजुला ठेवण्यात आल्याचे नागरिकांच्या तक्रारी आहेत. या बाबत त्वरीत कार्यवाही करावी.

श्री. प्रकाश जावळे : सिडको प्रशासनाने खोका असोसिएशनशी चर्चा करुन सर्व टपऱ्या एकाच ठिकाणी बसविल्या व सौंदर्यात भर टाकली त्याप्रकारे औरंगाबाद शहरातील ज्या जागा रिकाम्या आहेत व शहराच्या दृष्टिने सौंदर्यात भर पडत असल्यास तशी व्यवस्था व्हावी.

श्री. अजिज शेळके : समितीचे गठन सभागृहातच व्हावे आणि समितीचा प्रमुख कोण राहणार याची माहिती द्यावी.

मा. महापौर : या समितीमध्ये समजा महापौर असल्यास त्या समितीचा चेअरमन महापौर राहणार.

श्री. नारायण फत्तेलष्कर: शहागंज चमन जवळ ज्या टपऱ्या सध्या आहेत त्या तेथून हलवून इतरत्र जागा द्यावी ही विनंती.

श्री. गंगाधर गाडे : मागासवर्गीय लोकांचा काही भागातील समस्यांसाठी उपोषनास बसलेले आहेत या बाबतची एक लक्षवेधी सुचना मी दिलेली आहे. कृपया त्यावर चर्चा व्हावी.

मा. महापौर : ठिक आहे.

श्री. मोतीराम घडामोडे : टपऱ्यांच्या संदर्भात सिडको प्रशासनाने जशी व्यवस्था केलेली आहे तशी पध्दत अवलंबवावी तसेच जळगांवचे नगराध्यक्ष व आमदार श्री. सुरेश दादा जैन यांनी त्यांचे हद्दीत जशी योजना आखलेली आहे त्याबाबत तेथील समितीला पाहणीसाठी पाठवुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. ज्यामुळे औरंगाबादच्या सौंदर्यात भर पडेल.

श्री. रशिद मामु : शहरातील बऱ्याच भागामध्ये दहा बारा वर्षापासूनच्या टपऱ्या आहेत त्या परवानगीच्या आहेत परतुं आपसातील काही तक्रारी असल्याने गुंतागुंती वाढतात यासाठी तात्काळ कार्यवाही न करता योग्य ती चौकशी होऊनच पुढील कार्यवाही व्हावी. ज्यामुळे गरीब लोकांना दिलासा मिळेल.

**ठराव क्र. ८४/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत शहराचे विविध भागात टपऱ्या टाकण्यासाठी परवानगी देण्यात येते. आता या पुढे परवानगी देतांना संबंधित प्रभागातील स. नगर सेवकांना विश्वासात घेऊन तसेच सहाय्य संचालक, नगर रचना व मालमत्ता अधिकारी यांनी संबंधित जागेची पाहणी करुनच शहराच्या विकास योजनेत बाधित होणार नाहीत अशा जागेवर टपऱ्यांना परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>संवाद</u>**

**श्री. प्रदिप जैस्वाल** : मी ऐनवेळी एक प्रस्ताव दिलेला आहे की, औरंगाबाद जिल्हा श्रमिक पत्रकार संघटनेला मो. गारखेडा येथील सर्व्हे नं. ५३ मध्ये नियमाप्रमाणे शासकीय दराने जागा द्यावी.

**विषय क्र. ८५/३ :** औरंगाबाद जिल्हा श्रमिक पत्रकार संघटनेला महानगरपालिकेने गारखेडा परिसरातील सर्व्हे क्र. ५३ मधील काही जमिन दिलेली आहे. ही जमीन सदरहु संघटनेला शासकीय दरात उपलब्ध करुन देण्यात यावी. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. प्रदिप कुमार जैस्वाल, श्री. अविनाश कुमावत
अनुमोदक :- श्री. धनंजय गंगाखेडकर
दिनांक :- १६/११/९२.

<u>संवाद</u>

श्री. प्रकाश जावळे : सदरील प्रस्ताव पारीत व्हावा अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर : ठिक आहे. मंजुरी देण्यात येते.

ठराव क्र. ८५/३ : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ऐन वेळी मांडलेल्या प्रस्तावानुसार औरंगाबाद जिल्हा श्रमिक पत्रकार संघटनेला महानगरपालिकेने गारखेडा परिसरातील सर्व्हे क्र. ५३ मधील काही जमीन दिलेली आहे. सदरची जमीन संबंधित संघटनेला शासकीय दराने उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री. प्रकाश जावळे : औरंगाबाद शहरातील सर्व झोपडपट्ट्यांच्या विविध विकास कामांच्या संदर्भात महानगरपालिकेने निधी त्या कामांकरिताच उपयोगात आणली पाहिजे यासाठी काही भारतीय दलित पँथरचे कार्यकर्ते उपोषणास बसेले आहेत. त्यांच्या न्याय मागण्या उदा. ड्रेनेज, पाणी पुरवठा, स्मशान भुमी, रस्ते लाईट वगैरेसाठी आपण प्रयत्न करण्याचे आश्वासन द्याल व उपोषणाची जावून सांगता करावी अशी आमची लक्षवेधी सुचना आहे. कृपया त्यावर चर्चा व्हावी.

श्री. बंडू प्रधान : स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार अगोदर झोपडपट्टीच्या प्रश्नांवर चर्चा होणे पुर्वी काही स. सदस्यांचे ही मत विचारात घेणे जरुरीचे आहे. कारण हा प्रश्न फार किचकट असून घेणे आपआपल्या वार्डात स. सदस्य नी लक्ष द्यावे इतर वार्डामध्ये लक्ष देवू नये असे माझे मत आहे.

श्री. तकी हसन : महानगरपालिकेच्या बाहेर जे कार्यकर्ते आपल्या विविध मागण्यासाठी उपोषणांस बसलेले आहेत ते सर्व झोपडपट्टीतीलच आहेत आणि त्या सर्व झोपडपट्टीचे नेतृत्व करणारे स. सदस्य या ठिकाणी स्थानापन्न आहेत याचाच अर्थ असा की, जर संबंधित झोपडपट्ट्यांचा विकास अथवा कामे झालेली नसतील तर ते त्या झोपडपट्टीसाठी करुन घेतलेले नाहीत किंवा ते स. सदस्य ज्या प्रभागातून नेतृत्व करतात ते नेतृत्व करण्याच्या लायकीचे नाहीत.

श्री. अविनाश कुमावत : मा. महापौर आपण इतर झोपडपट्ट्यांमध्ये प्रत्यक्षात जाऊन पाहणी करावी.

श्री. बंडू प्रधान : मा. महापौर सन्माननिय सभासदांनी उपस्थित केलेला प्रश्न आपण चर्चेस घेऊ नये. यावर वादंग होईल. प्रत्येक सन्माननिय सभासद हे

आपआपल्या वार्डातील प्रश्न सोडविण्यास सक्षम आहेत. त्यामुळे इतरांनी दुसऱ्याच्या वार्डात दखल घेण्याची आवश्यकता नाही.

श्री. प्रदिप दत्त : मुस्लीम वस्तीतील कब्रस्थान अद्यापपावेतो का तयार करण्यात आलेले नाहीत.

श्री. गंगाधर गाडे : मी मांडलेला मुद्दा सन्माननिय सभासदाच्या लक्षात आलेला नाही. याचा मला खेद वाटतो. त्यांना त्यांच्या वस्त्यामध्ये काम करावयाचे असल्यास काहीही म्हणावयाचे नाही. परंतु बऱ्याचशा झोपडपट्टीतील कामे झालेले नाहीत हे मी आपल्या लक्षात आणून देतो. शहरातील झोपडपट्ट्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने शासनाकडील जो निधी येतो तो निधी झोपडपट्ट्यांच्या विकास कामासाठी खर्च न होता इतरत्र खर्च केला जातो हे मी निदर्शनास आणून देऊन इच्छितो.

श्री. बंडू प्रधान,

श्री. प्रदिप दत्त : गेल्या साडे चार वर्षापासून संबंधित सन्माननिय सभासद हे झोपडपट्टीतील भागाचे प्रतिनिधित्व करीत आहेत त्यांना या विकास कामाबाबत आता पर्यंत काही सुचले नाही आता निवडणुकीवर डोळा ठेऊन हा प्रश्न उपस्थित करणे योग्य नाही. गलिच्छ वस्ती सुधारण समितीचे सभापती सुध्दा या ठिकाणी आहेत. तेव्हा त्यांनी या कामासाठी काय प्रयत्न केले याची माहिती द्यावी तर काही सन्माननिय सभासदांनी गुत्तेदारी करण्यात पुर्ण वेळ वाया घालवला.

श्री. गंगाधर गाडे : सन्माननिय सभासदांनी प्रश्न उपस्थित केला की, गेल्या चार वर्षापासून आपण काहीही म्हटलेले नाही तेव्हा मी त्यांनाच सुचित करु इच्छितो की, चार वर्षापासून ते सन्माननिस सभासद प्रतिनिधित्व करतात तेथील विकास कामाचे प्रश्न सुटलेले नाहीत म्हणून त्या त्या भागातील लोक उपोषणास बसलेले आहेत.

श्री. बंडू प्रधान : आम्ही आमच्या वार्डातील प्रश्न सोडवू शकलो नाही यासाठी की संपुर्ण वेळ गुत्तेदारी करण्यात खर्च घातला.

श्री. नारायण फत्तेलष्कर: माझी एक सुचना आहे की, सन्माननिय सभासद श्री. गाडे यांनी प्रथमतः मा. आयुक्त यांना निवेदन द्यावे आणि त्याच्या आश्वासनानंतर उपोषण सोडवून पुढील बैठकीत उपोषणास बसलेल्या कार्यकर्त्याबाबत प्रश्न उपस्थित करावा तोपर्यंत चर्चा करु नये.

श्री. गंगाधर गाडे : शासनाकडून मागासवर्गीय (अनु. जाती/जमाती) वर्गाच्या विकासासाठी जो निधी देणगी म्हणून खर्च करण्यासाठी दिला जाते हा सर्व पैसा इतर वस्त्यामध्ये बिगर मागासवर्गीय खर्च केला जातो हा माझा आरोप आहे आणि त्यामुळे मागासवर्गीय झोपडपट्ट्यातील मुलभूत सुविधा पुर्ण होऊ शकलेल्या नाहीत. मा. आयुक्त यांना पत्रही दिलेले आहे की, प्रशासनाच्या वतीने याबाबत दखल घ्यावी आणि मनपाच्या एकुण खर्चाच्या उत्पन्नातील १५% अनुदान हे आर्थिकदृष्ट्या मागसलेल्या वस्त्यासाठी खर्च करावे. परंतु अद्यापही उत्तर प्राप्त झालेले नाही. शहरामध्ये संडास (कन्हर्शन) लाईन झोपडपट्टी भागासाठी योजना आखलेली होती. त्यामध्ये बऱ्याच भागात लाईन टाकण्यासाठी खड्डे खोदुन ठेवलेले आहेत. परंतु कनेक्शन अद्यापही झालेले नाही. म्हणजे शासनाकडून विमळणारे सर्व अनुदान विनाकारण खर्च न पडता त्याचा योग्य असा वापर होणे आवश्यक आहे आणि झोपडपट्टयांच्या

विकास कामासाठीच या अनुदानाचा उपयोग झाला पाहजे. यासाठी मी हा मुद्दा उपस्थित केलेला आहे. कोणताही भेद नसुन प्रशासनाने सर्वस्वी जबाबदारी योग्य रित्या सांभाळीत नाही हे मला लक्षात आणून द्यावयाचे आहे की, संजयनगर फुलेनगर किंवा आंबेडकर नगर भागामध्ये अद्यापही सुविधा केलेल्या नाहीत तर अशाच मागासवर्गीय भागातील स्मशानभुमी आहेत. उदा. भावसिंगपुरा, शहाबाजार, रमानगर अशा विविध ठिकाणी अद्यापही वॉल कंपाऊंड बांधण्यात आलेले नाहीत. या व्यतिरिक्त पाणी पुरवठा साफसफाई व्यवस्थित होत नाही. ज्या वेळेस कोणत्याही वर्तमानपत्रात एखादी मनपा विषयी बातमी प्रसिध्द झाल्यास प्रशासनानंतर खळबळून जागे होते व कामास लागते उदा. कुत्र्याविषयी, पाण्यामध्ये अळ्या निघतात ड्रेनेज लाईन फुटते या सर्व प्रश्नावर प्रशासनाने उशिर करु नये मी कोणत्याही सन्माननिय सभासदांना विरोध करत नाही. परंतु शासनाकडील मागासवर्गीय वस्त्यासाठी विविध विकास कामे करण्यासाठी जो खर्च (अनुदान) येतो तो सर्व इतर वस्तीत खर्च केला जातो हा माझा आरोप आहे. तेव्हा याबाबतीत काही कार्यकर्ते उपोषणास बसलेले आहेत. त्यांना दिलासा द्यावा ही विनंती.

श्री. रशिद मामु : सन्माननिय सभासद श्री. गाडे यांनी प्रशासनाच्या बाबतीत जी सुचना मांडली त्या संदर्भात स्थायी समितीचे अध्यक्ष यांनी सुध्दा उत्तर द्यावयास पाहिजे की, कोणत्या अनुदानाच्या खर्च कोणत्या ठिकाणी खर्च होतो हे पाहण्याची जबाबदारी स्थायी समितीची आहे.

श्री. अजिजुल्ला बेग : स्थायी समितीस कोणता खर्च कुठे होतो याची कल्पना नसते.

श्री. तकी हसन खान : आतापर्यंत पाच समितीचे अध्यक्ष झालेले आहेत त्यापैकी तीन अध्यक्ष हे दलित लोकांचे प्रतिनिधीत्व करणारे असून सन्माननिय सभासद श्री. गंगाधर गाडे त्यापैकी होत. तेव्हा त्याच्या कारकिर्दीत काय काय कामे झालीत याची माहिती द्यावी.

श्री. बंडू प्रधान : सन्माननिय सभासद श्री. गाडे यांनी सुचित केले की, आर्थिक दृष्ट्या मागसलेल्या वस्त्यासाठी १५% अनुदान आहे ते चुकीचे असून केवळ ५% अनुदान मागासवर्गीयांसाठी असून स्लम भागासाठी रु. १ कोटी १० लाखाचे अनुदान ठेवण्यात आलेले आहे आणि ते सर्व स्लम भागासाठी खर्च करण्यात आलेले आहेत. शहाबाजार येथील स्मशानभुमीच्या संदर्भात सन्माननिय सभासद श्री. मुजिब आलमशा खान व माझ्या वार्डातील अंतर्गत प्रश्न असल्याने प्रकरण पेंडींग आहे. परंतु इतर सनमाननिय सभासदांनी आपआपले वार्ड पहावे इतरांच्या वार्डात हस्तक्षेप करु नये अन्यथा आम्हाला सुध्दा हस्तक्षेप करता येऊ शकतो.

श्री. प्रदिप दत्त,

श्री. नारायण फत्तेलष्कर,

श्री. अजिजुल्ला बेग : एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करणे योग्य नसुन ही चर्चा येथेच संपवावी.

मा. महापौर : सन्माननिय सभासदांना सुचित करण्यात येते की, एकमेकांवर आरोप करणे ठिक नसून कोणता निधी कुठे खर्च होतो यावर चर्चा चालू होती.

श्री. अजित शेळके : सन्माननिय सभासदांनी आरोप केल्याप्रमाणे स्लम भाग सोडून इतर भागासाठी खर्च करण्यात आला तेव्हा कोणकोणत्या भागासाठी खर्च करण्यात आला याची तपशिलवार माहिती द्यावी स्लम भागाकरिता नेहरु रोजगार योजने अंतर्गत अपग्रेडेशन घराची योजना चार प्रभागाकरिता बाकी राहिलेली आहे. त्यामध्ये माझा प्रभाग येतो. यासाठी योग्य ती निधी उपलब्ध होणे साठी संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी. कन्वर्हशनची योजना पुर्ण झालेली आहे. या वर्षाचे बजेट संपले आहे अशी ओरड सध्या आहे यासाठी मा. आयुक्त यांचेशी चर्चा करावी किंवा पत्राने कळवावे की, यासाठी पुरेसा निधी विविध प्रभागातील कामासाठी उपलब्ध करुन द्यावा.

श्री. अजिमखान दादामिया : स्लाटर हाऊस (सिल्लेखाना) पडेगाव बाबत आतापर्यत काय कार्यवाही झाली या बाबतची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

जकात अधिक्षक(विशेष अधिकारी) : स्लाटर हाऊस पडेगाव येथील विविध कामाच्या संदर्भात दि. २० ऑगस्ट १९९२ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये विशेष अधिकारी म्हणून माझी नेमणूक झाली. त्यानुसार २७ ऑगस्ट रोजी तेथील कामाचे भुमिपुजन करण्यात आले. सप्टेंबर पासून तेथील कामास सुरुवात झालेली आहे मी दररोज दोन तीन घंटे प्रत्यक्षात हजर असतो कामाची प्रगती आहे. १९८२ ते १९९२ पर्यंत कामाची सुधारणा झालेली नाही. परंतु शहर अभियंता यांचे सहकार्याने कम्पाऊंडवाल ३८०० स्क्वे फुटाचे काम झालेले आहे. चार पाच दिवसापर्यंत बाकीचे काम पुर्णत्वास जाण्याची शक्यता आहे. २००० फुट पाईप लाईनचे काम पुर्ण झालेले आहे. पंप हाउुस पासून पाण्याच्या टाकीपर्यंत पाण्याच्या टाकीचे काम सुरु झालेले आहे. लाईटचे स्ट्रीट पोल साठी मनपोन रु. ३,७३,१००.०० चा चेक विद्युत मंडळास पाठविलेला आहे. त्या संदर्भात प्रत्यक्षात भे्ट घेतली असता तीन चार दिवसात त्या ठिकाणी खड्डे खोदकाम करुन पंधरा दिवसांपर्यंत काम पुर्ण होण्याची शक्यता आहे. बरेचसे कामे एका महिन्याच्या आत होतील अशी मला आशा आहे.

श्री. रशिद मामु : काही अडचणी असल्यास त्या सुचना मांडाव्यात.

जकात अधिक्षक (विशेष अधिकारी) : सध्या तरी सहकार्य विविध विभाग अधिकाऱ्यांकडून मिळत आहे. काही अडचणी असल्यास मी सभागृहाला माहिती देईन.

सर्वश्री रशिदमामु,
अविनाश कुमावत,
प्रदिप जैस्वाल : विशेष अधिकारी म्हणून चांगले काम करण्याचे कार्य पार पाडित असल्याबाबत एक आगाऊ वेतनवाढ देण्यात यावी.

श्री. शंकर मगर: स्लम भाग असो की, कुठलाही निधी उपलब्ध असल्यास स. सदस्यांनी सुचना केल्यानंतर कामाला सुरुवात होते. उपोषण करायला बसल्याची गरज पडत नाही. ज्या त्या भागासाठी चे अंदाजपत्रक तयार झालेले आहेत त्याप्रमाणे कामास सुरुवात होते. निवडणुका जवळ आल्या त्यामुळे उपोषणाचे अनेक प्रकार घडतील आपण आपले कामे आश्वासन देऊन चालू ठेवावे.

श्री. अलफखान : विशेष अधिकारी म्हणून श्री. शमीम आफंदी यांच्यावर पडेगाव कत्तलखान्याच्या बाबत जी जबाबदारी सभागृहाने टाकली आणि त्यांचे कार्य

व्यवस्थित चालु आहे. त्या प्रित्यर्थ एक आगऊ वेतनवाढ देणे ऐवजी दोन वेतनवाढी सभागृहाने मंजुरी द्यावी.

श्री. गंगाधर गाडे : स. सदस्य श्री. शंकर मगर यांनी सुचित केल्याप्रमाणे मला म्हणावयाचे आहे की, मी आपल्याकडे जी स्लम भागाच्या विकास कामांच्या संदर्भात यादी दिलेली आहे त्या त्या भागामध्ये शिवसेना सदस्यांनी दलित वस्त्यांमध्ये काहीही केलेले नाही असा माझा आरोप आहे. (यावेळी सेना सदस्य जोरजोरात बोलतात निषेध निषेध काहीही ऐकु येत नाही)

मा. महापौर : सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, सभागृहात शांतता राखावी स. सदस्य श्री. गाडे यांनी असे बोलणे योग्य नाही.

सर्व श्री.

प्रदिप जैस्वाल,

कचरु नवपुते, जयवंत ओक,

महादेव सुर्यवंशी : कुठल्याही प्रश्नावर आरोप न करता स. सदस्य श्री. गाडे यांनी केलेल्या आरोपाबद्दल सभागृहात माफी मागावी.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, सर्वांनी सभागृहात शांतता राखावी.

श्री. कचरु नवपुते : स. सदस्य श्री. गाडे यांनी माफी मागावी.

श्री. मधुकर शिदे : स. सदस्य श्री. गाडे यांनी आपले शब्द मागे घ्यावेत आणि आमच्या वार्डात येऊन पाहणी करावी की स्लम भागासाठी आम्ही काही केले किंवा नाही.

श्री. प्रकाश जावळे : स्लम भागातील विकास कामांच्या संदर्भात प्रशासन कुचकामी होते असे आपले म्हणणे आहे. (यावेळी सभागृहात स. सदस्य मध्ये एकमेकांत आवाज चालू असतो. काहीही ऐकु येत नाही.)

मा. महापौर : सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, सभागृहात शांतता राखावी स. सदस्य श्री. गाडे यांनी सभागृहात जो आरोप केला त्याबाबतचे इतिवृत्त वगळण्यात येते. त्याचप्रमाणे स. सदस्यांनी शिवसेना बाबत केलेले वक्तव्याबाबत मी स्वत: दिलगीरी व्यक्त करतो.

श्री. गंगाधर गाडे : मी असे म्हटलेले आहे की, अनेक दलित वस्त्या ज्या शिवसेनेच्या कक्षात आहेतत्या भागामध्ये शिवसेनेच्या स. सदस्यांनी काम केलेले नाही. असा माझा आरोप होता व बोललेला आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : अशा प्रकारचे स. सदस्यांनी वक्तव्य करणे योगय नसून ते राजकारण करीत आहेत. (यावेळी मध्येच एका स. सदस्याचा आवाज, कोरम पुर्ण नाही)

श्री. गंगाधर गाडे : माझ्या वक्तव्यात बदल नाही व केलेला आरोप स्पष्ट आहे की, ज्या दलित वस्त्या शिवसेना नगरसेवकांच्या ताब्यात आहेत त्या भागात स.सदस्यांनी काम केलेल नाही. (यावेळी पुन्हा सेना सदस्य जोरजोराने बोलतात.)

मा. महापौर : स. सदस्य श्री. गंगाधर गाडे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण सभागृहात असे वक्तव्य करु नये.

श्री. अविनाश कुमावत,

श्री. जयवंत ओक : स. सदस्य श्री. गंगाधर गाडे यांनी सभागृहाशी माफी मागावी (यावेळी स. सदस्य श्री. गंगाधर गाडे यांचा निषेध म्हणून सभात्या करतात. वेळ अंदाजे ठिक १:०५ वाजता)

श्री. अजिज जहागिरदार : सेना सदस्यांनी हिंदु वस्तीत कामे केलेली नाहीत तर मुस्लीम वस्तीत काय करणार?

सौ. लता दलाल : माझ्या वार्डात काही पिसाळलेल्या कुत्र्यांनी अनेक लोकांना चावा घेऊन जखमी केलेले आहेत.

श्री. अजिज जहागिरदार : कोरम नाही तेव्हा सभा संपविण्यात यावी.

मा. महापौर : सभा संपविण्यात येते.

यानंतर "जन गन मन" या राष्ट्र गीताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.